63



प्रा. रा. द. रानडे

एक कुशल प्राध्यापक व नामवंत ग्रंथकार

Professor R.D. Ranade as a Teacher and Author

या बी. आर. कुलकर्णी यांच्या इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद

अनुवादिका

सौ. पद्मा कुलकर्णी

अनुग्रहशताब्दी-प्रकाशन

२००१

प्रा. रा. द. रानडे

एक कुशल प्राध्यापक व नामवंत ग्रंथकार

Professor R. D. Ranade as a Teacher and Author

या बी. आर. कुलकर्णी यांच्या इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद

अनुवादिका

सौ. पद्मा कुलकर्णी

अनुग्रहशताब्दी-प्रकाशन

२००१

पहिली आवृत्ती २००१

प्रकाशिका
सौ. अश्विनी जोग व सौ. अंजली कन्नूर
TF 1 मंदार अपार्टमेंटस्, १०१ रेल्वे लाइन्स
सोलापूर ४१३ ००१

© प्रकाशिका

मूल्य रु. ५०/-

अक्षरजुळणी
सौ. उषा पसारकर
केतकी फोटो टाईप सेटर्स
१२६ ब, मार्कंडेय नगर
सोलापूर ४१३ ००३

मुद्रक
विनंद ऑफसेट प्रिंटर्स
१०८ शुक्रवार पेठ
सोलापूर ४१३ ००२

अनुक्रमणिका

अनुवादाबद्दल काही थोडेसे ७
गुरुदेवांच्या ग्रंथांच्या इथे वापरलेल्या आवृत्त्या १२
काही पारिभाषिक संज्ञांचे इंग्रजी पर्याय १४

प्रकरण पहिले अलाहाबाद येथील जीवनाकडे दृष्टिक्षेप १८
१. जनमानसापुढील व्यक्तिचित्र १८
२. कृष्णा ते गंगा २०
३. कुशाग्र बुद्धिमत्ता २२
४. अनश्नन् अन्यः अभिचाकशीति। २४
५. सुसंवादावरील प्रेम २५
६. आध्यात्मिक लागेबांधे २७
७. ब्रह्मरसाच्या पारण्याला आलेला पाहुणा २९

प्रकरण दुसरे कुशल प्राध्यापक ३३
पूर्वार्ध : अध्ययनपद्धती ३३
१. मानसशास्त्रीय सिद्धांतांची व्यवहारात गुंफण ३३
२. भाषाशास्त्राची झालर ३९
३. अभ्यासाचे सूत्र ४१
४. व्याख्यानांची पूर्वतयारी ४४
५. ताबडतोब वाचून संपवणे ४८
६. अध्यात्मविद्यापीठ ५१
(अ) संस्थेची उद्दिष्टे ५१
(आ) आठ खंडात्मक भारतीय तत्त्वज्ञानाच्या इतिहासाची योजना ५३

(इ) सोळा खंडात्मक भारतीय तत्त्वज्ञानाच्या इतिहासाची योजना ५३

उत्तरार्ध : अध्यापनपद्धती ५४

१. तत्त्वज्ञानावरील प्रेम ५४

२. मानसशास्त्रावरील प्रेम ५६

३. शिकवता शिकवता ६०

४. विद्यार्थ्यांच्या टिपणाचा नमुना ६२

५. काही आनुषंगिक गोष्टी ६५

६. हलके फुलके क्षण ६९

७. परीक्षकाच्या भूमिकेत ७१

८. विद्यार्थ्यांची सुखउन्नती ७२

प्रकरण तिसरे नामवंत ग्रंथकार ७६

पूर्वार्ध : ग्रंथांचे सिंहावलोकन ७६

१. बिकट वाट ७६

२. ग्रंथांचा कालक्रम ७७

३. जावक पत्रे ८१

४. अलिखित संवाद ८१

५. लेखनाची वैशिष्ट्ये ८२

(अ) आपुली स्थिती अनुमाना येवोंच नेदी ८२

(आ) विधायक-मीमांसा-पद्धती ८३

(इ) कांटचा प्रभाव ८४

(ई) ज्ञानविज्ञानतृप्तात्मा ८७

(उ) व्यापकता व आंतरिक सुव्यवस्था ८८

(ऊ) क्रमयोग किंवा अनंतस्पर्शी-आसन्नीकरण-न्याय ९१

(ए) पारस्परिक कारणता ९३

(ऐ) आध्यात्मिक उद्देश ९४
(ओ) शैली ९६

६. ग्रंथांच्या विवेचनाची रूपरेषा ९७

उत्तरार्ध : ग्रंथांचे अंतरंग ९८
१. तुजवीण रामा मज कंठवेना ९८
२. संपादित ग्रंथ १०१
साइन्स ऑफ द टाइम्स अँड कॅरेक्टरिस्टिक्स
(थॉमस कार्लाइल-लिखित) १०१
३. लेखसंग्रह व स्वतंत्र लेख १०४
(अ) नित्यनेमावलीची प्रस्तावना १०४
(आ) फिलॉसॉफिकल अँड अदर एसेज, भाग १ १०४
(इ) दि कन्सेप्शन ऑफ स्पिरिच्युअल लाइफ इन
महात्मा गांधी अँड हिंदी सेंटस् १०८
(ई) एसेज अँड रिफ्लेक्शन्स ११०
(उ) हें प्रचीतीचें बोलणें ११३
(ऊ) दि इव्होल्यूशन ऑफ माय ओन थॉट ११४
४. तत्त्वज्ञानावरील टिपणरूप ग्रंथ ११५
स्टडीज इन इंडियन फिलॉसॉफी ११५
५. साक्षात्कारमार्गावरील ग्रंथ ११६
(अ) प्राक्कथन ११६
(आ) मिस्टिसिझम इन महाराष्ट्र ११९
चार वचनामृते १२३
(इ) पाथवे टु गॉड इन हिंदी लिटरेचर १२५
परमार्थसोपान (हिंदी) १३२

(ई) पाथवे टु गॉड इन कन्नड लिटरेचर १३५
कन्नड परमार्थसोपान १३९
(उ) एकनाथवचनामृत १४०
(ऊ) परमार्थमंदिर १४१
६. प्रस्थानत्रयीवरील ग्रंथ : तत्त्वज्ञान व साक्षात्कारशास्त्र १४२
(अ) ए कन्स्ट्रक्टिव्ह सर्व्हे ऑफ उपनिषदिक फिलॉसाफी १४२
(आ) दि क्रिएटिव्ह पीरियड १४७
(इ) वेदान्त दि कल्मिनेशन ऑफ इंडियन थॉट १४९
(ई) ध्यानगीता १५५
(उ) दि भगवद्गीता अॅज ए फिलॉसॉफी ऑफ गॉड-रिअलायझेशन १५९

परिशिष्टे

१. संक्षिप्त टिपणांचे दोन नमुने १७३
२. गुरुदेवांचे हस्ताक्षर – इंग्रजी, ग्रीक व देवनागरी १७८
सूची १८५

अनुवादाबद्दल काही थोडेसे

श्री गुरुदेव रा. द. रानडे यांची जन्मशताब्दी निंबाळ येथे १९८६ साली साजरी झाली. नामसाधन, भजन, प्रवचन-कीर्तन-भक्तिसंगीत असे भरगच्च कार्यक्रम ७ जुलै ते ९ जुलै ह्या तीन दिवशी मोठ्या आनंदात झाले. या प्रासंगिक सोहळ्यांच्या जोडीला दहा पुस्तकांचे प्रकाशन झाले. या दहांमध्ये प्रोफेसर आर. डी. रानडे ॲज ए टीचर ॲंड ॲथर या प्रा. बी. आर. कुलकर्णी यांनी लिहिलेल्या पुस्तकाचा समावेश होता. आज त्या पुस्तकाचा मराठी भावानुवाद वाचकांपुढे ठेवत आहे. १९८६ च्या आधी प्रकाशित झालेल्या गुरुदेवांच्या पुस्तकांचा आढावा प्रा. कुलकर्णी यांच्या पुस्तकात घेतलेला होता. पण १९८६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या स्टडीज इन इंडियन फिलॉसॉफी व हें प्रचीतीचें बोलणें या दोन पुस्तकांचा परामर्श तिथे येणे शक्य नव्हते. प्रस्तुतच्या भावानुवादात ती दोन पुस्तके विचारात घेतली आहेत.

एका भाषेतील विचार दुसऱ्या भाषेत मांडणे सोपे नसते. बोलताना काय किंवा लिहिताना काय आपण आपल्या मातृभाषेच्या ढंगात आपले म्हणणे पुढे मांडतो. भारत सरकारच्या सेवेतील एक जुने अधिकारी के. पी. एस. मेनन यांनी एक किस्सा सांगितला आहे. ते सुट्टीत केरळला जात. त्यांचा एक नातेवाईक बाजारात जाण्यास निघे आणि जाताना विचारी - 'What what is to be brought from the market'? बाजारातून 'काय काय' आणायचे आहे या मराठी छापाचेच हे वाक्य आहे! आपल्या भाषेची शैली आपण नकळत दुसऱ्या भाषेत घुसवत असतो.

ज्या मजकुराचे भाषांतर करायचे आहे, त्याचा नेमका आणि तंतोतंत अर्थ अनुवादकाला कळला पाहिजे. मूळ लेखकाच्या मनातले सगळे काही आपल्याला समजले आहे अशी त्याची आग्रही भूमिका असता कामा नये. मूळ मजकुराचे मर्म जाणून घेऊन दुसऱ्या भाषेत त्या भाषेच्या शैलीत मांडता

आले पाहिजे. हे करताना मूळ वाक्याचे सौंदर्यही टिकवले पाहिजे हा एक भाग आहेच. नव्या भाषेचा साज जुन्या मजकुरावर जिथल्या तिथे चढणे हे अनुवादकाच्या कौशल्याचे गमक आहे. गीतारहस्यात लोकमान्यांनी पाश्चात्त्य लेखकांची मते कैक जागी घातली आहेत. ती तात्त्विक परिभाषेत असूनसुद्धा इतक्या सहजसुंदर मराठीत मांडली आहेत की पाश्चात्त्य लेखकांची नावे गाळून टाकली तर हे विचार भारतीयांचेच आहेत असे वाटावे. "टिळकांनी तत्त्वज्ञानाची महाराष्ट्रभाषेमध्ये उत्कृष्ट परिभाषा उत्पन्न केली व शुद्ध रीतीने महाराष्ट्र भाषेतही तात्त्विक प्रश्नांचा सांगोपांग ऊहापोह करण्याची पद्धत घालून दिली", असे उद्‌गार गुरुदेवांनी काढले आहेत (लो. टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका, संपादक, स. वि. बापट, खंड २, पृ ३४). 'यतो वाचो निवर्तन्ते, अप्राप्य मनसा सह' याचा भावार्थ 'मनेंसिं मुरडली वाचा' या तीन शब्दांत ज्ञानेश्वरांनी आणला आहे. तसे पाहिले तर संस्कृतात थोडक्या शब्दांत अर्थाची अभिव्यक्ती करता येते. पण इथे ज्ञानेश्वरांनी त्याच्यावरही कडी केली आहे. प्रत्यक्ष शारदेचे लावण्यरत्नभांडार समोर उघडून बसलेल्या त्या शब्दसम्राटाची बरोबरी कोण करणार? ही अतिशय मोठी उडी झाली. निदान मूळ लेखकाचा आशय नव्या भाषेत आणता आला म्हणजे निरोप्याचे काम आपण यशाशक्ति केले असे मानावयास हरकत नाही.

भाषांतर करण्याच्या कलेची एक शास्त्रशुद्ध चिकित्सा 'भगवद्‌गीतानुवाद' या अप्रतिम ग्रंथात दिसून येते. (Bhagavadgitanuvada, by Winand M. Callewaert and Shilanand Hemraj, Satya Bharati Publication, Purulia Road, Ranchi, 834001) या पुस्तकात ७१-७५ या पृष्ठांवर ही चर्चा आहे. बेल्जिअम देशातील प्रचंड अभ्यासू अशा दोन लोकांचा हा प्रबंध आहे. भाषांतराच्या दोन पद्धतींचे त्यांनी विश्लेषण केले आहे.

१ शब्दशः भाषांतर (Formal equivalence) म्हणजे शब्दाला शब्द ठेवणे. प्रत्येक शब्दाचे भाषांतर झालेच पाहिजे अशी कोशिस करणे. जॉर्ज

थीबो यांची शांकरभाष्य व रामानुजभाष्य यांची इंग्रजी भाषांतरे या कोटीतील आहेत. मुळातला एकही शब्द गाळण्याचा आपल्याला अधिकार नाही ही यामागची भूमिका आहे. भाषांतर नीरस किंवा क्लिष्ट झाले तरी इथे पर्वा नसते. नामूलं लिख्यते किंचित् नानपेक्षितमुच्यते (बिनबुडाची विधाने करायची नाहीत आणि अप्रस्तुत गोष्टी आणायच्या नाहीत) असे मल्लिनाथांच्या टीकेचे वैशिष्ट्य सांगतात. शब्दशः केलेले भाषांतर हाच कित्ता गिरवते. अनुवादाला आखीव चौकट हवीच असे हा पक्ष म्हणतो. या पद्धतीत एक गुण निश्चित आहे. इथे अनुवादकाला आपल्या पदरचे काही घुसडता येत नाही; स्वतःला पसंत असेल तो अर्थ मूळ लेखकाच्या डोक्यावर लादता येत नाही. मात्र या प्रकारचा अनुवाद कृत्रिम होतो. शब्दाला शब्द ठेवण्याने कधीकधी मजकुराचा गाभाच हातातून निसटतो. 'आईचं आतडं' हा वाक्प्रचार मराठी मनाला साद घालतो, पण इंग्रजीत भाषांतर करताना mother's intestine म्हटले तर इंग्रजी माणूस आ वासून पाहात राहील. शब्दशः भाषांतरात ही मोठीच उणीव आहे.

२ अर्थशः अनुवाद किंवा भावानुवाद (Dynamic equivalence) हा त्याच्यावर तोडगा आहे. इथे मुळातल्या वाक्याची रचना बदलते, काही शब्दांची वजाबाकी तर काही शब्दांची बेरीज करावी लागते. पण लेखकाचा आशय स्पष्ट होतो. इथे अनुवादक मूळ मजकुराच्या पोटात शिरून त्याचा उद्देश आत्मसात करतो व मग दुसऱ्या भाषेत तो मांडतो. हे साधण्याची रीत या दोन लेखकांनी सुचवली आहे. पहिल्या भाषेतील वाक्यातील कल्पना वेगवेगळ्या करणे. त्यांचा भावार्थ असलेले दुसऱ्या भाषेतील शब्द किंवा वाक्यांश शोधणे व मग ते दुसऱ्या भाषेच्या शैलीत जुळवून घेणे. ही एक तोड-जोड आहे. एक उदाहरण पाहू. तापल्या तव्यावर पोळी भाजून घ्यावी असे आपण म्हणतो. इंग्रजी भाषांतर करताना तवा आणि पोळी आणून काय उपयोग? 'तापलेला तवा' याचा भावार्थ 'आलेली संधी' आणि 'पोळी

भाजून घेणे' म्हणजे 'संधीचा उपयोग करणे.' मग Bake your bread while the plate is hot असे शब्दशः भाषांतर न करता Make the most of any opportunity that comes your way असे अर्थशः रूपांतर करावे. ज्याचे इंग्रजी भाषेवर प्रभुत्व आहे तो अनुवादक आणखी पुढे जाऊन Make hay while the sun shines असे म्हणेल. पण म्हणीला म्हण प्रत्येक वेळेला मिळेलच असे नाही. ते अनुवादकाच्या व्यासंगावर अवलंबून राहील. दोन्ही भाषांची पार्श्वभूमी, त्या त्या देशांचा सांस्कृतिक इतिहास, पुराणकथा, सामाजिक चालीरीती या गोष्टींचे ज्ञान अनुवादकाला कमालीच्या फायद्याचे ठरते. मग तो Formidable vow याचे भाषांतर भीष्मप्रतिज्ञा असे करेल, Utopiaला रामराज्य म्हणेल आणि 'शेंडेफळा'ला A fruit at the top of the tree असे म्हणून झाडावर न चढवता साध्या शब्दात last born child म्हणून मोकळा होईल. गुरुदेवांचा ग्रीक भाषेचा अभ्यास, इंग्रजी वाङ्मयात नेहमी हजर असणाऱ्या पुराणकथांशी दाट परिचय, बायबलवरील प्रभुत्व या गोष्टींनी त्यांची भाषांतरे मनाची पकड घेतात. भाषांतरापेक्षा रूपांतर किंवा भावांतर करावे असे ते सांगत. अनुवादकाची शब्दसंपत्ती, भाषेचे लालित्य, विषय खुलवण्याचे कसब या गोष्टी अनुवादाचा दर्जा वाढवतात. प्रत्येक अनुवादकाला हे सर्व अवगत असतेच असे नाही. त्याने मूळ पुस्तकाचा आशय दुसऱ्या भाषेत सुबोध करून सांगण्याचा माफक उद्देश ठेवला तरी पुष्कळ झाले. अर्थशः भाषांतरात अनुवादकाने स्वतःच्या पदरचे काही घालण्याचा धोका असतो. पण शेवटी काही गोष्टी त्याच्यावर सोपवणेच भाग असते. असो.

गुरुदेवांचे विज्ञानावर फार प्रेम होते. वैज्ञानिक सत्ये म्हणजे ईश्वराच्या शक्तीचा आविष्कार असे त्यांचे म्हणणे होते. विज्ञानाचा विषय Professor R. D. Ranade as a Teacher and Author या पुस्तकात हाताळला गेला नव्हता. ती त्रुटी इथे भरून काढली आहे. आणखी एक गोष्ट इथे नवीन घातली आहे. गुरुदेवांवर इमॅन्युएल कांट या जर्मन तत्त्वज्ञाचा फार प्रभाव

होता. त्याचे शब्द, कल्पना, सिद्धांत, गुरुदेवांनी भारतीय तत्त्वज्ञानात कौशल्याने गुंफल्याचे लक्षात येते. त्याही विषयाला प्रस्तुत अनुवादात स्थान दिले आहे. कांटच्या शब्दांचा अर्थ कळावा म्हणून भारतीय परिभाषेत ते आणले आहेत पण हे करताना त्यांच्यावरचा कांटचा शिक्का पुसला जातो, 'Categorical Imperative' या शब्दांनी जे चित्र डोळ्यांपुढे उभे राहते ते 'निरपेक्ष आदेश' या बुळबुळीत शब्दांनी उभे रहात नाही. कांटच्याच शब्दांबाबत नव्हे तर इतर पारिभाषिक संज्ञांच्या वापरातही असेच होते. तेव्हा मूळ शब्दप्रयोगही समजावे व अर्थही उमजावा म्हणून प्रस्तुत पुस्तकाच्या सुरुवातीस मराठी-इंग्रजी अशी एक सूची जोडली आहे. तत्त्वज्ञान कितीही सोपे करायचे म्हटले तरी काही थोडी क्लिष्ट परिभाषा येणारच, शिवाय गुरुदेवांचे विचार सर्वंकष असल्याने एक नव्हे, अनेक विज्ञानशाखांतले पारिभाषिक शब्द त्यांच्या वाङ्मयात आले आहेत. त्या शब्दांकडे दुर्लक्ष करून चालत नाही. असो. परिशिष्टात गुरुदेवांच्या इंग्रजी, ग्रीक व देवनागरी अक्षरांचे नमुने दिले आहेत. त्यांच्या टिपणांचे नमुनेही दिले आहेत.

कोणतेही लिखाण प्रसिद्ध करायचे ठरले की त्याची सुवाच्य मुद्रणप्रत श्री ना. शं. कुलकर्णी यांनी करायची असा आता एक पायंडा पडला आहे. आनंदाने व उत्साहाने त्यांनी मुद्रणप्रत केली. त्यांच्याबद्दल वाटणारी कृतज्ञता शब्दांनी व्यक्त करता येत नाही.

सोलापूर
गुरुदेव रानडे जयंती
३ जुलै २०००

सौ. पद्मा कुलकर्णी

Shri Gurudev R. D. Ranade's (Nimbal - Dist Bijapur - Karnataka) contribution for Indian Regional Philosophers - Mystics and other World Religious Heads (Mystics - Philosphers). His ~~books~~ Sacred books available at his Ashram - NIMBAL. PIN 586211

1 Signs of the Times and Characteristics, by Thomas Carlyle, Edited by R. D. Ranade, Humphrey, Milford, Oxford University Press, Bombay, Second Edition, 1917

2 A Constructive Survey of Upanishadic Philosophy, Bharatiya Vidya Bhavan, Chowpatty, Bombay - 7, Second edition, 1968

3 Jnaneshwara Vachanamrita, Published by Prof. R. D. Ranade, Poona, First edition, 1926.

4 Tukarama Vachanamrita, Published by Prof. R. D. Ranade, Poona, First edition, 1926

5 Ramadasa Vachanamrita, Published by Prof. R. D. Ranade, Poona, First edition, 1926

6 Santa Vachanamrita, Published by Prof. R. D. Ranade, Poona, First edition, 1927

7 The Creative Period (in collaboration with Dr. S. K. Belvalkar), Published by Prof. S. K. Belvalkar, Bilva-kunja Publishing House, Poona, 1927

* 8 Mysticism in Maharashtra, Published by A. V. Patwardhan, at the Aryabhushan Press, Poona, 1933 (Review of all religious mystics of the world

* 9 The Evolution of My Own Thought, an Article, published in Contemporary Indian Philosophy, Edited by S. Radhakrishnan and J. H. Muirhead, George Allen and Unwin, London, Revised and enlarged Second edition, 1952

* 10 Pathway to God in Hindi Literature, Adhyatma Vidya Mandir, Sangli, 1954

11 Paramartha Sopana (Hindi), Adhyatma Vidya Mandir, Sangli, 1954

* (34) गोदगुद्धा - Edited by Gurudev
English Translation - Smt Sucheta Bhagwat & Suresh Gajendragadkar

12 Ekanatha Vachanamrita, Venus Prakashan, Poona, Second edition, 1965

13 Philosophical and Other Essays, Part I, Shri Gurudev Ranade Satkar Samiti, Jamkhandi, 1956

* 14 The Conception of Spiritual Life in Mahatma Gandhi and Hindi Saints, Gujarat Vidya Sabha, Ahmedabad, 1956

* 15 The Bhagavad-gita as a Philosophy of God-realisation, Nagpur University, Nagpur, 1959

* 16 Pathway to God in Kannada Literature, Bharatiya Vidya Bhavan, Chowpatty, Bombay, in collaboration with Karnatak University, Dharwad, Third edition, 1989

** 17 Dhyanagita, Shri Gurudev Ranade Ashram, Nimbal, R. S. Dist Bijapur, (Karnatak), 1961 The fundamental Thoughts * of B-Gita for Meditation.

18 Kannada Paramartha Sopana, Karnatak University, Dharwar, Second edition, 1969

19 Paramartha Mandir, Shri Gurudev Paramartha Mandir, Jamkhandi, 1963

20 Essays and Reflections, Bharatiya Vidya Bhavan, Chowpatty, Bombay, 1964

21 Vedanta, the Culmination of Indian Thought, Bharatiya Vidya Bhavan, Chowpatty, Bombay, 1970

22 Studies in Indian Philosophy, Maharashtra State Board of Literature and Culture, Mantralaya, Bombay 400 032, 1986

** 23 हें प्रचीतीचें बोलणें, Shri Gurudev Ranade Samadhi Trust, Nimbal R. S. Dist. Bijapur, (Karnatak), 1986

24. Carlyle "The signs of time and characteristics. (1916).
25. A Philosophy of Spirit" Presidential address of the 13th. Indian Philosophical Congress 1937-38.
26. Pamphlets on Aristotle, Parmenides, Heraclitos and other Greek philosophers (27) श्रीशंकराचार्यांचा आत्मबोधावरील (28) गीताबोधावरील (29) परमार्थाचे व्यावहारिक (1957) (30) स्वानुभवाचे आणखी काही विचार (31) Reflections - (his college days thoughts - Philosophy religion Psychology (human), socialism, politics, etc)
(31) Aristotle's criticism of Plectus (32) Bhagavatamrutam.
(33) नित्यबोधावली (Nimbal Ashram - spiritual practice schedule)

काही पारिभाषिक संज्ञांचे इंग्रजी पर्याय

अतिनीतिवाद	- Supermoralism
अतिमानव	- Superman
अतीतत्ववाद	- Transcendentalism
अत्यणुकलन	- Infinitesimal calculus
अद्‌भुत	- Sublime
अनवस्था प्रसंग	- Infinite regress
अनुभवपूर्व	- A Priori
अनेकचिदणुवाद	- Pluralistic spiritualism
अनंतस्पर्शरेषा	- Asymptote
अनंतस्पर्शी-आसन्नीकरण-न्याय	- Asymptotic approximation
अपसामान्य मानसशास्त्र	- Abnormal psychology
अर्थापत्ती (धरून चाललेली कल्पना)	- Hypothesis, supposition
अविचलता	- Ataraxia
अविव्हलता	- Apathia
अहं ब्रह्मास्मि	- I am I
आकस्मिक सत्य	- Contingent truth
आकृती व पार्श्वभूमी	- Figure and ground
आत्मनो मोक्षार्थं जगद्धिताय च	- Perfection of oneself and happiness of others
आध्यात्मिक कर्ममार्ग	- Spiritual activism
आध्यात्मिक गुरुत्वाकर्षण	- Spiritual gravitation
आवश्यक सत्य	- Necessary truth
ईश्वरयुक्तिदोष	- Argumentum ad theonem

उद्दीपन	- Stimulus
उभयसुखवाद	- Eudaemonism
ऊर्जा-संरक्षण	- Conservation of energy
कलाभिरुचीची मीमांसा	- Critique of Judgment
कोटी	- Category
क्रमयोग	- Asymptotic approximation
गतिज ऊर्जा	- Kinetic energy
चिद्वादखंडन	- Refutation of Idealism
ज्ञाता	- Synthetic Unity of Apperception
तंत्रिका आवेगाचा वेग	- Velocity of a nerve impulse
तर्काभास	- Logical fallacy, paralogism
तात्त्विक संविधान	- Philosophical syllogism
तार्किक विभाजन	- Logical division
दिव्यीकरण	- Divinisation
द्वंद्वात्मक पद्धत	- Dialectical method
द्वंद्वात्मक युक्तिवाद	- Antinomy
नयाभास	- Antinomy
निःश्रेयस्	- Summum Bonum
निगामी सारणी	- Deductive system
निर्विशेष वस्तू	- Noumenon, Thing-in-itself
निष्काम कर्म	- Duty for the sake of Duty
नैगमनिक निश्चितता	- Deductive certainty
पक्षावयव	- Minor premise
परस्परावलंबित्व	- Reciprocal causality
परामानसिकीय अनुसंधान	- Psychical research
परायत्तता	- Heteronomy

पारस्परिक कारणता	- Reciprocal causality
पूर्वलक्षी निरोधन	- Retroactive inhibition
प्रक्षिप्ततावाद	- Interpolationism
प्रतिवाद	- Antithesis
बौद्धिक ईश्वरवाद	- Rational theology
मध्यस्थ्याचे कार्य	- Schematism
मनोविकलन वाद	- Psychoanalysis
माघार येणे	- Regress
मीमांसा	- Critique
मूर्तकल्पी व्यक्तित्वप्रकार	- Eidetic type of personality
मूर्धन्यभाव	- Master sentiment
रचनावादी युक्तिवाद	- Teleological argument
रामराज्य	- Kingdom of Ends
लोकभावना-युक्तिदोष	- Argumentum ad populem
वर्तनवाद	- Behaviourism
वस्तुनिष्ठता	- Objectivity
वाद	- Thesis
विज्ञानाचे तत्त्वज्ञान	- Philosophy of science.
विधायक-मीमांसा-पद्धती	- Critical and constructive method, method of constructive criticism
विनिमय-नियम	- Law of exchange
विप्रतिषेध	- Antinomy
विरोधाभास	- Antinomy
विश्लेषण	- Analysis
विश्वशास्त्रीय युक्तिवाद	- Cosmological argument

व्यक्तित्व-प्रकार	- Personality types
व्यक्ति-युक्तिदोष	- Argumentum ad hominem
व्यावहारिक कर्ममार्ग	- Phenomenal activism.
व्यावहारिक बुद्धीची मीमांसा	- Critique of Practical Reason
शुद्ध बुद्धीची मीमांसा	- Critique of Pure Reason
श्रेणित वर्गीकरण	- Classificatory series
संवाद	- Synthesis
संश्लेषण	- Synthesis
संकल्पनांतर	- Regress
संक्रमण	- Transfer
सत्ताशास्त्रीय युक्तिवाद	- Ontological argument
समष्टिवाद	- Gestaltism
समाकल्पन	- Apperception
समूहमन	- Group-mind
सहयोजनवाद	- Associationism
साध्यावयव	- Major premise
सामान्यीकरण	- Generalisation
सुसंवाद	- Harmony
स्वभाववाद	- Naturalism
स्वसंवित्	- Self-consciousness
स्वायत्तता	- Autonomy

प्रकरण पहिले

अलाहाबाद येथील जीवनाकडे दृष्टिक्षेप

१ जनमानसापुढील व्यक्तिचित्र

प्रा. रामचंद्र दत्तात्रेय रानडे यांच्या अलाहाबाद येथील जीवनाकडे अगदी ओझरता दृष्टिक्षेप जरी टाकला तरी एकदम डोळ्यात भरते की ते जीवन अध्ययन व अध्यापन या ब्रह्मकर्मांत पूर्णपणे गढून गेले होते. याच्यामागे दडलेल्या सखोल व समृद्ध अशा अंतरंगाचे दर्शन व्हायचे ते क्वचितच. तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक हीच त्यांची भूमिका तिथल्या लोकांच्या मनात ठाम होती. याच्याही पलीकडे आणखी काही असेल अशी त्यांना कल्पना यावी तरी कशी? लोकांचे डोळे साधारणपणे खिळून राहत ते दोन गोष्टींवर. एक तर त्यांच्या शैक्षणिक जीवनातील उज्ज्वल यशावर, किंवा दुसरे तर अलाहाबाद विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान शाखेतील अध्यापनाचा दर्जा त्यांनी एकदम उंचावला होता, त्याच्यावर. शिक्षणक्षेत्रानेच त्यांचे जीवन अंतर्बाह्य व्यापले आहे या भ्रमातच लोक होते. याला कारण तसेच आहे. गुरुदेवांनी आपले आध्यात्मिक जीवन पूर्णपणे झाकून ठेवले होते. वस्तुस्थिती मात्र बरोबर उलटी होती. ईश्वरसाक्षात्कार हेच त्यांच्या जीवनाचे सारसर्वस्व होते आणि साक्षात्काराचे स्पष्टीकरण करण्यासाठी व त्याची सत्यता विचारवंतांना पटवण्यासाठी त्यांच्या बौद्धिक जीवनाचा प्रपंच होता. प्रा. रानडे यांचा सांगावा असा होता की तत्त्वज्ञानी मंडळींनी अध्यात्माचे क्षेत्र आपलेसे करावे आणि साक्षात्कारी जनांनी तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात वावर करावा. तदनुसार ते शिक्षणक्षेत्र व अध्यात्म दोन्हीमध्ये रंगलेले होते. पण इतरेजनांना त्याची पुसटशीसुद्धा कल्पना आली नाही. अलाहाबादला त्यांच्याकडे लोकांनी ईश्वरसाक्षात्कारी म्हणून पाहिलेच नाही. त्यांना लोक फक्त एक ज्ञानोपासक समजले, आणि त्यांची जेव्हा जेव्हा भेट होई तेव्हा तेव्हा त्यांच्या बुद्धिमत्तेलाच त्यांनी मानवंदना दिली.

अलाहाबाद विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विभागातील शिक्षकांच्या पिढ्यान् पिढ्यांवर आदर्श प्राध्यापक असा प्रा. रानडे यांचा ठसा उमटला आहे. सुमारे दोन दशकांपूर्वी तत्त्वज्ञान विभागात पाऊल टाकण्याची संधी मिळाली. तत्क्षणी जाणवलेली पहिली गोष्ट म्हणजे गुरुदेवांबद्दल आदराने भरलेले वातावरण. त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे व आध्यात्मिक शक्तीचे अस्तित्व अंगाप्रत्यंगाला जाणवले. साक्षात्कारी संत व सद्गुरू म्हणून निंबाळला त्यांच्याबद्दल जो परमादर व जिव्हाळा दिसतो तो साहजिक आहे. पण एखाद्या शिक्षकाच्या वाटणीला असे प्रेम येण्याच्या कथा एकूण विरळाच. अगदी ह्याचमुळे केवळ शिक्षक या नात्याने अलाहाबादच्या लोकांची ही भावना पाहिल्यावर आश्चर्यानंदाने मनावर कब्जा केला. ते ज्या वर्गात तत्त्वज्ञान शिकवीत असत त्यात प्रवेश करतानाच आपण भिंतीवरील त्यांच्या भव्य तैलचित्राला सामोरे जातो. पाठोपाठ "या, हे पहा प्रा. रानडे, त्यांना वंदन करा", हे स्वागताचे शब्द कानांवर आले की मन भरून येते. ज्या टेबलाजवळ बसून गुरुदेवांनी दोन दशकांइतका दीर्घकाळ तत्त्वज्ञान शिकविले त्या टेबलावरच्या काचेखाली त्यांचा एक लहानसा फोटो आता ठेवलेला आहे. आज तिथे शिकवत असलेल्या अनेक प्राध्यापकांनी त्यांना पाहिलेले सुद्धा नाही. पण ही मंडळी अशा पद्धतीने बोलत होती की, जणू काही प्रा. रानडे कालपरवापर्यंत तिथे शिकवतच होते आणि एवढ्यातच निवृत्त झाले आहेत. गुरुदेवांनी तिथे शेवटचा पाय टाकल्याला आता चाळीस वर्षांहून जास्त काळ लोटला आहे यावर विश्वास बसत नाही. खुर्चीला मान मिळण्याच्या या दिवसांत व्यक्तीलाँ असा मान मिळणे दुरापास्तच. निवृत्त झालेल्या शिक्षकांबद्दल इतका प्रेमादर कुठे बघायला मिळतो? वसतिगृहाच्या एका विभागाला 'रानडे-विभाग' असे नाव दिल्याचे एका प्राध्यापकाने सांगितले. तत्त्वज्ञान शाखेतील नवीन तयार होणारी इमारत 'रानडे-भवन' म्हणून ओळखली जाईल अशीही माहिती मिळाली. पण हे बाह्य उपचार म्हणजे काहीच नव्हेत. गुरुदेवांना ज्यांनी पाहिले होते आणि ज्यांनी कुणी पाहिलेही नव्हते अशांच्या हृदयात त्यांची जी मूर्ती कोरली गेली आहे तिचा प्रभाव कितीतरी पटीने अधिक आहे. ती सर्व वास्तू त्यांच्या सामर्थ्याने

भारली गेल्याचा अनुभव आला.

२ कृष्णा ते गंगा

प्रा. रानडे कृष्णातीरावरून गंगातीरावर कसे पोचले? गंगामाईच्या काठावर बसून ईश्वरोपासना करणाऱ्या प्राचीन ऋषींनी तर त्यांना साद घातली नाही? ते काही असो. अलाहाबाद विद्यापीठाचे ऋषितुल्य कुलगुरू सर गंगानाथ झा यांनी त्यांना पाचारण केले हे मात्र खरे. डॉ. झा हे संस्कृत पंडित तर होतेच पण तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रावरील त्यांचा अधिकारही मोठा होता. त्यांनी गुरुदेवांचे 'ए कन्स्ट्रक्टिव्ह सर्व्हे ऑफ उपनिषदिक फिलॉसॉफी' हे पुस्तक वाचलेले होते. तत्त्वज्ञान आणि भाषाशास्त्र यांचा संगम, चिकित्सक वृत्ती, तात्त्विक काटेकोरपणा, भारतीय व पाश्चात्त्य तत्त्वज्ञानावरील पकड आणि ग्रीक भाषेवरील प्रभुत्व, अशा या ग्रंथात दिसणाऱ्या विविध गुणांवर ते लुब्ध झाले होते. निष्कलंक चारित्र्याच्या या विद्वानाची अलाहाबाद विद्यापीठात तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून नेमणूक करावी अशी स्वप्ने डॉ. झा रंगवू लागले व त्यांनी गुरुदेवांशी पत्रव्यवहार सुरू केला. अलहाबादला गेल्यास ॲकॅडेमी ऑफ फिलॉसॉफी अँड रिलिजन या आपण स्थापन केलेल्या संस्थेच्या कामकाजात अडथळा येईल अशी भीती गुरुदेवांनी व्यक्त केली. आपल्या प्रकृतिमानाला अलाहाबादची हवा कितपत मानवेल याचीसुद्धा त्यांना शंकाच होती. सर गंगानाथ झा यांनी गुरुदेवांच्या पत्राला उत्तर लिहिले ते असे :

सेनेट हाऊस, अलाहाबाद
ऑक्टोबर १, १९२७
कँप बनारस

प्रिय प्राध्यापक महोदय,

आपल्या २७ सप्टेंबरच्या पत्राबद्दल आभारी आहे. आपण केलेल्या पहिल्या सूचनेबद्दल असे म्हणता येईल की मी स्वतंत्रही नाही किंवा सर आशुतोष

मुखर्जीसारखा आपलेच खरे करणारा आणि त्यांच्याइतकी सत्ता हातात असणारा कुलगुरूही नाही. मी एरवी ती सूचना क्षणार्धात मानली असती. पण आमच्या विद्यापीठाचे संविधान पूर्णपणे लोकशाहीच्या तत्त्वावर आधारलेले आहे. शिवाय यू. पी.[१] मधील साध्याभोळ्या व व्यवहाराला चिकटून राहणाऱ्या मंडळींना आपल्या या उच्च ध्येयवादी सूचनेमागील फायदे पटणे कठीण आहे. म्हणून मला तरी असे वाटते की, आवडो वा न आवडो आपल्या दुसऱ्या सूचनेचाच आपल्याला अवलंब करावा लागेल. मग ती जरा दुय्यम दर्जाची का असेना. विद्यापीठातील नेमणुकांबद्दल आपल्याला माहिती असेलच. वेतनश्रेणी रु. ८००-५०-१२०० (कदाचित १२५० असेल) आहे. भविष्यनिधीची पद्धत आहे. प्राध्यापकाला आठवड्याकाठी कमीतकमी १२ व्याख्याने द्यावी लागतात. एप्रिल २४ ते जुलै १६ अशी उन्हाळ्याची भरभक्कम सुट्टी असते.

आपल्या ॲकेडेमीचे काम करण्यासाठी तिथल्या कार्यालयात आपली प्रत्यक्ष उपस्थिती पाहिजे असे थोडेच आहे? आणि म्हणून आपण इथे आलात तरी ॲकेडेमीच्या कामात व्यत्यय येण्याचे काहीच कारण नाही. हवामानाबद्दल म्हणाल तर अलाहाबादची हवा पुण्यापेक्षा कितीतरी कोरडी आहे. उन्हाळ्यात तपमान ११५° पर्यंत जाऊन पोचते.

काहीही असो. एका वर्षासाठी प्रयोग करायला तरी काही हरकत नसावी. नंतर इथे बरे वाटले नाही तर आपण मला सांगावे. आपल्याला विद्यापीठात कायम न करता नोकरीच्या जबाबदारीतून मुक्त करण्यात येईल.

प्राध्यापकांची निवड करणाऱ्या समितीसमोर आपले नाव मांडण्यास आपली संमती आहे किंवा काय हे मला उलट टपालाने कळवावे.

आपल्यासारख्या कर्तबगार आणि यशस्वी प्राध्यापकाला मी जर अलाहाबाद विद्यापीठात प्राध्यापक म्हणून आणू शकलो तर कुलगुरुपदावरून केलेली ती माझी सर्वाधिक मोलाची कामगिरी होईल हे लिहिण्याची आवश्यकता नाहीच. कृपया माझी निराशा करू नये.

आपला स्नेहांकित

गंगानाथ झा

हे निमंत्रण गुरुदेवांनी स्वीकारले व ते अलाहाबादला गेले. नंतरची २० वर्षे अलाहाबाद हे त्यांचे कार्यक्षेत्र ठरले. एका बाजूला तत्त्वज्ञानाच्या प्रांतात त्यांची कामगिरी चालली होती तर दुसऱ्या बाजूला ते तीव्र आध्यात्मिक साधनेत गुंतले होते. ही दुसरी बाजू उघड दिसत मात्र नसे.

३ कुशाग्र बुद्धिमत्ता

प्रा. रानडे यांचे विचार असंदिग्ध असत. त्यांची स्मरणशक्ती जबरदस्त होती. ओल्या मेणावर जसा एखादा ठसा चट्कन उमटतो तसा त्यांच्या मेंदूवर उमटे आणि काळ्या दगडावरील रेषेप्रमाणे तो कायम राही. सर्व गोष्टी त्यांच्या मनाच्या कपाटात नीटपणे मांडून ठेवल्यागत असत. इतकेच नव्हे तर ज्या वेळेस जे योग्य आहे ते त्यांना नेमके आठवे. मानसशास्त्रात यालाच स्मरणशक्तीची उपयोगिता म्हणतात. प्लेटो म्हणतो, "मन हे एखाद्या कबूतरखान्याप्रमाणे आहे. आपल्या बालपणी हा रिकामा असतो. ज्याप्रमाणे पकडलेले पक्षी कबूतरखान्यात आणून सोडले जातात त्याप्रमाणे आपण वेचलेले ज्ञानकण मनात साठवले जातात. खरे ज्ञान कसे असते? कबूतरखान्यात हात घालून अगदी हवा असलेला विशिष्ट पक्षी बाहेर काढण्याप्रमाणे ते असते. जरूर असलेली गोष्ट नेमकी आठवणे हे खरे ज्ञान. आपल्याकडे ज्ञानाची "साठवण" असेलही, पण हवे तेव्हा हवी ती गोष्ट सापडेलच असे नाही. दुसरीच काहीतरी मिळेल. चुकीचे विधान करणाऱ्या माणसाची गत अशी असते".[३] गुरुदेवांच्या विचारांचे धागे वळीव असून एकमेकांत गुंतत नसत. एका युक्तिवादाची दुसऱ्या युक्तिवादाशी किंवा एका विषयाची दुसऱ्या विषयाशी कधीच गल्लत होत नसे. असं सांगतात की, ८-१० वर्षांनंतरसुद्धा एखादी व्यक्ती भेटली तर पूर्वीच्या संभाषणाचा धागा जिथपर्यंत आला होता तिथून तो उचलून ते बोलणे सुरू करीत. त्या व्यक्तीची पुन्हा भेट झाली की त्यामुळे उत्पन्न झालेल्या उद्दीपनाने जुनी आठवण जागी होई. मग भाषणाचा प्रवाह न खंडल्याप्रमाणे सुरू होई. मानसशास्त्राची परिभाषा वापरून म्हणता येईल की त्यांच्या प्रतिक्रियांचे 'सामान्यीकरण' होत नसे. मानसशास्त्र सांगते की, उद्दीपके एकसारखी असली की, प्रतिक्रिया सामान्यीकृत

होतात. याचा अर्थ असा की अनेक उद्दीपकांचे एकमेकांशी जर खूप साम्य असेल तर त्या सर्वांवर एकच प्रतिक्रिया होते. एकाच चेहऱ्यामोहऱ्याचे राम व श्याम हे दोन जुळे भाऊ असले की, कोण कुठला ओळखत नाही. रामला श्याम समजून आपण बोलतो. दोन भिन्न व्यक्तींपासून येणारी उद्दीपके वास्तविक थोडीतरी भिन्न असतात. म्हणजे डोळ्याच्या आतल्या पडद्यावर उमटणारी चित्रे वेगळी असतात. पण त्यांत इतके साम्य असते की, माणसाचा गोंधळ उडतो. मग राम व श्याम यांच्या भेटीने वेगवेगळ्या प्रतिक्रिया न होता दोन्ही उद्दीपकांवर एकच प्रतिक्रिया होते. राम काय, श्याम काय, एकच वाटतात. म्हणजेच प्रतिक्रिया 'विशिष्ट' न राहता 'सामान्य' होते. याला प्रतिक्रियांचे सामान्यीकरण म्हणतात. प्रा. रानडे यांच्या मनात असा स्मृतिसंकर कधी झाला नाही. जणू वेगवेगळी उद्दीपके वेगवेगळ्या कप्प्यांतून साठवली जात आणि त्या त्या उद्दीपकांप्रमाणे त्या त्या तंतोतंत प्रतिक्रिया होत. त्यांच्या स्मृतिमंजूषेमध्ये प्रत्येक माणसाला आणि प्रत्येक घटनेला नेमका कोपरा होता. बराच कालावधी लोटला तरीही त्यांना चेहरे ओळखू येत, त्याचे हे रहस्य होते. १९५१ साली गुरुदेवांचा एक विद्यार्थी डॉ. शिवशंकर रॉय आपल्या धाकट्या भावाला घेऊन गुरुदेवांना भेटायला गेला होता. सहा वर्षानंतर हा धाकटा भाऊ पुन्हा आपल्या भावाबरोबर गुरुदेवांकडे आला. गुरुदेव तत्काल उद्‌गारले, 'आपण तर पूर्वी भेटलो आहोत की'! सहा वर्षांपूर्वीच्या भेटीत कोणत्या विषयावर चर्चा झाली हे सुद्धा त्यांना आठवले. यावरून उघड होते की, त्यांच्या मनातील उद्दीपकांचे सामान्यीकरण झालेले नसून ती स्वतंत्र होती. प्रत्येक उद्दीपक आपल्या ठराविक प्रतिक्रियेशी बांधले जाई आणि त्या उद्दीपकाला योग्य तीच प्रतिक्रिया मिळे.

पुढे पुढे ते स्वतः वाचन करीत नसत तर कुणाकडून तरी वाचून घेत. डोळ्यांनी पाहिलेल्या गोष्टींचे ग्रहण ते जितक्या जलद गतीने करीत तितक्याच जलद गतीने कानांनी ऐकलेल्या शब्दांचेही करीत. तसं पाहिले तर पुस्तके किंवा वर्तमानपत्रे वाचणाऱ्या विद्यार्थ्यांकडून वाचताना चुका होत असतील; आपापल्या विशिष्ट शैलीत विद्यार्थी वाचत असतील आणि त्यांचे उच्चार किंवा एखाद्या

शब्दावर जोर देण्याची पद्धतही भिन्न भिन्न असेल. पण गुरुदेवांना याची अडचण कधीच भासली नाही. त्यांचे ग्रहण तसेच शीघ्र राहिले. जसे वाचनाचे तसेच लिहिण्याचे. नंतरच्या काळात ते स्वतः लिहीत नसत तर आपण तोंडाने मजकूर सांगून दुसऱ्यांकडून लिहून घेत. यावरून कदाचित कुणाला वाटेल की त्यांची ग्रहणशक्ती श्रवणानुकूल (कानांनी ऐकलेले चट्कन समजणारी) होती; पण नाही, ती शक्ती दर्शनानुकूलही (डोळ्यांनी पाहिलेले चट्कन समजणारी) होती. कानांनी ऐकलेल्या गोष्टींचे आकलन व डोळ्यांनी पाहिलेल्या गोष्टींचे ग्रहण तितकेच तल्लख होते. त्यांचे वाचन अफाट होते. त्यांनी आपल्या ग्रंथांना जोडलेल्या संदर्भग्रंथविषयक टिपणींवरून हे स्पष्ट होते. तसेच स्वतःच्या पुस्तकांमधून इतर ग्रंथांचे त्यांनी केलेले अगणित उल्लेखही याला साक्ष आहेत. वह्यांच्या वह्या वळणदार व स्वच्छ अक्षरात त्यांनी लिहून काढल्या होत्या. त्यांत कुठे खाडाखोड नाही की चुका नाहीत. ग्रीक तत्त्वज्ञानाचीच गोष्ट घ्या ना. या विषयावरील कित्येक अभिजात ग्रंथांचे सारांश काढून त्यांवर त्यांनी आपले अभिप्राय दिले आहेत. असे अभिप्राय आणि ग्रीक सिद्धांतांचा व इतर तत्त्वज्ञानांतील सिद्धान्तांचा त्यांचा तौलनिक अभ्यास त्यांच्या लिखाणातून जागोजाग डोकावतो. लिखाणांची ही बाडे त्यांची ग्रहणशक्ती दर्शनानुकूलही होती ह्या म्हणण्याला दुजोरा देतात. एकूण बघितलेले काय किंवा ऐकलेले काय, त्यांची बुद्धी सर्वच चट्कन आत्मसात करी.

४ अनश्नन् अन्यः अभिचाकशीति।

नीरव शांतता गुरुदेवांना फार प्रिय होती. कुण्या विद्यार्थ्यांनी त्यांना घरी येऊन भेटण्याची इच्छा प्रदर्शित केली की ते त्यांना भर दुपारी एक वाजता बोलावीत. अलाहाबादच्या प्रखर उन्हात बाहेर हिंडणे हे एक दिव्यच होते. सूर्य आग ओकत असताना रस्त्यावर यायला बहुधा कुणी धजावत नसे. रहदारी कमी असल्याने वातावरण प्रशांत असे. चर्चा करण्यास गुरुदेव अशीच वेळ पसंत करीत. 'तुम्हाला ऊन्ह बाधणार नाही', असे ते विद्यार्थ्यांना आश्वासन देत. त्यांचे विद्यार्थीही काही कुरकुर न करता ठरलेल्या वेळेला त्यांच्याकडे जात.

अंगाची लाही होत असताना तत्त्वज्ञानाची चर्चा करणारे हे गुरुशिष्य धन्य होत!

प्रा. रानडे बहुशः चहावरच असत आणि खाल्ले तर घासभरच खात, हे सर्वश्रुत आहे. मग एखाद्या भोजनसमारंभात ते काही तोंडात टाकतील हे सुतराम शक्य नव्हते. १९३८ साली एम. ए. च्या विद्यार्थ्यांची तोंडी परीक्षा होती. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे एक परीक्षक होते. गुरुदेवांनी चहाची व अल्पोपहाराची व्यवस्था केली होती. ते लोकांना खाण्याचा आग्रह करीत होते पण स्वतः मात्र त्यांनी कशालाही स्पर्श केला नाही. लोक साहजिकच विचारू लागले की, "तुम्ही काहीच कसे घेत नाही"? त्यावर त्यांनी उत्तर दिले, "तुम्ही सर्वजण व्यवस्थित घ्या. मी इथूनच बघतो". हे ऐकून डॉ. राधाकृष्णन यांनी मुंडकोपनिषदातील प्रसिद्ध मंत्र उच्चारला :-

द्वा सुपर्णा सयुजा सखाया।
समानं वृक्षं परिषस्वजाते।।
तयोरन्यः पिप्पलं स्वादु अत्ति।
अनश्नन् अन्योऽभिचाकशीति।। (३.१.१)

(एकाच वृक्षावर मित्र व सोबती असणारे दोन पक्षी आहेत. त्यांपैकी एकजण वृक्षाची मधुर फळे सेवन करतो आणि दुसरा मात्र काहीच न खाता नुसता बघत राहतो). याहून अचूक वर्णन करणे कुणाला शक्य आहे?

५ सुसंवादावरील प्रेम

लहानातल्या लहान गोष्टीवरून देखील गुरुदेवांचे सुसंवादावरील प्रेम स्पष्ट होई. अवतीभोवती असलेल्या वस्तूंच्या मांडणीत किंचिन्मात्र जरी अव्यवस्था असली तरी ती झटकन त्यांच्या नजरेत भरे. पुस्तक किंवा वर्तमानपत्र वाचून दाखवणाऱ्याने त्यांच्यापासून ठराविक अंतरावर व ठराविक दिशेला बसले पाहिजे असा त्यांचा दंडक असे. पुस्तके एका विशिष्ट तऱ्हेनेच ठेवावी लागत. त्यांचा कोन थोडाही बदललेला असला तरी त्यांची दृष्टी ते टिपून घेई व पुस्तक नीट ठेवायला ते सांगत. समोर असलेल्या वस्तूंमधील प्रत्येक लहानमोठ्या वस्तूची जागा निश्चित झालेली असे, आणि त्यात कणभर बदल झाला तरी तो

त्यांना मुळीच खपत नसे. एकदा एका विद्यार्थ्याने एक आठवण सांगितली त्यावरून स्मरण राहण्यासाठी सुसंवादाचा उपयोग गुरुदेव कसा करून घेत हे उलगडते. १९८१ साली या विद्यार्थ्याची भेट झाली असता प्रस्तुत लेखकाने त्याला त्याचा दूरध्वनी क्रमांक विचारला. त्याने उत्तर दिले, "हा घ्या माझा दूरध्वनी क्रमांक. प्रा. रानडे यांनी लिहिला असता तसा मी लिहून दाखवतो हं". त्यांनी आधी ५ ५ ५ असे लिहिले व मग पहिल्या दोन आकड्यांमध्ये ४ हा आकडा लिहिला, दुसऱ्या दोन आकड्यांमध्ये ७ हा आकडा लिहिला आणि ५४५७५ हा क्रमांक तयार केला. "सुरवातीस ५, मध्ये ५ व शेवटी ५ आणि दोन पाचांच्या मध्ये ४ व ७", त्यांनी हसत खुलासा केला. गुरुदेवांची पद्धत अगदी हीच होती. आधी सुडौल रूपरेखा ते तयार करीत, मग तिथे बाकीचा तपशील भरीत व भरीव आकृती तयार करीत.

अनेक वर्षे गुरुदेव २ बेली रोड या घरात राहिले. हे घर भाड्याचे होते. नंतर त्यांनी हेस्टिंग्ज रोडवर[३] स्वतःचे घर बांधले. हे नवीन घर म्हणजे पहिल्या घराची हुबेहुब प्रतिकृती होती. एका विद्यार्थ्याने त्यांना प्रश्न केला, 'सर, तुम्ही नवीन घर बांधले, मग एखाद्या तज्ज्ञ माणसाचा सल्ला घेऊन जरा नवीन पद्धतीचे घर का बरे नाही बांधले'? त्यावर गुरुदेव म्हणाले, "अनेक वर्षे ज्या घरात राहिलो त्याच्यापेक्षा वेगळ्या पद्धतीच्या घरात कसे बरे राहता येईल"? ज्या विद्यार्थ्याने या प्रसंगाचे वर्णन केले त्याने त्यावर मल्लिनाथी केली, "प्रा. रानडे यांना एकात्मतेची ओढ होती. अनेकात ते एकता शोधत. नानात्वात एकत्वाचे व वैविध्यपूर्ण विश्वात एका ब्रह्माचे दर्शन त्यांना हवेसे वाटे". उगीचच्याउगीच बदल करणे त्यांना रुचत नसे. नवीन घर म्हणजे आधीच वातावरणात बदल झालेला असतो. त्यातून नवीन घराच्या रचनेत फरक केला तर त्या बदलात गोंधळाची भर पडते. नवीन घरात गेल्यावर दृष्टीला व पायाला नवीन वळण लावावे लागते. जुन्या सवयी अंगात इतक्या मुरलेल्या असतात की त्यांच्या जागी नव्या सवयी आणणे म्हणजे वेळ आणि श्रम यांचा निष्कारण अपव्यय. जुन्या घरात वावरण्याच्या ज्या सवयी लागलेल्या असतात त्या तशाच्या तशाच नव्या घरात नेल्या तर ते फायदेशीर ठरते. जेम्स म्हणतो, "सवयीने कोणतेही

काम सहजतेने करता येते, कामात दोष राहत नाही आणि श्रमही कमी होतात".* घराच्या आराखड्यात बदल झालेला असला की ध्यानाची खोली कुठली, पुस्तके कुठे ठेवावी, अभ्यासाची खोली कोणती हे सर्व ठरवताना वेळ जाणार. हा काळ व्यर्थ का घालवावा? नवीन घरात राहण्यास गेल्यावर जे पुनश्च हरिः ॐ होत असते त्याचा अनुभव कुणाला नाही? घरामध्ये सामानाची रचना सुंदर तर दिसली पाहिजे आणि वस्तू झटकन सापडल्याही पाहिजेत या दोन्ही गोष्टींचा संगम साधणे ही समस्या प्रथम पुढे येते. मग बरेचसे श्रम व वेळ खर्चून योजना आखल्या जातात, त्या पुन्हा पुन्हा बदलल्या जातात आणि कसेबसे एकदा सामान लागते. पण एवढ्याने काय झाले आहे? दिवाणखान्यातून स्वयंपाकघराकडे जायचे मनात आले की पावले सवयीने डावीकडे वळतात आणि मग लक्षात येते की, नव्या घरातील स्वयंपाकघर दिवाणखान्याच्या डाव्या अंगाला नसून उजव्या अंगाला आहे! माणूस सवयीचा गुलाम असतो आणि शरीराला किंवा मनाला नवीन वळण पाडणे हे फार जिकिरीचे असते. त्यामुळे सर्व कामामधील सहजता बिघडते. 'नवीन घर जुन्या घरासारखेच का'? याला हे उत्तर आहे. कोणतेही काम अधिक कार्यक्षमतेने कसे पार पाडावे हे गुरुदेव दक्षतेने ठरवीत असत. शारीरिक व मानसिक सवयीत ढवळाढवळ न करता सर्व कामे करण्याची त्यांची रीत होती. मानसशास्त्रीय तत्त्वे त्यांच्या आचरणातून व्यक्त होत. १९४२ साली बांधलेले निंबाळचे नवे घर तत्पूर्वी वीसएक वर्षे बांधलेल्या जुन्या घराचीच नवीन आवृत्ती आहे, हे जुने घर पाहिलेल्या मंडळींना सांगण्याची गरज नाही. जुन्या घराच्या जागीच आज गुरुदेवांच्या समाधिमंदिराची वास्तू दिसते.

६ आध्यात्मिक लागेबांधे

न केवलं यो महतोऽपभाषते।
श्रुणोति तस्मादपि यः स पापभाक्।।

(निंदा करणाराच नव्हे तर ऐकणाराही पापी असतो) या सुभाषितात सांगितल्याप्रमाणे गुरुदेवांचे वर्तन असे. छिद्रान्वेषी माणसाला ते थारा देत नसत. मनुष्याच्या अंगात असणाऱ्या सद्गुणांचे पांघरूण ते त्याच्या दोषांवर घालीत. कुणी दुसऱ्याची

निंदा करू लागले की ते त्याला लागलीच अडवत आणि म्हणत, "छे छे तुमचे म्हणणे बरोबर नाही. हे गृहस्थ सततोद्योगी आणि मोठ्या मनाचे आहेत हे तुम्ही कसे विसरता"? ज्याचे नाणे बव्हंशी खोटे ठरले आहे त्याचा देखील त्यांनी कधी राग राग केला नाही. उलट त्याची भलाई ते शोधून काढीत. सोनेमोती वेचा केरकचरा झाडून टाका अशी त्यांची वृत्ती असे. घरातली चाळणी काय करते? आळ्याकिडे जवळ ठेवून घेऊन चांगले पीठ आपल्या भोकांतून गळून जाऊ देते. उलट, सूप काय करते? कचरा भुसा पाखडून टाकून उत्तम धान्य स्वत:कडे ठेवते. तेव्हा माणसाने चाळणीसारखे न होता सुपासारखे व्हावे असे रामकृष्ण परमहंसांचे उद्‌गार आहेत.

ज्यांनी गुरुदेवांकडून नाम घेतले ते सर्व एकमेकांचे गुरुबंधू किंवा गुरुभगिनी होत. या शब्दांतूनच या सर्वांची एकमेकांबद्दल काय भावना असेल ते कळते. पारमार्थिक धाग्यांनी बांधलेले हे पवित्र नाते रक्ताच्या नात्यापेक्षाही अधिक मोलाचे वाटते. एकदा एक गंमत झाली. अलाहाबाद विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान शाखेतील एक प्राध्यापक एक दिवस भगवानदीन नावाच्या चपराश्यावर खूप कडाडले. बिचारा भगवानदीन! तो तत्त्वज्ञान शाखेतला जुना सेवक. त्याच्या मनाला ही गोष्ट फार लागली आणि त्याला रडू कोसळले. रागावलेले प्राध्यापक व भगवानदीन दोघांनीही गुरुदेवांकडून नाम घेतलेले होते. दुखावलेल्या भगवानदीनने हिय्या केला व तो त्या प्राध्यापकांकडे जाऊन म्हणाला, "सर, आपण प्राध्यापक आहात, मी तर केवळ चपराशी. पण आपण गुरुबंधू आहोत. गुरुदेवांकडून आपण रागावण्याची कला शिकलात की काय"? हे ऐकून त्या प्राध्यापकांचे हृदय विरघळले आणि त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा लागल्या. त्यांनी भगवानदीनचे पाय धरले आणि त्याला मिठी मारली. रामलक्ष्मणांच्या ह्या भेटीचे वर्णन कुणी करावे? 'नाम घ्या' असे गुरुदेवांनी कधी कुणाला सांगितले नाही. एकदा त्यांच्या एका आवडत्या विद्यार्थ्याला अगदी सहजगत्या "तुम्ही नाम घेतले आहे काय"? असा त्यांनी प्रश्न केला. निर्विकार चेहऱ्याने मुलाने उत्तर दिले, "नाही, सर". संभाषण तेवढ्यावरच थांबले. आपण नाम घेण्याची संधी डावलण्यात घोडचूक केली याची आज या विद्यार्थ्याच्या मनाला खंत आहे. डोळ्यांत पाणी

आणून तो ती खंत व्यक्त करतो.

७ ब्रह्मरसाच्या पारण्याला आलेला पाहुणा

गुरुदेवांच्या आयुष्यातील काही घटनांचा अर्थच आपल्याला लागत नाही. तर्क तिथे लंगडा पडतो. त्यांच्या तोंडातून बाहेर पडलेले शब्द जणू भविष्यकथन ठरले आहेत. डॉ. शिवशंकर रॉय यांनी आपल्या पूर्वस्मृतींना उजळा देत खालील घटना सांगितली. १५ ऑगस्ट १९३९ या दिवशी प्रा. रानडे यांना ते पहिल्यांदाच भेटावयास गेले. आग्रा विद्यापीठाची इंग्रजी भाषेची एम. ए. पदवी त्यांच्या पदरी होती. प्राध्यापक साहेबांनी प्रश्न केला,

"तुम्ही तत्त्वज्ञान विषय घेतला होता का"?

"हो, बी. ए. पदवीसाठी मी एक पेपर तत्त्वज्ञानाचा घेतला होता".

"अस्सं, मग तुम्ही प्रा. भांबानी यांचे विद्यार्थी असाल ना"?

"हो हो, होतो".

"मग आता तत्त्वज्ञान घेऊन पुन्हा एकदा एम. ए. का करीत नाही"?

"तसा काही माझा बेत नाही. मी आय. सी. एस. व्हावे अशी माझ्या वडलांची इच्छा आहे".

"म्हणून काय झाले? तत्त्वज्ञानात एम. ए. करायला काय हरकत आहे"?

"आज १५ ऑगस्ट आहे, सर," आणखी एका एम. ए.च्या खोड्यात आपण अडकतो की काय या भीतीने विद्यार्थी दुसरीच सबब काढून म्हणाला, "विद्यार्थ्यांना प्रवेश देणे केव्हाच बंद झाले आहे. आता मला कोण प्रवेश देईल"?

"कोण म्हणजे, मी देतो प्रवेश. मी डीन आहे". क्षणात त्यांनी हर्बर्ट विल्यम्स या कारकुनाला बोलावून सांगितले, "हर्बर्ट, यांना प्रवेशपत्रिका द्या".

विद्यार्थी हकिकत पुढे सांगत म्हणाला, "आणि असा मी त्या तत्त्वज्ञानशाखेत खेचला गेलो! मला या गोष्टीची स्वप्नात देखील कल्पना नव्हती. मी मनात म्हणालो, घटकाभर देवाच्या दारी बसावे म्हणून आलो आणि चातुर्मासाची व्रतवैकल्ये गळ्यात पडली. सहज प्राध्यापक रानडे यांना भेटायला म्हणून आलो काय आणि ह्या तत्त्वज्ञान एम. ए. च्या गुंत्यात पडलो काय? आपल्याला

तत्त्वज्ञान विषयाची गोडी नाही हे मी त्यांना परोपरीनी सांगितले, पण प्रा. रानडे यांनी ते काही मनावर घेतले नाही".

आणि ते मनावर घेणार तरी कसे? हा विद्यार्थी एक दिवस याच अलाहाबाद विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विभागात प्राध्यापक म्हणून येणार आहे हे ढळढळीत भविष्य त्यांना दिसत होते. शिवाय त्याच्या बुद्धीची चमक गुरुदेवांनी पाहिली व त्याला तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाकडे ओढले. पुढे असे झाले की, या विद्यार्थ्याने तत्त्वज्ञान एम. ए. पूर्ण केले व मग १९४२ साली तो प्रॉव्हिन्शिअल सिव्हिल सर्व्हिसेस या परीक्षेला बसला. एकूण बारा जागा भरावयाच्या होत्या आणि या विद्यार्थ्याचा क्रमांक नववा आला होता. अर्थात त्याची नेमणूक झाल्यातच जमा होती. हे ऐकल्यावर प्रा. रानडे एवढेच म्हणाले, "वा, वा, छान, छान". पण दुसऱ्या महायुद्धाच्या गडबडीत बाराऐवजी आठच जागा भरण्याचा सरकारी निर्णय झाला आणि नववा क्रमांक आलेला हा विद्यार्थी तसाच हात चोळीत बसला. व्यथित अंत:करणाने तो गुरुदेवांना भेटायला गेला. त्याची सगळी कथा गुरुदेवांनी ऐकली आणि ते म्हणाले, "अहो, अलाहाबाद विद्यापीठात तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक होणे हे जर जिवतीने तुमच्या कपाळावर लिहिले आहे तर तुम्ही डेप्युटी कलेक्टर कसे व्हाल"? तो विद्यार्थी चूप बसला. हे उगीचच माझे काहीतरी समाधान करीत आहेत, मी निराशेने हतबल होऊ नये म्हणून ते माझ्या दु:खावर फुंकर घालीत आहेत, अशी त्याची भावना झाली. अलाहाबाद विद्यापीठात प्राध्यापक होण्याची कल्पना त्याला चंद्राचा चेंडू करून खेळण्याइतकी अशक्य वाटली. त्यांचे शब्द एक दिवस प्रत्यक्षात उतरणार आहेत याची त्याला जाणीव झाली नाही. पण नंतर अशा घटना घडल्या की अनेक अडचणींना तोंड देऊन का होईना कालांतराने हा विद्यार्थी अलाहाबाद विद्यापीठात तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक झालाच! प्रा. रानडे भविष्य जाणणारे होते का? की, त्यांच्या मुखातून आलेल्या शब्दांत अशी काही जबरदस्त मंत्रशक्ती होती की ते शब्द खाली पडू नयेत म्हणून त्या शब्दानुरूपच घटना घडल्या?

एकदा चंद्रधर शर्मा नावाचा विद्यार्थी सहज त्यांना भेटायला गेला आणि बोलण्याच्या ओघात आपण दुसऱ्या दिवशी कानपूरला जाणार आहोत असे

त्याने सांगितले. "उद्या जाऊ नका. जाण्याचे जरा पुढे ढकला, परवा जा. उद्या संध्याकाळी माझ्याकडे या. माझे तुमच्याकडे जरा काम आहे", असे गुरुदेव म्हणाले. आपल्या जाण्यात हे अचानक विघ्न आलेले पाहून, कुठून आपण त्यांना भेटायला आलो असे त्या विद्यार्थ्याला झाले. पण प्रत्यक्षात असे घडले की, दुसऱ्या दिवशी ज्या गाडीने तो जाणार होता त्या गाडीला अपघात होऊन कित्येक माणसे दगावली. त्या विद्यार्थ्याने सुटकेचा केवढा निःश्वास टाकला असेल? तो प्रा. रानडे यांच्याकडे आला व म्हणाला, "सर, तुम्ही मला काहीतरी काम आहे म्हणाला होता ना? काय आहे काम"? "छे, छे तसं काही खास काम नाही, उगीच आपलं बोलावलं होतं", ते म्हणाले. गुरुदेवांनी आपल्याला तऱ्हेतऱ्हेच्या संकटांतून वाचवले आहे असे कितीतरी मंडळी कृतज्ञताभरल्या मनाने आणि अश्रुभरल्या डोळ्यांनी सांगतात.

अगदी अलीकडे म्हणजे १९८० साली एका विद्यार्थ्याने लिहिलेल्या पत्रावरून विद्यार्थ्यांना गुरुदेवांबद्दल केवढा आदर वाटत होता याची कल्पना येते.

"१९३९ सालापासून प्रा. रानडे यांच्याशी माझा फार फार जवळचा संबंध आला. २६ एप्रिल १९५७ ला मला त्यांचे अखेरचे दर्शन घडले. काशी एक्सप्रेसच्या पहिल्या वर्गाच्या डब्यात ते बसले होते. माझ्या हातावर आपल्या बोटांनी लिहून त्यांनी मला आशीर्वाद दिला. त्यांचा घसा फार खराब झालेला होता. २३ मार्च पासून अलाहाबादला अत्यंत घाणेरडी हवा पडली होती. ती त्यांना बाधली असावी. त्यांचे आपल्या विद्यार्थ्यांवर किती प्रेम होते याची कदाचित तुम्हाला कल्पना नसेल. अलाहाबाद विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विभागातील विद्यार्थ्यांच्या संख्येने जो उच्चांक आज गाठला आहे तो देशातील मोजक्याच विद्यापीठातून दिसतो. एम. ए. च्या पहिल्या वर्षात २३०, दुसऱ्या वर्षात २०० व बी. ए. च्या वर्गात १४०० विद्यार्थी आज शिकत आहेत. ८० विद्यार्थी संशोधन कार्य करीत आहेत. हे सर्व त्यांच्याच कृपेचे फळ आहे.....

गुरुदेवांच्या स्मृतींनी दाटलेला.....

आपला,

शिवशंकर रॉय"

याच विद्यार्थ्याने गुरुदेवांशी झालेल्या आपल्या शेवटच्या भेटीचे वर्णन केले. "त्यांनी मला पुन्हा पुन्हा हाक मारली आणि माझ्या पाठीवर हात फिरविला. नंतर स्वतःच्या गळ्यावर हात ठेवला आणि आकाशाकडे पाहिले. 'आता कैचें जाणें येणें, आता खुंटलें बोलणें. सर्व परमेश्वराधीन आहे', असे तर त्यांना सुचवायचे नव्हते? त्यांचे अंतःकरण भरून आले होते आणि डोळ्यांतून अश्रू वाहत होते. गद्‌गद्‌लेल्या आवाजाने व अश्रुभरल्या डोळ्यांनी डॉ. रॉय पुढे म्हणाले, "या भेटीची आठवण झाली की, भावनातिरेक आवरत नाही". पुढे काही वर्षांनी त्यांना एकदा विनंती केली गेली होती की, गुरुदेवांवर काहीतरी लिहा. त्यांचे उत्तर आले, "मी जेव्हा गुरुदेवांवर लिहीन तेव्हा माझी लेखणी हृदयात बुडवूनच लिहीन".

अलाहाबाद व गुरुदेव यांच्या संबंधाचे 'परस्परं भावयन्तः' अशाच शब्दांत वर्णन होईल. अलाहाबादने गुरुदेवांवर प्रेमाचा वर्षाव केला. त्या प्रयागतीर्थाबद्दल ते म्हणतात, "या शहरातील गेल्या काही वर्षांच्या वास्तव्यात अलाहाबाद विद्यापीठाने मला माझ्या विचारविश्वाची व्याप्ती विशाल करण्याची संधी दिली. तसेच तात्त्विक विचारांच्या विकासाचे अनेक मार्ग खुले करून देऊन मला उपकृत केले. सत्ताशास्त्र, नीतिशास्त्र, मानसशास्त्र किंवा धर्मतत्त्वज्ञान यांत समकालीन विचारवंतांनी जी भर घातली आहे तिचा अभ्यास करता आल्याने वैचारिक जगाच्या या नकाशावर माझे स्वतःचे स्थान नेमके कुठे आहे हे माझे मला आता चांगले उमगले आहे".[५]

संदर्भसूची

१ आताचा उत्तर प्रदेश

२ Theaetetus, 197d - 199 c

३ आताचा न्याय मार्ग

४ The Principles of Psychology, Vol I, P. 112

५ Contemporary Indian Philosophy, P. 562

प्रकरण दुसरे

कुशल प्राध्यापक

पूर्वार्ध : अध्ययनपद्धती

१ मानसशास्त्रीय सिद्धांतांची व्यवहारात गुंफण

आपण जे काही वाचतो ते मनात खोलवर रुजले पाहिजे हे प्रा. रानडे यांच्या अभ्यासाचे सूत्र आहे. अभ्यास करणे म्हणजे जाता येता केलेला खेळ नव्हे. साध्या वर्तमानपत्राच्या वाचनातही त्यांना थिल्लरपणा आवडत नसे. त्या वाचनाच्या वेळी चांगले टोक केलेल्या दोन शिसपेन्सिली - एक निळी, एक लाल - तयार लागत. ऑक्सफर्ड स्टँडर्ड डिक्शनरी आणि चेंबर्स ट्वेंटिएथ सेंचरी डिक्शनरी हे दोन्ही शब्दकोश जरूर असत. ऑक्सफर्ड डिक्शनरी तंतोतंत व रेखीव अर्थ देते. उलट शब्दांची व्युत्पत्ती हवी असेल तर चेंबर्स अधिक उपयोगी पडते. शब्दांचा नुसता अर्थ कळून त्यांचे समाधान होत नसे, शब्दाच्या मूळ धातूपर्यंत ते जात. कोणत्या धातूपासून शब्द आलेला आहे हे कळले की, त्याचा गर्भितार्थ कळतो आणि धातू एकदा हातात आला की त्यापासून नवनवीन शब्द बनवणे सोपे जाते. व्युत्पत्तिशास्त्राचा धागा हाती धरूनच पुढे गुरुदेवांनी नवीन शब्दांची टांकसाळ उघडली. त्यांनी पॉझिट्रॉन किंवा इलेक्ट्रॉन यांच्या धर्तीवर स्पिरिटॉन हा शब्द बनवला. आरग्युमेंटम ॲड होमिनेम किंवा आरग्युमेंटम ॲड पॉप्युलेम यावरून त्यांना आरग्युमेंटम ॲड थिओनेम हा शब्द सुचला. आरग्युमेंटम ॲड होमिनेम व आरग्युमेंटम ॲड पॉप्युलेम हे तार्किक युक्तिवादातील दोष आहेत, त्यांना तर्काभास म्हणतात. हे तर्कशास्त्रात प्रचलित आहेत. आरग्युमेंटम ॲड होमिनेम (व्यक्तियुक्तिदोष) या तऱ्हेच्या युक्तिवादात एखाद्या व्यक्तीचा दाखला देऊन आपले म्हणणे पुढे मांडले जाते. 'जीवन्मुक्त जनकराजाने कर्म केले म्हणून आपणही करावे', हे गीतेतले उदाहरण इथे देता येईल. आरग्युमेंटम ॲड पॉप्युलेम (लोकभावना-युक्ति दोष) म्हणजे लोकांच्या भावना चेतवणे. 'जागे व्हा, आपल्या अधिकारावर घाला आला आहे' असे म्हणून लोकांना डिवचणे हे उदाहरण या

प्रकारात मोडते. अर्थातच हे तर्काला धरून केलेले युक्तिवाद नाहीतच, चुकीचेच आहेत. अशाच धर्तीवर गुरुदेवांनी आरग्युमेंटम ॲड थिओनेम (ईश्वरयुक्तिदोष) हा शब्द तयार केला. देवाचा दाखला देऊन केलेल्या युक्तिवादासाठी गुरुदेवांनी हा शब्द बनवला. त्याचे उदाहरण त्यांनी दिले आहे - श्रीकृष्ण म्हणतात, 'मला काही मिळवायचे नाही तरी मी कर्म करीत राहतो'. देव कर्म करतो म्हणजे मनुष्यानेही करावे हा भावार्थ. प्रचलित तार्किक दोषांच्या पंक्तीला त्यांनी हा एक नवीन युक्तिवाद आणून बसवला.

वाचनाच्या दरबारात नेहमी हजर असणारा मानकरी म्हणजे रोजेटचा थिसॉरस. थिसॉरस केव्हा वापरायचा असतो? "जेव्हा आपल्याला एखादा शब्द माहीत असतो पण त्याचा अर्थ माहीत नसतो, तो शब्द कुठे, कसा वापरायचा याची नीटशी कल्पना नसते, वेगवेगळ्या संदर्भात त्याचे अर्थ कसे बदलतात याचा अंदाज नसतो, तेव्हा आपण शब्दकोश पहातो. उलट पक्षी अर्थ उत्तम माहीत असला तरी अचूक शब्दच जेव्हा हाताशी नसतो तेव्हा थिसॉरस वापरला जातो".[१] तोच तो शब्द पुन्हा पुन्हा वापरलेला गुरुदेवांना चालत नसे. थिसॉरस एका अर्थाचे अनेक शब्द आपल्यापुढे मांडतो. मग त्या शब्दांतल्या अर्थछटा पाहून हवा तो शब्द उचलावा. कधीमधी नट्टालचा ज्ञानकोश हजेरी लावून जाई. जाड्याजुड्या ज्ञानकोशांतून जी माहिती असते ती संक्षिप्त रूपात या ग्रंथात मिळते. पाथवे टु गॉड इन कन्नड लिटरेचर या पुस्तकाचे काम चालू होते तेव्हा किट्टेलस् कन्नड-इंग्लिश डिक्शनरी या महाकोशतुल्य ग्रंथाची आवश्यकता भासे आणि पाथवे टु गॉड इन हिंदी लिटरेचर लिहिले जात होते त्या वेळेस आणखीही काही पाहुण्यांना निमंत्रण असे. ते म्हणजे हिंदी-हिंदी आणि उर्दू-हिंदी शब्दकोश. संस्कृत ग्रंथांच्या अभ्यासाच्या वेळी वामन शिवराम आपटे यांच्या शब्दकोशाला मानाचे पान असे.

वर्तमानपत्रे वाचण्याची पद्धत ठरलेली होती. सुरवातीस ते फक्त मथळे वाचून घेत. त्यांतील महत्त्वाच्या मथळ्यांवर खुणा करायला सांगत. नंतर खुणा केलेला मजकूर ते तपशीलवारपणे वाचून घेत. महत्त्वाचा मजकूर कधीकधी

दोनदासुद्धा वाचायला सांगत. त्यातला आणखी लक्षणीय भाग असेल तो अधोरेखित करायला सांगत. आकृती व पार्श्वभूमी या मानसशास्त्रीय तत्त्वानुसार हा अधोरेखित भाग एकूण पानावरील मजकुराच्या पार्श्वभूमीवर आकृतीसारखा उठून दिसे. त्यातही एकदा निळ्या आणि एकदा लाल पेन्सिलीचा उपयोग करायचा असे. लालच लाल किंवा निळ्याच निळ्या अधोरेखा केल्या की त्या कंटाळवाण्या होतात, शिवाय तो मजकूर उठून दिसत नाही तो नाहीच. काळ्या-निळ्या अशा मिश्र पार्श्वभूमीवर लाल रेघ, तर काळ्या-लाल अशा पार्श्वभूमीवर निळी रेघ चटकन लक्ष वेधते. अवधान ज्या ज्या गोष्टींमुळे खेचून घेतले जाते असे मानसशास्त्र सांगते त्या त्या गोष्टींचा असा साध्या रोजच्या व्यवहारातही उपयोग केला जाई. मानसशास्त्रीय तत्त्वे नुसती शिकायची नसतात, तर त्यांचा फायदा करून घ्यायचा असतो, हे गुरुदेवांच्या वर्तमानपत्रे वाचून घेण्याच्या पद्धतीतून सुद्धा कळून येते. वर्तमानपत्र वाचताना कधीकधी असेही होई की एकदम पाचसात ओळींचा मजकूर महत्त्वाचा वाटे. इतक्या ओळींखाली रेघा मारण्याऐवजी त्या ओळींमागे समासात एक उभी रेघ मारणे सोयीचे असते. शिवाय ही उभी रेघ इतरांपेक्षा अगदी वेगळी दिसते व लक्ष आकर्षून घेते. त्या ओळींमध्ये असलेल्या माहितीच्या कमीजास्त महत्त्वानुसार कधी एकच तर कधी दुहेरी उभी रेघ ओढावी असे त्यांचे म्हणणे असे. वर्तमानपत्रांतील कात्रणे काढून ती नीट जपून ठेवली की जेव्हा लागतील तेव्हा त्यांचा उपयोग करणे सोपे होते. दुसऱ्या जागतिक महायुद्धाबद्दल त्यांनी अपार माहिती जमवली होती. एकदा ते म्हणाले, "या महायुद्धाचा अगदी तपशीलवार आणि पुराव्यावर आधारलेला असा इतिहास मला लिहिता येईल". एखाद्या तत्त्वज्ञानी, साक्षात्कारी पुरुषाची 'युद्धस्य कथा रम्या' अशी ही भूमिका बघून मात्र मोठा विस्मय वाटतो! या युद्धात नकोशा झालेल्या लोकांना खड्याप्रमाणे वेचून मृत्यूच्या पिंजऱ्यात ठेवणे, ठार करणे, पाण्यात बुडवणे, विषारी वायूने मारणे किंवा जिवंत पुरणे अशी कल्पनेच्या बाहेरची क्रूरता दिसत होती. परंतु जगात दुःख आहे हे या सर्व गोष्टींमुळे अगदी ढळढळीतपणे स्पष्ट होते. तसेच जगातल्या दुःखाप्रमाणेच

दुनियेची नश्वरताही डोळ्यात भरते. हिरोशिमा इथे अणुबाँबच्या हल्ल्याने उडालेला प्रलय मानवी जीवनाची क्षणभंगुरता सिद्ध करायला पुरेसा आहे. सकाळी उठून न्याहारीच्या तयारीला लागलेल्या हजारो जीवांपैकी एखाद्याला तरी कल्पना होती का की पुढच्या क्षणी आपण मृत्यूच्या पंजात सापडणार आहोत म्हणून? मानवी बुद्धिमत्तेचे ॲटम बाँबइतके हिडीस रूप अन्यत्र कुठेही आढळणार नाही. दुःख आणि नश्वरता या परमार्थाच्या जबरदस्त मानसिक प्रेरणा आहेत. युद्धांतील घटनांमुळे त्या उफाळून येतात.

शिक्षणशास्त्र हे मानसशास्त्राच्या पायावर उभारलेले आहे याकडे दुर्लक्ष होता कामा नये असे गुरुदेवांचे मत होते. विज्ञानाच्या विविध शाखांमधून जे शोध लागत असतात त्या सर्वांची नोंद शिक्षणशास्त्राच्या सिद्धांतांवरील ग्रंथांनी घेतली पाहिजे आणि हे ग्रंथ वेळोवेळी सुधारून घेतले पाहिजेत. जुने ग्रंथ कालबाह्य होत असतात. शिक्षण म्हणजे मुलाचा सर्वांगीण विकास. या विषयात केवळ शिक्षकानेच रस घ्यावा असे नसून सामान्य जनांनासुद्धा शिक्षणशास्त्राच्या मूलतत्त्वांची ओळख हवी. म्हणून या विषयावरील ग्रंथ सोपे व माहितीपूर्ण असावेत. पतंजली ऋषींच्या योगसूत्रांत शिक्षणशास्त्र व मानसशास्त्र यांतील मूलगामी प्रमेये आलेली आहेत म्हणून योगसूत्रांचा अभ्यास व्हावयाला हवा आणि ती सर्वांच्या नजरेसमोर आणायला हवीत असे त्यांचे सांगणे होते.

कोणत्याही विषयाच्या सैद्धांतिक अभ्यासापासून विद्यार्थ्याने मागे सरता कामा नये. त्या त्या विषयाच्या पारिभाषिक संज्ञाही अभ्यासकाला परिचित असल्या पाहिजेत. त्या कठीण असतात, कबूल. परंतु शास्त्रीय चर्चा रेखीव होण्यासाठी पारिभाषिक संज्ञांची फार गरज आहे. त्यांचा परिचय हळूहळू करून दिला पाहिजे, आ वासून पुढे ठाकलेल्या हिंस्र पशूंसारख्या त्या भीतिदायक नसाव्यात. इमॅन्युएल कांटचे तत्त्वज्ञान आधीच कठीण. त्यातून त्याने वापरलेल्या जाडजूड पारिभाषिक संज्ञांमुळे ते अधिकच अवघड होऊन बसले आहे. "कांटच्या तत्त्वज्ञानाचे वर्णन 'अतीतत्व-वाद' असे केले जाते. तो शब्द ऐकूनच अंगावर शहारे येतात आणि त्यात काहीतरी गूढ असले पाहिजे अशी भीती वाटते. 'अनुभवपूर्व' हा

शब्दही काही कमी बोजड नाही. पण विद्यार्थ्यांने जर थोडे धैर्य धरले तर या वाघसिंहांच्या जबड्यात न सापडता तो निसटून जाऊ शकतो".[२]

१९१९ सालच्या जुन्या जमान्याच्या वेळीच मराठीतून पाठ्यपुस्तके लिहिण्याच्या उपक्रमाचे गुरुदेवांनी कौतुक केले होते. त्यांचे म्हणणे असे की जेव्हा शिक्षण विद्यार्थ्याच्या मातृभाषेतून देण्याचे दिवस येतील तेव्हा या पुस्तकांची गरज भासेल. त्यासाठी अशी पुस्तके तयार हवीत. अनेक विषयांवर ग्रंथ लिहून प्रांतोप्रांतीच्या भाषांमधील वाङ्मय समृद्ध केले पाहिजे. सुरवातीसुरवातीला प्रांतिक भाषेतील नवीन रूढ होणारे शब्द समजावे म्हणून कंसात इंग्रजी शब्द घालणे ठीक. रूढ होईपर्यंत पारिभाषिक संज्ञा कदाचित बदलाव्या लागतात. थोडक्यात, ज्ञानाची सतत घोडदौड व्हावी अशी मनीषा बाळगावी; आपले डोळे मात्र शाश्वत मूल्यांकडे नेहमी लागलेले असावेत.

समाजसेवा ही गोष्टसुद्धा मानसशास्त्रीय तत्त्वांवर कशी आधारलेली आहे व सेवेसाठी मनाच्या शक्तींना वळण लावणे कसे आवश्यक आहे हे आवर्जून सांगणारे एक पत्र पाहू.

"तुमचे पत्र मिळाले. तुमच्याकडे दोन खादीचे पंचे पाठवावे म्हणून वडनपांना सांगितले आहे. ते लवकरच तुम्हाला मिळतील. तुम्हाला हवी असलेली बंगाली पुस्तके मुंबईत काही मिळत नाहीत. ती कलकत्त्याहून मागवण्याचा माझा बेत आहे. उर्दू पुस्तकेही घेऊन लवकरच तुम्हाला पाठवीन.

समाजसेवेचे खरे अधिष्ठान परमार्थच आहे; सेवेची प्रेरणा माणसाने परमार्थातून घ्यायला हवी. कसलाही कलंक न लागता समाजसेवा साधायची असेल तर परमार्थाच्या भक्कम पायावरच ती उभी पाहिजे. या विषयावरचे माझे विचार तुम्हाला कळवीन असे मी मागे तुम्हाला लिहिले होते. असे पाहा की, आपल्या भावनांत जे बळ असते ते आपल्याला कार्यप्रवृत्त करत असते. या शक्तीला बुद्धी केवळ दिशा दाखवते आणि वेळप्रसंगी तिच्यावर ताबा ठेवते. गंमत अशी आहे की आपल्या इच्छा, आकांक्षा, किंवा भावना या सगळ्यांचा मनात कल्लोळ असतो. त्यांच्यात एकजूट नसते. त्यांचे निरनिराळे गट असतात आणि त्यांतला

एक गट दुसऱ्या गटाला हाणून पाडत असतो. काही भावना आपल्याला एका वाटेने जायला सांगतात तर दुसऱ्या काही विरुद्ध रस्ता दाखवतात. हे टाळणे अगत्याचे आहे. त्यासाठी ध्येयवादी मनुष्याने पहिल्याप्रथम आपल्या सगळ्या मनोवृत्ती एकाच दिशेने वळवणे जरूर आहे. ज्या भावना ध्येयाच्या आड येतात त्यांना नुसती मुरड घालून भागणार नाही, त्यांचा समूळ नायनाटच करायला हवा. ध्येयाने झपाटलेल्या माणसाचे मन, त्याची बुद्धी किंवा त्याच्या आशा-आकांशा-भावना यांची तोंडे एकाच ध्रुवताऱ्याकडे वळलेली पाहिजेत. त्यांचे कार्य हातात हात घालून व्हायला हवे. अलीकडे पाश्चात्त्य देशातून तत्त्वज्ञान. मानसशास्त्र किंवा नीतिशास्त्र या विषयांवर पुस्तके निघाली आहेत. पण मनाच्या एकजात सगळ्या शक्तींचा प्रवाह ध्येयपूर्तीच्या दिशेने कसा वळवायचा हे कुणीसुद्धा सांगत नाही. ध्येयाच्या जोडीला व्यवहारात आणखी छोट्या मोठ्या गोष्टी माणसाला साध्य करायच्या असतात. पण त्या दुय्यम असतात, एवढेच नाही तर त्यांचीही ध्येय गाठण्याच्या कामी जोड करून घ्यावी लागते. असेल नसेल ती पुरी ताकद एकाच ध्येयाकडे लावता आली नाही तर मात्र ध्येयवाद लंगडा पडतो. यापायी कित्येक तरुणांची कशी फजिती होते हे तुम्ही पाहिले आहे. तारुण्याच्या भरात माणूस सेवेचे व्रत घेतो. आपले सर्वस्व त्याला वाहतो. पण ही उभारी आरंभशूराचीच ठरते. याचे कारण स्पष्ट आहे. भावनांना पक्के वळण लावलेलेच नसते. पहिल्या उमेदीत भावना दडपून टाकलेल्या असतात पण सुरवातीची ऊर्मी ओसरली की त्या उफाळून वर येतात. मग ध्येयवादी तरुण भांबावून जातो. भावना कशा कांबूत ठेवायच्या, सेवेचे व्रत नेटाने कसे चालवायचे हे त्याला उमजत नाही. तुकाराम म्हणतात... कर्णाच्या तोंडचा श्लोक याच्यावरच बोट ठेवतो...”

हे पत्र गुरुदेवांच्या हातचे आहे असे म्हणावेसे वाटते. इथूनतिथून सगळ्या कामांना परमार्थाचे अधिष्ठान आवश्यक आहे ही गुरुदेवांची श्रद्धा इथे स्पष्ट दिसते. विचार अतिशय प्रगल्भ व सुस्पष्ट आहेत. शिवाय मानसशास्त्र व तत्त्वज्ञान यांची परिभाषा वापरण्याची शैली खास गुरुदेवांची आहे. मजकुराच्या

संदर्भावरून हे पत्र काका कारखानीस यांना १९१० च्या आसपास लिहिले असावे. खादीच्या पंचांचा उल्लेख बोलका आहे. विवेकानंदांचा काकांवर प्रभाव होता म्हणून बंगाली पुस्तकांची मागणी असावी. गांधीजींबद्दल असलेल्या आदरापोटी उर्दू पुस्तकांचा अभ्यास करण्याचा काकांचा मनोदय असू शकतो. समाजसेवेचा विषय तर काकांच्या पोटतिडिकेचा. पत्राचा एक तुकडाच हाती आल्याने ते कुणी, कुणाला, कुठून व केव्हा लिहिले याला पुरावा नाही, पण वर निर्देश केलेल्या बाबी लक्षात घेतल्या तर हे पत्र गुरुदेवांकडून काकांना गेले असावे असे वाटते. म्हणून याचा विचार इथे केला आहे.

२ भाषाशास्त्राची झालर

एखाद्या ग्रंथाचे विवरण करण्यापूर्वी तो ग्रंथ स्वतःच मुळातून अभ्यासावा असा गुरुदेवांचा आग्रह असे. सिद्धांतांचे मूळ रूप पाहिले की त्यांतील बारकावे लक्षात येतात. उथळपणाला वाव राहत नाही. अभ्यासाला भाषाशास्त्राची जोड मिळाली की त्याचा अर्थ अधिकच सुस्पष्ट होतो. एखाद्या सिद्धांताची सांप्रदायिकांनी केलेली ओढाताण बाजूला सारून स्वतंत्र अर्थ लावता येतो. संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्याने मूळ ग्रंथाच्या दुसऱ्यांनी केलेल्या भाषांतरावर अवलंबून राहण्यापेक्षा स्वतःच भाषांतर करावे असे एकदा गुरुदेव म्हणाले होते. भाषाशास्त्रीय दृष्टी असल्यामुळे कित्येक गोष्टींचे अभिनव दर्शन ते घडवीत. पूर्वमीमांसेला नुसते मीमांसा व उत्तरमीमांसेला वेदान्त म्हणण्याची भारतीय तत्त्वज्ञानात परंपरा आहे. एकदा वर्गामध्ये गुरुदेव मीमांसा तत्त्वज्ञानातील 'अपूर्व', या सिद्धांताचे विवेचन करीत होते. 'अपूर्व' म्हणजे आपल्या कर्माची फळे देणारी अदृश्य शक्ती. पूर्वमीमांसा दर्शनाने परमेश्वराला बाजूला सारून अपूर्वाच्या हातात ही शक्ती सोपवली आहे. उत्तरमीमांसा दर्शनाने कर्माचे फल देण्याचा अधिकार 'पूर्व' म्हणजे आदिबीज किंवा परमेश्वर याच्या हवाली केला आहे. परिणामतः फल देण्याचे कार्य पूर्वमीमांसा अपूर्वाकडे देते तर उत्तरमीमांसा पूर्वाकडे देते. पूर्व-अपूर्व यांची ही गुंतागुंत सोडवून दोन्ही दर्शनांतल्या सिद्धांतांची योग्य दखल कशी घ्यावी हे सांगताना गुरुदेव म्हणतात : "पूर्वमीमांसा ही खरोखर अपूर्वमीमांसा

आहे, कारण अपूर्व सिद्धांतावर तिचा भर आहे. उलट उत्तरमीमांसा ही पूर्वमीमांसा आहे कारण तिथे पूर्व किंवा परमेश्वर याला प्राधान्य आहे". एका विद्यार्थाने गुरुदेवांचे हे मत टिपून ठेवले आहे. भाषाशास्त्रावर आधारलेल्या या विवरणाने पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा यांची ही उलटापालट पाहून परंपरागत विवरणकारांना धक्का न बसेल तरच नवल. भाषा शिकण्याचा गुरुदेवांना छंद होता. मराठी, कन्नड, संस्कृत, हिंदी, इंग्रजी, ग्रीक या भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. जर्मन भाषेची त्यांना तोंडओळख होती. भाषा ते का शिकले याबद्दलची एक घटना नमूद करण्याजोगी आहे. कर्नाटकातील साक्षात्कारशास्त्राचे स्वरूप या विषयावर कर्नाटक विद्यापीठाने त्यांचे एक व्याख्यान २६ ऑगस्ट १९५० ला धारवाड येथे आयोजित केले होते. अध्यक्षस्थानी व्हाइस चॅन्सेलर आर. ए.जहागिरदार हे होते. त्या प्रसंगी बोलतांना गुरुदेव म्हणाले : "मी कर्नाटक प्रांतीय आहे याचा मला अभिमान वाटतो. रामदास, तुकाराम यांची वचने सोडली तर कानडी संतसाहित्याच्या आधारानेच माझ्या सद्गुरूंनी आध्यात्मिक अनुभवांची सत्यता माझ्या मनावर बिंबवली. एकदा काय झाले, इंचगेरीजवळच्या होर्ती या गावी आम्ही गेलो होतो. १९१२ चा सुमार असावा. तिथे भाऊसाहेब महाराजांनी एका शिष्याला एक पद, म्हणण्यास सांगितले. 'गुरुवे निम्माज्ञेयनु मीरदे नडेदवनु' हे पद तेव्हा मी ऐकले. महाराजांनी मला त्या पदाचा अर्थ विचारला. मला कन्नड भाषा फारशी अवगत नव्हती. म्हणून या पदामधील 'गरुड' आणि 'उरग' या दोन शब्दांपलीकडे आपली उडी गेली नाही हे मी त्यांना सांगितले. अशा तोडक्या मोडक्या ज्ञानावर विसंबून राहणे योग्य नव्हे, कन्नड भाषा शिकणे जरूर आहे, असे ते म्हणाले. त्यानंतर नवीन भाषा कशी शिकावी याबद्दलचा एक कानमंत्रच डेक्कन कॉलेजचे प्रिन्सिपल बेन यांनी सांगितलेल्या पद्धतीतून मिळाला. नवीन भाषेमधील एखादे पुस्तक घ्यावे. बायबलचे अनेक भाषांतून भाषांतर झाले असल्याने बायबल अशा अभ्यासासाठी घ्यावे असे बेनसाहेब म्हणत असत. भाषा परकी असेना का, पण लिपी मात्र आपली पाहिजे. उदाहरणार्थ, आत्मा हा संस्कृत शब्द आपण रोमन लिपीत Atma असा लिहितो. भाषा

वेगळी असली तरी इंग्लिश लोकांना शब्द वाचता येतो. मग आत्मा या शब्दाचा अर्थ समजावून घेतला की झाले. मूळ देवनागरी लिपीतील शब्द त्यांना पूर्ण अगम्य असतो. पण रोमन लिपीत तो घातला की कळतो. परकी भाषा शिकताना लिपी आणि शब्दार्थ या दोन अडचणी असतात. त्यातल्या पहिल्या अडचणीतून असे बाहेर पडता येते. मग आपल्या लिपीत लिहिलेल्या त्या शब्दाचा अर्थ कळला म्हणजे भाषा शिकणे सोपे होते. मी ही पद्धत वापरली. बाबाचार्य काव्य यांनी विजापूरहून १९०८ साली महाराजरवर वचन हे पुस्तक प्रसिद्ध केले होते. यात श्री. निंबरगी महाराजांची वचने आहेत... 'महाराजरवर वचन' हे पुस्तक देवनागरी लिपीत छापलेले आहे त्यामुळे त्याचा मला फार उपयोग झाला".

३ अभ्यासाचे सूत्र

ज्या विषयाचा अभ्यास करायचा त्यावरील जास्तीत जास्त साहित्य जमा करणे ही गुरुदेवांच्या अभ्यासातील पहिली पायरी. यासाठी त्या विषयावरील हाताला येतील तितकी पुस्तके ते वाचत असत. कार्लाइलवर लिहिताना कार्लाइलची सर्व पुस्तके तर त्यांनी आत्मसात केली होतीच, शिवाय कार्लाइलवर इतरांनी लिहिलेले ग्रंथही पालथे घातले होते. साहित्य जमवण्याचे हे काम महिनोन् महिनेच काय, कधीकधी वर्षानुवर्षेही चाले. या कालात त्यांचे मन त्या विषयाने भारलेले असे. साहित्य समोर आल्यावर त्याची मांडणी सुरू होई. आधी त्याचे विषयवार वर्गीकरण करून त्या त्या विषयाचा मथळा ठरवला जाई. मग जमलेले सर्व साहित्य त्या मथळ्यांनुसार त्या त्या विभागात टाकले जाई. विभागणीचे हे काम सोपे करण्यासाठी त्यांनी एक युक्ती केली होती. एक मोठी लोखंडी पेटी घेऊन तिच्यात मानसशास्त्र, नीतिशास्त्र, साक्षात्कारशास्त्र, सत्ताशास्त्र वगैरे विषयांसाठी आठ खाने तयार करून घेतले होते. त्या त्या विषयावरील मजकूर मग या वेगवेगळ्या खान्यांतून ठेवायचा असे. काही काळ त्यांच्या खोलीला पोस्ट ऑफिसमधल्या सॉर्टिंग रूमचे स्वरूप येई. त्याच्यानंतरची प्रक्रिया म्हणजे एकेका खान्यातील टिपणे बाहेर काढणे व त्यांची पुन्हा मथळे, उपमथळे अशा पद्धतीने मांडणी करणे. उदाहरणार्थ सत्ताशास्त्राच्या खान्यातून काढलेली

सर्व माहिती पुन्हा जीव, जग व ईश्वर अशा तीन विषयानुरूप वाटणे. हीच प्रक्रिया आणखी आणखी सूक्ष्म स्तरावर चालू राही. सत्ताशास्त्राच्या तीन विभागांतील ईश्वर हा विषय घेतला की मग त्याचे पुढे विषयवार विभाजन सुरू होई : (अ) ईश्वराच्या अस्तित्वाचे युक्तिवाद (आ) ईश्वराचे स्वरूप (इ) जीव व ईश्वर यांचा संबंध किंवा (ई) ईश्वर व जग यांतील संबंध अशा प्रकारची ही पुढची विभागणी करण्यात येई. मग आणखी एक पाऊल पुढे. ईश्वराच्या अस्तित्वाचा युक्तिवाद हा विषय हातात घेतला म्हणजे त्या ठिकाणी भारतीय तत्त्वज्ञांनी मांडलेले विचार आणि पाश्चात्त्य तत्त्वज्ञांची मते या सर्वांचा समावेश करणे अगत्याचे असे. ईश्वर आहे हे सिद्ध करणे, तसेच ईश्वर नाही असा दावा करणे, यासाठी लोकांनी मांडलेल्या युक्तिवादांचे गुणावगुण पारखून त्यांची सविस्तर साधकबाधक चर्चा होई. त्यांचा तौलनिक अभ्यास होई आणि त्या युक्तिवादांच्या आपापसातील खंडनमंडनाचा परामर्शही घेतला जाई. सरतेशेवटी या सर्व ऊहापोहावरील आपले मत गुरुदेव मांडत. एका खान्यातील सर्व साहित्याची अशी व्यवस्था लागली की दुसरा खाना. तशीच चर्चा पुन्हा करून, सर्व खान्यांतील साहित्याची बारीकसारीक मुद्यापर्यंत वाटणी करीत असत. तपशीलवार विश्लेषणाची ही क्रिया म्हणजे ग्रंथाच्या इमारतीचे आधारस्तंभ असत. यांच्या आधारे नंतर संश्लेषण किंवा रचना सुरू होत असे. विषयवार वाटणी केलेले सर्व साहित्य जागच्याजागी बसवले जाई. मग ती इमारत बघताबघता आकार घेऊ लागे. प्रत्येक मुद्याची सुसूत्र मांडणी केलेली दिसे, एकही मुद्दा तरंगत राहत नसे. ज्याची त्याची योग्य जागा ज्याला त्याला मिळे, त्यामुळे विस्कळितपणाला वाव नव्हता. सर्व विषय चपखल बसलेली अशी एक सुसंबद्ध प्रणाली रूप घेई. एखाद्या लेखकाच्या साहित्याचा अभ्यास असो, एखादे पुस्तक लिहिण्याचे काम असो, की एखाद्या सिद्धांताचे विवरण असो, गुरुदेवांच्या अभ्यासाची हीच पद्धत होती. हे विश्लेषण आणि संश्लेषण त्यांच्या पुस्तकांच्या अनुक्रमणिकांत दृष्टोत्पत्तीस येते. तिथे प्रकरणे, त्यांतील विषय, त्यांखाली येणारे मुद्दे यांचे अगदी अध्याय-पाद-सूत्र किंवा दशक-समास-ओवी अशा साच्यात दर्शन होत असे. अशी ही अनुक्रमणिका

प्रत्येक पुस्तकाला असावयाचीच.

तत्त्वज्ञान किंवा मानसशास्त्र या विषयांवरील जाडजूड ग्रंथांचा, त्यांच्या १/४ किंवा १/५ भागाइतका गोषवारा काढण्याची विलक्षण हातोटी गुरुदेवांना साधली होती. ग्रंथांच्या या संक्षिप्त रूपामध्ये विषयांचा पूर्वापर संबंध इतका बेमालूम टिकवला जात असे की युक्तिवादात कुठेही खंड पडलेला दिसत नसे. भाषेचा ओघ कुठेच न अडखळता वाहत असे आणि हे एक संक्षिप्त रूप आहे असा कधी कुणाला संशय येण्याला जागाच नसे. एडवर्ड केअर्ड या लेखकाच्या 'दि क्रिटिकल फिलॉसॉफी ऑफ इमॅन्युएल कांट' या दोन खंडात्मक ग्रंथाचा जो सारांश गुरुदेवांनी काढला आहे त्याचा इथे दाखला देण्यासारखा आहे. या सारांशाच्या वह्यांमधून बाजूच्या समासात लिहिलेला मजकूरही महत्त्वाचा आहे. त्यामध्ये चालू विषयावर ॲडॅमसन किंवा पॉलसेन अशा बड्या लेखकांच्या कांटवरील मतांची नोंदणी आहे. कधीकधी स्वतःची मतेही दिलेली आहेत. एखाद्या ग्रंथाला संक्षिप्त रूप देणे ही गोष्ट सोपी नाही हे कुणीही कबूल करेल. विल्यम जेम्ससारख्या प्रथितयश आणि कुशल ग्रंथकाराने आपल्या स्वतःच्या 'दि प्रिन्सिपल्स ऑफ सायकॉलॉजी' या द्विखंडात्मक ग्रंथाला दिलेले संक्षिप्त रूप बघितले की हे सहज पटेल. जेम्स शब्दसृष्टीचा ईश्वर होता. पण त्याचा मूळचा ग्रंथ जितका रसरशीत आणि प्रासादिक आहे तितकीच ही संक्षिप्त आवृत्ती रसहीन व शेळपट आहे.

पुस्तकाचे परीक्षण करण्याची गुरुदेवांची पद्धत और होती. एखाद्या विद्यार्थ्याला ते त्या पुस्तकाची अनुक्रमणिका व प्रस्तावना, तसेच पुस्तकाची सुरवात व त्याचा शेवट वाचण्यास सांगत. मग मधल्या एखाद्या परिच्छेदातील सुरवातीचे एखादे दुसरे वाक्य वाचून घेत. असे हे वाचन चालू असताना 'हं, या मजकुरावर खूण कर, सोडून दे, पुढे चल, हे आणखी पुन्हा वाच, हे नको, पुढचे पान काढ, असे त्यांचे पाठोपाठ हुकूम सुटत. पुष्कळदा ते म्हणायचे की परिच्छेदाचे पहिले वाक्य वाचावे म्हणजे शितावरून भाताची परीक्षा होते आणि तो परिच्छेद वाचायचा की सोडून द्यायचा हे ठरवता येते. वाचन चाललेले असतानाच इकडे

एका कागदावर महत्त्वाचे मुद्दे आणि त्यांचे पृष्ठक्रमांक यांची नोंद व्हायची. मग सूची आणि संदर्भग्रंथांची यादी चाळायला सांगत. हे सर्व झाले की ते एकूण पुस्तकाचा आढावा घ्यायचे. प्रकरणांची नावे चर्चिल्या गेलेल्या विषयाला अनुरूप आहेत का, त्यांत जन्यजनक भाव सांभाळला गेला आहे का, लेखकाकडे तौलनिक व चिकित्सक अभ्यासाची दृष्टी आहे का, ग्रंथात काही अपूर्वता आहे का, अथवा विसंगती, पुनरुक्ती, व्याकरणदोष किंवा अपशब्द असे दोष तिथे आहेत का, या सर्व गोष्टींचा विचार होई. इतके झाले म्हणजे अगदी सहजगत्या त्या पुस्तकाचे परीक्षण तोंडी सांगून लिहून घेत. पुस्तकाच्या अंतरंगात शिरण्याची कला त्यांना बरोबर साधली होती. जणू पुस्तकांची नाडीच त्यांच्या हातात येई. क्ष-किरणाचा फोटो किंवा आणखी असलेच काही अहवाल हाताशी नसताना पूर्वीचे वैद्य नाडीपरीक्षेवरून प्रकृतीचे निदान करीत असत ना, अगदी तशीच. विद्यार्थ्यांना एखाद्या पुस्तकाचा उपयोग कसा होईल हे सांगायला ते कधीच विसरत नसत.

४ व्याख्यानांची पूर्वतयारी

त्यांचा अभ्यास किती सखोल असे याचा एक नमुना पाहू. प्लेटोच्या गॉर्जिअस या संवादावर देण्याच्या व्याख्यानाचे टिपण खाली दिले आहे. दोन अडीच पानांच्या या टिपणात त्या संवादातील सर्व मुद्दे आले आहेत. या संवादात आणि इतर संवादात प्लेटोने आपली जी मते मांडली आहेत त्यांचा तौलनिक अभ्यास इथे आहे. प्लेटोची मते व इतरांनी मांडलेली मते यांचेही मूल्यमापन आहे. या टिपणाच्या शेवटच्या वाक्यावरून स्पष्ट होते की हे टिपण पूर्ण करण्याआधी त्यांनी ग्रीक तत्त्वज्ञानावरील गाँपर्झ किंवा झेलर अशा अधिकारी लेखकांची मते पूर्ण अजमावली होती.

गॉर्जिअस

प्रास्ताविक - गॉर्जिअस, पोलस व कॅलिक्लिस हे तीन सोफिस्ट पंथी (म्हणजे ग्रीसमधील प्राचीन काळचे वितंडवादी किंवा वादपटू)

लोक. गॉर्जिअस हा लिऑंटिनी देशाचा अथेन्स येथील राजदूत. पोलस हा त्याचा शिष्य. कॅलिक्लिस हा त्याचा अथेन्स येथील यजमान.

१ अ) गॉर्जिअस हा शून्यवादी वाटपटू. त्याच्या दृष्टीने वस्तू, वस्तूचे ज्ञान व त्या ज्ञानाची देवाणघेवाण सर्वच मिथ्या आहेत.

ब) अलंकारशास्त्रापासून संवादाला सुरवात.

आपल्या वादपटुत्वाचा परिणाम श्रोत्यांवर जसा होतो याचे गॉर्जिअस वर्णन करतो. सॉक्रेटिसचे म्हणणे असे की अलंकारशास्त्र किंवा भाषेची कसरत म्हणजे नुसती मुखस्तुती करण्याची कला आहे. इथं न्याय-अन्याय, ज्ञान-अज्ञान यांची उलटापालट करायला वाव मिळतो. गॉर्जिअसचे त्याला प्रत्युत्तर असे की तलवारीचे हात करणाऱ्याकडून जरी पितृहत्या घडली तरी त्याचा दोष शस्त्रविद्येवर थोडाच येतो? पण सॉक्रेटिसची ठाम भूमिका अशी आहे की एखाद्या कलेचे किंवा शास्त्राचे ज्ञान आहे याचाच अर्थ असा की ते ज्ञान योग्य रीतीनेच व्यवहारात उतरणार.

२ या आपत्काली पोलस आपल्या गुरूंच्या मदतीला धावतो.

अ) कलेचे प्रकार दोन. एक श्रेयसाकडे नेणारी व दुसरी प्रेयसाकडे नेणारी. पहिल्या प्रकारात मल्लविद्या, वैद्यकशास्त्र, विधिविधानव्यवस्था आणि न्याय-व्यवस्था यांची गणना होते. सौंदर्यप्रसाधनशास्त्र, पाकशास्त्र, वादविवादकला आणि अलंकारशास्त्र यांना दुसऱ्या प्रकारात घातले जाते.

ब) या संवादाद्वारे श्रेयस् व प्रेयस् ही संपूर्णपणे भिन्न आहेत ही शिकवण सॉक्रेटिस देतो. नैतिक जीवनात सुखाला स्थान नाही. सुख आकड्यांत मोजता येत नाही. म्हणून प्रोटॅगोरास नावाच्या प्लेटोच्या आधी लिहिलेल्या संवादाप्रमाणे किंवा लॉज नावाच्या नंतर लिहिलेल्या संवादाप्रमाणे सुखांचे मोजमाप इथे सांगितलेले

नाही. (सुखांची बेरीजही करता येत नाही). श्रेयस्‌च्या मापात प्रेयस्‌ची आणि प्रेयस्‌च्या मापात श्रेयस्‌ची मोजणी होत नाही.

३ अ) आता कॅलिक्लिसविरुद्ध सॉक्रेटिस महात्मा गांधींच्या छापाचा युक्तिवाद करतो. १) दुसऱ्यांवर अन्याय करण्यापेक्षा स्वतःवर अन्याय झालेला परवडला. २) शिक्षा चुकवण्यापेक्षा ती भोगणे अधिक श्रेयस्कर आहे. ही गोष्ट सर्वांना सर्रास लागू आहे, मग तो शत्रू असो वा मित्र असो. दुसऱ्यांवर आग पाखडणारे दुर्जन आणि सदा दुष्ट बुद्धी असणारे खलपुरुष अवतीभोवती असतातच. त्यांच्याशी गाठ पडली तरी आपण समुद्राप्रमाणे शांत असावे. सॉक्रेटिसचा हा नैतिक उपदेश म्हणजे जगाच्या वाङ्मयात त्याने टाकलेली मोलाची भर आहे असे मत गाँपर्झ या इतिहासकाराने व्यक्त केले आहे.

ब) कॅलिक्लिस परंपरागत नीती व मन मानेल तसे वागणे यांत फरक करतो. परंपरागत नीती ही कृत्रिम व परिस्थितीनुसार केलेली आहे. सॉक्रेटिस जिला परंपरागत नीती म्हणतो तिच्यामुळे समाजात उलथापालथ होईल. भित्रा मनुष्य परंपरागत नीतीचा आधार घेतो. दुबळी माणसे आपला बचाव करण्याकरिता अशा नीतिनियमांना पुढे करतात. सॉक्रेटिसला काडीइतके व्यवहारज्ञान नाही. वास्तविक स्वैरवृत्तीत खरे सुख आहे. सुख म्हणजेच सद्‌गुण, बाकी सर्व झूट. प्रकृतिधर्माप्रमाणे वागणे ही नीतीच सार्वभौम आहे, बळी तो कान पिळी हाच खरा न्याय. 'ज्यांच्या मनगटात जोर आहे त्यांनी वैभव मिळवावे व ज्यांच्या अंगात हिंमत आहे त्यांनी ते टिकवावे'. अतिमानवाची कल्पना. युक्ती व शक्ती यांचा संगम हाच आदर्श (हिटलर). कॅलिक्लिसचे हे सर्व विचार लक्षात घेऊन प्लेटो त्यांचा धुव्वा उडवतो.

४ अ) आपल्या अंगच्या गुणांचा यथायोग्य उपयोग करता

येणे म्हणजेच सद्‌गुण, या प्लेटोच्या कल्पनेवर पायथागोरस, तसेच ऑरफिक संप्रदायाची छाप दिसते. सोमा आणि सेमा[३] यांच्यावर प्लेटो कोटी करतो. प्लेटोने दक्षिण इटलीला भेट दिली होती याची इथे आठवण होते.

ब) गानेबजानेवाले, कवी आणि राजकारणी लोक यांचा सॉक्रेटिस धि:कार करतो (पेरिक्लिस व थेमिस्टोक्लिस). राज्यकारभार नासका व खिळखिळीला आलेला दिसतो आहे, त्याला राजकारणीच जबाबदार आहेत. बंदरे बांधली आहेत आणि वेशी उभारल्या आहेत पण न्यायाला आणि संयमाला जागा नाही. आपला गुरू सॉक्रेटिस याला राजकारणी लोकांनीच मृत्युमुखात ढकलले म्हणून एकजात सर्व राजकारण्यांबद्दल प्लेटोच्या मनात अढी बसली होती. जिथे राजकारणीच धि:कारले गेले तिथे वादपटू लोकांची काय कथा? गळणारी घागर आणि भरलेली घागर.[४] सॉक्रेटिस नैतिक मूल्यांसाठी जीव टाकणारा होता. तत्कालीन समाजाच्या कल्पना व स्वत:च्या कल्पना यांत फार तफावत आहे याची त्याला जाणीव होती.

क) सॉक्रेटिसने मांडलेली चित्रगुप्ताच्या न्यायनिर्णयाची कल्पना. ख्रिश्चन व मुस्लिम धर्मांतील अशाच कल्पना. "कसलाही डाग न पडलेल्या स्वच्छ अवस्थेत माझ्या आत्म्याला न्यायनिर्णयाच्या दिवशी चित्रगुप्तापुढे कसे उभे करता येईल एवढीच चिंता मला आहे", असे सॉक्रेटिस म्हणत असे. शिक्षा ही सुधारण्यासाठी असते. सूड घेण्यासाठी नाही.

सामान्यत: म्हणायचे तर गाँपर्झ आणि लुटस्लॉस्की हे एका बाजूला असून झेलर आणि स्टुअर्ट दुसऱ्या बाजूला आहेत. पहिल्या दोघांना प्लेटोच्या या संवादात त्याच्या आयडियांच्या सिद्धांताचा लेशही दिसत नाही, दुसऱ्यांना मात्र तो दिसतो.

वर्गात जे शिकवायचे त्याची टिपणे काढण्याची गुरुदेवांची विशिष्ट पद्धत होती. विद्यार्थ्यांना उपयुक्त अशी त्या त्या विषयांवरील पुस्तके व नियतकालिके ते प्रथम वाचत. मग ही सर्व माहिती मुद्देसूतपणे मांडून ते वरीलप्रमाणे टिपण तयार करीत. मग त्याला आणखी संक्षिप्त रूप देत व मग अतिसंक्षिप्त रूप देत. हे शेवटचे रूप साधारणपणे वहीच्या एका पानात मावेल इतके असून महत्त्वाचे शब्द अधोरेखित केलेले असत. हा शेवटला सारांश बहुशः ते स्वतः लिहीत. शिकवताना कधीमधी दृष्टी टाकावी लागली तर असू दे, म्हणून हा कागद ते वर्गात घेऊन जात.

शिकवायला जाण्यापूर्वी पूर्ण तयारी केलीच पाहिजे असा त्यांचा आग्रह असे. एक उदाहरण देण्यासारखे आहे. १९२२-२४ च्या सुमाराची गोष्ट. ४-५ वर्षे शिकवण्याचा अनुभव असलेले एक प्राध्यापक गुरुदेवांकडे गेले होते. तिथूनच ते कॉलेजात जाऊन वर्गावर जाणार होते. गुरुदेवांनी त्यांना सांगितले की आज तुम्ही रजा घ्या, शिकवण्यास जाऊ नका. ते प्राध्यापक म्हणाले की हा विषय मी ४-५ वर्षे शिकवीत आहे. म्हणून आता तयारी करण्याची मला जरूर नाही. प्रकरण प्राध्यापकांच्या अंगावर शेकले. "स्वतःच्या ज्ञानाचा गर्व होऊ देऊ नका आणि तयारी केल्याशिवाय वर्गावर जात जाऊ नका", असे बजावून गुरुदेवांनी त्यांना रजा घेण्यास भाग पाडले.

५ ताबडतोब वाचून संपवणे!

कोणत्याही विषयावरील नेमलेले किंवा महत्त्वाचे ग्रंथ वाचून गुरुदेव थांबत नसत. अनेक ज्ञानशाखांच्या अभ्यासात कालपरवापर्यंत काय काय काम झाले आहे हे अजमावण्यासाठी ते नियतकालिके वाचनात ठेवीत. माइंड व हिबर्ट जर्नल या दोन नियतकालिकांचे ते वर्गणीदार होते. ती सुरू झाल्यावेळेपासूनचा दोन्ही मासिकांचा प्रत्येक अंक त्यांनी जपून ठेवला होता. इंटरनॅशनल जर्नल ऑफ एथिक्स, रिव्ह्यू ऑफ मेटॉफिजिक्स, रिव्ह्यू ऑफ रिलिजन किंवा सायकॉलॉजी बुलेटिन यांसारखी मासिके त्यांच्या नित्य वाचनात होती. या सर्वांमधले महत्त्वाचे लेख निवडून टाइप करून घेऊन विषयवार बाईंडिंग करून ते ठेवत असत.

'ताबडतोब वाचून संपवणे' अशा मथळ्याखाली त्यांनी माईंड या नियतकालिकातील लेखांची एक यादी दिली आहे. तिची लांबी पाहूनच डोळे फिरतात. लागलीच संपवण्याच्या या यादीची लांबी जर एवढी तर एकूण वाचनाचा व्याप आणि त्यातील विषयांची विविधता किती असेल याची काहीशी कल्पना येऊ शकेल. विज्ञान, सौंदर्यशास्त्र, सत्ताशास्त्र, नीतिशास्त्र, समाजतत्त्वज्ञान, मानसशास्त्र, धर्मतत्त्वज्ञान या सर्व विषयांची इथे वर्णी लागली आहे. पुढील टिपण बोलके आहे.

ताबडतोब वाचून संपवणे

1.H.W. Carr, Einstein's Theory and Philosophy, Mind, 1922, Pp. 169-177 (Article).
2.T.Grenwood, Einstein and Idealism, Mind, 1922, Pp. 205-207.
3. R. B. Braithwaite, Prof. Eddington's Gifford Lectures, Mind, 1929, Pp. 409-435.
4. A. Seth Pringle-Pattison, The Idea of Immortality, Mind, 1923, Pp. 220-224. Reviewed by J.E. Mc Taggart.
5. G.E. Moore, The Refutation of Idealism, Mind, 1903, Pp. 433-453.
6. W. T. Stace, The Refutation of Realism, Mind, 1934, Pp. 145-155.
7. L. A. Reid, Artistic Experience, Mind, 1926, Pp. 181-203, (Article).
8. H. Delacroix, Psychologie de L' Art, Mind, 1928, Pp. 119-120. Reviewed by H. Knight.
9. W. T. Stace, The Meaning of Beauty, File 1930. Reviewed by T. E. Jessop.
10. L. A. Reid, A Study in Aesthetics, File 1931, Reviewed by P. Leon.
11. J. S. Mackenzie, An Introduction to Social Philosophy, Mind, 1891, Pp. 114-119. Reviewed by S. Alexander.
12. H. Sturt, Moral Experience, Mind, 1929, Pp. 256-257. Reviewed by W. D. Lamont.
13. Hartmann, Ethics.

14. W. James, A Pluralistic Universe, Mind, 1909, Pp. 576-588. Reviewed by A. E. Taylor.
15. J.S. Mackenzie, Elements of Constructive Philosophy, Mind, 1919, Pp. 229-234. Reviewed by B. Bosanquet.
16. C. Lloyd Morgan, Life, Mind and Spirit, Mind, 1926, Pp. 354-360. Reviewed by L. T. Hobhouse.
17. W. James, The Varieties of Religious Experience, Mind, 1903, Pp. 245-250. Reviewed by H. Rashdall.
18. E. Caird, The Evolution of Theology in Greek Philosophy, Mind, 1905, Pp. 403-412, Reviewed by R. P. Hardie.
19. H. Delacroix, Etudes d'Histoire et de Psychologie du Mysticisme, Mind, 1912, Pp. 112-116. Reviewed by A. R. Whately.
20. W. R. Sorley, Moral Values and the Idea of God, Mind, 1919, Pp. 234 ff. Reviewed by R. Inge.
21. W. R. Inge, The Philosophy of Plotinus, Mind, 1919, Pp. 238-245. Reviewed by A. E. Taylor.
22. J. B. Pratt, The Religious Consciousness, Mind, 1921, Pp. 368-369. Reviewed by J. W. Scott.
23. J. B. Pratt, Adventures in Philosophy and Religion, Mind, 1935.
24. A. G. Widgery, The Comparative Study of Religion, Mind, 1924, Pp. 105-106. Reviewed by C. C. J. Webb.
25. E. S. Waterhouse, The Philosophy of Religious Experience, Mind, 1924, Pp. 443-451. Reviewed by J. W. Scott.
26. J. A. Stewart, Plato's Doctrine of Ideas, Mind, 1910, Pp. 82-97. Reviewed by A. E. Taylor.
27. R. A. C. Macmillan, The Crowning Phase of the Critical Philosophy, Mind, 1914, Pp. 597-604. Reviewed by R. F. A. Hoernle.
28. E. Caird, Hegel, Mind, 1883, Pp. 432-438. Reviewed by R. Adamson.
29. J. Caird, Spinoza, Mind, 1888, Pp. 601-604. Reviewed by W. R. Sorley.
30 J. A. Stewart, The Myths of Plato, Mind, 1906, Pp. 94-101.

Reviewed by J. Burnet.
31. C. Werner, Aristotle et l' Idealism Platoniscien, Mind, 1910, Pp. 590-593. Reviewed by A. E. Taylor.
32. N. K. Smith, A Commentary to Kant's Critique of Pure Reason, Mind, 1919, Pp. 217-229. Reviewed by G. D. Hicks.
33. J. Ward, A Study of Kant, Mind, 1923, Pp. 479-485, Reviewed by N. K. Smith.
34. W. T. Stace, The Philosophy of Hegel, Mind, 1924, Pp. 463-465. Reviewed by J. S. Mackenzie.
35. J. H. Muirhead, The Platonic Tradition of Anglo-Saxon Philosophy, Mind, 1931. Reviewed by H. Barker.
36. J. S. Mackenzie, E. Caird as a Philosophical Teacher, Mind, 1909, Pp. 509 ff, (Article).

६. अध्यात्मविद्यापीठ

(अ) संस्थेची उद्दिष्टे

ईश्वरविषयक प्रश्नांचा तात्त्विक अभ्यास करण्याची ज्यांना ज्यांना म्हणून गोडी आहे त्यांनी एकत्र यावे या उद्देशाने प्रा. रानडे यांनी अध्यात्मविद्यापीठ या संस्थेची स्थापना केली. विश्वधर्माच्या मूलतत्त्वांचा इथे अभ्यास व्हावयाचा होता. अंधश्रद्धा व संशयपिशाच्च यांना इथे मज्जाव होता, कारण त्यामुळे मन पूर्वग्रहदूषित होऊन खरा अभ्यास होत नाही. म्हणूनच धर्माच्या अभ्यासाला तत्त्वज्ञानाची जोड द्यावी लागते. ॲकेडेमीच्या प्रॉस्पेक्टसमध्ये गुरुदेवांनी सांगून ठेवले आहे की, "इथला मुख्य अभ्यासविषय तत्त्वज्ञान आणि धर्मशास्त्र आहे". किंवा, "मनुष्याच्या मनात जगातल्या अंतिम तत्त्वाच्या शोधाची जी ओढ आहे तिला तात्त्विक पाया देणे हा या अभ्यासाचा उद्देश आहे. ....विश्वाबद्दलचा तात्त्विक दृष्टिकोन हवाच पण त्याबरोबर प्रचलित धर्ममतांचा अभ्यासही केला पाहिजे किंबहुना आपल्या परिशीलनात या दोन्हींचा संगम व्हावयास हवा. म्हणजेच आध्यात्मिक जीवनात आपल्याला मिळवावयाचे काय, आणि आपण मिळवले काय याचे तर्कशुद्ध स्पष्टीकरण आणि समर्थन आपल्याला देता येते" (पृ २-३) . अध्यात्मविद्यापीठाचा उपक्रम या कार्यासाठीच केला होता. इंडियन

फिलॉसॉफिकल रिव्ह्यू या नावाचे एक त्रैमासिक गुरुदेवांनी सुरू केले होते. विविध ग्रंथांचे प्रकाशन हा संस्थेचा आणखी एक संकल्प होता. यात धर्मतत्त्वज्ञानावरील ग्रंथांचा समावेश तर होताच होता, पण भारतीय व पाश्चात्त्य तत्त्वज्ञानावरील ग्रंथांचाही होता. ग्रंथ प्रकाशनाला गुरुदेवांच्या दृष्टीने फार महत्त्व होते, कारण व्याख्यानांच्या योगाने एखादा विषय जरी लवकर समजत असला तरी ग्रंथ ही टिकाऊ संपत्ती असते. त्यांचे पुन्हा पुन्हा वाचन करता येते. ग्रंथप्रकाशनाला गुरुदेव किती मोल देत होते हे त्यांच्या एका सहजपणे लिहिलेल्या वाक्यावरून कळते. पूर्वमीमांसा या सर गंगानाथ झा यांच्या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेत ते म्हणतात की अगदी संगमरवरी इमारती घेतल्या तरी त्यापेक्षा ग्रंथ अधिक टिकाऊ असतात. हें प्रचीतीचें बोलणें या गुरुदेवांच्या पुस्तकात ही प्रस्तावना असून पृ. ७१ वर वरील वाक्य आहे. लिखाणाची परिभाषा सुस्पष्ट व तंतोतंत असावी. तसेच भारतीय तत्त्वज्ञान पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाच्या आधुनिक परिभाषेत मांडावे. एखाद्या विषयाचा अभ्यास करताना रेखीव व तंतोतंत परिभाषेची नितांत आवश्यकता असते हे आज आपल्याला पूर्णपणे पटले आहे. पण ही गरज गुरुदेवांनी अर्ध्या शतकापूर्वी ओळखली होती. प्रॉस्पेक्टसच्या सुरवातीस ते पुढे म्हणतात, "भारतीय व पाश्चात्त्य तत्त्वज्ञानात जे बहुमोल विचार आहेत त्यांचा संगम करण्याचा प्रयत्न अध्यात्मविद्यापीठ करणार आहे. त्यातून मनुष्याच्या विचाराला निश्चित दिशा लागावी अशी अपेक्षा आहे. ही विचारधारा ईश्वराभिमुख आहे. ईश्वराकडे जाण्याचा मार्ग दाखविण्याचे सामर्थ्य भारतीय विचारात असल्यामुळेच आध्यात्मिक जीवनाचे माहेरघर असे भारताला म्हणता येईल".

एखाद्या ज्ञानकोशाप्रमाणे समग्र माहिती देणारा भारतीय तत्त्वज्ञानाचा इतिहास लिहिला जावा या हेतूने त्यांनी एक तपशीलवार आराखडा १९१८ सालीच तयार केला होता. भारतीय तत्त्वज्ञानाचा इतिहास वास्तविक भारतीयांनीच लिहायला हवा आणि हे काम याआधीच व्हावयास हवे होते. गुरुदेवांच्या या आराखड्याकडे नुसती नजर टाकली तरी अनेक गोष्टी लक्षात येतात. यामध्ये तत्त्वज्ञान व धर्मशास्त्र यो दोहोंना योग्य स्थान दिलेले होते. त्यात वैदिक व अवैदिक दर्शनांचा

समावेश होता. यांपैकी काही दर्शनांचे वाङ्मय संस्कृतमध्ये होते तर इतर काहींचे नंतर आलेल्या भाषांमध्ये होते. थोडक्यात, भारतीय तत्त्वज्ञानाचा इतिहास लिहिण्याच्या कार्यात या योजनेने नवजीवनकालाची सुरवात होणार होती. १६ खंडात्मक इतिहासाची आणखी एक योजना त्यांनी तयार केली होती. युरोपातील तत्त्वज्ञान, भारतीय तत्त्वज्ञान व धर्मतत्त्वज्ञान या तीन विभागांचा यात अंतर्भाव होता. या दोन्ही योजना पुढीलप्रमाणे :-

(आ) आठ खंडात्मक भारतीय तत्त्वज्ञानाच्या इतिहासाची योजना :

१ दि ऑरिजिन्स
२ दि क्रिएटिव्ह पीरिअड
३ दि सिंथेटिक पीरिअड
४ दि व्हॉइस ऑफ डिसेंट
५ दि पीरिअड ऑफ रिकन्स्ट्रक्शन
६ दि क्राउनिंग फेज
७ मिस्टिसिझम
८ मॉडर्न टेंडन्सीज

(इ) सोळा खंडात्मक भारतीय तत्त्वज्ञानाच्या इतिहासाची योजना :

१ दि पाथवे टु गॉड
२ रीसेंट टेन्डन्सीज ऑफ युरोपियन थॉट
३ दि मेटॅफिजिक्स ऑफ ॲरिस्टॉटल
४ दि प्रॉब्लेम्स ऑफ मेटॅफिजिक्स
५ दि सर्च ऑफ रिलिजन्स फॉर गॉड
६ दि मिस्टिकल बेसिस ऑफ ख्रिश्चॅनिटी
७ दि सायंटिफिक ॲप्रोच टु गॉड
८ दि प्रिन्सिपल्स ऑफ थिऑपॉलिटी
९ ॲन आउटलाइन ऑफ इंडियन फिलॉसॉफी
१० ए कन्स्ट्रक्टिव्ह सर्व्हे ऑफ उपनिषदिक फिलॉसॉफी

११ ए क्रिटिकल सर्व्हे ऑफ बुद्धिझम

१२ दि फिलॉसॉफी ऑफ दि भगवद्गीता

१३ वेदांत इन रिलेशन टु वेस्टर्न थॉट

१४ इंडियन मिस्टिसिझम

१५ कॉन्टेंपोररी टेन्डन्सीज ऑफ इंडियन थॉट

१६ एसेज अँड रिव्ह्यूज

सप्टेंबर १९१८ मध्ये डॉ. एस. के. बेलवलकर व डॉ. एन. जी. सरदेसाई यांच्या समवेत गुरुदेव लोकमान्य टिळकांना भेटावयास गेले होते. लोकमान्य तेव्हा विलायतेला जाण्याच्या जारीच्या तयारीस लागले होते. पण भारतीय तत्त्वज्ञानाचा इतिहास लिहिण्याच्या कामाबद्दल त्यांना एवढी कळकळ होती की त्यांनी सहा तास या इतिहासाच्या आराखड्याची चर्चा करण्यात घालवले. 'हे काम तडीस न्या' असे त्यांनी सांगितले. एवढेच नव्हे तर 'हिंदी तत्त्वज्ञानाचा इतिहास लिहिणे हे एक मोठे राष्ट्रीय कार्य आहे व हे काम तुम्ही पार पाडू शकाल', असा आशीर्वादही दिला.राजकारणात पडलो नसतो तर असे प्रचंड कार्य मीच अंगावर घेतले असते असे उद्गारही त्यांनी काढले.[५]

उत्तरार्ध : अध्यापनपद्धती

१ तत्त्वज्ञानावरील प्रेम

गुरुदेव रानडे यानी १९११ पासून अध्यापनकार्याला सुरुवात केली. तेव्हा ते पुण्यास फर्ग्युसन कॉलेजात इंग्रजी शिकवीत. नेमलेली पुस्तकेच फक्त शिकवावी असे त्यांनी कधीही केले नाही. कार्लाइल शिकवताना साहित्य-मीमांसेचा त्यांनी सखोल अभ्यास केला. १९१४ पासून ते फर्ग्युसन कॉलेजात तत्त्वज्ञान शिकवू लागले. भारताच्या इतिहासात पुढे नावारूपाला आलेल्या अनेक व्यक्ती त्यांच्या हाताखालून गेल्या व तत्त्वज्ञान शिकविण्याच्या गुरुदेवांच्या हातोटीची त्यांनी सदैव तारीफ केली. अगदी सुरवातीला प्रा. रानडे गणित विषयाचे विद्यार्थी होते. बिनचूकपणा, नेटकेपणा, सुस्पष्टता किंवा नैगमनिक निष्कर्षापोटी येणारी निश्चितता या गुणांचा विचार केला तर गणिताची बरोबरी इतर कुठलेही शास्त्र करू

शकणार नाही. या गुणांमुळे गणित विषय त्यांना फार प्रिय होता. त्यांनी आपल्या गणिताच्या ज्ञानाचा तत्त्वज्ञानात उपयोग केला व अत्यणु-कलनाच्या मदतीने झेनोचे कूटप्रश्न सोडवले. आइनस्टाइनचा सापेक्षतेचा सिद्धांत प्रा. रानडे सहजगत्या हाताळीत असत. पाँकारे, हॉल्डेन प्रभृती शास्त्रज्ञांच्या सिद्धांतांवर त्यांचा अधिकार होता. 'विज्ञानाचे तत्त्वज्ञान' हा विषय त्यांनी एम. ए. च्या अभ्यासक्रमात घातला. तो विषय ते स्वतः शिकवीत. गणिताच्या किंवा तत्त्वज्ञानाच्या खोल पाण्यात शिरले की त्यांत विरोध राहत नाही हे सरळ आहे. पायथागोरस, प्लेटो, ॲरिस्टॉटल, देकार्त, लायब्नीझ, रसेल, व्हाइटहेड, जेम्स जीन्स हे जसे गणिती होते तसेच तत्त्वज्ञही होते. गंमत म्हणजे पहिल्यापहिल्याने प्रा. रानडे यांनी तत्त्वज्ञानाशी वाकडे धरले होते. ते म्हणतात, "आता मला कळून चुकले आहे की तत्त्वज्ञानाशी जे माझे वाकडे होते त्याचे कारण तत्त्वज्ञान विषयात काही दोष होता हे नव्हते. त्या वेळेस विद्यापीठाने या विषयासाठी लावलेली पाठ्यपुस्तके रट्याळ होती. कॉलेजात हा विषय शिकवण्याची पद्धतही त्या नावडीला कारणीभूत होती. दुर्दैवाने हा विषय शिकवणारे शिक्षक यथातथाच होते. तीस तीस वर्षे तत्त्वज्ञान शिकवत असूनदेखील विद्यार्थ्यांच्या मनात, विशेषतः एखाद्या तरुण व महत्त्वाकांक्षी विद्यार्थ्याच्या मनात ते आपल्या विषयाबद्दल तिळमात्रही गोडी उत्पन्न करू शकत नव्हते"[६]. "एखादा विषय मुळातच अवघड असतो आणि जर त्या विषयासाठी लावलेली पुस्तके रद्दी असतील तर तो विषय आणखीनच अवघड होतो, आणि बिचाऱ्या विद्यार्थ्याला सतत ठेचा लागतात".[७] अशा वेळेस अभ्यासक्रमाबद्दलचा आणि शिकवण्याच्या पद्धतीवरचा राग बिचाऱ्या विषयावर काढला जातो, किंवा संक्रमित होतो. संक्रमित होतो म्हणजे काय? शरीरशास्त्र व मानसशास्त्र या क्षेत्रात संक्रमणाचा सिद्धांत प्रस्थापित झालेला आहे. आपण काही डाव्या हाताने लिहायला शिकलेलो नसतो पण वेडेवाकडे का होईना, डाव्या हाताने आपण लिहू शकतो. कारण उजव्या हाताचे कौशल्य डाव्या हातात आपोआप संक्रमित होते किंवा उतरते. तसेच जर काही कारणाने एखाद्या माणसावर राग असला तर त्या माणसाशी साहचर्य असलेल्या सगळ्या

गोष्टींबद्दल राग येऊ लागतो. म्हणजेच माणसाचा राग त्याच्या जवळच्या इतर गोष्टींमध्ये संक्रमित होतो. असो. ज्ञानेश्वरांची महती पटण्यापूर्वी त्यांच्या नावाशी निगडित असणाऱ्या सगळ्याच गोष्टींनी विसोबा खेचरांच्या तळपायाची आग मस्तकाला जात होती तसेच गुरुदेवांचे तत्त्वज्ञानाबद्दल झाले होते. त्यांच्या मनात पुढे तत्त्वज्ञानाबद्दल जे प्रेम उत्पन्न झाले त्याबद्दल अधिक लिहिण्याची गरजच नाही. नामस्मरणाखालोखाल तत्त्वज्ञानाला त्यांच्या जीवनात स्थान मिळाले. त्यांचे तत्त्वज्ञानाचे अध्ययन, अध्यापन, त्या विषयावरील लेखन व संशोधन हे सर्व त्या प्रेमाने ओथंबलेले होते. आपल्या आध्यात्मिक अनुभवांचे समर्थन त्यांनी तत्त्वज्ञानाच्या कसोटीवर घासून केले, आणि साक्षात्कारशास्त्राला बौद्धिक साक्षात्कारशास्त्र या पदवीला पोचवले. साक्षात्काराच्या क्षेत्रात अंधश्रद्धारूपी गुरेढोरे शिरू नयेत म्हणून जणू काही त्यांनी त्या क्षेत्राला तत्त्वज्ञानाचे कुंपण घातले आणि सरतेशेवटी साक्षात्कार हे शास्त्र आहे असे सांगून तत्संबंधीचे मानसशास्त्र व तत्त्वज्ञान यांचा ऊहापोह केला.

२ मानसशास्त्रावरील प्रेम

तत्त्वज्ञानाप्रमाणेच मानसशास्त्रावरही त्यांचे प्रेम असे व त्यातील सिद्धांतांकडे त्यांची कुतुहूलपूर्ण दृष्टी असे. १९१७ साली त्यांनी तयार केलेला मानसशास्त्राचा अभ्यासक्रम व १९३६-३७ साली केलेला अभ्यासक्रम यांवर नजर टाकावी. मग एकदम लक्षात येते की त्यांच्या मानसशास्त्राच्या अभ्यासाचे क्षेत्र व खोली सतत वाढत होती. तदनुरूप अभ्यासक्रमातही ते बदल करीत होते. १९१७ साली मानसशास्त्र स्वतःच अजून अंकुरावस्थेत होते आणि तत्त्वज्ञानी मंडळींचाच तिथे वरचष्मा होता. अनेक दृष्टिकोनांतून मानसशास्त्राचा अभ्यास होऊ लागला होता पण अजून त्याला निश्चित आकार आला नव्हता. अर्थातच १९१७ सालच्या अभ्यासक्रमात सत्ताशास्त्राचा छाप असलेले म्हणजेच सैद्धांतिक मानसशास्त्र दृष्टीस पडते, आणि हे स्वाभाविक आहे. या अभ्यासक्रमात प्लेटो, देकार्त, लायब्नीझ किंवा बार्कले या तत्त्वज्ञांची नावे सापडतात. तरीही हे लक्षात येते की इथेसुद्धा ध्वनिसिद्धांत किंवा रंगवेदनाचा सिद्धांत यासारखे

प्रायोगिक मानसशास्त्रातील विषय डोकावू लागले होते. तसेच निरनिराळ्या क्रियांचे मेंदूवरील स्थान निश्चित करणे किंवा तंत्रिका-आवेगाचा वेग अजमावणे अशासारखे शरीर-मानसशास्त्रातील विषय इथे दिसतात. मानसशास्त्रात त्या वेळेपर्यंत जे जे शोध लागले होते त्या सर्वांची गुरुदेवांनी दखल घेतली होती. मानसशास्त्राचा कोंब भराभर वाढून त्याला झपाट्याने शाखा उपशाखा फुटत होत्या. १९३६-३७ साली गुरुदेवांनी दुसरा अभ्यासक्रम तयार केला, तोपर्यंत त्या वृक्षाने चांगले अंग धरले होते. तुलनात्मक मानसशास्त्र, बाल-मानसशास्त्र किंवा अपसामान्य मानसशास्त्र या शाखा स्वतंत्र झाल्या होत्या. वर्तनवाद आणि समष्टिवाद यासारखे संप्रदाय शड्डू ठोकून मैदानात उतरले होते. इतके दिवस मानसशास्त्र तत्त्वज्ञानाच्या घरी पाणी भरत होते, आता त्याने आपले स्वतंत्र घरकुल उभारले. १९३६-३७ सालच्या अभ्यासक्रमात या सर्व गोष्टींचे स्पष्ट प्रतिबिंब पडलेले दिसते.

गुरुदेवांच्या लिखाणात ठायीठायी मानसशास्त्राचे जे उल्लेख आहेत त्यांवरून त्यांना या शास्त्राची किती गोडी होती हे स्पष्ट होते. मनुष्याच्या मनाचे व्यापार कसे चालतात याची माहिती पुढील ज्ञानाला पायाभूत ठरते. त्यायोगे अनेक विषय सुलभ होतात. साक्षात्कारशास्त्राचा विचार करताना त्याच्या मानसशास्त्रीय पैलूकडे गुरुदेवांचे सदैव लक्ष असे. साक्षात्काराचे मानसशास्त्रीय परिणाम,[८] स्थितप्रज्ञाची मानसिक लक्षणे,[९] नामस्मरणातील मानसशास्त्रीय भाग,[१०] धर्मतत्त्वज्ञानाच्या मानसशास्त्रातील अद्‌भुताचे स्थान,[११] शरणागतीचे मानसशास्त्र,[१२] उन्मनी अवस्थेचे मानसशास्त्रीय दृष्टीतून विवरण[१३] अशा प्रकारच्या अनेक मुद्यांचा त्यांच्या लिखाणात समावेश असे. साक्षात्काराचे मानसशास्त्र या विषयाला एक स्वतंत्र स्थान मिळाले आहे.[१४] पाथवे टु गॉड या संकल्पित पुस्तकाच्या आराखड्यावरून हा विषय, आतापर्यंत बौद्धिक दृष्टिकोनातून हाताळला गेला होता, तो आता मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून विवरिला जाणार होता, हे स्पष्ट होते.[१५] बुद्धिवादी, भावनाप्रधान व कार्यरत असे जे साक्षात्कारी पुरुषांचे वर्ग केले आहेत ते व्यक्ती तितक्या प्रकृती या मानसशास्त्रीय तत्त्वावर आधारलेले आहेत.[१६]

जाग्रत्, स्वप्न, सुषुप्ती व तुर्या या चार अवस्था गुरुदेव मान्य करतात, पण तुर्येपलीकडे काही नाही असे त्यांचे ठाम मत आहे. उन्मनी किंवा तुर्यातीत ही पाचवी अवस्था आहे असे म्हणणाऱ्या वेदान्त्यांचे मत त्यांना संमत नाही. 'ही पाचवी अवस्था मानणे म्हणजे अनवस्था प्रसंगाला आमंत्रण देणे आहे'.[१७] एकदा तुर्येपलीकडे काही आहे हे कबूल केले तर मग आणखी 'त्याच्याही पलीकडे' असे करत का राहू नये?

१९५० साली एका विद्यार्थ्याला वर्तनवाद समजावून देताना त्यांनी एक मुद्दा मांडला. काम, क्रोध व भय या तीन मूलभूत किंवा प्राथमिक भावांचा वॉटसनने उल्लेख केला आहे, हे सांगून गुरुदेव वॉटसनचे कौतुक करून म्हणाले की वॉटसनने इथे भगवद्गीतेवरही मात केली आहे. गीतेत (१६.२१) काम, क्रोध व लोभ (कामः क्रोधश्च लोभश्च) तीनच विकार सांगितले आहेत. गीतेने या श्लोकात दिली नसली तरी वॉटसनने मात्र भयाची आवर्जून आठवण दिली आहे. वास्तविक भय हा प्राथमिक भाव आहे. दुसरे म्हणजे काम व लोभ हे गीतेने दोन स्वतंत्र भाव मानले खरे, पण लोभ तरी कामातूनच जन्माला येतो ना? मग ते दोन कशाला मानले पाहिजेत? गुरुदेव पुढे विचारतात, खरोखर एकच मूलभूत भाव का मानू नये, तीन तरी हवेत कशाला? वॉटसनचे टीकाकार हेच म्हणतात. मूलभूत म्हणजे एकच हवा. इकडे मूलभूत म्हणायचे आणि तिकडे तीन भाव मानायचे हे बरोबर नाही. जिथे बहुत्व दिसेल, तिथे एकत्व प्रस्थापित करण्याचा त्यांचा जो नेहमीचा कल असतो त्याचेच हे उदाहरण आहे. आणखी एक मुद्दा पाहू. वर्तनवादी मानसशास्त्रज्ञांचे म्हणजे आहे की मनात येणाऱ्या प्रत्येक कल्पनेसरशी कंठात थरथर होते. गुरुदेव आठवण देतात की साधकाने मात्र यापलीकडे गेले पाहिजे.[१८]

मनोविकलनवाद या समकालीन संप्रदायाचे गुरुदेवांच्या ग्रंथांत उल्लेख आहेत. काम हीच जीवनातील प्रमुख प्रवृत्ती आहे या मनोविकलनवादाच्या सिद्धांतातले तथ्य मान्य केलेच पाहिजे. काम या शत्रूचे प्रथम निर्दालन करा असे गीतेने कधीच सांगून ठेवले आहे.[१९] मनोविकलनवाद असेही म्हणतो की दडपलेल्या

प्रवृत्ती संधी मिळाली रे मिळाली की आपल्या वागण्यातून व्यक्त होतात. याच संदर्भात गुरुदेवांनी इसापनीतीमधील मांजराच्या गोष्टीकडे बोट दाखवले आहे. मांजराने राजकन्येचा वेष घेतला खरा, पण उंदीर दृष्टीस पडताक्षणीच उंदीर खाण्याच्या दडपून टाकलेल्या प्रवृत्तीने उचल खाल्ली व त्याने उंदरावर झेप घेतली.[२०]

तुलसीदासांनी केलेल्या रामाच्या वर्णनाचे स्पष्टीकरण करताना गुरुदेवांनी मानसशास्त्रातील आणखी दोन संप्रदायांतील संकल्पनांचा उपयोग केला आहे. कोणतीही घटना म्हणजे तिच्या अवयवांची बेरीज असते असे मानणाऱ्या सहयोजनवादान्वये राम म्हणजे विविध रसांची गोळाबेरीज. उलट समष्टिवादाच्या म्हणण्याप्रमाणे प्रत्येक घटनेमध्ये घटकांच्या बेरजेखेरीज आणखी एक संमेलगुण किंवा समष्टिगुण असतो. अर्थातच एकजात सगळ्या रसांनी युक्त असलेले राम केवळ सर्व रसांचा एकत्र बांधलेला गठ्ठा नसून एक अभिजात अनुभव आहे. तुलसीदासांनी अकथ शब्द वापरून हा अनुभव वर्णनापलीकडे असल्याचे सूचित केले आहे. गुरुदेवांचे मते तुलसीदासांची भूमिका समष्टिवादाची आहे.[२१]

व्यक्तित्व-प्रकाराच्या सिद्धांताला मानसशास्त्रात बरेच महत्त्व आहे. सांख्य तत्त्वज्ञानाने सत्त्व, रज व तम हे तीन गुण मानले आहेत. या तीन गुणांच्या अनुरोधाने गुरुदेवांनी विविध क्षेत्रांतील जी उदाहरणे दिली आहेत त्यांत मानसशास्त्रही आहे. जीन्स्च हा मानसशास्त्रज्ञ मूर्तकल्पी-व्यक्तित्व-प्रकार सांगतो, स्प्रँगर व कार्लाइल हेसुद्धा वेगवेगळे व्यक्तित्व-प्रकार मानतात.[२२] मूर्तकल्पी प्रकारात मोडणारी व्यक्ती आठवणीतून एखादी गोष्ट सांगत असली तरी जणूकाही ती वस्तू प्रत्यक्ष डोळ्यांसमोर असल्यासारखे सांगते. प्रतिमा स्मृतीतून आलेली असेल, पण ती अत्यंत स्पष्ट असते. स्प्रँगरने केलेले व्यक्तिप्रकार म्हणजे, १) बुद्धिवादी, २) अर्थ-व्यवस्थेकडे कल असणारे, ३) सौंदर्यदृष्टीचे, ४) समाजात रमणारे, ५) सत्ताभिलाषी व ६) धार्मिक प्रवृत्तीचे. नेत्याकडे पाहण्याची आपली दृष्टी कशी असते यावरून कार्लाइल व्यक्तित्वप्रकार करतो. १) नेता ईश्वरी अंश आहे, २) नेता प्रेषित आहे, ३) नेता कवी आहे, ४) नेता ब्रह्मकर्म करणारा आहे, ५) नेता

विद्वान आहे व ६) नेता राजा आहे. ही नेत्याबद्दलची मते असणारे व्यक्तित्वाचे सहा प्रकार झाले. युंगचे अन्तर्मुखी व बहिर्मुखी हे व्यक्तित्वप्रकार वापरून व त्यांना थोडी मुरड घालून त्यांत गुरुदेवांनी प्रसिद्ध व्यक्तींना बसवले आहे.[२३]

मानसशास्त्रातील मर्मग्राहित्वाचे हे आपले चारदोन दाखले आहेत. आणखी खूप खूप सांगता येतील.

३. शिकवता शिकवता

यॅशमान या लेखकाने कांटच्या शिकवण्याच्या पद्धतीचे वर्णन केले आहे. व्याख्यान देत असताना कांट जणूकाही श्रोत्यांसमोर एखादा बौद्धिक प्रयोगच करीत असे आणि तो करीत असतानाच तो स्वतःही विचारमग्न होई. सुरवातीस तो त्या विषयाचे एक स्थूल रेखाचित्र पुढे मांडी. नंतर नवीन नवीन कल्पना आणून तो त्यात बदल करी. पाठोपाठ आणखी स्पष्टीकरणे पुढे येत, पहिली स्पष्टीकरणे बाजूला सारली जात आणि असे होता होता मूळ चित्राची उजळणी होऊन त्याच्यावर एक अखेरचा हात फिरे. यामुळे त्या विषयाची पूर्ण रूपरेखा डोळ्यांसमोर उभी राही. श्रोत्यांनी या सर्व कार्यक्रमाकडे पूर्ण लक्ष दिल्यास त्याला विषय तर समजेच, शिवाय सुसंगत रीत्या विचार कसा करावा याचाही धडा मिळे.[२४] प्रा. रानडे यांच्या शिकवण्याच्या पद्धतीचे हे वर्णन आहे म्हणा ना ! आपल्या विद्यार्थ्यांना ते विचाराच्या उच्च पातळीवर घेऊन जात. शिकवताना किंवा लिहिताना एखाद्या विषयाची त्यांची फोड श्रेणित वर्गीकरणाप्रमाणे असे. तार्किक विभाजनाने मोठ्या वर्गाच्या खाली छोटे वर्ग व नंतर प्रत्येक छोट्या वर्गाखाली अधिकाधिक उपवर्ग करून वंशवृक्षाप्रमाणे निगामी सारणी तयार करण्याच्या त्यांच्या अध्ययनपद्धतीचे याआधीच जे वर्णन आले आहे, तेच त्यांच्या अध्यापनासही लागू आहे. पुढे प्राध्यापक झालेले गुरुदेवांचे विद्यार्थी सांगतात की, आपणही वर्गात शिकवताना हीच गुरुदेवांची पद्धत स्वीकारली आणि तिचा चांगला उपयोग झाला.

गुरुदेवांची आणखी एक पद्धत म्हणजे एखादा मुद्दा सांगून झाला की लागलीच त्याचे परीक्षण करणे. याचा दुहेरी फायदा होतो. एकतर परीक्षण चालले असताना

विद्यार्थ्यांची चिकित्सावृत्ती जागी होऊन तो विषय मनात चांगला ठसतो. दुसरे म्हणजे सगळे मुद्दे सांगून मग परीक्षणाला प्रारंभ झाला तर मुद्दा व त्याचे परीक्षण यांचा धागा तुटतो. शिवाय मध्ये येणाऱ्या मुद्यांमुळे पहिला मुद्दा लक्षात राहण्यामध्ये व्यत्यय येतो. याला पूर्वलक्षी निरोधन म्हणतात. पाठोपाठ नवीन मुद्दे येत गेले म्हणजे पुढे पाठ व मागे सपाट होते. परीक्षणाला पहिल्या मुद्यापासून सुरवात करायची ठरवले तर तोवर पहिला मुद्दाच विसरलेला असतो! अर्थात हे वर्गात शिकवत असतानाचे झाले. कारण लिहिलेल्या मजकुरात असतात तसे इथे डोळ्यासमोर ओळीने मुद्दे नसतात. एक उदाहरण सांगता येईल. ग्रीनचे मत असे की विज्ञानाप्रमाणेच नीतीलासुद्धा वस्तुनिष्ठता व सामान्यता असते, कारण दोन्ही ठिकाणी सर्व जीवांची उत्पती ईश्वरापासूनच झालेली असते हे मानावे लागते. इतके सांगितले की लागलीच गुरुदेवांनी पुढील प्रश्न उपस्थित केले – ही उत्पत्ती कोणत्या तऱ्हेची आहे? जीव हे ईश्वराचे अंश आहेत का? की ईश्वराची प्रतिबिंबे आहेत? की ते आभास आहेत? इथे ग्रीनची व वेदान्ताची उत्तम तुलना झाली. विद्यार्थ्यांच्या विचाराला चालना देऊन मग पुढचा मुद्दा सुरू होई.

निःसंदिग्धता हा गुरुदेवांचा विशेष गुण होता. विषयाचे ग्रहण सखोल असल्याने कुठे संदिग्धता नसे की वैचारिक गोंधळ नसे. अगदी अवघड तात्त्विक सिद्धांत देखील ते बाळबोध भाषेत सांगत. सत्ताशास्त्रासारखा क्लिष्ट विषय असला तरी ज्याला इंग्रजीचे बऱ्यापैकी ज्ञान आहे त्याला तो सहज समजे. एखाद्या प्रमेयाभोवती उलट्यासुलट्या विचारांचा उगीचच गुंता झालेला असतो त्यामुळे ते प्रमेय गहन वाटायला लागते. पण गुरुदेवांनी एकदा हा गुंता हलके हलके उकलायला सुरवात केली की तो गहनपणा कुठल्याकुंठे पळून जाई. पावलापावलागणिक विषय स्पष्ट होत जाई आणि विद्यार्थ्याला शेवटी असे वाटे की, अरे हे तर इतके सोपे आहे, आपण उगीचच घाबरून गेलो होतो! अंगविक्षेप करणे किंवा केवळ वक्तृत्वाने छाप मारणे हे गुरुदेवांनी कधी केले नाही. त्यांचे शिकवणे परिणामकारी होई याचे कारण विषयाचा त्यांनी केलेला मूलगामी अभ्यास व अतिशय सुसंगत

आणि मनोहारी शैलीत केलेली विषयाची मांडणी. सर्व व्याख्याने ते आधी अत्यंत साक्षेपाने तयार करीत. ही तयारी शेवटच्या क्षणापर्यंत चाले. गाडीतून विद्यापीठात जाताना सुद्धा सर्व मुद्दे ते वाचून घेत.

४. विद्यार्थ्यांच्या टिपणाचा नमुना

विद्यार्थ्यांना अवघड विषय सुद्धा कसा आत्मसात होत असे हे बघायचे असेल तर त्यांच्या एका विद्यार्थ्याची वर्गात घेतलेली टिपणे पाहणे फायद्याचे ठरेल.

ईश्वर हे वेदान्तातील एकमेवाद्वितीय तत्त्व. ईश्वरशास्त्रामध्ये ईश्वराचे जे स्थान आहे तेच स्थान तत्त्वज्ञानामध्ये ब्रह्माला आहे. तुलना कराः- वॉर्ड आणि रॅशडाल. ईश्वर हेच एक सत्तत्त्व आहे (एकतत्त्ववाद). इथे ईश्वर म्हणजेच अंतिम तत्त्व किंवा ब्रह्म.

जीव सुद्धा मायाच आहेत, ईश्वरच फक्त सत् आहे हे शंकराचार्यांचे मत आहे. परंतु रामानुजाचार्य म्हणतात की अचित् (जड जग) आणि चित् (जीव) हेही खरे आहेत.

बादरायणाचार्यांचे मत आपल्यासारखेच आहे हे शंकराचार्य कसे सिद्ध करतात?

प्रश्न : ईश्वर किंवा ब्रह्म हे एकच सत्तत्त्व आहे की त्याच्या जोडीला इतर एखादे सत्तत्त्व आहे? त्यासाठी वेदान्तसूत्रांतील खालील सूत्रे पाहाः-

१ परमतः सेतून्मानसंबंधभेदव्यपदेशेभ्यः। ३.२.३१

२ सामान्यात् तु। ३.२.३२

३ बुद्ध्यर्थः पादवत्। ३.२.३३

४ स्थानविशेषात् प्रकाशादिवत्। ३.२.३४

५ उपपत्तेश्च। ३.२.३५

६ तथान्यप्रतिषेधात्। ३.२.३६

यांतील पहिले सूत्र पूर्वपक्ष मांडते. बाकीची सूत्रे उत्तरपक्ष

मांडतात. पहिल्या सूत्रात 'व्यपदेश' म्हणजे उल्लेख हा शब्द आहे. ज्याअर्थी या सूत्रात सेतू (पूल), उन्मान (मोजण्याचे प्रमाण), संबंध व भेद हे उल्लेख आहेत, त्याअर्थी आणखी दुसरे तत्त्व (परम्) असलेच पाहिजे. परम् = दुसरे.

पहिला आक्षेप :- दुसरे सत्तत्त्व असलेच पाहिजे, कारण उपनिषदात एतं सेतुं तीर्त्वा (छांदोग्य) असा सेतू शब्द आहे. ज्याअर्थी पूल दोन गोष्टींना जोडतो त्या अर्थी एकाहून अधिक सत्तत्त्वे असली पाहिजेत, म्हणजेच जग व जीव खरे आहेत.

दुसरा आक्षेप :- उन्मान याचा संदर्भ कठोपनिषदात आहे. अणोरणीयान् महतो महीयान्. सूक्ष्मातील सूक्ष्म व मोठ्याहून मोठे. अणोरणीयान् व महतो महीयान् या शब्दांनी ईश्वराचे मोजमाप केले आहे. मोजणे हे सापेक्ष पद आहे. दोन गोष्टी असतील तरच कमी-अधिक अशा प्रकारचे मोजणे शक्य होते.

तिसरा आक्षेप :- संबंध व भेद हे शब्द ब्रह्माला लावले आहेत. उदा. द्वा सुपर्णा सयुजा सखाया (मुंडक). दोन पक्षी आहेत, जुळे आहेत व मित्र आहेत. संबंध आला की दोन वस्तू आल्याच.

आक्षेपांना उत्तरेः-

१ पुलाच्या कल्पनेचे खंडन दुसऱ्या सूत्रात आहे. सेतू किंवा पूल हा शब्द सामान्य या अर्थी म्हणजे केवळ साम्य दाखवण्यासाठी वापरला आहे. मुख कमलाप्रमाणे आहे म्हणजे मुख कमलच नव्हे. मुखावर भुंगे नसतात. सूत्रामधील सेतू शब्दाचा अर्थ असा की ब्रह्माच्या साहाय्याने भवसागर तरून जाता येतो. ब्रह्म चिखलाचे, लाकडाचे बनवलेले आहे असा अर्थ नाही. ब्रह्म संसाराला बांध घालते, म्हणून त्यात व पुलात साम्य आहे.

२ उन्मान शब्द ब्रह्माची नीट कल्पना यावी म्हणून वापरला

आहे. बुद्ध्यर्थः पादवत्. पाद म्हणजे माप, पाय नाही. हाही शब्द चट्कन आकलन व्हावे म्हणून आहे. ब्रह्म मेयही नाही आणि अमेयही नाही. ते मोजमापाच्या पलीकडे आहे.

३ संबंध व भेद हे शब्द ब्रह्माची उपाधी अशा अर्थाचे आहेत. या उपाधीमुळे जीव ब्रह्माहून वेगळा आहे असे म्हटले जाते. स्थानविशेष. सूर्याचा प्रकाश कोणत्याही झरोक्यातून आला तरी त्यात बदल होत नाही. लाल काचेतून आला तर तो लाल दिसतो, पण मुळात लाल नसतो. सूर्यप्रकाशाला आपण लाल किंवा हिरवा म्हणतो याचे कारण तो त्या त्या माध्यमातून येतो, स्थानविशेषात्.

तुलना करा : ऊस डोंगा परि रस नाहीं डोंगा। स्थान म्हणजे उपाधी.

४ उपपत्तेश्च. तार्किक दृष्टीने पाहिले तर अंतिम तत्त्व एकच असले पाहिजे. उपपत्ती म्हणजे 'स्वपिति' किंवा 'स्वं अपिति', ब्रह्मात्मैक्य, असा शंकराचार्य अर्थ करतात. जीव व ब्रह्म ही तत्त्वे दोन नाहीत, एकच आहेत. ओखॅमचा नियम असा आहे की जरुरीपेक्षा अधिक संख्येने तत्त्वे वाढवू नयेत. एक ब्रह्म पुरेसे असल्यावर आणखी इतर तत्त्वांची जरूर काय?

५ तथान्य. श्रुतींनीच दुसरे तत्त्व अमान्य केले आहे. नान्योऽतोऽस्ति द्रष्टा, नान्योऽतोऽस्ति श्रोता, ब्रह्माखेरीज आणखी कुणी बघणारा किंवा ऐकणारा नाही. नेह नानास्ति किंचन. कुठेही नानात्व नाही. एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति। सत्तत्त्व एकच आहे, त्याला अनेक नावे दिली जातात. अशा तऱ्हेचा बादरायणाचार्यांकडून शंकराचार्यांना दुजोरा मिळतो. म्हणून ब्रह्म हे एकच सत्तत्त्व आहे. व्युत्पत्ती, तर्क व श्रुती या तिहेरी उपायांनी सत्तत्त्व एकच आहे हे सिद्ध होते.

या टिपणावरून विद्यार्थ्याला युक्तिवादाचा धागा बरोबर सापडला आहे हे स्पष्ट होते. गुरुदेवांचे शब्द, वाक्प्रचार, त्यांनी लावलेले अर्थ, एखाद्या मुद्यावरील त्यांचे भाष्य किंवा स्पष्टीकरण ही त्यांच्या विद्यार्थ्यांच्या कानात घुमत राहत, इतकी की ह्या सर्व गोष्टी त्यांच्याही तोंडात बसून जात. गुरुदेवांच्या एका विद्यार्थ्यानें या संबंधात बोलताना हसत हसत उद्गार काढले : त्यांचे विद्यार्थी स्वतः प्राध्यापक झाल्यावर शिकवताना गुरुदेवांचे शब्द सर्रास वापरीत; कधी अवतरण चिन्हांनी ते शब्द गुरुदेवांचे आहेत हे सुचवीत तर कधी तेही करत नसत !

५ काही आनुषंगिक गोष्टी

शिकवताना गुरुदेव अभ्यासक्रमाप्रमाणे शिकवीत पण ते आपल्या विशिष्ट पद्धतीने शिकवीत. जी पुस्तके पाठ्यपुस्तके म्हणून नेमलेली नसत, ती ते वापरत कारण त्यांना माहीत होते की, विद्यार्थी फक्त पाठ्यपुस्तकेच वाचणार, अधिक वाचनासाठी दिलेल्या पुस्तकांना हात लावणार नाहीत. त्यांच्या व्याख्यानांतून उन्मेषाचे झोत असत. ती कंटाळवाणी वर्णने नसत. वह्याच्या वह्या टिपणे लिहून देऊन त्यांनी विद्यार्थ्यांना कधी आळशी आणि कामचुकार बनवले नाही. परंतु ते असे काही सूचक बोलत की विद्यार्थ्यांना त्यावर अभ्यास करणे भागच पडे. मुलांनी स्वतंत्र प्रज्ञेने अभ्यास करावा अशी त्यांची अपेक्षा होती आणि ते स्वतः विषयांमध्ये इतकी गोडी उत्पन्न करीत की मुले मोठ्या उत्साहाने वाचन करीत. यापुढच्या अभ्यासाला गुरुदेवांचे मार्गदर्शन असेच. अनेक पुस्तकांतले व मासिकांतले संदर्भ सांगून ते विद्यार्थ्यांचे काम हलके करीत.

प्रत्यक्ष शिकवत असताना मध्येच काहीतरी प्रश्न विचारून कुणी अडथळा आणलेला त्यांना खपत नसे. त्यांचे शिकवणे समजायला तशा अडचणी नसायच्याच तरी पण तास संपल्यावर मुले त्यांच्याकडे जाऊन मोकळेपणाने चर्चा करीत असत. तौलनिक दृष्टीने शिकवताना भाषाभाषांमधील भिन्नत्व कधी त्यांच्या आड आले नाही आणि अलाहाबादला शिकवतानाही त्यांनी मराठी अवतरणे सांगायला कमी केले नाही ! उदाहरणार्थ, ईश्वर सगुण आहे की निर्गुण आहे

याची चर्चा चालू असताना त्यांनी वर्गात 'तुज सगुण म्हणू की निर्गुण रे। सगुण निर्गुण एकु गोविंदु रे'। या ज्ञानेश्वरांच्या ओळी सांगितल्या. कशाला सगुणानिर्गुणाची चर्चा हवी, दोन्ही ईश्वरात सामावून जातात. एकदा धर्माच्या मानसशास्त्रामधील संतांची लक्षणे हा विषय शिकवत असताना त्यांनी सांगितले की आपल्याला जो अनुभव आला आहे तो दुसऱ्यांना आणून देण्यात संतांचे संतपण असते, आणि क्षणात एक मराठी ओळ त्यांच्या मुखातून आली : 'आपणासारिखे करिती तात्काळ'. गंमत म्हणजे मराठीचा गंध नसणारे अलाहाबादचे विद्यार्थी एखाद-दुसरी चूक करून का होईना ही मराठी वचनेसुद्धा उतरवून घेत!

तत्त्वज्ञानात समाविष्ट केला गेलेला असा एकही विषय राहिला नाही की जो गुरुदेवांनी शिकवला नाही. त्यांनी शिकवलेल्या पेपरपैकी काही पेपर म्हणजे ब्रॅडले व बोझँके यांचे चिद्‌वादी तर्कशास्त्र, ग्रीक तत्त्वज्ञान, अर्वाचीन युरोपियन तत्त्वज्ञान, समकालीन युरोपियन तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, मानसशास्त्रातील संप्रदाय, धर्मतत्त्वज्ञान, किंवा सत्ताशास्त्र. भारतीय तत्त्वज्ञान व शंकराचार्य यांबद्दल काही सांगायलाच नको. ते त्यांचे अतिशय आवडते विषय होते. आपल्या सहकाऱ्यांना हवे असलेले विषय ते त्यांना प्रथम निवडू देत, ज्यांना कुणीच हात लावत नसे ते उरलेले विषय ते स्वतः शिकवीत. तत्त्वज्ञानाच्या सर्वच शाखांत त्यांना असीम गोडी होती. विशेष अभ्यासाकरिता घेतलेल्या पेपरसंबंधी चर्चा करण्याकरिता विद्यार्थी त्यांच्याकडे जात. तत्त्वज्ञानातील प्रत्येक शाखेचे त्यांचे अध्ययन इतके सर्वंकष असे की, जन्मभर त्यांनी ह्या एकाच विषयाचा व्यासंग ठेवला आहे, असे ही चर्चा चालली असताना वाटायचे. १९३६-३७ सालासाठी 'तत्त्वज्ञानातील समस्या' या पेपरासाठी त्यांनी अभ्यासक्रम तयार केला होता. पहिल्या सत्रामध्ये त्यांनी विज्ञान व तत्त्वज्ञानातील समस्या हा विषय शिकवला. दुसऱ्या सत्रात ज्ञानशास्त्र व नीतीशास्त्रातील समस्या आणि तिसऱ्यात सौंदर्यशास्त्र व सत्ताशास्त्रातील समस्या हे विषय शिकवले. मजा म्हणजे त्यांनी विज्ञानातील समस्या हा पेपर तत्त्वज्ञानात अंतर्भूत केला होता! हा पेपर अलाहाबादच्या विद्यार्थ्यांना बागुलबुवा वाटे. एक तर या विषयाचा पसारा फार मोठा होता.

दुसरे तर त्यात शास्त्रीय विषयांच्या समस्यांना हात घालणारे तत्त्वज्ञ अभ्यासावे लागत. हा पेपर शिकवताना गुरुदेव केवळ त्यांच्या तात्त्विक सिद्धांतांचा अभ्यास करून थांबत नसत तर त्यांची शास्त्रीय तत्त्वेही आत्मसात करीत. जेम्स वॉर्डचे नॅचरॅलिझम अँड ॲगनॉस्टिसिझम हे पुस्तक शिकवताना त्यांनी त्यातला विज्ञानाचा भाग पूर्ण अभ्यासला होता. वैज्ञानिक विषय असला तरी ते खोलात शिरत आणि तत्संबंधी अनेक प्रश्न उपस्थित करीत. ऊर्जा संरक्षण याबद्दल त्यांनी काय काय शंका प्रदर्शित केल्या ते पाहाण्यासारखे आहे. विविध प्रश्न उपस्थित करून ते विद्यार्थांना अधिक अभ्यासाची प्रेरणा देत.

ऊर्जा संरक्षण या तत्त्वाचा मानसशास्त्रावरील परिणाम

मनाचा शरीरावर होणारा परिणाम. व्यक्तिस्वातंत्र्य : संरक्षण हे तत्त्व सर्वव्यापी आहे का?

ऊर्जा - गतिज की आध्यात्मिक?

ऊर्जा - सीमित की असीमित?

संरक्षण नियम - विनिमय नियम.

ऊर्जा संरक्षण हा नियम मनाचा शरीरावर होणारा परिणाम मानतो की नाही? यातून स्वभाववाद प्रस्थापित होतो काय?

एका ठिकाणी गुरुदेवांनी असे म्हटले आहे की वेदान्त तत्त्वज्ञान म्हणजे नुसती बौद्धिक चर्चा नाही तर ते ज्वलंत व जीवनस्पर्शी तत्त्वज्ञान आहे. वेदान्त तत्त्वज्ञानाचा विकास व्हावा असे त्यांना फार वाटे. विद्यापीठात शिकवले जाणारे तत्त्वज्ञान शंकराचार्यांपासून सुरू होते व तिथेच संपते, हे योग्य नाही. शंकराचार्यांच्या आधी होऊन गेलेल्या व त्यांच्या नंतर झालेल्या अद्वैतवादी तत्त्वज्ञांनी वेदान्तात मोलाची भर घातली आहे, तार्किक खंडनमंडन त्यांच्या तत्त्वज्ञानात आहे, आणि म्हणून त्या सर्वांचे विद्यार्थ्यांनी अध्ययन करावे. विद्यार्थ्यांना (आणि शिक्षकांनासुद्धा !) एखादा विषय तयार करायला लावण्याचा उत्तम उपाय म्हणजे तो विषय अभ्यासक्रमात घालणे. गुरुदेवांनी तेच केले. अभ्यासाचा प्रवाह कुंठित झालेला त्यांना आवडत नसे. त्याच शिक्षकाने तोच विषय वर्षानुवर्षे एकाच पद्धतीने

शिकवला तर तिथे नवीन अभ्यासाला आणि प्रगतीला वावच नसतो. नवीन नवीन विषय घेऊन नवनवीन दृष्टीकोनांतून त्यांचा विचार व्हावा व विज्ञानाच्या क्षेत्रातील अद्ययावत् प्रगतीचा आढावा घेतला जावा यासाठी ते अधूनमधून अभ्यासक्रम बदलत असत. शंकराचार्यांच्यानंतर झालेले अद्वैती तत्त्वज्ञ म्हणजे १) मंडन, २) पद्मपाद, ३) सुरेश्वर, ४) प्रकाशात्मन्, ५) वाचस्पती, ६) सर्वज्ञात्ममुनि, ७) प्रकाशानंद किंवा ८) श्रीहर्ष हे सर्व त्यांनी शिकवले होते. रामानुजाचार्यांच्या नंतर झालेले विशिष्टाद्वैती, मध्वाचार्यांनंतरचे द्वैती आणि वल्लभाचार्यांनंतरचे शुद्धाद्वैती तत्त्वज्ञ अभ्यासक्रमात असावेत असे त्यांना वाटे. तसे ते घातले नाहीत तर त्यांचे मौलिक सिद्धांत आपल्याला कायमचे पारखे होतील.

गुरुदेवांनी आपली टिमकी कधी वाजवली नाही. ते अत्यंत नम्र होते. उपनिषदांवरील पुस्तकांची विद्यार्थ्यांना मोठीच्या मोठी यादी त्यांनी लिहून दिली पण तिथे स्वतःच्या पुस्तकाचा उल्लेख कटाक्षाने टाळला. एकदा असे झाले की संस्कृतच्या प्राध्यापकांच्या हातात ती यादी पडली. तीवरून नजर फिरवल्यावर ते विद्यार्थांना म्हणाले की, 'प्रा. रानडे यांनी स्वतः उपनिषदांवर एक पुस्तक लिहिले आहे ते तर या तुमच्या यादीत कुठे दिसत नाही'. विद्यार्थी गुरुदेवांकडे आले व विचारू लागले की, 'सर, तुम्ही तुमचे स्वतःचे उपनिषदांवरील पुस्तक या यादीत का सांगितले नाही'? 'मी स्वतःच तो विषय शिकवतो आहे मग त्या पुस्तकाची काय जरुरी आहे'? त्यांनी उत्तर दिले. त्यांचे अनेक विद्यार्थी सांगतात की, 'वर्गात शिकवताना प्रथम-पुरुषी एकवचनी सर्वनामाचा (म्हणजे 'मी'चा) ते उपयोग करीत नसत'. 'नाही, कधीही नाही', एका विद्यार्थ्याने ठासून सांगितले. मुलांनी स्वतंत्र विचार करावा, नुसती आपल्या सांगण्याची री ओढू नये असे त्यांचे मत होते. त्यांच्या मतावर विद्यार्थ्यांनी टीका केली तरी त्याचा त्यांना राग नसे. उलट आपल्याला जे पटते ते स्पष्टपणे व धैर्याने मुलांनी सांगावे असेच ते म्हणत. मात्र उगीचच काहीतरी खोड काढायची अशी वृत्ती तिथे असता कामा नये.

शिकवता शिकवता जर एखादा नवीन विचार सुचला तर गुरुदेव लहानशा कागदाच्या कपट्यावर महत्त्वाचे शब्द खरडून ठेवत. इकडे हाताची बोटे ते शब्द लिहीत असली तरी त्यांची नजर विद्यार्थ्यांकडेच असे आणि शिकवण्यात काही खंड पडत नसे. आवश्यक सत्य व आकस्मिक सत्य या विषयाचा ऊहापोह चालला असताना त्यांची बोटे इकडे नोंद करीत होती : - 'जन्माला येणे हे आकस्मिक आहे, मृत्यू मात्र अटळ आहे. मरणं प्रकृतिः'। असे काही काही लिहिलेले कागदाचे तुकडे ते आपल्या कोटाच्या खिशात कोंबून टाकत. केव्हातरी तसली टिपणे उपयोगाला येतील अशी त्यांची खात्री असे. यांपैकी काही टिपणे तात्त्विक दृष्ट्या इतकी महत्त्वाची आहेत की ज्यांना सखोल अभ्यास करावयाचा आहे त्यांना ती नवीन दिशा दाखवतात. आकस्मिक घटना आणि अटळ घटना यांचे 'जन्म आकस्मिक पण मृत्यू अटळ' यापेक्षा जास्त पटणारे उदाहरण देता येईल का? मृत्यू अटळ आहे हे एकदा मनात बिंबले की, त्याची धास्ती राहत नाही.

६. हलके फुलके क्षण

विषय अवघड असल्याने विद्यार्थ्यांच्या मनावर जर फार ताण पडत असला तर विषय नीट उमगत नाही. तरी पण विद्यार्थ्यांना आपली बुद्धी अगदी जागरूक ठेवावी लागेल अशा भीतीने काही कुणी महत्त्वाचे विषय गाळीत नसतात. विषयावर एकाग्र चित्त होणे अत्यावश्यक आहे. तरीही विषय मुलांना अतिशयच गहन वाटतो आहे असे दिसले तर मात्र गुरुदेव काहीतरी विनोदी उदाहरणे देऊन तो ताण एकदम कमी करीत. विषयही मग सहज समजत असे. अशी एकदोन उदाहरणे देण्यासारखी आहेत. एकदा वर्गात समवाय सिद्धांताची चर्चा चालू होती. न्यायदर्शनात दोन तऱ्हेचे संबंध सांगितले आहेत. संयोग (आकस्मिक संबंध) व समवाय (आवश्यक संबंध). संयोग हा अनित्य संबंध आहे, तो राहील किंवा तुटेल, परंतु समवाय मात्र नित्यसंबंध आहे. तो कधीच तुटत नाही. गुरुदेवांनी संयोगाचे उदाहरण म्हणून रामायणातील प्रसिद्ध श्लोक सांगितलाः-

यथा काष्ठं च काष्ठं च समेयातां महोदधौ।
समुपेत्य च व्यपेयातां तद्वत् भूतसमागमः।।

(विशाल सागरात लाकडाचे दोन ओंडके जवळ येतात व दूर जातात, तसाच प्राणिजाताचा संयोग व वियोग होत असतो). समवाय संबंध कळायला जरा अवघड आहे, आणि पुढे संयुक्त-समवाय, समवेत-समवाय किंवा संयुक्त-समवेत-समवाय अशा जटिल संकल्पना येऊ लागल्या की माणूस हतबुद्ध होऊन जातो. शिकवताना एवढ्यावरच हे प्रकरण थांबले नाही. प्रा. रानडे यांनी भारतीय तत्त्वज्ञानातील संबंध-सिद्धांताची ब्रॅडलेल्या संबंध-सिद्धांताशी वर्गात तुलना करून दाखवली, जगात असतील नसतील तेवढ्या सगळ्या संबंध-कल्पनांची ब्रॅडलेने हजेरी घेतली आहे. हे सुरू झाल्यावर मात्र वातावरण तंग झाले आणि बहुधा विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यांवरून विषय त्यांना अगम्य वाटतो आहे असे गुरुदेवांना दिसू लागले. मग त्यांनी आपले मोहरे एकदम फिरवले व अगदी रोजच्या व्यवहारातील एक प्रश्न विचारला : 'विवाह हा संयोग आहे की समवाय आहे? पति-पत्नी यांच्यामधील संबंध नित्य आहे की अनित्य आहे? तो वियोज्य आहे की अवियोज्य आहे'?[२५] विद्यार्थ्यांना हायसे वाटले असेल आणि उदाहरणाची गंमतही वाटली असेल. गुरुदेवांनी स्वतःच आपल्या प्रश्नांचे उत्तर दिले की प्राचीन हिंदू शास्त्राप्रमाणे विवाहसंबंध हा समवाय संबंध आहे, केवळ संयोग संबंध नाही.

आणखी एक उदाहरण बघू. एकदा वर्गात गुरुदेव 'विशेष' या सिद्धांताची चर्चा करीत होते. वैशेषिक दर्शनाने 'विशेष' हा स्वतंत्र पदार्थ मानला आहे. इतर दर्शनांनी त्यावर चांगले तोंडसुख घेतले आहे. विरोधी पक्षाच्या या तर्कशुद्ध हल्ल्याला सामोरे जाऊन 'विशेष' या संकल्पनेचे समर्थन करणे वैशेषिक तत्त्वज्ञांना कठीण होऊन बसले आहे. खंडन-मंडनाच्या या लठ्ठालठ्ठीने विद्यार्थ्यांच्या बुद्धीला शीण आला. गुरुदेवांनी वातावरण खेळीमेळीचे करण्यासाठी म्हटले : प्रेम करणे आणि शहाणपणा टिकवणे कठीण आहे असे म्हणतात ना, तसेच इथे आहे. वैशेषिक दर्शनाला आपल्या 'विशेष' या सिद्धांतावर प्रेम करणे आणि

त्याचे समर्थन करण्याचा शहाणपणा टिकवणे कठीण झाले आहे!

अशा हलक्या फुलक्या उद्‌गारांनी वातावरण एकदम प्रसन्न होई.

७ परीक्षकाच्या भूमिकेत

एखाद्या प्रश्नपत्रिकेत आपण कोणकोणते प्रश्न विचारले आहेत ते गुरुदेवांना पक्के आठवे. एकदा एका विद्यापीठाकडे त्यांनी प्रश्नपत्रिका पाठवल्यानंतर तिथे ती थोडी बदलली गेली. काही महिन्यांनंतर उत्तरपत्रिका तपासण्यासाठी आल्या. त्यांच्याबरोबर प्रश्नपत्रिकाही आलीच. त्या प्रश्नपत्रिकेकडे त्यांनी एक नजर टाकली आणि त्यांच्या लक्षात आले की, ही प्रश्नपत्रिका आपल्या हातची नाही. विद्यापीठाला त्यांनी कळवले की ही प्रश्नपत्रिका ज्या अर्थी माझी नाही त्या अर्थी या उत्तरपत्रिका चुकून माझ्याकडे पाठवल्या गेल्या असाव्यात. (ज्याने प्रश्नपत्रिका काढली त्याच्याकडेच उत्तरपत्रिका जात असत). काय गडबड झाली आहे हे विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या लागलीच लक्षात आले आणि त्यांनी क्षमायाचना करून प्रा. रानडे यांना विनंती केली की कृपा करून आपण त्या उत्तरपत्रिका तपासाव्या. गुरुदेवांनी ते कबूल केले.

अलाहाबाद विद्यापीठाच्या एम. ए. च्या विद्यार्थ्यांच्या तोंडी परीक्षेचा एक प्रसंग. प्रा. रानडे व आग्रा कॉलेजचे डॉ. डी. डी. सली हे दोघे परीक्षक होते. एका विद्यार्थ्याची परीक्षा सुरू झाली. डॉ. सली यांनी त्याला शंकराचार्यांचे ब्रह्म व ब्रॅडलेचे अंतिम तत्त्व यांत काय फरक आहे असे विचारले. विद्यार्थ्याने उत्तर दिले की ब्रॅडलेच्या अंतिम तत्त्वाला तार्किक संभाव्यता आहे म्हणजे ती कल्पना तर्कशुद्ध आहे एवढेच. पण शंकराचार्यांचे ब्रह्म सत्ताशास्त्रीय आहे म्हणजे ते सत्‌तत्त्व म्हणून प्रत्यक्षात अस्तित्वात आहे. प्रा. रानडे "छान, छान", म्हणून पुटपुटत होते. त्या विद्यार्थ्याला आणखी कुणी काही विशेष विचारले नाही आणि जायला सांगितले. नंतरच्या विद्यार्थ्याची परीक्षा ३०-३५ मिनिटे चालली. पहिल्या विद्यार्थ्यांची कल्पना अशी झाली की आपल्याला पाच मिनिटांत ज्याअर्थी निरोप दिला त्याअर्थी आपला पुरा निकाल लागला असावा. तो अगदी खिन्न झाला. दुपारी साडेचार वाजता या विद्यार्थ्याकडे तत्त्वज्ञान शाखेचा चपराशी भगवानदीन

आला आणि आपल्या नेहमीच्या हुकुमी आवाजात त्याने निरोप सांगितला की प्राध्यापक साहेबांनी तुम्हाला बोलावले आहे. "आता कशाला बोलावले आहे? दोन मिनिटात माझी तोंडी परीक्षेतून हकालपट्टी केली, माझे जन्माचे नुकसान झाले". भगवानदीनने पुन्हा सांगितले की ते तुमची वाट बघत घराच्या व्हरांड्यात बसले आहेत. विद्यार्थी तिकडे जातो न जातो तोच, "अभिनंदन, तुमचा तोंडी परीक्षेत पहिला नंबर आला आहे", या शब्दांनी त्याचे स्वागत झाले. "सर, माझा या गोष्टीवर विश्वासच बसत नाही, मला पुरती दोन मिनिटेसुद्धा मिळाली नाहीत आणि माझ्या नंतरच्या विद्यार्थ्याला चांगला अर्धा तास दिला". प्रा. रानडे यांनी उत्तर दिले, "बाबा रे, तोंडी परीक्षेत स्मरणशक्तीची परीक्षा घेत नसतात, तर विद्यार्थ्याची चिकित्सक दृष्टी पाहतात. दुसरा विद्यार्थी भरमसाठ संस्कृत अवतरणे घडाघड म्हणत होता पण त्यात चुका होत होत्या. त्या दुरुस्त करण्यात बराच वेळ गेला".

८ विद्यार्थ्यांची सुखउन्नती

नुकतीच एका कॉलेजात नेमणूक झालेला एक विद्यार्थी निंबाळला प्रत्येक सुट्टीत येई. कशाचे तरी वाचन चालू होते. गुरुदेवांनी मध्येच एकदम विचारले, "यंदा तू कोणकोणते विषय शिकवतोस"?

"तर्कशास्त्र, नीतिशास्त्र, व समाज-मानसशास्त्र".

"इथे येण्याआधी समाजमानसशास्त्रातला कोणता भाग शिकवला"?

"समूहमन".

"मग आता अशी कल्पना कर की तू वर्गात शिकवतो आहेस आणि समूहमनाचा विषय सुरू कर".

ह्या विद्यार्थ्याने बोलायला सुरवात केली आणि प्राध्यापकांचे प्राध्यापक असलेले गुरुदेव तटस्थ बसून कानावर पडलेला प्रत्येक शब्द अवधानपूर्वक ऐकू लागले. साधारणपणे १५ मिनिटे झाल्यानंतर त्यांनी विद्यार्थ्याला थांबायला सांगितले, "उत्तम, उत्तम, पण तुझ्या शिकवण्याचा वेग जरा जास्त वाटतो, तो आवरला पाहिजे. अत्यंत सावकाश शिकवावे म्हणजे आपला प्रत्येक शब्द मुलांना कळतो.

मुलांपुढे शिक्षकाने आपल्या विद्वत्तेचे प्रदर्शन करायचे नसते तर विषय त्यांच्या मनावर ठसवायचा असतो". आपल्या विद्यार्थ्यांनी नामवंत शिक्षक व्हावे आणि त्या विद्यार्थ्यांच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शिकवण्याचा लाभ मिळावा असे त्यांना वाटे. आपण वर्गात शिकवत असताना विद्यार्थ्यांनी घेतलेली टिपणे ते मागून घेत, ती नीट पाहत व कधीकधी ठेवूनही घेत. आपले सर्व शिकवणे मुलांना नीट समजले आहे ना याचा अंदाज घेण्यासाठी ते तसे करीत असावेत. विषय मुलांना नीट कळला नाही असे जर टिपणांवरून वाटले तर आपल्या शिकवण्याच्या पद्धतीतच काही बदल करायला हवा काय याचा ते विचार करीत. मुलांना जास्तीत जास्त फायदा मिळावा म्हणून ते कितीही कष्ट करायला तयार असत. स्वतःमध्ये सुधारणा करायला वाटेल तेवढा वाव आहे ही त्यांची भूमिका होती. विद्यार्थ्यांच्या योग्यतेची त्यांना पारख असे. एक विद्यार्थी खूप हुषार होता. त्याच्या संशोधनाचा विषय महत्त्वाचा होता आणि त्याने त्या विषयावर काही लेखही प्रसिद्ध केलेले होते. गुरुदेवांची इच्छा होती की याने केवळ पीएच. डी. न करता एकदम डी. लिट् पदवीसाठी अभ्यास करावा. त्यांनी विद्यापीठाकडे त्या विद्यार्थ्यासाठी शिफारस केली आणि त्या विद्यार्थ्याला डी. लिट् पदवी मिळालीही! विद्यार्थ्यांच्या सद्गुणांचे चीज व्हावे अशी त्यांना तळमळ असे. पीएच. डी. चे प्रबंध ते स्वतः आमूलाग्र तपाशीत आणि त्यासाठी जरूर तेवढा वेळ घेऊनच ते विद्यापीठाला अहवाल पाठवीत. एकदा एका विद्यापीठाने अडीच महिने अहवालाची वाट पाहून त्यांना पत्रे पाठविली, शेवटी तार केली आणि काम लवकर संपवण्याची विनंती केली. गुरुदेवांनी उत्तर पाठवले की अशा प्रकारचा निबंध नीटपणे तपासण्यासाठी निदान तीन महिने मुदत हवी. आता आपल्या प्रबंधाची काही धडगत नाही असे वाटून विद्यार्थ्याच्या पोटात गोळा उठला. साडेतीन महिन्यांनंतर प्रबंधाच्या स्तुतीने भरलेला गुरुदेवांचा अहवाल रजिस्ट्रारकडे आला. उशीरा होईना का पण विद्यार्थ्याचे कल्याण होईल असा अहवाल आला. स्वतःच्या बौद्धिक श्रेष्ठतेची शेखी मिरवून विद्यार्थ्यांना त्यांनी कधी गलितधैर्य केले नाही. एकदा तर ते एका विद्यार्थ्याला म्हणाले, 'तुमच्यात

आणि माझ्यात काही फार फरक नाही. मी थोडीशी जास्त पुस्तके वाचली आहेत इतकेच'. विद्यार्थ्यांनी पुढे जाण्याची धडपड करावी यासाठी केवढे हे प्रोत्साहन!

प्रा. रानडे आदर्श शिक्षक कसे झाले याचा सर्व बाजूंनी विचार केला तर आदर्श अध्यापनाची अष्टांगे आपण सांगू शकतो. ती म्हणजे अभ्यासविषयावरील प्रेम, विद्यार्थ्यांवरील प्रेम, उत्तम पूर्वतयारी, चिकित्सक व तौलनिक दृष्टी, सुसंगत व स्पष्ट विवरण, विद्यार्थ्यांना स्वतंत्र विचार करण्यास उत्तेजन, नवीन अर्थनिर्णय आणि पराकाष्ठेची नम्रता.

श्रीकृष्णांनी शिक्षकाच्या भूमिकेवरून आपला शिष्य अर्जुन याच्यासाठी जे जे काही केले ते सर्व पाहून ज्ञानेश्वरीतला संजय म्हणतो. 'अहो असे शिष्यासाठी जीव टाकणारे गुरू पृथ्वीच्या पाठीवर इतरत्र आहेत कुठे? शिष्यावरचे हे प्रेम मला तर उलगडतच नाही'!

हा ठाववरी शिष्याची निकसी। साहाते गुरू आहाती कवणे देशी।
परि नेणिजे आवडी कैशी। संजयो म्हणे।। (११.६४६)

संदर्भसूची

१ Roget's Thesaurus, (Pocket Edition), Introduction, P. v

२ William Wallace, Kant, P. 159

३ सोमा = शरीर; सेमा = थडगे. आत्मा देहरूपी थडग्यात पुरला गेला आहे अशी पायथागोरस व ऑरफिक संप्रदायांची भूमिका होती.

४ वासनेमागे धावून सर्व गमावून लोक गळक्या घागरीप्रमाणे निस्तेज होतात. संयमी लोक भरल्या घागरीप्रमाणे पूर्णप्रज्ञ असतात. एका ग्रीक पुराणकथेचा इथे संदर्भ आहे. डॅनॉस राजाच्या ४९ मुलींना नरकामध्ये भोके असलेल्या चाळणीने भोके असलेली घागर भरण्याची शिक्षा मिळाली होती.

५ स. वि. बापट (संपादक), लोकमान्य टिळक, आठवणी व आख्यायिका, खंड २, पृ. ३४-३५

६ Contemporary Indian Philosophy, P. 540

७ The Conception of Spiritual Life in Mahatma Gandhi and Hindi Saints, P. 135

८ Pathway to God in Hindi Literature, Pp. 216-218

९ The Bhagavad-gita as a Philosophy of God-realisation, Pp. 220-221

१० तत्रैव, Pp. 251 ff.

११ तत्रैव, २९२-२९३

१२ Studies in Indian Philosophy, P. 119

१३ तत्रैव, P. 119, P. 120

१४ Pathway to God in Hindi Literature, Pp. 368-374

१५ Studies in Indian Philosophy, P. 111

१६ तत्रैव, P. 120

१७ Pathway to God in Hindi Literature, P. 256

१८ तत्रैव, Pp. 156-157

१९ The Bhagavad-gita as a Philosophy of God-realisation, P. 252

२० तत्रैव, P. 253

२१ Pathway to God in Hindi Literature, P. 114

२२ Studies in Indian Philosophy, P. 6

२३ The Bhagavad-gita as a Philosophy of God-realisation, P. 204

२४ E. Caird, The Critical Philosophy of Kant, Vol I, P. 60

२५ हे वर्णन ९.८.१९३९ साली एका विद्यार्थाने वर्गात घेतलेल्या टिपणामध्ये मिळाले.

❑❑

प्रकरण तिसरे

नामवंत ग्रंथकार

पूर्वार्ध : ग्रंथांचे सिंहावलोकन

१ बिकट वाट

ग्रंथकार या नात्याने गुरुदेव रानडे यांचे कार्य इतके मौलिक आहे की आपली मंदमती त्याचे मूल्यमापन करण्यास कशी पुरेल या विचाराने मनावर दडपण येते. अनेक प्रश्न डोळ्यांपुढे गर्दी करतात. गुरुदेवांचे विचार आपण जसेच्या तसे लोकांपुढे मांडू शकू का? त्यांच्या लिखाणाचा अर्थ अमकाच असला पाहिजे असे म्हणण्यात दुराग्रह तर होणार नाही? त्यांना काय म्हणायचे आहे ते आपल्याला समजले आहे असे आपण छातीठोकपणे म्हणू शकतो का? काही असो. जरासे धैर्य आणले तर असे म्हणता येईल की त्यांच्या ग्रंथांचा वर्षानुवर्ष सखोल अभ्यास केला तर तिथली ज्ञानशास्त्रीय, तर्कशास्त्रीय किंवा सत्ताशास्त्रीय प्रमेये समजू शकतात. मग ती जरा अवघड का असेनात. मात्र साक्षात्काराचा विषय आला की अगदी जपून पाऊल टाकायला लागते. ज्याला स्वतःला साक्षात्कार झालेला आहे, तोच दुसऱ्या साक्षात्कारी पुरुषाचे अनुभव जाणू शकतो. काठावरून पोहणाराला त्याची कल्पना येणे शक्य नाही. गुरुदेवांच्या लिखाणात साक्षात्काराला मध्यवर्ती स्थान आहे. अगणित अनुभव त्यांनी नोंदून ठेवले आहेत पण त्यांचे आकलन होणे कठीण आहे. उपनिषदे, भगवद्गीता, ब्रह्मसूत्रे व संतवाङ्मय यांतील अनेक उताऱ्यांचे त्यांनी साक्षात्काराच्या दृष्टिकोनातून अर्थ सांगितले आहेत. इथे त्यांचे फक्त वर्णन करायचे आहे. मूल्यमापन नाही. इथे तर्काला स्थान नाही. अनुभवाला आहे. म्हणून अनुभवाच्या बाबतीत कोरडे ठणठणीत असणाऱ्याने मौनं सर्वार्थसाधनम् हा मार्ग पत्करावा. पण हेही खरे आहे की गुरुदेवांचे लिखाण निःसंदिग्ध असल्याने त्या विषयाला हात घालण्याचे धैर्य येते. सर्वज्ञतेचा आव आणला नाही म्हणजे झाले. या ठिकाणी त्यांच्या समग्र ग्रंथांच्या आधाराने त्यांच्या तत्त्वज्ञानाची मांडणी करायची नसून एकेका

ग्रंथाचे विश्लेषण करायचे आहे.

२. ग्रंथांचा कालक्रम

एखाद्या लेखकाचे ग्रंथ एकापाठोपाठ एक असे सलग लिहिले गेले आहेत की लेखनाचे वेगवेगळे कालखंड पडतात हे बघणे अगत्याचे असते. याला ऐतिहासिक महत्त्व तर आहेच. शिवाय, ग्रंथांचा एकमेकांशी काय संबंध आहे, किंवा लेखकाच्या जीवनाच्या कोणत्या टप्प्यापाशी कोणता ग्रंथ लिहिला गेला, हे बघणे जरूर असते. यामुळे ग्रंथकर्त्याच्या मानसिक-बौद्धिक-आध्यात्मिक जीवनाच्या पार्श्वभूमीवरून ग्रंथांचे आकलन करणे अधिक सुलभ जाते.

प्रा. रानडे यांच्या ग्रंथलेखनाचे दोन विभिन्न कालखंड पडतात. पहिल्या कालखंडाची सुरवात १९११ साली प्रसिद्ध झालेल्या नित्यनेमावलीच्या प्रस्तावनेपासून झाली असे स्थूलमानाने म्हणता येईल. त्यांच्या तात्त्विक-आध्यात्मिक लिखाणाची पहिली झलक इथे दिसते. कार्लाइलच्या, 'साइन्स ऑफ दि टाइम्स', तसेच 'कॅरॅक्टरिस्टिकस्', या दोन निबंधांची त्यांनी १९१६ साली सटीप आवृत्ती काढली. या पहिल्या पुस्तकावरून सुद्धा समन्वयाचा शोध घेण्याचे त्यांच्या लिखाणाचे वैशिष्ट्य नजरेत भरते. १९२६ साली प्रसिद्ध झालेल्या, 'ए कन्स्ट्रक्टिव्ह सर्व्हे ऑफ उपनिषदिक फिलॉसॉफी' या ग्रंथाबाबत हेच म्हणता येईल. ग्रंथाच्या नावावरूनच उपनिषदांतर्गत प्रमेयांकडे बघण्याची विधायक दृष्टी स्पष्ट होते. जुलै १९१५ मध्ये बंगलोरला संस्कृत ॲकेडेमीची स्थापना झाली तेव्हा बंगलोर व मैसूर येथे त्यांनी दिलेल्या व्याख्यानांवर हे पुस्तक आधारित आहे. हे सर्व चालू असताना एकीकडे गुरुदेव भारतीय संतांच्या वाङ्मयाचे परिशीलन करीत होते. महाराष्ट्रातील संतांची शिकवण व त्यांचे आध्यात्मिक जीवन यांवर प्रकाश टाकणारे त्या त्या संताच्या वाङ्मयातील वेचे त्यांनी काढले होते. 'ज्ञानेश्वरवचनामृत' (१९२६), 'तुकारामवचनामृत' (१९२६), 'रामदासवचनामृत' (१९२६) व 'संतवचनामृत' (१९२७) या नावांनी हे वेचे प्रसिद्ध झाले. १९२७ साली 'दि क्रिएटिव्ह पीरिअड' हा डॉ. एस. के बेलवलकर व गुरुदेव या दोघांनी मिळून लिहिलेला ग्रंथ प्रसिद्ध झाला. वर दिलेल्या चार वचनामृतांच्या आधारावर

लिहिलेला ग्रंथ 'मिस्टिसिझम इन महाराष्ट्र' हा १९३३ साली प्रकाशित झाला. इथे एकेका संताचे तत्त्वज्ञान घेऊन सत्ताशास्त्र, नीतिशास्त्र, साक्षात्कारशास्त्र अशांसारख्या विभागांत विषयाची मांडणी केलेली आहे.

ही पुस्तके प्रकाशित झाल्यानंतर ग्रंथप्रकाशनाचा दुसरा कालखंड सुरू होण्यापूर्वी सुमारे २० वर्षांचा कालावधी लोटला. इतर विद्वानांच्या ग्रंथांना लिहिलेल्या प्रस्तावना व काही लेख सोडले तर या कालात काही विशेष लिखाण प्रसिद्ध झाले नाही. दोन लेखांचा इथे विशेष उल्लेख करावा लागेल. 'दि इव्होल्यूशन ऑफ माय ओन थॉट' हा लेख १९३७ साली प्रसिद्ध झालेल्या कॉंटेम्पोररी इंडियन फिलॉसॉफी या ग्रंथात आला आहे. दुसरा लेख म्हणजे नागपूर येथे १९३७ मध्ये भरलेल्या भारतीय तत्त्वज्ञान परिषदेच्या अध्यक्षपदावरून त्यांनी केलेले भाषण होय. या कालावधीतील फार मोठा भाग अलाहाबाद विद्यापीठातील तत्त्वज्ञान शाखा नावारूपाला आणण्यात गेला. हे काम जोखमीचे होते. त्यांच्या कारकीर्दीत तत्त्वज्ञान शाखेकडे देशातील कानाकोपऱ्यातील विद्यार्थ्यांचे लक्ष वेधले. जवळजवळ एका दशकाचा काळ ते कलाविभाग-प्रमुख होते, आणि काही काळ उपकुलगुरू होते. या काळात अनेक विषयांचा अभ्यास व चिंतन चालू असले तरी भरीव असे काही लिखाणाचे काम हाती घेण्याला त्यांना क्षणाची उसंत नव्हती. सगळी बौद्धिक शक्ती अध्यापनकार्यात व्यतीत होई. अनेक अध्यापकांना ही अडचण भासली आहे. ए. ई. टेलर या तत्कालीन श्रेष्ठ तत्त्वज्ञाने प्रा. रानडे यांना १८-१२-१९२३ रोजी एक पत्र लिहिले होते. त्यात तो म्हणतो, "या कामाला[१] आवश्यक असणारी सवड शिकवण्याच्या कार्यातून मला मिळेलसे वाटत नाही. बहुधा हे काम सेवानिवृत्तीपर्यंत म्हणजे अध्यापनाच्या कर्तव्यातून मुक्त होईपर्यंत पुढे ढकलावे लागेल". १९४७ साली गुरुदेव विद्यापीठातून निवृत्त झाल्यानंतर त्यांच्या लिखाणाचा दुसरा कालखंड सुरू झाला; एकापाठोपाठ एक असे ग्रंथ बाहेर पडले. इतरही एकदोन ग्रंथांचे त्यांचे काम चालू होते. पण हे ग्रंथ त्यांच्या निर्याणानंतर प्रसिद्ध झाले. जीव, जग किंवा ईश्वर यांच्या संबंधीच्या समस्या सोडवण्याच्या कामाला बुद्धीची शक्ती तोकडी पडते अशी त्यांची

प्रथमपासूनच भूमिका होती. आता आता तर ते शुष्क बुद्धिवादाला कंटाळले होते; भाव व अव्यभिचारिणी भक्ती यावरच भर होता. 'ज्याला काही बौद्धिक स्पष्टीकरण नाही असे ईश्वरावरचे अनाकलनीय प्रेम म्हणजे भाव, असे ते भावाचे वर्णन करतात. एकाग्र नामस्मरणाचे पारडे आता एकदम जड झाले. त्यांचे यानंतरचे लिखाण या पार्श्वभूमीवर समजावून घ्यायचे आहे. १९५४ साली 'पाथवे टु गॉड इन हिंदी लिटरेचर' हे पुस्तक बाहेर आले. हिंदी संतकवींच्या वाणीत जे साक्षात्काराचे तत्त्वज्ञान साठवले आहे त्याचा इथे ऊहापोह आहे. या पुस्तकाचा आधारग्रंथ 'परमार्थसोपान', (हिंदी) याचेही १९५४ साली प्रकाशन झाले. 'एकनाथवचनामृत', (अध्यात्मग्रंथमाला क्र. ५) हे १९५५ साली प्रकाशात आले. 'फिलॉसॉफिकल अँड अदर एसेज, पार्ट १', हे १९५६ साली जगापुढे आले. यातील काही लेख १९२० सालच्या आधी लिहिलेले होते. बी. जे. इन्स्टिट्यूट ऑफ लर्निंग अँड रिसर्च, गुजरात विद्या सभा, अहमदाबाद या संस्थेच्या विद्यमाने गुरुदेवांनी ऑगस्ट १९४७ मध्ये जी व्याख्याने दिली होती त्यावरील पुस्तक, 'दि कन्सेप्शन ऑफ स्पिरिच्युअल लाइफ इन महात्मा गांधी अँड हिंदी सेंट्स' हे १९५६ मध्ये प्रसिद्ध झाले. १९५७ मध्ये गुरुदेवांचे निर्याण झाले. 'दि भगवद्गीता ॲज ए फिलॉसॉफी ऑफ गॉड-रिअलायझेशन' हा ग्रंथ १९५९ साली बाहेर आला. ही गुरुदेवांची कृती गीताप्रेमी मंडळींना अमोल देणगी आहे. या ग्रंथाचा आधार म्हणजे १९२८ साली नागपूर येथे गुरुदेवांनी दिलेली रावबहादूर बापूराव दादा किनखेडे व्याख्याने. १९६० साली आणखी एक पुस्तक प्रकाशित जाले, ते म्हणजे 'पाथवे टु गॉड इन कन्नड लिटरेचर'. हिंदी संतांवरील त्यांच्या पुस्तकाच्या धर्तीवरच हे पुस्तक लिहिलेले आहे. १९५४-. ५६ या कालात त्यांनी कर्नाटक विद्यापीठात व्याख्याने दिली होती. एकूण २० व्याख्यानांची योजना होती. परंतु १४ व्याख्यानेच फक्त दिली गेली. ही व्याख्याने म्हणजे पुस्तकातील १ ते ११, १४, १५ व १६ ही प्रकरणे होत. उरलेली सहा प्रकरणे त्यांच्या टिपणांच्या मदतीने त्यांच्या दोन विद्यार्थ्यांनी लिहिली. १२, १३, १७ व १८ ही प्रकरणे प्रा. के. व्ही. गजेंद्रगडकर यांनी व १९ व २० ही प्रकरणे

प्रा. बी. आर. कुलकर्णी यांनी लिहिली. १९६१ साली 'ध्यानगीता' बाहेर आली. ध्यानाला उपकारक ठरावी असा तिचा उद्देश आहे. पाथवे टु गॉड इन कन्नड लिटरेचर या पुस्तकाचा आधारग्रंथ, 'कन्नड परमार्थसोपान' हा १९६२ मध्ये प्रसिद्ध झाला. संप्रदायात म्हटल्या जाणाऱ्या ५०० पारमार्थिक पदांचा संग्रह प्रसिद्ध करण्याचा गुरुदेवांचा मानस होता. ते हयात असतानाच तो तयार होता. तो १९६३ साली 'परमार्थमंदिर' या नावाने प्रसिद्ध झाला. वेळोवेळी लिहिलेले त्यांचे लेख एकत्र करून तयार केलेले पुस्तक 'एसेज अँड रिफ्लेक्शन्स' या नावाने १९६४ साली बाहेर आले. 'वेदान्त, दि कल्मिनेशन ऑफ इंडियन थॉट' हा १९७० साली प्रकाशित झालेला ग्रंथ म्हणजे मार्च १९२९ मध्ये कलकत्ता विद्यापीठात दिलेल्या श्रीगोपाल बसु मलिक व्याख्यानांचे विकसित रूप आहे. या पुस्तकाची फक्त टिपणे होती, ती तपशीलवार होती पण विवरणाला सुरवात झाली नव्हती. टिपणे प्रकरणवार मांडलेली होती व प्रत्येक प्रकरणात घेण्याच्या विभाग-उपविभागांची पूर्ण आकृती तयार होती. या साहित्यानुसार टिपणांचे विवरण नंतर त्यांच्या दोन विद्यार्थ्यांनी केले. डॉ. व्ही. एच.दाते यांनी १ ले व ९ वे ही प्रकरणे लिहिली व प्रा. बी. आर. कुलकर्णी यांनी बाकीची ८ प्रकरणे लिहिली. १९१७ ते १९५६ या दीर्घकालात अनेक विद्वानांच्या ग्रंथांना गुरुदेवांनी प्रस्तावना लिहिल्या होत्या त्या एकत्र करून 'हें प्रचीतीचें बोलणें' या नावाखाली १९८६ साली गुरुदेव रानडे जन्मशताब्दी ग्रंथ क्रमांक ७ म्हणून त्या प्रसिद्ध केल्या गेल्या. आणखी एक जन्मशताब्दी ग्रंथ म्हणजे १९८६ मध्ये 'स्टडीज इन इंडियन फिलॉसॉफी' या नावाने बाहेर आलेली भारतीय दर्शनावरील त्यांची टिपणे. ही झाली गुरुदेवांच्या पुस्तकांची कालक्रमानुसार केलेली यादी.

या ग्रंथांचे दुसऱ्या दृष्टिकोनातून वर्गीकरण करता येईल. ए कन्स्ट्रक्टिव्ह सर्व्हे ऑफ उपनिषदिक फिलॉसॉफी, संश्लेषण पद्धतीने लिहिलेले असून दि क्रिएटिव्ह पीरिअड विश्लेषण पद्धतीने लिहिलेले आहे. पहिल्यात उपनिषदांतील तत्त्वज्ञानाची विषयानुसार मांडणी आहे आणि दुसऱ्यात एकेक उपनिषद् विचारार्थ घेतले आहे. त्याचप्रमाणे मिस्टिसिझम इन महाराष्ट्र यात विश्लेषण पद्धती

असून त्यात एकेक संत घेऊन त्यांचे आध्यात्मिक तत्त्वज्ञान सांगितलेले आहे, तर पाथवे टु गॉड इन हिंदी लिटरेचर व पाथवे टु गॉड इन कन्नड लिटरेचर यांत संश्लेषण पद्धती आहे. या दोन पुस्तकांत प्रतिपाद्य विषयांचा एक आराखडा तयार करून त्यानुसार चर्चा केली आहे. विशिष्ट विषयाचे किंवा सिद्धांताचे विवरण चालू असतांना त्या मतानुरूप संतांची नावे येतात. पण इथे व्यक्तीपेक्षा सिद्धांतांना अधिक महत्त्व आहे. गुरुदेवांनी गीतेवरील दोन्ही पुस्तकात व वेदान्तावरील पुस्तकात संश्लेषण पद्धती वापरली आहे. विश्लेषण पद्धती ही वर्णनात्मक असते तर संश्लेषण पद्धतीत अर्थाची फोड केली जाते. मिस्टिसिझम इन महाराष्ट्र याची पुन्हा एकदा संश्लेषणात्मक पद्धतीने पुनर्रचना करावी असे गुरुदेवांच्या मनात फार होते व २६ ऑगस्ट १९५० ला धारवाड येथे कर्नाटकातील साक्षात्कारवाद या विषयावर दिलेल्या व्याख्यानात त्यांनी हे बोलूनही दाखवले होते. मात्र ते काम तसेच राहून गेले.

३. जावक पत्रे.

गुरुदेवांच्या लिखाणाचा आणखी एक भाग म्हणजे त्यांची पत्रे. या पत्रांचे दोन गट पडतात. (१) गुरुदेवांनी आपले सद्गुरू श्री भाऊसाहेब महाराज तसेच आपले ज्येष्ठ गुरुबंधू व ज्येष्ठ गुरुभगिनी यांना लिहिलेली पत्रे व (२) इतर मंडळींना म्हणजे विद्यार्थी, प्राध्यापक वर्ग, मित्रमंडळी व मुख्यतः परमार्थप्रेमी मंडळींना लिहिलेली पत्रे. त्यांची आवक पत्रे तर सर्वच्या सर्व तारीखवार लावलेली होतीच, पण कित्येक जावक पत्राची नक्क्लही त्यांच्याकडे असे. उणीपुरी ५० वर्षांची ही पत्रे आहेत.

४. अलिखित संवाद

ज्यांचा इंग्रजी भाषेशी परिचय असेल त्यांनाच गुरुदेवांच्या बहुतेक ग्रंथांची गोडी चाखता येते. पण जवळच्या मंडळींशी त्यांचा अलिखित संवाद चाले. अशा संवादांच्या बैठकींना सिटिंग असे म्हणत. निंबाळ, अलाहाबाद किंवा सांगली येथे या बैठकी वारंवार होत. त्यांचे मोल कळायला हृदया हृदय एक झाले अशा स्थितीची गरज असे. सिटिंगमध्ये जिव्हाळ्याची चर्चा होई. ए. ई.

टेलरने प्लेटोच्या अलिखित चर्चेबद्दल म्हटले आहे की, "साहजिकच यातले त्या त्या वेळेला काही लिहून ठेवले गेलेले नाही... हे आपले कमनशीबच म्हणायचे, कारण अंतःकरणापासून प्रिय असलेल्या विषयांवरील त्यांचे विचार व त्यांच्या नितांत श्रद्धा याबद्दल काही कळावे अशी आपली मनापासून इच्छा असते".[२] नेमक्या याच गोष्टीसाठी आपल्याला साधकांनी तयार केलेल्या टिपणांवर अवलंबून राहावे लागते. या साधकांनी ही टिपणे ठेवली नसती तर आता आपल्या हाताशी ज्या काही थोड्या हकीकती आल्या आहेत त्याही आल्या नसत्या. म्हणून त्यांच्याबद्दल नेहमीच कृतज्ञ राहिले पाहिजे. मात्र हे नमूद केलेच पाहिजे की काही झाले तरी ती स्मरणावरून केलेली टिपणे आहेत. सत्य जाणून घेण्याची जी प्रमाणे आहेत त्यांतील आप्तवाक्य या प्रमाणात स्मरणाची गणना केली जाते. अर्थातच आप्तवाक्य हे प्रमाण म्हणून वापरताना त्यात जे गुणदोष दिसतात ते इथेही असणार. या टिपणांकडे दृष्टिक्षेप टाकताक्षणी लक्षात येते की या चर्चा बहुतांशी आध्यात्मिक विषयांवर असत. व्यावहारिक विषयही अधूनमधून डोकावत.

५. लेखनाची वैशिष्ट्ये

(अ) आपुली स्थिती अनुमाना। येवोच नेदी।।

आपल्या लिखाणात गुरुदेवांनी स्वतःबद्दल उल्लेख करणे टाळले आहे. पहिल्या पहिल्या लिखाणात हे विशेषच दिसते. पुढे पुढे मात्र आयुष्यातील काही घटना त्यांनी सांगितल्या आहेत. ए कन्स्ट्रक्टिव्ह सर्व्हे ऑफ उपनिषदिक फिलॉसॉफी आणि मिस्टिसिझम इन महाराष्ट्र यात लेखक पूर्णपणे दृष्टिआड आहे. पण पाथवे टु गॉड इन हिंदी लिटरेचर किंवा दि भगवद्गीता ॲज ए फिलॉसॉफी ऑफ गॉड-रिअलायझेशन या पुस्तकांमध्ये आणि विशेषत्वेकरून पाथवे टु गॉड इन कन्नड लिटरेचर या पुस्तकात ते वाचकांशी मोकळेपणाने बोलू लागले. आपल्या गुरुपरंपरेतील संतांच्या जीवनातील किंवा उपदेशातील कित्येक प्रसंग त्यांनी वाचकांपुढे ठेवले. इथे वाचकांना त्यांच्या हृदयांत डोकावण्याचा आनंद मिळतो. १९४२-४३ च्या सुमारास ध्यानगीतेचे काम चालू असतानाच गुरुदेवांच्या लिखाणात व्यक्तिगत गोष्टींचा वावर दिसून येऊ लागला. आपले सद्गुरू श्री

भाऊसाहेब महाराज व परमगुरू श्री निंबरगी महाराज यांचे उल्लेख वारंवर यायला लागले. त्यांची शिकवणूक जगापुढे मांडावी हा उद्देश तर यात आहेच. शिवाय, आपल्या संप्रदायातील या दोन महापुरुषांची बोलकी शब्दचित्रे रेखाटावी अशी गुरुदेवांची मनीषा असणे अशक्य नाही. आपली मते त्यांनी स्वतंत्रपणे मांडली नाहीत, ते संतांच्या मुखांतून बोलतात. संतश्रेष्ठांनी जगाला इतके देऊन ठेवले आहे की आपण आणखी काय नवीन अनुभव सांगणार अशी त्यामागची भूमिका असावी. सिद्धांतांचे विवरण करतांना ते सिद्धांत कुणीतरी पूर्वील विचारवंतांनी सांगितले आहेत असा त्यांचा उगम गुरुदेव सांगतात आणि आपण मागे राहतात. सिद्धांतांचे मूळ कुठे सापडते हे दिल्याने ती मते अधिकृत आहेत हे आपोआपच सिद्ध होते. मूळ वेचे काढून त्यांची जी सुसंबद्ध प्रणाली ते तयार करीत ती त्यांच्या विधायक-मीमांसा पद्धतीचा पाया आहे.

(आ) विधायक-मीमांसा पद्धती

तात्त्विक सिद्धांतांचा समन्वय करण्याकडे गुरुदेवांचा कल होता. दुसऱ्यांमधील दोषांकडे दुर्लक्ष करून फक्त गुण उचलले की समन्वयाची पूर्वपीठिका तयार होते. कारण मग भांडणाचे मूळ नाहीसे होते. कांट ज्या अर्थाने मीमांसा शब्द वापरतो त्या अर्थाने गुरुदेवांचे लिखाण मीमांसात्मक होते. अशी ही मीमांसा म्हणजे दोन्ही पक्षांच्या म्हणण्यात काहीना काही सत्याचा अंश असणारच हे ओळखणे आणि एकच पक्ष पूर्णपणे विजयी झाला आहे असा आग्रह न धरणे. दोघांना मान्य असणाऱ्या गोष्टींवर भर देऊन त्यांच्यामधील वादाचा निकाल लावण्याची या मीमांसेची इच्छा असते. म्हणून ती विघातक नसून विधायक असते. ज्ञानमार्ग व कर्ममार्ग यांचा गुरुदेवांनी कसा समन्वय साधला आहे. ते पहा : "सांख्य म्हणजे ज्ञानमार्ग आणि योग म्हणजे कर्ममार्ग, यांत समन्वय घडवून आणणे सहज शक्य आहे. त्यांच्यामध्ये मतैक्य कुठे आहे ते शोधले म्हणजे झाले. भगवद्गीतेने सांख्याला ज्ञानमार्ग म्हटले आहे, त्यांत संन्यासाची कल्पना आहे. योगाची व्याख्या कर्ममार्ग म्हणून केली आहे, तिथे अनासक्ती अपेक्षित आहे. पण संन्यास व अनासक्ती एकच असल्याने..... सांख्याला

योगापासून आणि योगाला सांख्यापासून तोडण्याचे कारण नाही".[३]

(इ) कांटचा प्रभाव

पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील ज्या तत्त्ववेत्त्याचा गुरुदेवांवर सर्वांत जास्त परिणाम झाला तो म्हणजे जर्मन तत्त्वज्ञ इमॅन्युएल कांट, हे निस्संशय. त्यांच्या लिखाणात कांटचा सर्वत्र वावर आहे. त्याच्या नावाचा व त्याच्या ग्रंथांचा उल्लेख अनेकदा येतो. कांटची पद्धती गुरुदेवांनी वापरली आहे, त्याचे शब्द व वाक्प्रचार सढळ हाताने योजले आहेत, तसेच त्याची प्रमेये व त्याने हाताळलेले विषय यांची गुरुदेवांनी चर्चा केली आहे. त्यांनी कांट पचवला आहे, इतका की त्यांनी भारतीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास कांटमय करून टाकला असे म्हणणे फारसे अतिशयोक्तीचे ठरू नये. कांटच्या विचारांनी गुरुदेव भारावून गेले यात आश्चर्य नाही. कांट हा एक श्रेष्ठ तत्त्वज्ञ असून त्याचे विचार विशेषच निःसंदिग्ध असत. तपशीलवार व दीर्घ तात्त्विक विश्लेषणाची त्याला देणगी होती. गुरुदेव कांटला किती मानत असत हे अजमावण्यासाठी अद्भुताच्या क्षेत्रात कांटने केलेल्या कामगिरीबद्दल गुरुदेवांनी त्याची जी स्तुती केली आहे तेवढी पाहिली की पुरे.[४] नियमितपणाचा त्यांचा आदर्श म्हणजे कांट. संध्याकाळच्या फिरण्यासकट दिवसाचे सर्व कार्यक्रम घड्याळाच्या काट्याप्रमाणे नियमितपणे करणाऱ्या एका विद्यार्थ्याला ते म्हणाले होते की, 'अरे याने तर कांटवरही मात केली'.

गुरुदेवांनी कांटचा किती सखोल अभ्यास केला होता ते त्यांच्या पहिल्या पुस्तकापासूनच लक्षात येते. कांटचा कार्लाइलवर परिणाम झाला आहे असे ते सांगतात.[५] शिवाय कार्लाइलने कांटचे शब्द किती उचलले आहेत तेही दाखवतात.[६] गुरुदेवांच्या एकूण लिखाणांत, विशेषतः उत्तरकालातील लिखाणात कांटचा उल्लेख कितीदा आला आहे ते मोजणे सोपे नाही. थोडी पाने उलटली न उलटली की कोणत्या तरी स्वरूपात कांट डोकावतोच. कांटच्या पुस्तकांतील 'चिद्वादखंडन'[७] किंवा 'कलाभिरुचीची मीमांसा'[८] यांचा उल्लेख तर आहेच, पण १९१६ पासूनच ए क्रिटीक ऑफ प्युअर रीझन या पुस्तकातील सिद्धांतांचा उल्लेख जो सुरू होतो,[९] तो तहत दि भगवद्गीता ॲज ए फिलॉसॉफी ऑफ

गॉड-रिअलायझेशन या अखेरच्या पुस्तकापर्यंत म्हणजे पुढील चाळीस वर्षे होतच राहतो. ए कन्स्ट्रक्टिव्ह सर्व्हे ऑफ उपनिषदिक फिलॉसॉफी या पुस्तकात गुरुदेवांनी कांटच्या तीन मीमांसा ग्रंथांची एक वेगळीच मांडणी केली आहे. ए क्रिटीक ऑफ प्युअर रीझन (शुद्धबुद्धिमीमांसा) हा ग्रंथ एका भव्य तात्त्विक संविधानाचा साध्यावयव असून ए क्रिटीक ऑफ प्रॅक्टिकल रीझन (व्यावहारिक बुद्धीची मीमांसा) हा पक्षावयव व ए क्रिटीक ऑफ जज्जमेंट (कलाभिरुचीची मीमांसा) हा निष्कर्ष आहे असे ते म्हणतात. पहिल्या ग्रंथातील शुद्धबुद्धी या विषयाला दुसरा व तिसरा ग्रंथ अनुक्रमे शुभकल्पनेची व मूल्यकल्पनेची जोड देतात.[१०] 'भगवद्गीतेतील विरोधाभास किंवा नयाभास', 'निरपेक्ष आदेश व भगवद्गीता' आणि 'भगवद्गीतेतील अद्भुताचे स्वरूप' अशी तीन व्याखाने गुरुदेवांनी १९२८ साली नागपूरला दिली होती. पुढे ते नमूद करतात की कांटच्या तीन मीमांसाग्रंथांतील तत्त्वज्ञानात हेच तीन विषय प्रामुख्याने असून त्यांचेच आपण आपल्या गीतेवरील ग्रंथात विवरण केले आहे.[११]

गुरुदेवांनी अंगीकारलेली विधायक-मीमांसा पद्धती मूळची कांटचीच. ही पद्धती अंमलात आणून कांटने युरोपीय तत्त्वज्ञानात क्रांती घडवून आणली होती. ए कन्स्ट्रक्टिव्ह सर्व्हे ऑफ उपनिषदिक फिलॉसॉफी या ग्रंथातल्या पाचव्या प्रकरणातील विवरणपद्धती, भाषा, किंवा प्रमेये पाहिल्यास, ज्या कुणाची कांटशी नुसती तोंडओळख आहे त्यांनाही तिथे कांट उभा असल्याचे जाणवते. या प्रकरणाची संपूर्ण मांडणीच कांटछापाची आहे. संकल्पनांतराची पद्धत इथे आढळते. कांटच्या तत्त्वज्ञानात अनेकदा संकल्पनांतर दिसते. विचाराची पावले पुढे पडली तरी कित्येकदा एखाद्या प्रश्नाचे पुरेसे स्पष्टीकरण होत नाही. म्हणून अधिक उलगडा करणाऱ्या संकल्पनांकडे माघारी यावे लागते. अशी माघार घेतघेतच विज्ञानाची प्रगती होत असते. एखाद्या गावाला जाताना आधी धरलेली वाट चुकली होती याची जाणीव झाल्याबरोबर मागे येऊन आपल्याला दुसरी वाट धरावी लागतेच की नाही? तत्त्वज्ञानात तसेच आहे. कांटने स्वतः माघारच नव्हे तर कोलांटी उडी घेतली होती; पुनश्च हरिः ॐ अशा थाटाची त्याने घोषणा

केली की बाकी काही करण्याआधी मनाच्या शक्तींचेच परीक्षण करणे आवश्यक आहे. ही माघार घेण्याची किंवा विचाराला नवीन दिशा देण्याची पद्धती म्हणजे संकल्पनांतर किंवा नवीन संकल्पना. तोच साचा वापरून उपनिषदांतील काही गोष्टींचे विवेचन गुरुदेवांनी आपल्या पुस्तकात केले आहे. तदनुसार विश्वशास्त्रीय संकल्पनांऐवजी शरीरविज्ञानातील संकल्पना किंवा विश्वशास्त्रीय व शरीरविज्ञानातील संकल्पनांऐवजी मानसशास्त्रीय संकल्पना वापरल्या पाहिजेत असे सांगितले आहे. तर्काभास, तर्कबुद्धिआदर्श, मीमांसा, आपल्या शक्तीच्या मर्यादाविषयी अज्ञान, पदार्थ, अनुभवपूर्व, विप्रतिषेध (नयाभास), संकल्पनांतर, मध्यस्थाचे कार्य, निर्विशेष वस्तू, बौद्धिक ईश्वरवाद या अर्थाचे अगणित शब्द गुरुदेवांनी आपल्या लिखाणात अगदी सर्रहा विशिष्ट हेतूने योजिले आहेत. त्या शब्दांचे शब्द-कोशातील अर्थ पाहून गुरुदेवांना काय म्हणायचे आहे ते कळणार नाही. श्रद्धेसाठी बुद्धीचा त्याग, दुराग्रहाच्या निद्रेतून जागे होणे, निष्काम कर्म हे विषय साधे दिसतात, पण तत्त्वज्ञानाचा प्रत्येक विद्यार्थी अशीच साक्ष देईल की त्यांवर कांटची मोहर आहे. कांटचे शब्द गुरुदेवांच्या परिभाषेत इतके रुळले होते की ते सहजगत्या त्यांच्या लेखणीतून उतरत.

कांटची प्रमेयेही वारंवार भेटतात. अहं ब्रह्मास्मि,[१२] परस्परावलंबित्व[१३] ज्ञाता किंवा ज्ञः,[१४] रामराज्य,[१५] आत्मनो मोक्षार्थं जगद्धिताय च,[१६] ईश्वराच्या अस्तित्वासाठी नैतिक युक्तिवाद मांडणे[१७] व त्याचा त्याग करणे[१८] वगैरे उदाहरणे वानगीदाखल देता येतील. साक्षात्काराची मीमांसा करण्यापूर्वी साक्षात्काराच्या निकषांचा विचार करणे जरूर आहे अशी प्रथा गुरुदेवांनी पाडली. या निकषांचा विचार करताना सामान्यता, वस्तुनिष्ठता व आवश्यकता या कांटच्या संकल्पनांचा नेहमी ऊहापोह केला आहे.[१९] सत्ताशास्त्रीय युक्तिवाद, विश्वशास्त्रीय युक्तिवाद व रचनावादी युक्तिवाद हे ईश्वराच्या अस्तित्वाचे तीन युक्तिवाद खरे तर कांटच्या डोक्यातून आलेले नाहीत; त्यांच्या परीक्षणासाठी त्याने ते सुसंगत पद्धतीने मांडले, इतकेच. असे असूनही या युक्तिवादांचा विषय निघाला रे निघाला , की कांटची आठवण झाल्याविना राहत नाही. या युक्तिवादांचे पुन्हा पुन्हा येणारे

संदर्भ गुरुदेवांच्या पुस्तकांतून निवडून काढण्यात फार मजा येईल. निरपेक्ष आदेशाचा पहिला उल्लेख ए कन्स्ट्रक्टिव्ह सर्व्हे ऑफ उपनिषदिक फिलॉसॉफी या ग्रंथाइतका मागे जातो.[२०] इतकेच नव्हे तर ती संकल्पना त्यांच्या अखेरच्या गीतेवरील ग्रंथात दोन तीन प्रकरणात मध्यवर्ती कल्पना म्हणून मिरवते.

कांटने ज्ञानदृष्टीकडे दुर्लक्ष केले म्हणून आपण स्वतः ती उणीव भरून काढत आहोत असे गुरुदेव म्हणतात.[२१] गंमत म्हणजे हे करत असताना कांटचे स्थान आपोआप उंचावले जाते. कांटच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झालेल्या त्याच्या ओपस पॉस्टूमम या ग्रंथासंबंधी बोलताना गुरुदेव म्हणतात की या लिखाणात बुद्धिवादी कांटचे स्थित्यंतर साक्षात्कारी कांटमध्ये झालेले पाहावयास मिळते. कांटने आता ज्ञानदृष्टीचे महत्त्व ओळखले आहे आणि त्याने नैतिक, अद्‌भुत व दिव्य यांचे जे ऐक्य दाखवले आहे ते गीतेच्या तत्त्वज्ञानाहून तिळमात्र भिन्न नाही. गुरुदेवांनी आपल्या ग्रंथराजाचा शेवट कांटबद्दलच्या उद्‌गारांनी करावा हाच त्या कनिग्जबर्गच्या ऋषीचा सर्वोच्च गौरव आहे.

(ई) ज्ञानविज्ञानतृप्तात्मा

साक्षात्कारशास्त्र व विज्ञान यांचे मतैक्य होणे शक्य नाही, अशी सामान्यपणे एक समजूत आहे. पण ही दोन्ही एकमेकांना पूरक आहेत असे गुरुदेवांचे म्हणणे आहे. ज्ञानेश्वरांनी दोन नैसर्गिक घटनांचा जो उल्लेख केला आहे तो सातशे वर्षापूर्वी केला आहे हे पाहिल्यावर ज्ञानेश्वरांच्या असामान्यतेची खात्री पटते असे सांगून गुरुदेव पुढे म्हणतात की या उल्लेखांवरून शास्त्रीय दृष्टिकोन व साक्षात्कार यात छत्तिसाचा आकडा नाही हे स्पष्ट होते.[२२]

निरीक्षण व प्रयोग यांना विज्ञानाचे 'वास्तविक आधार' मानले जाते. गुरुदेवांच्या विचारसरणीत यांना महत्त्वाचे स्थान आहे. कोणत्याही अर्थापत्तीचा पडताळा पाहता आला पाहिजे यावर त्यांचा भर आहे. जिचा पडताळा पाहता येत नाही ती कल्पना विज्ञान झिडकारते. गुरुदेवांच्या लिखाणात सूक्ष्मदर्शक यंत्रातून केलेल्या अणुजीवांच्या निरीक्षणाचा उल्लेख आहे.[२३] गांधीलमाशी आपल्या अर्भकांचे पोषण कसे करते याचे त्यांनी निरीक्षण केले होते.[२४] विज्ञानातील प्रयोग ते

करीत तेही वाचावयास मिळते.[२५] अतींद्रिय अनुभवांच्या नावाखाली कविकल्पना मांडणे किंवा आभासाला अनुभव समजणे अयोग्य होय असा त्यांचा इशारा आहे. अतींद्रिय अनुभवाची कसोटी घेतली पाहिजे, ती नुसती पोकळ कल्पना असता कामा नये.[२६] १९३७ साली इंडियन फिलॉसॉफिकल काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून त्यांनी जे भाषण केले त्यावरून विज्ञानाची त्यांना केवढी ओढ होती याची प्रचिती येते.[२७] त्यांच्या लिखाणात विज्ञानक्षेत्रातील पारिभाषिक शब्द विखुरलेले दिसतात. स्पिरिटॉन,[२८] आध्यात्मिक गुरुत्वाकर्षणाचा नियम,[२९] अनंतस्पर्शरेषा,[३०] वगैरे शब्द याची साक्ष देतात. प्रसिद्ध झालेल्या लिखाणाबद्दल हे झाले. आइनस्टाइनच्या सापेक्षतेच्या सिद्धांतावरील त्यांची टिपणे पाहिली की त्यांतील विद्वत्ता पाहून आश्चर्याने तोंडात बोट जाते. त्यांच्या तात्त्विक लिखाणात जशी प्लेटो, ॲरिस्टॉटल, कांट किंवा स्पिनोझा वगैरे मंडळींची ये-जा आहे तशीच इथे न्यूटन, जेम्स जीन्स, प्लांक, हाइसेनबर्ग, कार्ल पिअर्सन आदींची वहिवाट दिसते. गुरुदेवांच्या ठिकाणी विज्ञान व तत्त्वज्ञान यांचा संगम आहे याचे कारण म्हणजे विज्ञान सुद्धा परमेश्वराचेच एक अंग आहे ही त्यामागची श्रद्धा. 'संपूर्ण जीवशास्त्र जसे ईश्वराचे कार्य दिसते तसेच संपूर्ण पदार्थविज्ञानही दिसते. विज्ञान ही ईश्वराच्या शक्तीची अभिव्यक्ती आहे'.[३१]

(उ) व्यापकता व आंतरिक सुव्यवस्था

मागे दिलेल्या तत्त्वज्ञानाच्या इतिहासाच्या आराखड्यावरून गुरुदेवांचे अभ्यासक्षेत्र किती व्यापक होते याची कल्पना येते. त्यांच्या लिखाणातही याचेच प्रतिबिंब दिसते. ग्रीक भाषेच्या व्याकरणापासून ते आइनस्टाइनच्या सापेक्षतेपर्यंत त्यांची मजल जाते. ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान सांगण्याआधी त्यांच्या वेळची ग्रंथरचना, सामाजिक व धार्मिक पार्श्वभूमी यांचा तपशीलवार इतिहास ते सांगतात. गीतेवरील ग्रंथावरून त्यांच्या व्यासंगाचा आवाका लक्षात येतो. गीतेवरील विविध ग्रंथांचे परीक्षण करून त्यांची वैशिष्ट्ये मांडण्यात उणेपुरे अर्धे पुस्तक खर्ची पडले आहे. व्यापकता म्हणजे ज्ञानाचे भारे जमवून त्यांचा वेडावाकडा ढीग रचणे नव्हे. वैपुल्याबरोबरच गुरुदेवांच्या लिखाणात सुसंबद्ध मांडणी दिसते. संश्लेषणात्मक

पद्धतीविषयी त्यांना जे अधिक प्रेम वाटे त्याचे कारण हेच. विषयांच्या विकासानुसार परिच्छेदांची संगती, वाक्यांची रचना, इतकेच नव्हे तर चपखल बसणारे शब्द या सर्वांची यथायोग्य जुळणी होण्यासाठी ते फार विचार करीत असत. भारतीय तत्त्वज्ञानातील वेगवेगळ्या दर्शनांतील आत्म्याची कल्पना त्यांनी चढत्या क्रमाने कशी मांडली आहे पहा -

१ बौद्ध तत्त्वज्ञानात आत्मा नाही.

२ प्रभाकरांनी आत्मा जड आहे असे मानले आहे.

३ न्याय तत्त्वज्ञानामधील आत्मा चैतन्ययुक्तआहे, (मात्र चैतन्य आगंतुक आहे)

४ कुमारिलांनी आत्मा म्हणजे स्वसंवित् आहे असे मानले आहे.

५ वेदान्त दर्शनात आत्मा स्वप्रकाश आहे.

या ठिकाणी नुसती अनेक मते एकत्र केलेली नाहीत तर आत्मा या कल्पनेचा कसा विकास होत गेला आहे ते दाखवले आहे. प्लेटोच्या गॉर्जिअस या संवादात युक्तिवाद चालू असताना एकदम उठून कॅलिक्लिस म्हणतो :- 'अहो ही मांडणी छाप पाडत असली तरी युक्तिवाद बुद्धीला पटत नाही'. आज एकदम कॅलिक्लिस इथे आला तरी गुरुदेवांच्या युक्तिवादात तो काही दोष काढू शकणार नाही!

सुसंबद्धता आली की विकास थांबतो अशी कल्पना कुणी करून घेऊ नये. नवीन विचारांना स्थान न देणाऱ्या साचलेल्या सिद्धांतांची वळलेली मोट म्हणजे सुसंवादी प्रणाली नव्हे. उलट त्या मांडणीत विकासाचे बीज आणि विकासाची दिशा अंतर्भूत असाव्या लागतात. दाराखिडक्यांच्या चौकटी लवचिक नसतात त्यामुळे दाराखिडक्यांची वाढ होऊ शकत नाही. सुसंबद्धता विचाराला वळण देते. विकसनशील प्रणालीत विचारप्रवाहाला बांध घालणाऱ्या "चौकटी खरे म्हणजे अस्तित्वात नसतातच. आपल्याला नवीन काही सुचेनासे होणे म्हणजेच ही चौकट".[३२] एखाद्या सिद्धांतापासून नवीन अर्थ काढता आला नाही की विचार तिथे थबकतो; मग आपण म्हणतो या मांडणीच्या कडक नियमाने आम्हाला अडवले. आपलाच विचार खुंटतो कारण भिन्न भिन्न मतांमधील लक्ष्यार्थ आपल्या

ध्यानात येत नाही. हा दोष आपला; नियमांचा नाही. गुरुदेवांची दृष्टी मात्र जिथे कुठे नेति नेति छापाचा सिद्धांत आहे, तिथे इति इति असा भाववाची लक्ष्यार्थ कसा निघेल याकडे असे. उदाहरणार्थ त्यांचे एक विधान असे आहे, "सांख्य, वैशेषिक व मीमांसा या सर्वांना 'आस्तिक दर्शन' या वर्गातून वगळले पाहिजे, कारण सांख्य निरीश्वर आहे, वैशेषिकांनी आप्तवाक्य हे प्रमाण मानले नाही आणि मीमांसेला ईश्वराची गरज नाही. गंमत म्हणजे सांख्य-योग, वैशेषिक-न्याय, मीमांसा-वेदान्त या जोड्यांपैकी पहिले दर्शन नास्तिक आहे व दुसरे आस्तिक आहे. हा विचारामध्ये झालेल्या विकासाचा परिणाम असावा".[३३]

तात्त्विक विचार-विश्वात एखाद्या संकल्पनेची किंवा सिद्धांताची योग्य जागा ठरविण्याकडे गुरुदेवांचा कल होता. याला मानसशास्त्रात समाकल्पन म्हणतात. जुने जे काही असेल त्याच्या मांडणीत नव्याला सामावून घेणे म्हणजे समाकल्पन. पाश्चात्त्य तात्त्विक संकल्पनांनी गुरुदेवांच्या अभ्यासाचा मोठा भाग व्यापला होता. संतवाङ्मयातील कल्पना ते या तात्त्विक परिभाषेत सांगत. त्यांच्या डोळ्यासमोर विचारवंत व त्यांची प्रमेये यांचा जणू नकाशाच पसरलेला असे. कोणतेही नवीन प्रमेय आले की या नकाशावर ते कुठे चपखल बसते हे पाहून त्याला गुरुदेव नाव देत आणि मग आसपासच्या कल्पनांशी असणारे त्याचे साम्य किंवा फरक दाखवून देत. उदाहरणार्थ, "हे अगदी कांटच्या विश्वशास्त्रीय-रचनावादी युक्तिवादासारखे आहे".[३४] "तुलसीदासांची परहिताची कल्पना म्हणजे बेंथॅमच्या उपयोगितावादी परहित-कल्पनेचे आध्यात्मिक प्रतिरूप आहे"[३५] "लायब्नीझच्या भाषेत बोलायचे तर संताच्या परिवारातील लोकांना संताशी असलेल्या आध्यात्मिक लाग्याबांध्याचा फायदा मिळतो".[३६] "आपल्या स्वसंवित्च्या सिद्धांताने ज्याने आधुनिक पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा पाया घातला त्या देकार्त या फ्रेंच गणिती-तत्त्वज्ञाच्या धर्तीवर पुरंदरदासांनी एक महत्त्वाचे विधान केले आहे."[३७] "अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः। (भगवद्गीता १५.१४) या ठिकाणी उल्लेख केलेला वैश्वानर हा पार्थिव अग्नी किंवा अग्निकुंडातला अग्नी नसून तो हेराक्लाइटॉस किंवा झोरोॲस्टर यांनी वर्णिलेला दिव्याग्नी आहे".[३८]

(ऊ) क्रमयोग किंवा अनंतस्पर्शी-आसन्नीकरण-न्याय

क्रमयोग सिद्धांताचा पहिला उल्लेख मिस्टिसिझम इन महाराष्ट्र या ग्रंथात आहे. ज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञानाचे विवरण करीत असताना गुरुदेव सांगतात की परिपूर्णता क्रमाक्रमाने येते. पाथवे टु गॉड इन कन्नड लिटरेचर या ग्रंथात क्रमयोगाला अपरोक्षानुभूतीचे एक लक्षण मानले आहे. कोणत्याही क्षेत्रातली प्रगती टप्प्याटप्प्याने, क्रमाक्रमाने, किंवा अखंडपणे होते. गणितामध्ये अनंतस्पर्शरेषा अशी एक संकल्पना आहे. अनंतस्पर्शरेषा म्हणजे अखंडपणे विशिष्ट वक्ररेषेच्या जवळ जवळ जाणारी रेषा. (आकृती १ पहा).



अब - अनंतस्पर्शरेषा

कड - विशिष्ट वक्ररेषा (साधकाचा मार्ग)

पारिभाषिक शब्दात जवळ जाण्याला आसन्नीकरण म्हणतात. संस्कृत परंपरेला अनुसरून आपण याला अनंतस्पर्शी-आसन्नीकरण-न्याय असे म्हणू; इथे न्याय म्हणजे सिद्धांत. तेव्हा अनंतस्पर्शी आसन्नीकरण म्हणजे अनंतस्पर्शरेषेप्रमाणे क्रमाक्रमाने ध्येयाच्या जवळ जवळ जाण्याची प्रक्रिया. संस्कृतात प्रचलित असलेला सोपान-आरोहण-न्याय म्हणजेच पायरीपायरीने जिना चढणे ही संकल्पनासुद्धा इथे वापरता येईल. आकृती १ मध्ये अंतर $प_१ फ_१ >$ अंतर $प_२ फ_२ >$ अंतर $प_३ फ_३$. याचा अर्थ असा की विशिष्ट वक्ररेषा जसजशी सतत मार्ग आक्रमत राहील तसतसे अनंतस्पर्शरेषा व विशिष्टवक्ररेषा यातले अंतर कमीकमी होईल. विशिष्ट वक्ररेषा व अनंतस्पर्शरेषा अनंत अंतरानेच मिळतात. हाच क्रमयोग. याचप्रमाणे साधक हा परमार्थ-मार्गावरून वाटचाल करीत असताना ईश्वराच्या

अधिकाधिक जवळ जातो आणि अनंतापाशी त्याला मिळतो.[३९] साक्षात्काराच्या भाषेत अनंततत्त्व म्हणजे परमेश्वर. सर्वच साध्यांची ही कथा आहे; ती हळूहळू प्राप्त होत असतात. ज्याला मानसशास्त्रात एखाद्या समस्येवर प्रकाश पडणे असे म्हणतात ती पायरीसुद्धा एकदम येत नसते. त्याआधी पूर्वतयारी व पोषण या पायऱ्या असतात. त्यांचे पर्यवसान समस्येची उकल होण्यात होते. क्षणशः कणशः अशी ती प्रगती होते. तशीच प्रगती नैतिक व आध्यात्मिक क्षेत्रातही होते. क्रमयोग हा एक व्यापक सिद्धांत आहे आणि त्याला ज्ञानशास्त्रीय व सत्ताशास्त्रीय बाजू आहेत हे ब्रॅडले व प्लेटो यांच्या तत्त्वज्ञानांवरून लक्षात येते असे सांगून प्रा. रानडे यांनी क्रमयोगाच्या आध्यात्मिक बाजूचे विवरण केले आहे. ही बाजू मीराबाईच्या बनत बनत बन आई रे या उद्‌गारातून स्पष्ट होते. "उच्चतम शिखरावर माणसाला एकदम विहंगममार्गाने उड्डाण करता येणारही नाही कदाचित, पण पिपीलिका मार्गाने तिळतिळ अंतर तोडून त्याला शिखराला धीरे धीरे पोचता येते".[४०] या सिद्धांताचे नैतिक पैलू लक्षात घेण्याजोगे आहेत. पहिले म्हणजे ध्येय क्षणार्धात हातात येत नसल्याने साधकाला 'ग'ची बाधा होत नाही. दुसरे म्हणजे त्याची निराशाही होत नाही. कारण प्रगती निश्चितपणे होत असते, मग ती हळूहळू का होईना. शिवाय प्रयत्नात शैथिल्य येत नाही कारण अखेरचा टप्पा गाठण्यासाठी त्याला सतत चालत राहावे लागते. दुसऱ्या एका ठिकाणी गुरुदेवांनी हीच कल्पना मांडली आहे. "साक्षात्कार एकदम होत नसतो. आपण त्यासाठी सतत प्रयत्नशील राहावे लागते. आपण त्याच्या जवळ जवळ जात असतो, तिथपर्यंत पोचत मात्र नाही".[४१] क्रमयोगाच्या या संकल्पनेच्या मदतीनेच गुरुदेवांनी ज्ञानोत्तर कर्म व ज्ञानकर्मसमुच्चय या परंपरागत सिद्धांतांमधील वादंग मिटविले आहे. ज्ञान ही घटना नसून ती एक प्रक्रिया आहे, आणि तिला शेवट नाही. ज्ञानोत्तर कर्माला काही अर्थच नाही. कारण 'उत्तर' म्हणायला ज्ञानप्रक्रिया संपली पाहिजे आणि ती तर संपतच नाही, चालूच रहाते. तसेच ज्ञानप्रक्रिया पूर्ण होत नाही म्हणून ज्ञान आणि कर्म यांचा समुच्चय करण्याचाही प्रश्न येत नाही.

(ए) पारस्परिक कारणता

क्रममार्गाच्या सिद्धांताच्या जोडीने गुरुदेवांच्या लिखाणात नेहमी येणारा सिद्धांत म्हणजे कार्य व कारण यांचे परस्परावलंबित्व. सर्वसाधारणपणे आपण एका घटनेला कारण व दुसऱ्या घटनेला कार्य म्हणतो. परंतु कांट म्हणतो की कित्येकदा दोन घटना एकमेकींचे कारणही असतात आणि एकमेकींचे कार्यही असतात. अ हे ब चे कारण असले तरी ब हे अ चे कारण असू शकते. दोन्ही एकमेकांची कारणेही आहेत व कार्येही आहेत. यालाच कांट परस्पर-कारणता म्हणतो. प्रा. रानडे यांनी हे तत्त्व अनेक गोष्टींना लावले आहे. एखादे उदाहरण घेऊन ते पाहू. प्रश्न असा आहे की आध्यात्मिक अनुभवात अनाहत नादाने अमृतरस पाझरतो की अमृतरसाच्या अनुभवाने अनाहत नाद ऐकू येतो? दोन्ही तऱ्हेची वर्णने कबिरांनी केली आहेत. त्यांच्या या उलटसुलट भूमिकांचा समन्वय कसा करायचा? इथे कांटचा सिद्धांत कामी येतो. "अनाहत नादाचा अमृतरस पाझरण्यावर परिणाम होतो. आणि अमृतरस पाझरण्याचा अनाहत नादावर परिणाम होतो. यालाच कांट पारस्परिक-कारणता म्हणतो".[४२] अनाहत नाद हे कारण व रस हे कार्य असे आपण ठामपणे म्हणू शकत नाही. कारण रसानुभवापासून नाद निर्माण होतो व त्या ठिकाणी रस हे कारण व नाद हे कार्य ठरते. म्हणजे दोन्हीही एकमेकांची कारणे जशी आहेत तशीच कार्येही आहेत. अनंतस्पर्शी–आसन्नीकरण व पारस्परिक-कारणता या दोन्ही गोष्टी कधीकधी एकत्रही सापडतात. एकमेकांना अनंतापाशी मिळणाऱ्या दोन गोष्टींत परस्पर-कारणता दिसून येते. हळूहळू पाप धुतले जाणे व अधिक अधिक स्पष्टपणे ईश्वरदर्शन होणे यात परस्पर-कारणता आहे. "जसजसे पाप घटत जाते तसतशी ईश्वरदर्शनात प्रगती होत जाते; आणि ईश्वरदर्शन जसजसे वाढीला लागते तसतसा पापाचा मळ कमी कमी होत जातो. दोन्ही प्रक्रिया एकमेकीबरोबरच होत असतात".[४३] अशा प्रकारे दोन्हींमध्ये परस्पर-कारणता आहे. आता पापरहित होणे ही क्रमाक्रमाने होणारी प्रक्रिया आहे; ईश्वरदर्शनाची प्रक्रियाही पावलापावलाने होते आणि या दोन्ही क्रिया वर पाहिल्याप्रमाणे परस्परांची कारणे व कार्ये आहेत. इथे दोन्ही सिद्धांत एकदम

स्पष्ट दिसतात.

(ऐ) आध्यात्मिक उद्देश

गुरुदेव वेगवेगळ्या विषयांत रस घेत असले तरी या विविधतेत एकसूत्रीपणा होता कारण सर्वच विषय ईश्वर या केंद्राभोवती गुंफलेले होते. मानसशास्त्राच्या भाषेत बोलायचे तर मनुष्यामध्ये एक मूधन्र्यभाव असून तो इतर सर्व भावांवर वर्चस्व गाजवतो. इतर भाव ज्याच्या त्याच्या महत्त्वाप्रमाणे कमी अधिक पातळीवर असतात. मनामध्ये या श्रेष्ठ-कनिष्ठ भावांची एक रचना झालेली असते. ईश्वरप्रेम हा गुरुदेवांच्या मनातला मूर्धन्यभाव होता. त्यांच्या लिखाणाचा मूलतम हेतू आध्यात्मिक होता हे न्यायतःच प्राप्त होते. ए कन्स्ट्रक्टिव्ह सर्व्हे ऑफ उपनिषदिक फिलॉसॉफी या ग्रंथाच्या प्रस्तावनेत ते म्हणतात, "या ग्रंथाचा अंतिम हेतू आध्यात्मिक आहे. इतर सर्व गोष्टींना त्याच्या खालचा दर्जा द्यायला हवा.... उपनिषदांची शिकवण साक्षात्कारपर्यवसायी आहे हेच या ग्रंथात दाखवायचे आहे..... कोणत्याही सत्ताशास्त्रीय सिद्धांताचे मूल्यमापन करावयाचे झाले तर हेच बघावे लागेल की तो सिद्धांत आपल्याला ईश्वराभिमुख करतो का? किंवा आपले जीवन समृद्ध करतो का? या गुणांवरच त्या सिद्धांताची सत्यता आणि जिवंतपणा ही अवलंबून असतात".[४४]

संतवाङ्मय प्रसिद्ध करण्याच्या हेतूने त्यांनी सुरू केलेल्या अध्यात्मग्रंथमालेचा उद्देश हाच आहे. या पुस्तकांच्या प्रस्तावनेचा सारांश बहुतांशी त्यांच्यात शब्दात सांगता येईल : 'या ग्रंथमालेचे मुख्य प्रयोजन म्हणजे लोकांस परमार्थाचे उज्ज्वल स्वरूप महाराष्ट्र वाङ्मयातून उघड करून सांगणे हे होय. परमार्थाबद्दलच्या निरनिराळ्या भ्रामक कल्पनांचे निरसन करून शुद्ध परमार्थाचे स्वरूप समजावून देणे हे संतवाङ्मयाचे पवित्र कर्तव्य आहे. बुद्धिवादास पटेल अशाच प्रकारचा अनुभव संतांच्या ग्रंथांत सांगितला आहे असे दिसून येईल. पाश्चात्त्य व पौर्वात्य तत्त्वज्ञांचे व सत्पुरुषांचे विचार व अनुभव जमेस धरून, शास्त्रीय निकष लावून, स्वानुभवास पडताळून, चिकित्सक बुद्धीने आधुनिक लोकांस परमार्थाच्या दृष्टीने उपयोगी पडेल अशा प्रकारचा एक ग्रंथ लिहिण्याची जरुरी आहे.'[४५]

बादरायणांचे एखादे सूत्र असो, कुणा संताचा एखादा दोहा किंवा एखादे पद असो, त्यातला साक्षात्काराला अनुकूल असणारा अर्थ गुरुदेव तेव्हाच वेचून काढीत. उदाहरणार्थ, 'पराभिध्यानात् तु' (वेदान्तसूत्र ३.२.५) या सूत्राचा अर्थनिर्णय करताना शंकराचार्य व रामानुजाचार्य यांनी निष्कारण गुंतागुंत करून ठेवली आहे, असे ते म्हणत.[४६] त्यांनी स्वतः अगदी सरळ अर्थ लावला आहे. पर म्हणजे ब्रह्म आणि अभिध्यान म्हणजे एकाग्रध्यान. 'परब्रह्माचे एकाग्र चित्ताने ध्यान केल्यामुळे' असा या सूत्राचा सरळ अर्थ होतो. शंकराचार्यांप्रमाणे 'पर' म्हणजे विश्व असा अर्थ करण्याची जरुरी नाही. रामानुजाचार्यांनी 'पर'चा अर्थ परमात्मा असा केला असला तरी ईश्वराच्या ध्यानाचा उल्लेख केलेला नाही. 'तद् विष्णोः परमं पदम्' हा श्रुतिग्रंथांमध्ये वारंवार येणारा वाक्प्रचार असून तो परात्पर तत्त्वाकडे बोट दाखवतो. गुरुदेव 'पर' या शब्दाचा तोच अर्थ घेतात. दुसरे उदाहरण पाहू. तदधिगमे उत्तरपूर्वाघयोः अश्लेषविनाशौ तद् व्यपदेशात् (वेदान्तसूत्र ४.१.१३). या ठिकाणी उत्तर व पूर्व या शब्दांचा क्रियमाण कर्म व संचित कर्म हा परंपरागत अर्थ आहे. पण त्यांचा साक्षात्कारपूर्व कर्मे व साक्षात्कारोत्तर कर्मे असा देखील उपयोग करता येईल.[४७] साक्षात्काराने मनुष्याच्या क्रियांमध्ये आमूलाग्र फरक होतो. साक्षात्कारपूर्व स्थितीत कुकर्म होण्याची शक्यता असते. पण साक्षात्कारोत्तर स्थितीमध्ये संतांच्या क्रिया नैतिकच असतात. इथेही सूत्राचा अर्थ साक्षात्काराच्या संदर्भातच लावला आहे.

संतांच्या पदांचा अर्थ असाच केलेला आहे. तिथेही आध्यात्मिक सार कसे काढले आहे ते पहा. "कृष्णमूर्ति कण्णमुंदे निंतिरुत्तदे या पदांत पुरंदरदासांनी सगुण ईश्वराचे वर्णन केले आहे. निंतिदंतिदे (जणूकाही उभा आहे) या पाठापेक्षा निंतिरुत्तदे (उभा आहे) हा पाठ साक्षात्काराच्या दृष्टीने अधिक योग्य आहे असे मी सुचवले. पुरंदरदासांनी कृष्णदर्शनाचे खात्रीलायक वर्णन केले आहे. त्यांनी कृष्णाला पाहिले आहे. 'जणूकाही' पाहिले आहे असे ते म्हणत नाहीत".[४८]

एखाद्या ग्रंथाच्या तात्पर्यनिर्णयासाठी मीमांसाशास्त्राने जे निकष सांगितले आहेत त्यांत उपक्रम (सुरवात) अभ्यास (पुन्हा पुन्हा सांगणे), उपसंहार (शेवट)

वगैरेंचा समावेश आहे. गुरुदेवांच्या संपूर्ण लेखनसंपत्तीचा तात्पर्यनिर्णय करायचा झाला तर नित्यनेमावलीची प्रस्तावना हा लेखनाचा उपक्रम व दि भगवद्गीता ॲज ए फिलॉसॉफी ऑफ गॉड-रिअलायझेशन हा उपसंहार म्हणता येईल. बुद्धिनिष्ठ साक्षात्कारवादाच्या सिद्धांताची उपक्रमात सुरुवात होऊन इतर सर्व ग्रंथांतून त्याचा अभ्यास (दृढीकरण) होत होत उपसंहारात त्याचा कळस झाला आहे. ग्रंथांचे लिखाणही याच क्रमाने झाले आहे. कालक्रमाचा दृष्टिकोन व तार्किक दृष्टिकोन यांचा याहून सुरस संगम सापडणे कठीण.

(ओ) शैली

गुरुदेवांची शैली सुबोध आहे. त्यांना काय म्हणायचे असते ते सहज समजते आणि एकदा समजले म्हणजे ते आपल्या मनात पक्के रुजते. प्रकरणाची किंवा पुस्तकाची सुरवात अशी असे की वाचकांचे मन एकदम आकृष्ट होई आणि शेवट असा असे की त्याचा ठसा वाचकाच्या मनावर कायमचा उमटे. त्यांच्या लिखाणात स्पष्टता आहे कारण रेखीवपणा व तंतोतंतपणा यांवर त्यांचा भर आहे. तंतोतंतपणा असला की शैली शब्दबंबाळ होत नाही व दुर्ज्ञेयत्वाला थारा मिळत नाही. हुबेहुब चित्र रेखाटण्याचे उदाहरण म्हणून दिव्य आकाशपटलाचे त्यांचे शब्दचित्र पाहावे.[४९] त्यांचे वाङ्मय ओजस्वी व टवटवीत आहे. विवरण चालू असलेला विषय ते निपुणतेने रंगवीत.

शब्दांचा अचूक उपयोग करण्यावर गुरुदेवांचा कटाक्ष होता. कुणी अयोग्य शब्द वापरला तर ती गोष्ट त्यांची नजर झटकन टिपून घेई. विल्यम जेम्सच्या एका शब्दाला त्यांनी कसा आक्षेप घेतला ते पाहाण्यासारखे आहे. त्यांचे विद्यार्थी त्यांना त्यांच्या लेखन-वाचनाच्या कामात मदत करत असत. अशाच एक विद्यार्थ्याला त्याच्या परीक्षेचा अभ्यास करायला सवड मिळाली नव्हती. गुरुदेवांना हे दिसत होते पण ते त्यांनी बोलून दाखवले नाही. The Varieties of Religious Experience हे त्या विद्यार्थ्याला पाठ्यपुस्तक होते. एक दिवस अगदी सहजपणे गुरुदेव म्हणाले, "ते पुस्तक काढ व वाच पाहू मोठ्याने". जणूकाही त्यांनाच तो विषय ऐकायचा होता! वास्तविक त्या वाचनातून त्या विद्यार्थ्याची

त्यांच्या सान्निध्यात तयारी होत होती. वाचन सुरू झाले. गुरुदेव ऐकत होते. पृष्ठ २१५ वरील (Mentor Edition) एक वाक्य विद्यार्थी वाचत होता. "If the grace of God miraculously operates, it probably operates through the subliminal door" (देवाची कृपा विलक्षण रीतीने आपल्या जीवनावर परिणाम करत असते. कसे, ते अगम्य आहे. बहुधा कृपा मनाच्या खालच्या स्तरातून प्रकट होत असावी). वाक्यातला Subliminal शब्द ऐकताच गुरुदेव एकदम म्हणाले, "तो शब्द खोडून टाक. त्याच्या जागी Superliminal हा शब्द लिहून ठेव". Subliminal म्हणजे अधस्तल किंवा वासनामय मन. देवाची कृपा यातून कशी बरं प्रकट होणार? ती Superliminal म्हणजे वरच्या स्तरामधून किंवा उन्मनीतून आली पाहिजे. देव उच्च पदस्थ आहे. त्याची कृपा आडवाटेने येते ही कल्पना गुरुदेवांना एकदम खटकली व त्यांनी पुस्तकातला शब्द बदलायला लावला.

६. ग्रंथांच्या विवेचनाची रूपरेषा

गुरुदेवांच्या पुस्तकांचे रसग्रहण करताना पुस्तकांच्या प्रसिद्धीच्या तारखांचा विचार करायचा नाही, तर त्यांतील विषयांनुसार पुस्तकांचे वेगवेगळे गट पाडायचे आहेत. त्यांच्या पत्रांपासून आपण सुरुवात करू. नंतर कार्लाइलवरच्या पुस्तकाला स्वतंत्र स्थान देऊ. या पुस्तकात तत्त्वज्ञान व ललित वाङ्मय यांचा संगम आहे. मग आपण त्यांच्या लेखांकडे व लेखसंग्रहांकडे वळू. यामध्ये पहिला क्रमांक नित्यनेमावलीच्या प्रस्तावनेला आहे. पाठोपाठ 'फिलॉसॉफिकल अँड अदर एसेज,' 'दि कन्सेप्शन ऑफ स्पिरिच्युअल लाइफ इन महात्मा गांधी अँड हिंदी सेन्ट्स', 'एसेज अँड रिफ्लेक्शन्स' व 'हें प्रचीतीचें बोलणें' यांच्याकडे दृष्टी वळवू. यानंतर गुरुदेवांचा एक महत्त्वाचा निबंध, 'दि इव्होल्युशन ऑफ माय ओन थॉट' याचा विचार केला जाईल. नंतरच्या गटात त्यांचा तत्त्वज्ञानावरील टिपणरूप ग्रंथ, 'स्टडीज इन इंडियन फिलॉसॉफी' ही एकच कृती घ्यायची आहे. यात षड्दर्शनांचे व इतर काही तत्त्वप्रणालींचे चिकित्सक समीक्षण आहे. नंतर एकदम तीन ग्रंथ येतात. त्यांचा विषय परमार्थमार्ग असा आहे. 'मिस्टिसिझम

इन महाराष्ट्र' व त्याचे चार आधारग्रंथ ; 'पाथवे टु गॉड इन हिंदी लिटरेचर' व हिंदी 'परमार्थसोपान' हा त्याचा आधारग्रंथ आणि 'पाथवे टु गॉड इन कन्नड लिटरेचर' व त्याचा आधारग्रंथ, 'कन्नड परमार्थसोपान,' या गटात समाविष्ट होणारे आहेत. 'एकनाथवचनामृताचा' विचारही याच गटाबरोबर करायचा आहे. यानंतर आपण संतकवींच्या ५०० पदांचा संग्रह, 'परमार्थमंदिर' याकडे जाऊ. आता येतो तो अखेरचा गट. यातील ग्रंथांत साक्षात्कारशास्त्राचा मानसशास्त्र व तत्त्वज्ञान या दृष्टिकोनांतून ऊहापोह आहे. या सर्वच लिखाणात परमार्थ हेच अखेरचे ध्येय आहे हे स्पष्टपणे कळते. या शेवटच्या गटात एकूण पाच ग्रंथ येतात. 'ए कन्स्ट्रक्टिव्ह सर्व्हे ऑफ उपनिषदिक फिलॉसॉफी' व 'दि क्रिएटिव्ह पीरिअड', 'वेदान्त दि कल्मिनेशन ऑफ इंडियन थॉट,' 'ध्यानगीता' व दि भगवद्गीता ॲज ए फिलॉसॉफी ऑफ गॉड-रिअलायझेशन. प्रस्थानत्रयीवरील ह्या ग्रंथांत गुरुदेवांनी तात्त्विक व साक्षात्कारशास्त्रीय प्रमेये हाताळली आहेत.

उत्तरार्ध : ग्रंथांचे अंतरंग

१ तुजवीण रामा मज कंठवेना

आपले सदगुरू श्री भाऊसाहेब महाराज, तसेच अनेक गुरुबंधू व गुरुभगिनी यांना गुरुदेवांनी लिहिलेल्या पत्रांचा एक गट पडतो. त्यांपैकी काही पाहता येतील. भाऊसाहेब महाराजांना लिहिलेल्या पत्रांत (१९०९ ते १९१४) मुख्यतः परमेश्वर प्राप्तीची तळमळ दृग्गोचर होते. या पत्रांतून शारीरिक व्यथेचा बऱ्याच ठिकाणी उल्लेख आहे. अंतर्निरीक्षण सतत चालू आहे. आपले मन अशुद्ध असल्याने साधनात विघ्न येते,[१०] किंवा 'मदालस्य' या दोन शत्रूंस जिंकता येत नाही,[११] असे ते सांगतात. आपल्याकडून साधन नीट होत नाही, मग देव कसा दिसणार ही तळमळ ठायीठायी दिसते. 'नेम नाही, निष्ठा नाही, स्वस्वरूपाची प्राप्ती कशी होईल या विवंचनेत पडलो आहे'.[१२] सद्गुरूंबद्दलची अपार श्रद्धा या पत्रांचा पाया आहे. सद्गुरूंना भेटण्याची ओढ व इंचगेरीला गुरुगृही जाऊन राहण्याची तीव्र इच्छा अनेक पत्रांत व्यक्त केलेली आहे. संतसंगतीसाठी मन

आसुसले होते आणि गुरुकृपेची तहान होती. स्वप्रयत्नाला सद्‌गुरुकृपेची जोड हवी व त्यासाठी संपूर्ण शरणागतीची आवश्यकता आहे हा गुरुदेवांचा ठाम सिद्धांत एव्हापासूनच होता. "मनुष्य संकटात पडला असता त्यास ईश्वराची आठवण होते, व नित्य त्यास स्मरू लागतो, पण हे वैराग्य व हे स्मरण संकटांतून बाहेर (पडत) असता अथवा पडल्यावर टिकले तर त्याचा उपयोग व याच वेळी सद्‌गुरूंनी कृपा केली (तर) मनुष्याचे कल्याण होऊन जाते".[५३] गुरुदेवांचे आयुष्यामधले ध्येय परमेश्वरप्राप्ती हे होते व बाकीच्या गोष्टी त्यांच्या दृष्टीने गौण होत्या याचे स्पष्ट उल्लेख या पत्रांतून आहेत. "ज्या उद्योगाने अंगात अभिमान चढेल, किंवा परमेश्वरभक्तीकडे दुर्लक्ष होईल, किंवा परमार्थविचारास आडकाठी होईल अशा प्रकारचा उद्योग करणे भाग पडू नये अशी बळकट इच्छा आहे".[५४] पैसा हे साधन आहे, साध्य नाही आणि अंतःकरणातल्या भक्तीला पैशाचे अवडंबर नसावे हा महत्त्वाचा विचार इथे स्पष्ट मांडला आहे. 'केवळ पैशाने भक्तीचा थाट करण्यापेक्षा नीती व अनुभव वाढवून भक्तीचा थाट होणे दसपट चांगले आहे'.[५५] 'नीलवर्ण चंद्राची कोर कधी कधी भासमान होते'[५६] असा अनुभवाचा उल्लेखही आहे. एवंच परमार्थमार्गावरील अंधाऱ्या रात्रीचे दर्शन जसे पत्रातून होते तसेच अनेक मानसिक-नैतिक-आध्यात्मिक परिपक्व विचारही ठायीठायी दिसतात.

श्री अंबुराव महाराज (बाबा) किंवा श्रीमती शिवलिंगव्वा अक्का यांना लिहिलेल्या पत्रांवरून एक गोष्ट एकदम नजरेत भरते की या दोन्ही ज्येष्ठ विभूतींबद्दल गुरुदेवांच्या मनात गुरुतुल्य आदर होता. "आपल्यासारख्यांच्या संगतीत राहण्याची संधी मिळाल्याखेरीज साधन वाढणे शक्य नाही",[५७] असे ते बाबांना जसे लिहितात तसेच, 'समर्थांनी भक्ती करण्यास या दासास उत्तेजन द्यावे',[५८] असे ते शिवलिंगव्वा अक्कांना लिहितात. सद्‌गुरू भाऊसाहेब महाराज यांच्याबद्दल या तिघांच्याही मनांत अपरंपार भक्ती होती व त्यांची एकमेकांना लिहिलेली पत्रे सद्‌गुरुमहिमा अगाध असल्याचा निर्वाळा देतात. महाराजांच्या मागे त्यांची कीर्ती राहावी व खरा परमार्थ वाढावा या दृष्टीने मठाची व्यवस्था

कशी चालू आहे हे गुरुदेव बाबांना वारंवार विचारतात व तसेच मठाला आर्थिक साहाय्य करतात. भक्तिमार्गात स्थानमाहात्म्य टिकवणे अतिशय अगत्याचे आहे हा विचार गुरुदेवांनी बाबांना लिहिलेल्या पत्रांत मांडला आहे. 'समर्थांच्या मुख्य स्थापनेचा सप्ता दुसऱ्या कोठल्याही सप्त्यापेक्षा श्रेष्ठ आहे हे सर्वांस कळण्यास पाहिजे. दुसरीकडे कोठेही सप्ते झाले तरी इंचगेरीस सप्ता झालाच पाहिजे'.[५९] हाच विचार शिवलिंगव्वा अक्का यांना लिहिलेल्या पत्रातही आहे.[६०] शिवभावाने लिहिलेल्या पत्रांचा उत्कृष्ट नमुना इथे बघावयास मिळतो. ही पत्रे लिहिण्याच्या वेळी गुरुदेवांनी श्रेष्ठ पारमार्थिक पदवी मिळवलेली होती. स्वकीयांच्या मृत्यूचे उल्लेख धीरगंभीरतेने करण्याची स्थितप्रज्ञता त्यांच्या अंगी आलेली होती, तरीहि 'जें जगा धाकुटे होईजे तें जवळीक माझी' अशा तऱ्हेची त्यांची नम्रता या पत्रांमधून मनावर बिंबते.

गुरुदेवांच्या पत्रांचा दुसरा गट म्हणजे आप्तस्वकीय, सहाध्यायी, विविध संस्था मित्रमंडळी किंवा शिष्यांना लिहिलेली पत्रे. यातली कांही पत्रे म्हणजे साधकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे असायची. ते प्रश्न जसे व्यवहारातल्या गोष्टींबद्दलचे किंवा तात्त्विक सिद्धांतांबद्दल असायचे तसेच आध्यात्मिक विषयावरीलही असायचे. गुरुदेवांकडून गेलेल्या उत्तरांनी अनेक मानसशास्त्रीय, नैतिक किंवा साक्षात्कार-विषयक मुद्यांवर प्रकाश पडायचा. त्यांचा सल्ला साधा आणि सरळ असे. एका आजारी मित्राला लिहिलेले हे चारपाच ओळींचे पत्रच पहा ना :- 'जेव्हा साधेल तेव्हा नामस्मरण करीत जावे. माळेची सवय लावून घेतली तर उत्तम. शक्य असेल तेव्हा माळ पुरी करावी, मग थोडी विश्रांती घ्यावी आणि मग पुन्हा माळ घ्यावी. अतिविचार करून डोक्याला ताण देऊ नये. श्रद्धा व भक्ती असो द्यावी.' बहुतेक पत्रांच्या शेवटी "तुमचे नामस्मरण कसे चालले आहे ते कळवा", असा मजकूर असायचाच. नामस्मरण हे त्यांच्या पत्रांतले पालुपदच होते. एका गृहस्थांना त्यांच्या घरातील कोणीतरी गेल्यानंतर सांत्वनपर लिहिलेले हे पत्र :- "ईश्वरी साक्षात्काराच्या महान् ध्येयाला तुम्ही जे स्वत:ला सतत वाहून घेतले आहे त्यामुळेच तुम्हाला हलके वाटत असेल आणि

मन शांत होत असेल. जगामध्ये दुर्दैवाचे तडाखे हे बसायचेच पण ईश्वरी कृपेच्या आधारावर माणूस ते विसरायला शिकतो". दुःखाच्या घावांवर अध्यात्माची मलमपट्टी करणे किती जरूर आहे हे इथे स्पष्ट कळून येते. गुरुदेवांच्या जावक व आवक दोन्ही तऱ्हेच्या पत्रांचा अभ्यास होणे फार आवश्यक आहे. श्री व सौ पत्तिहाळ यांच्या 'चिंतनिका' या पुस्तकाने या अभ्यासाची नांदी झाली आहे.[६१]

२ संपादित ग्रंथ

साइन्स ऑफ द टाइम्स अँड कॅरॅक्टरिस्टिक्स (थॉमस कार्लाइल लिखित)

हे पुस्तक गुरुदेवांनी फर्ग्युसन कॉलेजात इंग्रजी शिकवत असताना तयार केले. ही साहित्यसोनियाची खाणच आहे. शेवटी दिलेल्या टिपणांना टिपणे म्हणणे हा त्यांचा अपमान आहे कारण ही टिपणे शब्दांची व वाक्प्रचारांचीच काय पण अवतरणांचीही स्पष्ट उकल करून दाखवतात; कार्लाइलने उल्लेख केलेल्या लेखकांची माहितीही देतात; अतः ती वाङ्मयक्षेत्रातील महत्त्वाच्या विषयांची एक सूची आहे असे म्हणणे अधिक सार्थ ठरेल. एखाद्या ज्ञानकोशाच्या धर्तीवर लिहिलेल्या या टिपणांकडे एक दृष्टिक्षेप टाकला की गुरुदेवांनी पाश्चात्त्य वाङ्मयाचा इतिहास, ख्रिश्चन धर्माचा इतिहास, तत्त्वज्ञानाचा इतिहास व ग्रीक पुराणकथा यांचा किती मनापासून अभ्यास केला होता हे लक्षात येते. कार्लाइल आपल्या लिखाणात मोठमोठे लेखक, तत्त्वज्ञ, तसेच वैज्ञानिक यांचा मुक्तहस्ताने उल्लेख करत असल्याने गुरुदेवांना हा सर्व अभ्यास करणे आवश्यक वाटले असावे. या टिपणांच्या मदतीने कार्लाइलचे निबंध समजून उमजून वाचता येतात व त्यातला आनंद मनसोक्त लुटता येतो. यावरूनच टिपणांचे महत्त्व लक्षात यावे. ही टिपणे जशी विद्यार्थ्यांच्या, तशीच जिज्ञासू वाचकांच्याही उपयोगाची आहेत. एखाद्या लेखकाचा पूर्णपणे अभ्यास कसा करावा याचा एक नमुनाच या पुस्तकाने आपल्यापुढे ठेवला आहे. मल्लिनाथाने कालिदासाच्या अंतरंगाचे जे दर्शन घडवले आहे त्याच्या तोडीचा या पुस्तकाचा दर्जा आहे.

इथे टिपणांना सूची दिलेली आहे. एवढेच नव्हे तर अवतरणांना सुद्धा सविस्तर सूची दिलेली आहे. एखादे अवतरण आपण अगदी याच पुस्तकात

वाचले आहे असे खात्रीने माहीत असते तरी आपली स्मृती अनेक वेळा दगा देते आणि ते अवतरण नेमके कोणत्या जागी वाचले हे बिलकूल आठवत नाही. पण कार्लाइलवरचे हे पुस्तक वाचताना ती भीती नाही; अवतरणांची एक सूचीच गुरुदेवांनी तयार ठेवली आहे. ही सूची म्हणजे या पुस्तकाचे वैशिष्ट्य आहे. कारण अशा तऱ्हेची सूची क्वचितच बघण्यात येते. कार्लाइलवर जेवढे म्हणून वाचता येईल तेवढे वाचून गुरुदेवांनी विद्यार्थ्यांना ज्ञानाची पाणपोई घातली आहे.

कार्लाइल, ए क्रिटिकल रिव्ह्यू हे प्रकरण फार महत्त्वाचे आहे. इथे शैली आणि तत्सम विषय आहेत. आधी कार्लाइलच्या दोन निबंधांचे बहिरंगपरीक्षण व मग त्यांचे अंतरंगपरीक्षण आहे. साइन्स ऑफ दि टाइम्स या लेखात कार्लाइलने यांत्रिकतावादावर हल्ला केला आहे. शिक्षणशास्त्र, काव्य, समाजकार्य, धर्मशास्त्र किंवा तत्त्वज्ञान यांत यांत्रिकता येणे किती धोक्याचे आहे हे आपल्या हळूहळू लक्षात येते. चैतन्यवादाला इथे डोक्यावर बसवले आहे (पृ.१९). कॅरॅक्टरिस्टिक्स या निबंधात अबोधाचा उदोउदो केला आहे (पृ. १८). कार्लाइलने अबोधमन हा शब्द वापरला आहे. अबोधमन म्हटले की त्याला फ्रॉइडचा वास येतो व दडपलेल्या वासना-भावनांच्या भुतांचा नाच डोळ्यापुढे येतो. पण हा अर्थ इथे अपेक्षित नाही. कार्लाइलला या शब्दातून विसराळूपणाही सूचित करावयाचा नाही. अबोधमन म्हणजे निरागसता, निरहंकार किंवा निष्पापता. 'आमची सदसद्विवेकबुद्धी जागी आहे असे विधान करणे म्हणजे सुद्धा वदतोव्याघात आहे' (पृ. १९). पण अबोधाची इतकी स्तुतिस्तोत्रे गाणे गुरुदेवांना पसंत नाही. कसे असेल? स्वात्मबोध किंवा स्वसंवित् या संकल्पनेला त्यांच्या स्वतःच्या तत्त्वज्ञानात फार उच्च स्थान आहे ना!

यानंतर उपयोगितावादाची चर्चा आहे. कार्लाइलच्या मते उपयोगितावाद म्हणजे यांत्रिकतावाद व अभिनिवेश यांची युती आहे. गुरुदेवांनी इथे लागलीच उपयोगितावादाचा उगम बेंथॅमच्या तत्त्वज्ञानात कसा सापडतो, जेम्स मिल व जॉन स्टुअर्ट मिल हे पितापुत्र त्याचा कसा अंगीकार करतात व डुकराचे

तत्त्वज्ञान म्हणून कार्लाइल त्याचा धि:कार कसा करतो हे सर्व विशद केले आहे (पृ. २१-२४). कार्लाइलने व्यक्तिमत्त्वाचा केलेला गौरव गुरुदेवांना अतिशयोक्तिपूर्ण वाटतो. कार्लाइलच्या राजनैतिक मतांबद्दल ते म्हणतात, 'कार्लाइल सुरवातीस पुरोगामी असून नंतर प्रतिगामी झाला आहे असे नसून सुरवातीपासून शेवटपर्यंत त्याच्यामध्ये पुरोगामित्व व प्रतिगामित्व दोन्हीही हजर आहेत' (पृ.२८). एक तत्त्वज्ञ या नात्याने कार्लाइलचे केलेले मूल्यमापन पहा – सर्व नैसर्गिक गोष्टींच्या मुळाशी एक अधिष्ठान आहे, आणि मायेच्या पडद्याआड असलेल्या सत्तत्त्वाचा शोध आपण घेतला पाहिजे अशी त्याची शिकवण आहे (पृ. ३५). कार्लाइलने आभासवाद मांडला, मायावादाचेच हे इंग्रजी रूप आहे (पृ. ३७). कार्लाइल चिद्वादी होता तरीहि त्याने उपयोगिता किंवा समाधान हा सत्याचा निकष मानला आहे (पृ. ४०-४१). कार्लाइलच्या नंतर होऊन गेलेला श्रेष्ठ उपयोगितावादी विल्यम जेम्स याचा जसा नियमबद्ध तत्त्वप्रणाली मांडण्यावर विश्वास नव्हता, तसाच कार्लाइलचाही नव्हता. तो म्हणे की अशा प्रणाली म्हणजे पत्त्यांचे बंगले आहेत (पृ.४३). सत्ताशास्त्रालाही त्याच्या लेखी फारशी किंमत नव्हती, अर्थातच बुद्धीला त्याने ज्ञानदृष्टीच्या खालचे स्थान दिले होते. ईश्वराचा साक्षात्कार व त्याचे अज्ञेयत्व ही कार्लाइलची मते त्याच्या ज्ञानदृष्टीच्या मतांशी संलग्न आहेत. या जगात मनुष्य जे जे काही करतो त्या सर्वांत साक्षात्काराला श्रेष्ठ स्थान आहे असे कार्लाइल म्हणतो (पृ.४६). विश्वधर्माचा किंवा सगळ्या विश्वाला एकच धर्म असावा या मताचा कार्लाइल कट्टा पुरस्कर्ता होता. वाङ्मयीन दृष्ट्या नाही तर तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनेही कार्लाइल फार श्रेष्ठ होता. या क्षणभंगुर जगात दिसणाऱ्या ऊन्हसावल्यांच्या खेळामागे चित्सूर्य तळपत आहे असा संदेश त्याने दिला (पृ.५५).

या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीच्या गुरुदेवांच्या प्रस्तावनेचे शेवटचे वाक्य असे आहे : "या दोन निबंधात यांत्रिकतावाद व उपयोगितावाद यावर झोड उठविली आहे..... स्वभाववादालाही इथे चांगला शह बसतो. परंतु हे लक्षात ठेवले पाहिजे की या दोन्हींचा समन्वय करण्यासाठी त्यांच्या पलीकडे गेले

पाहिजे". कोणत्याही दोन परस्परविरुद्ध गोष्टी दिसल्या की त्यांच्यापेक्षा व्यापक कल्पनेत दोन्हींचा समन्वय करणे हे जणूकाही गुरुदेवांचे व्रत होते. विश्वातील नानात्वाचा समन्वय ते ईश्वरात करीत.

३ लेखसंग्रह व स्वतंत्र लेख

(अ) नित्यनेमावलीची प्रस्तावना

१९११ साली प्रसिद्ध झालेल्या 'नित्यनेमावली' या संप्रदायाच्या भजनसंग्रहाची पहिली आवृत्ती भाऊसाहेब महाराजांच्या देखरेखीखाली झाली होती. तिला गुरुदेवांनी प्रस्तावना लिहिली आहे. या प्रस्तावनेचा मुद्दाम उल्लेख करण्याचे कारण म्हणजे त्यावेळी गुरुदेव जेमतेम सत्तावीस वर्षांचे होते. तरीही तत्त्वज्ञान व साक्षात्कारशास्त्र या विषयांसंबंधी त्यांच्या पुढच्या ग्रंथांमधून मांडलेले विचार इथेच परिपक्व झालेले दिसून येतात. परमार्थाला असणारी नीतीची आवश्यकता, खऱ्या साधूची लक्षणे, आत्मदर्शन किंवा साक्षात्कार याचा खरा अर्थ, सत्संगतीचे महत्त्व, नामस्मरणाची प्रक्रिया या सर्व गोष्टींची आटोपशीर पण सुस्पष्ट चर्चा इथे आहे. सुरवातीला संप्रदायाची ऐतिहासिक परंपरा दिलेली आहे. इतिहासाची साक्ष महत्त्वाची असते हे त्यांनी पुढील ग्रंथांमधून स्पष्ट केलेले आहे. पण या छोट्याशा प्रस्तावनेत देखील, इतिहासाचा मान ठेवला आहे. तुकारामांच्या अभंगसंख्येबद्दलचे विवरण त्यांच्या संशोधकबुद्धीचे दर्शन घडवते. संस्कृत भाषेतील महत्त्वाची अवतरणे, तसेच उपनिषदे व संतवाङ्मय यांच्या अभ्यास यांनी ही प्रस्तावना नटली आहे, आणि आपल्या सद्गुरूंच्या भक्तीत रंगून गेली आहे. नित्यनेमावलीची ही विद्वत्ताप्रचुर प्रस्तावना लिहून देखील गुरुदेवांनी तिथे कुठेच आपले नाव घातले नाही, याबद्दल भाऊसाहेब महाराजांनी त्यांना प्रशस्तिपत्र दिले ही गोष्ट सर्वविदित आहे. निरहंकारवृत्ती हा त्यांचा स्वभावविशेष या लिखाणापासूनच कळून येतो.

(आ) फिलॉसॉफिकल अँड अदर एसेज, भाग १

या लेखसंग्रहाला विशेष महत्त्व आहे. यातील ग्रीक तत्त्वज्ञांवरील लेख गुरुदेवांनी तरुण वयात लिहिलेले असूनही ते गहन तात्त्विक विचारांनी भरलेले

आहेत. हेराक्लाइटसवरील लेखात त्याच्या तत्त्वज्ञानाची फोड करून त्याच्याबद्दलचे आपले मत गुरुदेवांनी मांडले आहे. फ्लीडरर या जाड्या विद्वानाचे मत असे होते की हेराक्लाइटस हा साक्षात्कारी होता, पण गुरुदेवांना ते मान्य नव्हते. साक्षात्काराच्या दृष्टिकोनाला अमाप शिव्याशाप देणाऱ्या हेराक्लाइटसला साक्षात्कारी कसे म्हणावे? दुसरे म्हणजे हेराक्लाइटसने बुद्धीलाच मानाचे पान दिले आहे, अतः त्याला साक्षात्कारी म्हणजे अयोग्य आहे असे गुरुदेव म्हणतात. या युक्तिवादाने हेराक्लाइटसला साक्षात्कारी ठरवण्याच्या प्रवृत्तीला आळा तर बसतोच शिवाय परमेश्वरप्राप्तीसाठी केवळ बुद्धीवर अवलंबून राहणे धोक्याचे आहे हे गुरुदेवांचे मत स्पष्ट होते. विश्लेषणाच्या क्षेत्रात बुद्धी जे कार्य करते आणि जे कार्य तिचेच आहे ते सर्व गुरुदेवांना कबूल आहे. पण परमेश्वरप्राप्तीसाठीही ती पुरेशी आहे हे मात्र त्यांना मान्य नाही. त्या पैजेचा विडा फक्त ज्ञानदृष्टीच उचलू शकते. म्हणूनच जिथे बुद्धीचे अधिराज्य आहे तिथून साक्षात्काराची पदवी गाठता येत नाही. हेराक्लाइटसचे हेच झाले. हेराक्लाइटसवरचा गुरुदेवांचा लेख श्री अरविंदांना फार आवडला होता. गुरुदेवांची विद्वत्ता व हेराक्लाइटसचा त्यांनी लावलेला नवीन अर्थ यावर मत देण्याचा खरा अधिकार श्री अरविंदांना होता कारण ग्रीक भाषेवर त्यांचे प्रभुत्व होते. हेराक्लाइटसवरील गुरुदेवांचा लेख प्रसिद्ध झाल्या झाल्या १९१६-१७ झाली त्यांनी आर्य या मासिकात त्याच्यावर सात लेख लिहिले. ते पुढे पाँडिचरीच्या श्री अरविंद आश्रमाने पुस्तकरूपाने प्रसिद्ध केले. त्याच्या १९८९ सालच्या चवथ्या आवृत्तीत पृ. १-२ वर श्री अरविंद म्हणतात :- "प्रा. रा. द. रानडे यांनी अलीकडेच हेराक्लाइटसच्या तत्त्वज्ञानावर एक प्रकरण-ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. त्याच्यावरच्या पृष्ठक्रमांकावरून तो कशाचा तरी मधलाच भाग असावा असे वाटते, पण कशाचा, हे मात्र कळत नाही. तत्त्वचिंतकांवर त्यांनी एखादी लेखमाला लिहिली आहे का? की तत्त्वज्ञानाचा इतिहास लिहिला आहे? त्यांच्यासारख्या अभ्यासू व सिद्धहस्त लेखकाकडून हे काम झाले असेल तर आणखी काय पाहिजे? काही असो. असे लिखाण त्यांनी केले असेल तर ते एक महद्भाग्यच ठरेल. एखाद्या विषयाची सांगोपांग चर्चा

अगदी बाळबोध रीतीने करण्याची देवदत्त प्रतिभा त्यांच्याकडे आहे. पण एवढ्याने काय झाले आहे? तत्त्वज्ञान किंवा भाषाशास्त्र हे विषय घ्या. सामान्य वाचकाच्या दृष्टीला ते अवघड, रुक्ष व डोक्यावरून जाणारे वाटतात व तो त्यांच्यापासून चार पावले दूर राहतो. पण या विषयांना देखील प्रा. रानडे असा साज चढवतात की वाचकांना त्यांत आपोआप अभिरुची उत्पन्न व्हावी. प्रासादिक, ओघवती व आकर्षक अशा शैलीत ते आपले मनोगत मांडतात. प्रौढ व सुगम रीतीने विचारांची अभिव्यक्ती करणे हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. वास्तविक पाहता ही गोष्ट ग्रीक व फ्रेंच भाषांना साधते, इंग्रजी भाषेला नाही. असो. फक्त सतरा पानात त्यांनी कोड्याच्या भाषेत बोलणाऱ्या हेराक्लाइटस या एफेसिअन तत्त्वज्ञाचे विचार कुशलतेने उलगडून दाखवले आहेत. ते वाचून आपण मंत्रमुग्ध व तृप्त होऊन जातो".

प्रा. रानडे यांचे ग्रीक भाषेवर प्रभुत्व असल्यामुळे ग्रीक ग्रंथांच्या इतरांनी केलेल्या इंग्रजी भाषांतरांवर ते अवलंबून नसत. तसेच इतर अभ्यासकांनी कुणा तत्त्वज्ञाच्या विचारांचा अर्थ बरोबर लावला आहे की नाही हेही ते बघू शकत. एलिॲटिक तत्त्वज्ञ आणि प्रोटॅगोरास यांच्यावर ॲरिस्टॉटलने जे टीकास्त्र सोडले आहे ते फार प्रभावी आहे असे ते म्हणत पण म्हणून ॲरिस्टॉटल म्हणतो ते सर्वच योग्य अशी भोळी समजूत असता कामा नये. या संदर्भात दोन उदाहरणे पाहू. (१) "..... ॲरिस्टॉटलने प्रोटॅगोरासवर केलेली टीका इतकी नवीन आणि सद्य:कालीन कल्पना सूचित करणारी आहे, वेदन म्हणजे काय या विषयावरील त्याचे मानसशास्त्रीय विश्लेषण इतके मूलगामी आहे आणि सत्यानृत्याची त्याने केलेली फोड इतकी तर्कशुद्ध आहे की प्रस्तुत लेखकाच्या मते ॲरिस्टॉटलचा मेटॅफिजिका हा ग्रंथ नुसता धूळ खात पडू देणे किंवा वाळवीच्या भक्ष्यस्थानी जाऊ देणे हा घोर अपराध आहे". (पृ.९३). (२) ॲरिस्टॉटलने तात्त्विक दृष्टीने झेनॉफेनिसवर टीका केली त्यावेळेस झेनॉफेनिसच्या मानवतावादी दृष्टीकोनाकडे ॲरिस्टॉटलचे अक्षम्य दुर्लक्ष झाले. झेनॉफेनिसचा मोठेपणा त्याला कळलाच नाही.... त्याच्या मानवतावादाकडे ॲरिस्टॉटलने थोड्यातरी सहृदयतेने पाहावयास

हवे होते". (पृ.२९-३०). तर्कदुष्ट तात्त्विक विचारांचे ॲरिस्टॉटलने जे खंडन केले आहे त्याची गुरुदेव स्तुती करतात. पण नको त्या ठिकाणी तो शस्त्र परजायला लागला तर ते त्यांना खपत नाही. ॲरिस्टॉटलने प्लेटोची ज्या शब्दांत संभावना केली त्याच शब्दात गुरुदेवांनी ॲरिस्टॉटलची संभावना केली असतो :- 'ॲरिस्टॉटल आम्हाला प्रिय आहे हे खरे आहे पण सत्य हे त्याच्यापेक्षाही अधिक प्रिय आहे'. बर्ट्रान्ड रसेलच्या बाबतीत तसेच. अत्यणु-कलनशास्त्राकडे दुर्लक्ष केल्याबद्दल गुरुदेव रसेलला दोष देतात. सामान्य मनुष्य इतकेच समजतो की धनुष्यातून सुटलेला बाण मार्ग आक्रमित असतो. पण हा बाण स्थिरच असतो असे झेनोने 'सिद्ध' केले म्हणे! पण रसेलसारख्या गणिती विद्वानाने झेनोची बाजू घ्यावी का? गुरुदेव म्हणतात की रसेलने अत्यणु-कलनशास्त्रावर जी टीका केली आहे तो पाठीत खुपसलेला सुरा आहे. सुटलेला बाण स्थिर आहे किंवा कासव जर पाऊलभर पुढे गेले असले तर त्या सरपटणाऱ्या कासवाला जलद धावणारा अकिलिस हरवू शकणार नाही, अशा तऱ्हेची विरोधाभासी विधाने करताना झेनोने केलेली हातचलाखी उघडकीला आणण्यासाठी अत्यणु-कलनशास्त्राशिवाय दुसरा तरणोपाय नाही हे रसेलने ध्यानात घ्यायला हवे होते.

तत्त्वज्ञांचा - मग ते पौर्वात्य असोत की पाश्चिमात्य असोत - विचार करताना गुरुदेव आजकालची परिभाषा वापरतात. उदाहरणार्थ - Problem of the One and the Many (द्वैताद्वैत विचार) पृ.८, Conception of Polarity (ध्रुवबिंदु कल्पना) पृ.११, Doctrine of Continuity (सातत्य नियम) पृ.५६, Psycho-theology (अध्यात्मशास्त्र) पृ.७०, Law of Contradiction (व्याघाती नियम) पृ.१०८, Relativistic Sceptic (स्याद्वादी) पृ.१११, Ontological Substratum and Epistemological Nucleus (परात्पर वस्तू व ज्ञाता) पृ.१२२, किंवा Intellectual Nihilism (बौद्धिक शून्यवाद) पृ. १६५. हेराक्लाइटस काय किंवा याज्ञवल्क्य काय, त्यांची प्रमेये नीटनेटक्या स्वरूपात आपल्यापर्यंत आलेली नाहीत; त्यांची वचनेच आली आहेत आणि तीही विस्कळित स्वरूपात. अशी विविध वचने एकत्र करून ती तात्त्विक सिद्धांतांच्या चौकटीत बसवून व

अद्ययावत् संकल्पना व परिभाषा वापरून पुढे मांडण्याचे जे कठीण कार्य गुरुदेवांनी केले त्यावरून त्यांची संश्लेषणाची दृष्टी स्पष्ट होते.

इंडियन थिइझम हा लेख म्हणजे डॉ. मॅकनिकोल याच्या याच नावाच्या पुस्तकाचे परीक्षण आहे. या विषयावर लिहिल्या गेलेल्या पुस्तकात नवीन पुस्तकाचे स्थान काय आहे हे सुरवातीसच सांगितले आहे. नंतर सर्व प्रकरणांचे विश्लेषण असून पुस्तकाच्या गुणावगुणांचा उल्लेख आहे. मॅकनिकोलला उपनिषदांचे तत्त्वज्ञान कळले नाही, मात्र संतकवींचा परिचय पाश्चात्त्य विद्वानांना त्याने चांगल्या रीतीने करून दिला आहे. ख्रिश्चन मताचा पगडा मनावर असल्याने मॅकनिकोलला निःपक्षपाती भूमिका घेता आली नाही.

झेनोची चर्चा करताना गुरुदेवांचे गणितावरील प्रभुत्व दिसते, ए फिलॉसॉफी ऑफ स्पिरिट या लेखात त्यांचा विविध विज्ञानशाखांचा व्यासंग उठून दिसतो. पदार्थविज्ञान, जीवशास्त्र व नसाशास्त्र यांतील अद्ययावत् शोधांची त्यांनी इतकी सूक्ष्म नोंद केली आहे की हा लेखक कुणी वैज्ञानिक असावा असा वाचकाचा सहज ग्रह व्हावा. इथेही चैतन्य हेच विश्वाचे मूलतत्त्व आहे ही त्यांची धारणा झाकून राहत नाही. उलट तत्त्वज्ञान व विज्ञान यात विरोध नसून दोन्हींचे स्पष्टीकरण एकमेकांच्या भाषेत करता येईल असे त्यांनी दाखवून दिले आहे. हा लेख म्हणजे १९३७ साली त्यांनी इंडियन फिलॉसॉफिकल कांग्रेसच्या नागपूर अधिवेशनाच्या वेळेला अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणाचा सारांश आहे. शेवटच्या लेखाच्या अखेरीस भारताच्या आशादायक भविष्याचे चित्र रेखाटले आहे.

(इ) दि कन्सेप्शन ऑफ स्पिरिच्युअल लाइफ इन महात्मा गांधी अँड हिंदी सेंटस्

या ठिकाणी महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानातील चक्र या संकल्पनेचे स्थान स्पष्ट केले असून शिवाय तशाच किंवा इतर आणखी संकल्पनांचा उल्लेख आहे. काही काही धर्मग्रंथांतून तसेच चालीरीतीतून आढळणाऱ्या चक्राच्या कल्पना म्हणजे साक्षात्कारात अनुभवास येणाऱ्या चक्राची प्रतिरूपे आहेत. इथे चक्र संकल्पनेची विविध दृष्टिकोनांतून चर्चा केली आहे. ईश्वर केंद्रबिंदू असलेल्या

विश्वचक्राचा ऋग्वेदामध्ये उल्लेख आहे. उपनिषदांनी नंतर सृष्टिक्रमाच्या चक्राची संकल्पना नावारूपाला आणली. परमेश्वर म्हणजे एक बृहत् चक्र असून ते सर्वव्यापक आहे. भगवद्गीतेत यज्ञचक्राची संकल्पना आहे आणि महात्मा गांधींनी तिलाच चरख्याच्या तत्त्वज्ञानाचा पाया मानला आहे. गांधींच्या मते चरखा हे यज्ञाचे प्रतीक आहे व त्यामध्ये बौद्धिक, आर्थिक, नैतिक व आध्यात्मिक परिपूर्णता समाविष्ट आहे. भागवतातील शिंशुमार चक्रही खगोल-शास्त्रीय संकल्पना आहे. तिथे अंतरिक्षात पसरलेल्या एका मगराचे वर्णन आहे. त्याचे शरीर चक्राकार असून तारे, नक्षत्रपुंज व ग्रहगोल हे सगळे त्याचे मुख व शेपटी या दोन केंद्रांभोवती अखंडपणे फिरत असतात. आकाशातील तारागण या मगराचे अवयव आहेत. ध्यानमग्न अवस्थेत वासुदेवांना या शिंशुमार चक्राचे दर्शन झाले होते. एका प्रदर्शनामध्ये ठेवलेले अशोकचक्र गुरुदेवांना दिसले तेव्हा त्यांच्या अन्तःचक्षूंसमोर हे चक्र होते. "हे चित्र म्हणजे चक्राच्या अतींद्रिय अनुभवाचे बाह्य चित्रण आहे". (पृ.३). "हे चक्र मनुष्याची भीतीने जशी गाळण उडवून देते तसेच ते त्याचे संरक्षण करते व त्याला आकर्षितही करते.... त्यातल्या झळाळणाऱ्या रंगांचे वर्णन अभिनव नवरंग असे आहे ते रंग ता ना पि हि नि पा जा या विज्ञानशास्त्रातील संकेतापलीकडचे आहेत. हा संकेत अगदी त्रोटक व सीमित असा एक तक्ता आहे. अतींद्रिय अनुभवाला येणाऱ्या रंगांचे वर्णन करण्यास तो असमर्थ आहे" (पृ.२९). इस्लाममध्ये स्वर्गीय चक्राचे वर्णन आहे तर बौद्ध तत्त्वज्ञानात भवचक्राचे विवेचन आहे.

या पुस्तकातील आणखी एक मुद्दा म्हणजे महात्मा गांधींचे आध्यात्मिक आत्मचरित्र. गांधीजींचा रामनामावर दृढ विश्वास होता. नाम नुसते तोंडातून येऊन उपयोग नाही, ते पोटातून आले पाहिजे. रामनामात शक्ती आहे, असे सांगून गांधीजींनी त्याला पारमार्थिक क्षेत्रातील अणुबाँबच्या पदवीला नेऊन पोचवले आहे. नामस्मरण अत्यंत कठीण आहे, तलवारीच्या पात्यावर चालण्याची ती कसरत आहे. भक्ताला देवाची भूक, देवाची तहान लागली पाहिजे आणि ईश्वरैक्याची त्याला तळमळ लागली पाहिजे. मनुष्याचा सुस्वभाव व सदाचार

म्हणजे त्याची पारमार्थिक प्रगती दाखवणारा आरसाच होय (पृ.६८). पारमार्थिक मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रत्येक वाटसरूला जो तळमळीचा व निराशेचा टप्पा पार करावा लागतो त्यातून गांधीजींचीही सुटका झाली नाही. आपण ईश्वरापासून कैक योजने दूर आहोत असा चटका त्यांच्या मनाला लागलेला होता. त्यांच्या पारमार्थिक वाटचालीतील तीन टप्पे गुरुदेवांनी दाखवले आहेत. पहिला टप्पा अनाहत नाद ऐकू येण्याचा. "हा नाद सुरवातीला अत्यंत मंजुळ असून कालांतराने तो स्पष्ट होत जाऊन त्या नादघोषात सामर्थ्य येऊ लागले" (पृ.७३). दुसऱ्या टप्प्याच्या वेळी मधुर आलाप ऐकू येऊ लागले. परंतु त्यांचा अर्थ स्पष्ट होत नव्हता (पृ,७४). तिसऱ्या पायरीला पोचल्यावर मात्र नादाची स्पष्टता इतकी वाढली की त्यांना देवाचे शब्द ऐकू आले. या अनुभवाच्या सत्यतेबद्दल गांधीजींच्या मनात काडीचाही संदेह नव्हता. ते म्हणत की उभे जग आपल्या विरुद्ध गेले तरी देवाचे शब्द आपण ऐकले आहेत या श्रद्धेला तिळमात्र धक्का लागणार नाही (पृ.७९).

या पुस्तकाच्या नंतरच्या भागात हिंदी संतांच्या साक्षात्काराचा उगम, उत्कर्ष व त्यांनी गाठलेल्या अत्युच्च पदाची माहिती असून कबिरांचे पारमार्थिक आत्मचरित्रही आहे. पारमार्थिक जीवनाची पराकाष्ठा कबिरांच्या जीवनात स्पष्ट दिसते. हा भाग बव्हंशी पाथवे टु गॉड इन हिंदी लिटरेचर या ग्रंथातील चर्चेनुरूपच आहे.

(ई) एसेज अँड रिफ्लेक्शन्स

वेळोवेळी लिहिलेली ग्रंथांची परीक्षणे आणि मधून मधून लिहिलेले लेख यांचा या पुस्तकात समावेश आहे. पहिल्याच लेखात गुरुदेवांनी एका दीर्घ युक्तिवादाद्वारे भारतीय तत्त्वज्ञानाकडे बघण्याची दृष्टी बदलण्याची किती आवश्यकता आहे हे दाखवले. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे खुद्द भारतानेच आपल्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष केले आहे. युरोपिअन लोकांनी भारतीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला आणि अनेकांनी आपल्या आवडीप्रमाणे वेगवेगळ्या दर्शनांचे सुसंगत विवरण केले. आपल्याकडे विद्वान मंडळी काही कमी नव्हती. परंतु भारतीय

तत्त्वज्ञान जगाच्या डोळ्यापुढे आणण्यासाठी त्याला सुव्यवस्थित रूप देऊन ते पाश्यात्त्य तत्त्वज्ञानाच्या पद्धतीने आणि त्याच्या परिभाषेत मांडणे अगत्याचे होते ही गोष्ट पूर्ण दुर्लक्षित राहिली. भारतीय तत्त्वज्ञानाचा 'प्रमेय' इतिहास म्हणजे तत्त्वज्ञानात येणाऱ्या भिन्नभिन्न सिद्धांतांचा संश्लेषणात्मक इतिहास लिहिला जाणे जरूर होते. कुणानंतर कोण तत्त्वज्ञ झाले किंवा कोणत्या दर्शनानंतर कोणते दर्शन झाले यात फक्त कालक्रमाचा इतिहास येतो, पण एखादे प्रमेय विविध दर्शनांनी कसे हाताळले आहे याची कल्पना त्यावरून येत नाही. असा प्रयत्नच मुळी झाला नव्हता. मूळ ग्रंथांचा चिकित्सक बुद्धीने अर्थनिर्णय करण्याचे कामही कुणी विशेष अंगावर घेतले नव्हते. याचा असा विपरीत परिणाम झाला की युरोपिअन अभ्यासकांनी स्वतःच्या पूर्वग्रहदूषित दृष्टीने भारतीय तत्त्वज्ञानाचा अर्थ लावून तो आपल्यापुढे आणून ठेवला. अतः तत्त्वज्ञानाचे योग्य मूल्यमापन होण्याच्या दृष्टीने सत्ताशास्त्र, ज्ञानशास्त्र, तर्कशास्त्र किंवा नीतिशास्त्र या क्षेत्रांतील भारतीय व पाश्चात्त्य सिद्धांतांचा तौलनिक अभ्यास होणे अत्यावश्यक होऊन बसले. 'ग्रीक अँड संस्कृत, ए कंपॅरिटिव्ह स्टडी' हा दीर्घ निबंध मुळात एक स्वतंत्र पुस्तिका होती, इथे तिचे पुनर्मुद्रण केले आहे. गुरुदेवांनी ग्रीक भाषेचा अभ्यास कशासाठी केला होता म्हटले तर प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञांचे विचार मुळातून वाचण्याची त्यांना तीव्र जिज्ञासा होती म्हणून. विचारांची अभिव्यक्ती हा भाषेचा मूळ उद्देश साध्य झाल्यावर भाषाशास्त्राच्या व व्याकरणशास्त्राच्या दृष्टींनी त्यांनी या भाषेचा अभ्यास केला तेव्हा त्यांना आढळून आले की संस्कृत व ग्रीक या भाषांत अनेक प्रकारचे साम्य आहे. या लेखांत या दोन भाषांच्या उपयोगातील साम्य-फरक स्पष्ट केले आहेत. उदा. संधिविचार दोन्ही ठिकाणी बराचसा सारखा आहे पण ग्रीकमध्ये संस्कृताप्रमाणे क्रियापदांचा कारक उपयोग नाही. ग्रीकमध्ये वैदिक संस्कृताप्रमाणे स्वरांचा उपयोग आहे. नंतरच्या संस्कृतात तो दिसून येत नाही. ग्रीक व संस्कृत यांच्या या तौलनिक अभ्यासात यानंतर विभक्ती, अंक, काल इत्यादी विषयांचा परामर्श घेतला आहे. विशेष उल्लेख करण्याजोगी गोष्ट म्हणजे ग्रीक तत्त्वज्ञानाचा अभ्यास करताना शब्दांचा अर्थ

जसा गुरुदेवांनी ध्यानात घेतला तसेच शब्दांच्या रूपांकडेही पाहिले. दोन्ही भाषांतील शब्दांचा उपयोग करण्याच्या पद्धतींतील साम्य त्यांच्या डोळ्यांत भरले असावे. लॅटिन व ग्रीक भाषांतले साम्य दुनियेला माहीत आहे, पण व्युत्पत्तिशास्त्राच्या सखोल अभ्यासाने गुरुदेवांनी दाखवून दिले की ग्रीक व संस्कृत यांतील साम्यसुद्धा तितकेच ठळक आहे.

प्रिन्सिपल बेन यांच्यावरील लेख म्हणजे गुरुदेवांनी आपल्या या शिक्षकांना वाहिलेली आदरांजली आहे. प्रिन्सिपल बेन हे डेक्कन कॉलेजमधले बडे प्रस्थ होते. या लेखात गुरुदेवांचे त्यांच्याबद्दलचे प्रेम व आदर तसेच त्यांच्या बहुढंगी व्यक्तित्वाचे गुणग्रहण दिसून येते. प्रा. रानडे नर्मभाषी होते. अर्थातच प्रि. बेन यांच्या विनोदप्रियतेवर त्यांनी अचूक बोट ठेवले आहे यात आश्चर्य नाही. एखादी नवीन भाषा कशी शिकावी याबद्दलचे प्रिं. बेन यांचे मार्गदर्शन हा या लेखातील विशेष आहे. प्रिं. बेन हे भाषाशास्त्रज्ञ होते. निरोप घेण्याचा प्रसंग सुखदुःखमिश्रित असतो. प्रि. बेन सेवानिवृत्त होऊन जेव्हा परत मायदेशी जाण्यास निघाले त्यावेळी झालेल्या हळव्या मनःस्थितीत गुरुदेवांनी या लेखाच्या शेवटच्या परिच्छेदात त्यांना वंदन केले आहे. गुरुदेवांनी लिहिलेली परीक्षणे जशी प्रस्तुत पुस्तकात आहेत तसेच पुस्तकाचे परीक्षण कसे करावे यावरील एक लेखही आहे. ॲन आयडिअल क्रिटिक या लेखात त्यांनी परीक्षण करणाऱ्याची भूमिका कशी असावी याचा ऊहापोह केला आहे. त्याला त्यांनी परीक्षणाचे नियम असे म्हटले आहे. पुस्तकाचे परीक्षण करणाऱ्याला त्या विषयाचे सांगोपांग ज्ञान असले पाहिजे, त्याशिवाय त्याला पुस्तकात तो विषय कसा हाताळला आहे याबद्दल चांगले वाईट काहीच बोलता येणार नाही. त्याने पूर्वग्रहरहित मनाने पुस्तकाकडे पाहावे. लेखकाच्या मतांचा मुद्दाम विपर्यास करू नये. पुस्तक केव्हा, कुठे व कोणत्या उद्देशाने लिहिले आहे ते लक्षात घ्यावे. त्याशिवाय यथार्थ मूल्यमापन करता येणार नाही. लेखकाच्या दृष्टिकोनातून त्या विषयाकडे बघितले म्हणजे लेखकाची व वाचकाची अशा दोघांच्या भूमिका लक्षात येतात. शेवटची महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपली चूक झाली तर परीक्षकाने ती प्रांजळपणे कबूल

केली पाहिजे. परीक्षणाच्या या सर्व नियमांचे पालन स्वतः गुरुदेवांनी कसे केले आहे हे या पुस्तकामधील दि पॉझिटिव्ह सायन्सेस ऑफ दि एनशन्ट हिंदूज, स्टडीज इन वेदान्त, किंवा बुद्ध अँड दि गॉस्पेल ऑफ बुद्धिझम इत्यादी ग्रंथांची त्यांनी केलेली परीक्षणे पाहिली की लागलीच कळते.

(उ) हें प्रचीतीचें बोलणें

१९१७ ते १९५६ अशा दीर्घ काळात गुरुदेवांनी विविध विद्वानांच्या ग्रंथांना ज्या प्रस्तावना लिहिल्या, त्यांपैकी जितक्या मिळू शकल्या त्या संकलित करून हे पुस्तक तयार केले आहे. पुस्तकाची अनुक्रमणिका चाळली तरी ज्या ग्रंथांना प्रस्तावना लिहिल्या आहेत त्यांतील विषयांचे वैविध्य ठळकपणे उठून दिसते. त्यांतही साक्षात्कार हे एकच सूत्र आहे. भारतीयांना मिळालेला तत्त्वज्ञानाचा वारसा सामान्य मनुष्यापर्यंत आणून पोचवणे फार जरुरीचे होते. म्हणून साध्या, सोप्या, सर्वांना कळेल अशा भाषेत एकनाथांनी आपले ग्रंथ लिहून बहुजनसमाजावर उपकार केले आहेत, असे एका प्रस्तावनेत वाचायला मिळते (श्री एकनाथ दर्शन). सुसंबद्ध मांडणी, तौलनिक अभ्यास जिथे म्हणून दिसेल तिथे गुरुदेवांची नजर स्थिरावते व त्या वैशिष्ट्याचा ते आवर्जून उल्लेख करतात (श्रीमद्भगवद्गीता-मर्म-दर्शन). एखाद्या ग्रंथकर्त्याचे ते मराठीतून ग्रंथ लिहिण्याबद्दल कौतुक करतात (भारतीय मानसशास्त्र), तर दुसऱ्या एखाद्याने आधुनिक विज्ञानाचा उपयोग करून अध्यात्मशास्त्र व नीतिशास्त्र यांतील प्रमेये सुस्पष्ट केल्याबद्दल त्याचे पाठ थोपटतात (प्रणवोपासना). वर एका ठिकाणी उल्लेख केलेली यशस्वी ग्रंथ-समीक्षकाची भूमिका इथे गुरुदेवांनी प्रत्यक्षात आणून दाखवली आहे.त्यांची गुणग्राहकता व सहृदयता जागोजागी दिसते. ग्रंथाच्या अनुषंगाने चमत्कार (आधुनिक भक्तविजय), नामस्मरण (प्रणवोपासना), ज्ञानेश्वरांची तत्त्वज्ञानक्षेत्रातील भूमिका (श्री ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान), अशा विषयांबद्दल आपली मते गुरुदेवांनी मांडली आहेत. या प्रस्तावना वाचून ते मूळ ग्रंथ पाहण्याची वाचकांना इच्छा होते हीच त्या प्रस्तावनांच्या गुणांची कसोटी आहे.

(ऊ) दि इव्होल्यूशन ऑफ माय ओन थॉट

हा लेख म्हणजे त्यांचे तात्त्विक आत्मचरित्र आहे. इथे त्यांनी आपल्या तात्त्विक विचारसरणीमध्ये अंगीकारलेली पद्धती, आपल्या विचाराचा झालेला विकास व परमार्थाबद्दलचे आत्यंतिक प्रेम यांचा सारांश दिला आहे. त्यांचे म्हणणे लेखातील त्यांच्याच शब्दात पाहाणे योग्य ठरेल.

"भारतीय व युरोपिअन तत्त्वज्ञानात मी ज़ी चिमूटभर भर घातली आहे ती घालतांना विधायक-मीमांसा पद्धती वापरली आहे. माझ्या तत्त्वसिद्धांतांची ठोस आकृती जरी अजून प्रसिद्ध झाली नाही तरी, मला असे वाटते की माझ्या लिखाणातून काही भाग निवडला तर त्यातून माझ्या तत्त्वज्ञानाची रूपरेषा सहज कळून येईल" (पृ.५३९). सुरवातीला माझे मत असे होते की अंतिम सत्तत्त्व चैतन्यात्मक असून अशी अनेक तत्त्वे अस्तित्वात आहेत... साहजिकच न कळत अनेकचिदणुवादाच्या रस्त्याने माझा विचारप्रवाह वाहत होता (पृ.५४०). माझ्या लिखाणावरून काही गोष्टी अगदी स्पष्ट होतात. अगदी लहानपणापासून माझा परमार्थाकडे कल होता. तात्त्विक विचारांचा विकास होण्याच्या दृष्टीने भारतीय व पाश्चिमात्य तत्त्वज्ञानांचा समन्वय होणे अगत्याचे आहे आणि तसा समन्वय होणे सहज शक्य आहे. सापेक्षतावाद ईश्वराला लागू होत नाही. सत्य एकच असून परमेश्वर हेच एकमेव सत्य आहे; तदितर सर्व गोष्टीत असत्याचा भरणा आहे. अंतिम सत्तत्त्वाचा शोध घेणाच्या विचारात माझे मन रमे. अंतिम तत्त्व अचल किंवा अविकारी आहे असे सांगणाऱ्या तत्त्वज्ञानात देखील व्यवहारात अनुभवाला येणारे बदल आणि गती यांचे स्पष्टीकरण हवे. स्वसंवित् असू शकते इतकचे नव्हे तर तीच एकमेव सत्य आहे. आत्मदर्शनाला नैतिक व साक्षात्कारात्मक पैलू आहेत. ज्ञानदृष्टीच फक्त आपल्याला आत्मसाक्षात्कारापर्यंत पोचवू शकते. नैतिक तयारी नसेल तर साक्षात्कार अशक्य आहे.... तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात शिरल्यापासून आत्मसाक्षात्कारावर माझे डोळे खिळले होते. देव करो आणि आत्मसाक्षात्कार हाच माझ्या तत्त्वज्ञानाचा कळस ठरो" (पृ. ५६१-५६२).

आपले तत्त्वज्ञान कसे विकसित झाले याचा घेतलेला हा मागोवा विद्वानांना

फार आवडला. माइंड या नियतकालिकाच्या १९३७ सालच्या अंकात (पृ.४०६-४०७) एका समीक्षकाने लिहिले, "या पुस्तकात आलेल्या लेखांत प्रा. रानडे यांनी लिहिलेला आपल्या विचाराचा क्रमशः परिपोष कसा झाला याबद्दलचा लेख सर्वाधिक मौलिक आहे. प्रथितयश विचारवंतांच्या तत्त्वज्ञानाचा चिकित्सक दृष्टीने अर्थ लावून खऱ्या सत्याचा ते शोध घेतात. या पद्धतीची काही उदाहरणे त्यांनी दिली आहेत. अर्थनिर्णय करण्याच्या त्यांच्या अभिजात कौशल्याचा दाखला हवा असेल तर झेलर व बर्नेट यांच्या पार्मेनायडिससंबंधीच्या मतांचा त्यांनी घेतलेला आढावा पहावा. तसेच उपनिषदांतील स्वसंवित्‌च्या संकल्पनेचे त्यांचे निरूपण पाहावे".

४ तत्त्वज्ञानावरील टिपणरूप ग्रंथ

स्टडीज इन इंडियन फिलॉसॉफी

भारतीय तत्त्वज्ञानातील दर्शनांचे पूर्ण आराखडे या पुस्तकात आले आहेत. त्यांचे स्वरूप विवरणात्मक व चिकित्सात्मक दोन्ही प्रकारचे आहे. प्रत्येक दर्शनात ज्या विषयांचा अंतर्भाव करायचा आहे ते सर्व घेऊन त्यांची तर्कशुद्ध मांडणी केलेली आहे. गुरुदेवांनी एकेका दर्शनावर एकेक पुस्तक लिहिण्याचे योजले असते तर यातल्या एकेका विषयावर एकेक प्रकरण झाले असते आणि जर एकच ग्रंथ लिहायचा ठरवला असता तर हे विषय प्रत्येक दर्शनामधले मुद्दे म्हणून उपयोगाला आले असते. विषयांची चर्चा कशी करायची हे मध्ये मध्ये चारदोन महत्त्वाचे शब्द घालून सूचित केले आहे. उदाहरणार्थ, सांख्यदर्शनाला वास्तववादी, नास्तिकवादी व चैतन्यवादी असे म्हटले आहे (पृ.१). तौलनिक अभ्यास कुठे येणार हे दाखवून दिले आहे. बौद्ध तत्त्वज्ञानातील आत्म्याची कल्पना उपनिषदे व प्लेटो, ह्यूम व जेम्स आणि कार्लाइल यांच्या कल्पनांशी ताडून पहायची आहे (पृ. १९). ज्या लेखकांची किंवा ज्या पुस्तकांतील मते अभ्यासाला घ्यायची आहेत त्यांची नावे ठायीठायी येतात. संदर्भग्रंथांच्या यादीत ती असतील यात काहीच नवल नाही. जिथे आधार दिले आहेत ते आपल्या पद्धतीला अनुसरून मूळ ग्रंथांचे दिले आहेत. उदाहरणार्थ, योगदर्शनासाठी

पातंजलसूत्रे, न्यायदर्शनासाठी गौतमसूत्रे व त्यांवरील वात्स्यायन किंवा उद्योतकर यांच्या टीका, आणि गौडपादांच्या चर्चेसाठी मांडूक्यकारिका यांचा उल्लेख आहे. अर्थनिर्णयाबाबत मीमांसा तत्त्वज्ञानाने दिलेले नियम हा विभाग फार महत्त्वाचा आहे. भाषाशास्त्र शिकणाऱ्यांना किंवा हिंदू कायद्याच्या अभ्यासकांना मीमांसेतील हा भाग पाहणे अनिवार्य आहे (पृष्ठे ६३ पासून पुढे). मीमांसा तत्त्वज्ञानाचा जरा नीट अभ्यास केला म्हणजे ते दर्शन केवळ कर्मकांडाच्या मागे आहे असे म्हणणे किती फोल आहे हे चांगले कळते. गुरुदेवांचा एक नियोजित ग्रंथ Pathway to God, याची तपशीलवार अनुक्रमणिका त्यांनी तयार केलेली होती. या अनुक्रमणिकेतील विषयांची झेप फार दूरगामी आहे. त्यात प्राचीन, अर्वाचीन तसेच भारतीय व पाश्चात्त्य तत्त्वज्ञानातले व धर्मांतले अनेक सिद्धांत हाताळले जाणार होते (पृष्ठे ११० पासून पुढे). भारतीय तत्त्वज्ञानाचा खोल अभ्यास करू इच्छिणाराला हा ग्रंथ जसा मार्गदर्शक आहे तसा आव्हान देणाराही आहे. या पुस्तकाच्या १२० पानांपैकी पहिल्या ७० पानांवर विस्तृत टीपा लिहिलेले पुस्तक १९९६ साली प्रसिद्ध झाले.

५ साक्षात्कारमार्गावरील ग्रंथ

(अ) प्राक्कथन

यानंतर आपण गुरुदेवांच्या साक्षात्कार-मार्गासंबंधीच्या ग्रंथांकडे वळू. संतवाणीचा अशा तऱ्हेचा अभ्यास यापूर्वी झाला नव्हता. पाथवे टु गॉड इन मराठी लिटरेचर[६२] पाथवे टु गॉड इन हिंदी लिटरेचर आणि पाथवे टु गॉड इन कन्नड लिटरेचर या ग्रंथत्रयीचा आधी विचार करू. या तीन ग्रंथांपैकी दुसऱ्या व तिसऱ्या ग्रंथांतील विषयांची मांडणी समान आहे. मानसशास्त्र, सत्ताशास्त्र, नीतिशास्त्र व धर्मतत्त्वज्ञान या क्रमाने विषयांचा ऊहापोह त्यांत केला आहे. साक्षात्कारमार्गावरील ग्रंथांतील परमार्थाच्या प्रेरणा, नैतिक तयारी व आध्यात्मिक जीवन या प्रकरणांत सर्वसाधारणपणे हेच विषय चर्चिले आहेत. मिस्टिसिझम इन महाराष्ट्र या ग्रंथात एकेका संताची शिकवण स्पष्ट करताना याच अन्वयानुसार मुद्दे घेतले आहेत. या अनुक्रमामुळे 'आपली सद्यःस्थिती', 'आपले ध्येय' आणि 'ते ध्येय गाठण्याची

प्रक्रिया' या मार्गाचे म्हणजेच परमार्थमार्गाचे दिग्दर्शन होते.

गुरुदेवांनी मराठी संत व कन्नड संत यांच्या शिकवणीची मीमांसा केली हे साहजिक आहे. या दोन्ही त्यांच्या जुळ्या मातृभाषा म्हणता येतील. परंतु हिंदी संतांचा काय संबंध होता? याचे स्पष्टीकरण त्यांनीच केले आहे. "अलाहाबाद ही जवळजवळ वीस वर्षे माझी कर्मभूमी होती. या जागेचे व हिंदी वाङ्मयाचे माझ्यावर अनंत उपकार आहेत. म्हणून या ऋणांतून मुक्त होण्याची माझी इच्छा होती. १९२७ ते १९४६ या कालात मी अलाहाबाद विद्यापीठात अध्यापन केले. हिंदी भाषेचा अभ्यास करून तिथली आध्यात्मिक प्रमेये तत्त्वज्ञानाच्या व साक्षात्कारशास्त्राच्या भाषेत मी मांडून दाखविली नसती तर ती कृतघ्नता ठरली असती... महाराष्ट्र व कर्नाटक येथील संतांनी विचारांचे भांडार आपल्याला खुले करून दिले आहे; हिंदी संतांचे विचार त्याच मोलाचे आहेत".[६३] भाषेचे ऋण फेडण्याची ही अभिनव रीत अनुसरणारे किती लोक भेटतील? प्रा. रानडे यांच्यासारखी मोजकी मंडळी पुढे आली तरी भाषाभाषांतील संतवाङ्मयातील अमृत ज्याला वाटेल त्याला सेवन करता येईल. राष्ट्राची एकात्मता साधण्याचा हा राजरस्ता आहे. भाषा ही कुणा एकाची मालमत्ता आहे या विचारसरणीला त्यामुळे पायबंद बसेल. ही भाषा 'माझी' ती भाषा 'तुझी' अशा तऱ्हेच्या आपपरभावानेच सवत्या सुभ्याची मनोवृत्ती बळावते. सर्व संत अवघ्या विश्वाला लागू पडणारी भाषा वापरतात, हे लक्षात घेतले म्हणजे भाषिक, भौगोलिक, ऐतिहासिक अडचणी भासेनाशा होतात. उदाहरणार्थ, मीराबाई देवाला रत्न किंवा अमोलिक वस्तू म्हणून संबोधतात; ज्ञानेश्वरही ईश्वराच्या दर्शनाचे वर्णन रत्न म्हणून करतात आणि अमोलिक रत्न हा शब्दप्रयोग वापरतात. महलिंगरंग ईश्वराला अमूल्य रत्नच म्हणतात. अशी उदाहरणे शेकड्यांनी देता येतील. आपला सांस्कृतिक वारसा इथून तिथून एकच आहे याची ही साक्ष आहे. 'ते' देखील 'माझी' भाषा बोलतात हे जाणवले की वैरभावना ओसरून जाते हा नेहमीचा अनुभव आहे.

इथे एका गोष्टीचा विशेष उल्लेख केला पाहिजे. गुरुदेवांनी संतवाङ्मयाचा

जो परामर्श घेतला आहे, त्याला स्वानुभवाचा भक्कम आधार आहे.

जैसें डोळयां अंजन भेटे। ते वेळीं दृष्टीसी फांटा फुटे।
मग वास पाहिजे तेथ प्रगटे। महानिधी।। (ज्ञानेश्वरी १.२३)

डोळयांमध्ये अंजन घातल्यावर माणसाला पृथ्वीच्या पोटातील संपत्ती सुद्धा दिसते. गुरुदेवांना स्वतःला कितीतरी वर्षांपासून पारमार्थिक अनुभव येत असल्याने इतरांनी केलेले अनुभवांच्या वर्णनाचे मूल्य ते अचूक ओळखीत. त्या वर्णनाच्या मागची भूमिका त्यांच्या बरोबर धानात येई. त्यांनी पारमार्थिक अनुभवांचे जे विश्लेषण केले आहे ते स्वतःच्या अनुभवाच्या पायावर केलेले आहे. त्यांनी केलेल्या अनुभवांच्या रसग्रहणाचे एक उदाहरण पाहू. पारमार्थिक अनुभवात इंद्रिये व त्यांचे विषय यात अदलाबदल कशी होते व सर्वच अनुभवांमागे आत्म्याचे अधिष्ठान कसे असते हा विषय चालू आहे. इतरत्र गुरुदेव सांगतात की रोजच्या व्यवहारात कोणत्याही इंद्रियाकडे दुसऱ्या इंद्रियांचे विषय जाणण्याची क्षमता नाही आणि म्हणून कोणतेच इंद्रिय दुसऱ्याचे काम करू शकत नाही. पण अतींद्रिय अनुभवांत कामांची ही अदलाबदल झालेली अनेकदा दिसते. पुरंदरदास सांगतात की डोळयांना ऐकू येते. हे कसे बरे घडते? कांटच्या समाकल्पन सिद्धांतानुसार गुरुदेवांनी याचा उलगडा केला आहे. वस्तू जेव्हा आपल्याला दिसते तेव्हा नुसत्या डोळयांना महत्त्व नाही तर 'बघणारा' जो आहे त्याला महत्त्व आहे. दोघात फरक असा की कांटचे प्रमेय केवळ ज्ञानशास्त्रापुरते मर्यादित आहे आणि पुरंदरदासांचे प्रमेय आध्यात्मिक ज्ञानाचा विषय हाताळते. कांटचा सिद्धांत ऐंद्रिय ज्ञानाच्या क्षेत्रातच घोटाळतो, तर पुरंदरदास अतींद्रिय ज्ञानाच्या क्षेत्रात पाऊल टाकतात. बघण्याच्या क्रियेत खरे तर आत्मा 'बघणारा' असतो, आपला चर्मचक्षू बघत नाही; आत्मा ऐकतो, कान नाही. या समाकल्पनेच्या प्रमेयानेच कामांच्या अदलाबदलीचा उलगडा होतो.[६४]

गुरुदेवांच्या स्वतःच्या अनुभवामुळे त्यांच्याकडे आणखी एक शक्ती आली होती. अस्सल आणि नक्कल यातला फरक त्यांना तत्क्षणी समजे. पाथवे टु गॉड इन हिंदी लिटरेचर या ग्रंथात हे कार्य सर्वाधिक स्पष्ट होते. एका पदात

वर्णन केलेला अनुभव हा खराखुरा साक्षात्कार नाहीच असे त्यांनी स्पष्ट म्हटले आहे. "परीक्षिताची गोष्ट घ्या. आपल्या नावाच्या अर्थानुसार मातेच्या उदरात असतानाच सुदर्शनाने शत्रूच्या अस्त्रापासून आपले संरक्षण करीत असलेला परमेश्वर परीक्षिताला दिसत होता अशी कथा आहे. हे म्हणणे पुराणात शोभते, इतिहासात किंवा अनुभवशास्त्रात नाही".[६५]

(आ) मिस्टिसिझम इन महाराष्ट्र

हा ग्रंथ हाती घेतल्याबरोबर सर्वप्रथम डोळ्यात भरणारी गोष्ट म्हणजे त्याची ३५ पानांची प्रस्तावना. प्रस्तावनेची भाषा शुद्ध व उच्च अभिरुचीला शोभणारी आहे. सुरवातीलाच साक्षात्कारशास्त्राची रेखीव, तंतोतंत व काटेकोर व्याख्या दिलेली आहे. गुरुदेवांनी या प्रस्तावनेत महाराष्ट्रातील साक्षात्कारी संतांची पाश्चात्त्य संतांशी तुलना केलेली आहे. कोण्या एखाद्याच देशात किंवा कोण्या एखाद्याच काळी साक्षात्कारी संत दिसावे असा कुणाला मक्ता मिळालेला नाही हे दाखवणे हा या तुलनेचा उद्देश आहे. परमेश्वराचे नाम, ज्वलंत भक्ती अथवा आत्मप्रचिती या सर्व बाबतींत साक्षात्कारी संतांची शिकवण एकसारखी असते. ईश्वरप्राप्तीसाठी सोसावा लागणारा तळमळीचा काळ, आध्यात्मिकता व लैंगिक प्रवृत्ती किंवा पारमार्थिक अनुभवांच्या सत्यतेचे निकष असे साक्षात्काराच्या मानसशास्त्रातील व साक्षात्काराच्या तत्त्वज्ञानातील विषय प्रस्तावनेत चर्चिले आहेत. "ईश्वरप्राप्तीपूर्वी साधकाला बहुशः तळमळीच्या अवस्थेतून जावेच लागते. साक्षात्काराबाबत उमदी वृत्ती येण्याआधी माणसाला लोखंडाचे चणे खावेच लागतात" (पृ. १८). आध्यात्मिकता व लैंगिक प्रवृत्ती यात विळ्याभोपळ्याइतके सख्य आहे यावर भर देऊन गुरुदेव म्हणतात की केवळ काहीसे साधर्म्य असल्याने देव व भक्त यातील संबंधाची पतिपत्नीमधील संबंधाशी तुलना केली जाते पण वास्तविक आध्यात्मिकता व लैंगिक प्रवृत्ती यात दोन ध्रुवांचे अंतर आहे (पृ.२४). आध्यात्मिक अनुभवांच्या निकषांची इथे सविस्तर चर्चा आहे. या संदर्भात सार्वत्रिकता, तसेच बौद्धिक, भावनिक व नैतिक पैलू, आणि ज्ञानदृष्टी यांचे विवरण केले आहे. हे सर्व निकष महत्त्वाचे असले तरी अनुभवाची सत्यता शेवटी दिव्य स्पर्शाने

रोमारोमात भिनलेल्या ज्याच्या त्याच्या निजानंदतृप्तीवरच अवलंबून आहे. स्वानुभवाने पटलेल्या खात्रीला कशानेही तडा जात नाही आणि तिला दुसऱ्या कुठल्याही निकषाची जरूर नाही (पृष्ठे(२४) पासून पुढे). "कुणाला साक्षात्काराचे तत्त्वज्ञान मांडायाचे असेल तर त्यासाठी प्रत्यक्ष घटनांची शिधासामुग्री जरूर आहे; म्हणजे अनेकांच्या पारमार्थिक अनुभवांची नोंद करणे व त्याचा अर्थ लावणे आवश्यक आहे. तशी सांगोपांग माहिती जमवून महाराष्ट्रातील संतांच्या अनुभवांचा प्रांत इथे अभ्यासासाठी घेतला आहे. भारतीय संतांच्या अनुभवांची झलक त्यातून दिसते. ह्या प्रांतात अजून कुणीच प्रवेश केला नव्हाता" पृ.(३४).

भारतीय साक्षात्कारशास्त्राचा प्राचीन कालापासून ऐतिहासिक आढावा घेतल्यानंतर आपण महाराष्ट्रातील साक्षात्कारी संतांपाशी येऊन पोचतो. ह्या परंपरेचा पाया ज्ञानेश्वरांनी रचला. नामदेव व इतर संतांनी त्यावर देवालय उभारले व तुकाराम त्यावरचा कळस झाले. एकेका संताच्या साक्षात्कारी जीवनाचे परीक्षण सुरू होण्यापूर्वी एका वेगळ्या दृष्टीकोनातून म्हणजे प्रत्येक संताचा स्वभाव लक्षात घेऊन महाराष्ट्रातील संतांचे वर्गीकरण केलेले आहे. "ज्ञानेश्वर हे बुद्धिनिष्ठ साक्षात्कारी आहेत; नामदेवांचा काल म्हणजे साक्षात्काराच्या क्षेत्रात लोकतंत्र आलेला काल; एकनाथांनी प्रपंच व परमार्थ यांचा समन्वय केला; तुकारामांचा साक्षात्कार व्यक्तिगत जीवनाला धरून आहे; तर रामदास हे कर्मयोगी संत आहेत" (पृ.२०). यानंतर प्रत्येक संताच्या तत्त्वज्ञानाची सत्ताशास्त्र, नीतिशास्त्र व साक्षात्कारशास्त्र या तीन विभागांत मीमांसा केली आहे. या संतांचे विविध विषयांवरील विचार त्यांच्याच शब्दांच्या आधाराने मांडले असल्याने आपण त्या संतांशीच बोलत आहोत असे वाटते. संतांच्या ग्रंथांतील निवडक वेचे घेऊन त्यांचे भाषांतरही दिले आहे. हे भाषांतर इतके प्रासादिक आहे की ते भाषांतर आहे यावर विश्वास बसत नाही. वाचकाची लय लागते. भाषांतरकाराने जितके स्वातंत्र्य घेता येईल तितके घ्यावे, पण मूळ मजकुराशी आवश्यक तितका प्रामाणिकपणा राखावा असे म्हणतात त्याचे उदाहरण इथे बघायला मिळते.

ज्ञानेश्वरांपासून विवरणाला सुरवात होते. नंतर त्यांचे समकालीन संत येतात. यांपैकी काही त्यांच्याहून वयाने मोठे आहेत व काही लहान आहेत. निवृत्तिनाथ म्हणजे ज्ञानेश्वरांचे वडील बंधू व सद्‌गुरू; सोपान म्हणजे त्यांचे धाकटे बंधू व मुक्ताबाई ही लहान बहीण. शेवटी ज्ञानेश्वरांना शरण गेलेले योगी चांगदेव चर्चेत येतात. दुसऱ्या भागात येणारे संत म्हणजे नामदेव शिंपी, गोरा कुंभार, सांवता माळी, नरहरी सोनार, चोखा हरिजन, जनाबाई ही मोलकरीण, व कान्होपात्रा ही नर्तकी. हे खरे लोकतंत्र. यावरून सिद्ध होते की परमेश्वरप्राप्ती सर्वांना साध्य आहे. तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या भागात अनुक्रमे एकनाथ, तुकाराम व रामदास यांचा अभ्यास आहे. प्रत्येक भागानंतर त्या त्या संताच्या काळातल्या सामाजिक व आध्यात्मिक परिस्थितीचे सिंहावलोकन केले आहे. साक्षात्कारामध्ये व विशेषतः महाराष्ट्रातील संतांमध्ये अद्वैत व भक्ती यांचा समन्वय कसा होतो हे इथे दाखविले आहे (पृ. १७८). "ज्ञानदेव, निवृत्तिनाथ, सोपान आणि इतर संत भक्तीपासून निघून सायुज्यापर्यंत कसे जातात हे सहज कळेल" (पृ.१७९).

या ग्रंथात समाविष्ट केलेल्या संतांतील सर्वश्रेष्ठ संत म्हणजे ज्ञानेश्वर. तीक्ष्ण तात्त्विकदृष्टी, उच्च पारमार्थिक अनुभव व रसाळ काव्यमय शैली यांचा सुरेख संगम इथे होतो. ज्ञानेश्वरांनी सांगितलेल्या चिद्‌विलासाच्या सिद्धांतामुळे त्यांना वास्तववादी तत्त्वज्ञांच्या गटात ढकलावे असे तर्कट कधी मधी पुढे येते. काही असो, ज्ञानेश्वर हे पूर्णपणे अद्वैतवादी आहेत हे निश्चित. चिद्‌विलासवादाचा लीलावादाशी जवळचा संबंध आहे; तिथे जगाला ईश्वराचे प्रकट रूप मानले जाते हेही खरे आहे; पण ज्ञानेश्वरांच्या बाबतीत चिद्‌विलास हा अद्वैताला पोचण्याचा एक टप्पा आहे. जग मिथ्या आहे हे पटवण्यासाठी अद्वैत संप्रदायात वापरली जाणारी गंधर्वदुर्ग, शशविषाण, खपुष्प, वन्ध्यापुत्र किंवा मृगजळ ही सर्व उदाहरणे ज्ञानेश्वरांनी घेतली आहेत. यावरून ते शांकरसंप्रदायात बसतात हे सरळ आहे. एवढेच नव्हे तर ते अविद्येला खोटी म्हणतात. म्हणून जग हे नसलेल्या कारणाचे नसलेले कार्य ठरते. या त्यांच्या युक्तिवादाने त्यांनी अद्वैताच्याही पुढे पाऊल टाकले आहे असे म्हणणे प्राप्त होते. इथे भक्तीचिये वाटे लागून

मनुष्याने आभासांनी बुजबुजलेल्या या जगापासून आपली सुटका करून घेऊन आपल्या मूळघराला जावे, देहग्रामापासून निघून आत्मपाटणाला जावे असे ते सांगतात. मृत्यूच्या वेळेस जर काही उपयोगी पडत असेल तर भक्ती. भक्तावर ईश्वर विशेष कृपा करतो. "अर्जुना हे लक्षात घे की भक्ताने माझी नित्य सेवा केली असल्याने शेवटच्या वेळेला मी त्याचा सेवक होतो.... त्याच्या उपकारांचे ओझे मला सहन होत नाही. तो धनको व मी ऋणको आहे आणि त्याच्या ऋणातून उत्तीर्ण होण्यासाठी मी त्याची परिचर्या करतो" (पृ.१३३).

तुकारामांच्या आध्यात्मिक जीवनाकडे पाहिले तर तिथे तळमळीचा काळ तीव्रतेने दिसतो. प्रत्येक साधकाला खाचखळग्यांतून व काट्याकुट्यांतून चाललयाशिवाय परमेश्वरी प्रसादाची प्राप्ती होत नाही. तुकारामांनी आळसाला प्रथम रामराम ठोकला. कारण आळस आला की सर्व उत्साह ओसरतो. त्यांनी विसराळूपणाला दूर ढकलले. नामस्मरणाचा विसर पडला की प्रपंचातले मोह धुडगूस घालतात. ध्यानाची लाज धरली की हित सांडले जाते. परमेश्वरप्राप्तीसाठी तुकारामांनी कंबर बांधली. ही केवळ वल्गना नव्हती तर ध्येय गाठण्याचा दृढ निश्चय होता. पण त्यांना दिसून आले की रात्रंदिवस प्रयत्न करूनही देवाचे दर्शन होणे सोपे नाही. ते रस्ता तुडवीत होते. पण त्यांचे उद्दिष्ट दूरदूरच जात होते. दाही दिशा धुंडाळल्या तरी देवाचे दर्शन नाही याचे त्यांना दुःख होत होते. त्यांचे डोळे देवाचे दर्शन घेण्यासाठी आसुसलेले होते. "या टप्प्याला पोचल्यावर आपल्या अंगचे अवगुण आठवू लागतात. प्रत्येक साधकाच्या बाबतीत हे होतच असते. आत्मनिरीक्षण करून साधक स्वतःची निर्भर्त्सना करतो" (पृ.२८९). आपण व आपले मन यांच्या आड उभे राहण्यासाठी तुकाराम नारायणाची विनवणी करतात व त्याची कृपा भाकतात. तुकाराम शेवटी इतके हताश झाले की ते आपल्या जिवावर उदार झाले. दयाळू दयाळू म्हणतात तो देवच इतका निष्ठुर झाला तर इतर कोण आपला अंगीकार करेल? अशा आत्यंतिक निराशेनंतर तुकारामांना अवचित श्रीमुखाचे दर्शन झाले आणि उठाउठी त्यांचा ताप निघून गेला. समस्त जग आनंदाने धवळून गेले. साक्षात्कार झाल्यानंतर संत फक्त

उपकारापुरताच उरलेला असतो असे तुकाराम म्हणतात (पृ.३११).

हाताने काम करत असताना मुखाने राम म्हणत असावे असा रामदासांचा आदेश आहे. प्रत्येक गोष्टीला ईश्वराचे अधिष्ठान पाहिजे. आधी ईश्वरावर श्रद्धा ठेवावी, मग आपले काम किंवा राजकारण करावे. रामदासांची शिकवण फार व्यावहारिक आहे. निस्पृहाने सतत कार्यमग्न असावे, परांतराला धक्का लावू नये. आपल्या वर्तनाने दुसऱ्याला उदाहरण घालून द्यावे व धैर्याचा डोंगर असावे. दुसऱ्यांवर न विसंबता आपला कार्यभाग साधतो तोच भला. माणसाने समुदाय मेळवावे. स्वतः महंत होऊन न बसता मागे राहून सर्व कार्याची सूत्रे हलवावी. ते आणखी सांगतात, "लोक शोधून पहावे, त्यांचे अधिकार जाणावे. ते काय करू शकतात आणि काय नाही याची परीक्षा केल्यावर त्यांना जवळ अथवा दूर करावे. अधिकारपरत्वे काम चांगले, वाईट होत असते... हा कोरडा उपदेश नाही. आधी केले आहे, मगच सांगितले आहे.... महंताने आपल्यासारखे आणखी महंत तयार करावे, त्यांना युक्ती व शहाणपण शिकवावे आणि मग नाना देशात त्यांना विखरून टाकावे" (पृ.४१४). ही बाह्य कार्ये होत. अशा तऱ्हेने सतत कार्यमग्न राहाण्यासाठी भक्त ईश्वराच्या नितांत चिंतनातून शक्ती मिळवतो, काही गलबला काही निवळ असा काळ कंठीत तो जातो.

संतांची जी वचने या पुस्तकात घेतली आहेत त्यांची एक सूची ग्रंथाला जोडली आहे. या ग्रंथाचा एक विशेष म्हणजे तौलनिक साक्षात्कारशास्त्रावरील ग्रंथांबद्दलचे टिपण. या पुस्तकाने जगामधल्या साक्षात्कारी संतांच्या मालिकेत महाराष्ट्रातील संतांना एकदम स्थान मिळाले. या ग्रंथाबद्दल एन. मॅकनिकोल म्हणतो, "सरतेशेवटी महाराष्ट्रातील संतांची योग्यता जगापुढे आणली गेली आणि विशेष म्हणजे त्यांच्यातीलच एका विद्वानाच्या हस्ते हे काम झाले".

चार वचनामृते

अध्यात्मग्रंथमालेत प्रसिद्ध झालेली ही चार पुस्तके म्हणजे मिस्टिसिझम इन महाराष्ट्र या ग्रंथात चर्चिलेल्या विषयांना आधारभूत असलेले संतवाङ्मयातील वेचे आहेत. ही चार पुस्तके साधारणपणे इंग्रजी ग्रंथातील पाच विभागांशी

संलग्न आहेत. १ ला विभाग, बौद्धिक साक्षात्कारशास्त्र, हा ज्ञानेश्वरवचनामृताशी संलग्न असून विभाग २ व ३ म्हणजे लोकतंत्रात्मक व समन्वयात्मक साक्षात्कारशास्त्र हे संतवचनामृताशी संलग्न आहेत. व्यक्तिगत साक्षात्कारशास्त्राचे म्हणजे विभाग ४ चे मूळ तुकारामवचनामृतात सापडते तर कर्मप्रधान साक्षात्कारशास्त्राचा म्हणजे विभाग ५ चा आधार रामदासवचनामृत आहे. ही वचनामृते मराठी संतवाङ्मयाचे मंथन करून काढलेले नवनीत आहे. महाराष्ट्रातील संतवाणीचे सार जसे त्यात मिळते तसेच परमार्थमार्गाची लक्षणे सर्व धर्मांतून समान कशी आहेत हेही कळते. ज्ञान, भक्ती, व कर्म यांचा समन्वय करणाऱ्या महाराष्ट्रातील संतपरंपरेचा तो एक इतिहासच आहे.

१९०८ साली गुरुदेवांनी दासबोधाचा अभ्यास सुरू केला. तेव्हापासून मराठी संतवाङ्मयाचे त्यांचे अध्ययन सुरू झाले. तुकाराम, एकनाथ आणि ज्ञानेश्वर यांचाही अभ्यास पाठोपाठ सुरू झाला.[६६] वचनामृतांतील वेचे मुख्यतः संतांची नैतिक व आध्यात्मिक शिकवण, तसेच तत्सम विषयांवरील त्यांची मते यांचा विचार करतात. वेचे विषयवार मांडलेले असून त्यांना समर्पक शीर्षके दिलेली आहेत. वचनामृतांना सविस्तर प्रस्तावना जोडलेल्या असून वेच्यांमधील विषयांचे सार वेच्यांच्या क्रमानुसार दिले आहे. वेच्यांचा आणि त्यांवरील इंग्रजी पुस्तकातील भाष्याचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने प्रस्तावनांचे मार्गदर्शन होते. तळटीपांतून कठीण शब्दांचे अर्थ दिले आहेत.

ज्ञानेश्वरवचनामृताच्या शेवटी ओव्यांची अध्यायवार सूची दिलेली आहे. ज्ञानेश्वरीच्या कितव्या अध्यायातून कोणत्या ओव्या वेच्यांत घेतल्या आहेत हे त्या सूचीवरून लागलीच काढता येते. पाठोपाठ मराठी अनुक्रमणिकेचे इंग्रजी भाषांतर येते. संतवचनामृतात विविध संतांचे जे अभंग घेतले आहेत त्यांची सूची आहे. प्रत्येक संताच्या अभंगांचा स्वतंत्र गट करून त्यांची अकारविल्हे मांडणी केली आहे. तुकारामवचनामृतात अभंगांची अकारविल्हे सूची असून अनुक्रमणिकेचे इंग्रजी भाषांतर आहे. ज्ञानेश्वरवचनामृत व तुकारामवचनामृतातील अनुक्रमणिकेच्या इंग्रजी भाषांतरामुळे मिस्टिसिझम इन महाराष्ट्र या ग्रंथातील तो

तो विभाग शोधून काढणे सुलभ होते.

एखादी गोष्ट केवळ पद्धत आहे म्हणून करायची असा गुरुदेवांचा हट्ट केव्हाही नसे. पुस्तकाच्या दर्शनी पृष्ठावर श्रुतिस्मृतिग्रंथांतील एखादे वाक्य लिहिले पाहिजे असा त्यांचा आग्रह नव्हता. म्हणूनच, त्यांनी आवर्जून एखादे अवतरण दिले तर त्यात काही विशेष उद्देश असावा असे वाटते. चारी वचनामृतांच्या सुरवातीला त्यांनी खालील ओवी उद्धृत केली आहे.

तैसें अध्यात्मशास्त्रीं इये। अंतरंगचि अधिकारिये।
परि लोकु वाक्चातुर्यें। होईल सुखिया।। (ज्ञानेश्वरी १८.१७५०).

पारमार्थिक अनुभव खरे की खोटे हे पारखण्यासाठी स्वतःचे अंतःकरण हाच खरा निकष आहे. परंतु संतवाङ्मयाच्या अध्ययनाने वाचक धन्य होईल हेही महत्त्वाचे आहे. ही ओवी घालण्याची दोन कारणे असू शकतील :- एकतर या ग्रंथमालेला अध्यात्मग्रंथमाला हे नाव दिले असल्याने अध्यात्मशास्त्रावरील एखादी ओवी तिथे खुलून दिसेल हे सरळ आहे. परंतु यापेक्षा दुसरे एक कारण अधिक सयुक्तिक वाटते. आध्यात्मिक अनुभवाच्या खरेपणाचा निर्णय शेवटी ज्या त्या व्यक्तीचाच असतो हे गुरुदेव वारंवार सांगतात. एकाच्या अनुभवाची सत्यता दुसरा कुणी सांगू शकत नाही. म्हणून संतांच्या आध्यात्मिक अनुभवांची इथे चर्चा केलेली असली तरी साधकाला हे कळले पाहिजे की प्रत्येकाला या मार्गावरून स्वतःच वाटचाल करावी लागते, त्याचा आनंद त्याने स्वतःच सेवन करायचा असतो आणि त्याची सत्यताही स्वतःच पारखायची असते. ओवीच्या पहिल्या अर्ध्या भागात हेच सांगितले आहे. अर्थात ओवीत पुढे म्हटल्याप्रमाणे संतवाङ्मयाच्या वाचनाचा एक आगळाच आनंद वाचकाला मिळतो. त्या दृष्टीने वेच्यांची ही पुस्तके कुणालाही लाभदायक ठरतील हे स्पष्ट करण्यासाठी कदाचित ही ओवी घातली असेल.

(इ) पाथवे टु गॉड इन हिंदी लिटरेचर

या ग्रंथाच्या पानापानांतून गुरुदेवांचा ग्रंथलेखनातील आध्यात्मिक उद्देश दृग्गोचर होतो. "साक्षात्काराच्या उद्यानातील रंगीबेरंगी फुले गुंफून त्यांचा एक हार ईशचरणी

अर्पण करावा अशी प्रस्तुत लेखकाची फार दिवसांची मनीषा होती" (प्रस्तावना, पृ. १). ह्या पुस्तकात दोन विभाग आहेत. पहिल्या भागात पदे आहेत व दुसऱ्या भागात दोहे आहेत. दोहा या वाङ्मयप्रकाराबद्दल गुरुदेव म्हणतात की केवळ दोन ओळींच्या या दोह्यांतून कितीतरी मानसशास्त्रीय, सत्ताशास्त्रीय, नैतिक व आध्यात्मिक सत्ये कथित केली आहेत. हे चुटकुल्यातले साक्षात्कारशास्त्र आहे. "चुटके, विद्वत्ता, विनोद, उपहास, प्रेम, भक्ती, सेवा एवढेच नव्हे तर मानवजातीला केलेला उपदेश या दोह्यांतून सापडतो" (पृ.२७०).

पदे व दोहे यांचे विवरण एकाच पद्धतीने केले आहे. सुरवातीला परमार्थमार्गाला लागण्याच्या प्रेरणा सांगितल्या आहेत. नंतर नैतिक तयारीचा विषय घेतला आहे आणि मग ईश्वर व संत यांतील संबंध काय असतो याबद्दल थोडी सैद्धांतिक चर्चा आहे. हे झाल्यावर साधकाची परमार्थमार्गावर वाटचाल कशी होते याचे सविस्तर वर्णन आहे. नाममाहात्म्य, नामस्मरणप्रक्रिया किंवा साधकाला भोगावा लागणारा तळमळीचा काळ या सर्वांची तिथे चर्चा आहे. शेवटच्या प्रकरणात विविध पारमार्थिक अनुभवांचे वर्णन असून त्यांचे साधकांवर होणारे परिणामही वर्णिले आहेत.

ग्रंथाच्या सुरवातीलाच साक्षात्काराचे मानसशास्त्र व तत्त्वज्ञान यांचे विवरण कसे करावे हे सांगितले आहे. साक्षात्कारशास्त्राचा ऊहापोह करायचे कुणी ठरवले तर त्यासाठी एक पूर्वपीठिका इथे तयार आहे. जगातील कुठल्याही भाषेतील संतवाङ्मयाची सामुग्री त्या आराखड्यात मांडली की साधकाचा परमार्थमार्गावरील प्रवास त्या भाषेत कसकसा वर्णन केला आहे याची यथार्थ कल्पना येईल. जगातील साक्षात्कारशास्त्राच्या अभ्यासासाठी अत्यंत उपयोगी अशी ही एक विवरणपद्धती आहे. गुरुदेवांनी सांगितलेल्या या पाच पायऱ्या म्हणजे पाच आर्यसत्ये आहेत असे म्हटले तरी चालेल, किंवा चतुःसूत्रीच्या धर्तीवर हिला आपण पंचसूत्री म्हणू शकतो. ही सूत्रे म्हणजे १) परमार्थाच्या प्रेरणा, २) नैतिक तयारीची आवश्यकता, ३) सद्गुरूंची लक्षणे व कार्य, ४) नामस्मरण, ५) परमार्थाचे फलित म्हणजे विविध आध्यात्मिक अनुभव.

वैदिक कालापासून विचारवंत सांगत आले आहेत की व्याधी, गलितगात्रता किंवा मृत्यू हे परमार्थाला प्रेरक ठरतात. त्यांच्या जोडीला जीवनाचे क्षणभंगुरत्व किंवा पापाची टोचणी ह्याही प्रेरणा आहेत. हिंदी संतसाहित्याचा सखोल अभ्यास करून गुरुदेवांनी या प्रेरणांचे मानसशास्त्रीय, तात्त्विक किंवा नैतिक असे वर्गीकरण केले आहे. जन्मभर आपण मृगजळाच्या मागे असतो. सूरदास सांगतात की विषयांच्या पाशात आपण पूर्णपणे अडकून पडतो, अर्थात सत्यापासून आपण दूरच राहतो. संतवाङ्मयात अनेक तात्त्विक विचारही आले आहेत. जगाला सत्य समजणे, असत्य समजणे किंवा सत्यासत्य समजणे हे सर्व भ्रमच आहेत. आणि ज्याला आत्मदर्शन झाले तोच या तीन्ही भ्रमांच्या पलीकडे जाऊ शकतो असे तुलसीदास म्हणतात. सूरदासांची तक्रार आहे की जगात सज्जनांना दुःखाच्या खाईत पडावे लागते तर दुर्जन सुखात लोळत असतात. आपली लायकी व मिळणारे फळ यात असलेली ही विसंगती कशी दूर होणार? आपल्या मनाला सारखे वाटत असते की सद्‌गुणी माणसाला सुख मिळालेच पाहिजे आणि 'असे होईल' अशी कुणीतरी खात्री दिली पाहिजे. ईश्वराने हस्तक्षेप केला तरच सद्‌गुण व सुख यांचा समतोल साधेल अशा आशेने ईश्वराकडे माणूस धाव घेतो. इमॅन्युएल कांट या जर्मन तत्त्वज्ञाने ईश्वराच्या अस्तित्त्वाचा नैतिक युक्तिवाद असाच मांडला आहे. तो म्हणतो की ईश्वर हा जगाचा नैतिक शास्ता आहे आणि ज्या प्रमाणात सद्‌गुण असतील त्या प्रमाणात तो सुख देतो. जगात आढळणारी आणखी एक गोष्ट म्हणजे आपले ध्येय गाठण्याबाबत कशाचाही अंदाज बांधता न येणे. आयुष्यात अनेक संकटे येतात आणि एका अतर्क्य शक्तीपुढे आपण हतबल होतो. तिला तुम्ही नियती म्हणा किंवा दैव म्हणा. अशा अटळ नियमांच्या कचाट्यात सापडल्यावर एकच मार्ग खुला असतो. हा मार्ग म्हणजे अंगी नम्रता आणून सर्वभावे ईश्वराला शरण जाणे. "कुण्या अदृश्य शक्तीवर विश्वास ठेवण्यापेक्षा किंवा होणारे होणारच अशी तात्त्विक भूमिका घेण्यापेक्षा ईश्वराला शरण जाणे हाच ध्येयप्राप्तीसाठी रामबाण उपाय आहे. ईश्वराशी संगनमत केल्याविना आतापर्यंत कुणातरी प्राण्याला यश मिळाले आहे

का"? (पृ.४१).

आपले वर्तन चुकले तर ब्रह्मा, विष्णू आणि महेश हे सुद्धा आपले रक्षण करू शकत नाहीत असे गुरुदेवांचे परमगुरू श्री निंबरगी महाराज म्हणत असत. नैतिक नियम अनुल्लंघनीय आहेत म्हणून सदाचाराला फार महत्त्व आहे. आपल्याला काहीही दुःख झाले तरी ते आपल्या हातून आधी काहीतरी चूक घडलेली असते म्हणूनच होय. परमेश्वरप्राप्तीसाठी शुद्ध वर्तनाची नितांत आवश्यकता आहे. असे खडतर नियम घालणारे संप्रदाय आजकाल आहेत कुठे? गुरुदेव रानडे ज्या संप्रदायात होते. तो निंबरगी संप्रदाय अशा प्रकारचा आहे. इथे सद्‌गुणसेवन व दुर्गुणत्याग हा परमार्थाचा भक्कम पाया मानला जातो. ईश्वर हा सर्व सद्‌गुणांची खाण आहे आणि ईश्वरपराङ्‌मुखता हे दुर्गुणांचे मूळ आहे. म्हणून सरळच म्हणता येते की सद्‌गुण म्हणजे भक्तीचेच वेगवेगळे पैलू आहेत आणि दुर्गुण म्हणजे भक्तिमार्गापासून च्युत होणे आहे (पृ.७०). परंपरागत नवविधा भक्तीच्या संदर्भात गुरुदेवांनी तुलसीदासांच्या नवविधा भक्तीची सविस्तर चर्चा केली आहे. शेवटी ते सांगतात की 'मम भरोस' म्हणजे ईश्वराच्या कृपाळूपणावर व सर्वशक्तिमत्त्वावर पूर्ण भरवसा ठेवणे ही सर्वात श्रेष्ठ भक्ती होय. भक्तीचा सामाजिक आविष्कार म्हणजे ईश्वरभक्तांची मांदियाळी. "रामराज्य म्हणजे जिथे देवाची अनियंत्रित सत्ता चालते आणि जिथे सर्व मानवप्राणी भक्तीच्या धाग्यांनी एकमेकांशी बांधले गेले आहेत असे राज्य. इथल्या मंडळीचे एकमेव कार्य म्हणजे ईश्वराच्या जयजयकाराने जगाला दुमदुमित करणे" (पृ.२९५).

पदे व दोहे या दोन्ही ठिकाणी ईश्वर व संत यांत काय संबंध सांगितला आहे ते विशद करीत असताना गुरुदेवांनी अनेक तात्त्विक प्रमेयांचे विश्लेषण केले आहे. ही बहुतेक चर्चा सैद्धांतिक स्वरूपाची आहे. पतंजली, बादरायण, शंकर, रामानुज, मध्व, ॲरिस्टॉटल, स्पिनोझा, कांट किंवा जेम्स यांच्या विचारांच्या विश्वात संतांचे बोल कुठे बसतात हे दाखवले आहे. धर्मतत्त्वज्ञानातील एक कूट समस्या म्हणजे सगुण व निर्गुण यांतील संबंध. तुलसीदासांचे उदाहरण घेऊन या प्रश्नाचे विवरण केले आहे. तुलसीदास निर्गुणापेक्षा सगुणाला अधिक मूल्य

देतात आणि असे असूनही सगुण व निर्गुण यांत एक प्रकारचे ऐक्य आहे असे म्हणतात. नामाला ठाणदिवीचे काम देऊन देहलीदीपन्यायाने तुलसीदासानी सगुणनिर्गुणात संबंध प्रस्थापित केला आहे. ठाणदिवीची संकल्पना वापरण्याचा कांटला छंद होता. स्पिनोझाप्रमाणे तुलसीदास नाम व रूप यांना ईश्वराचे गुण समजतात.[६७] सगुण-निर्गुण यात विरोध नसून सामंजस्य आहे असे मीराबाईंचेही म्हणणे होते (पृ.११५). ईश्वर व संत यांतील संबंध जाणून घेण्यासाठी कबिरांचे तीन दोहे गुरुदेवांनी नयाभासाच्या पद्धतीने मांडून दाखवले आहेत. पहिल्या दोह्यात पूर्वपक्ष, दुसऱ्यात उत्तरपक्ष व तिसऱ्यात समन्वय आहे; तिसरा दोहा पहिल्या दोन दृष्टिकोनांत समन्वय घडवून आणतो. जो चाहे आकार तू या दोह्यात संताला सगुण रूपाने आलेला परमेश्वरच मानले आहे, म्हणजेच त्याचे अस्तित्व खरे मानले आहे. हा झाला पूर्वपक्ष. निराकारकी आरसी या दोह्यात संताला देवाचे प्रतिबिंब म्हटले आहे, म्हणजेच संताला स्वतंत्र अस्तित्व नाही, कारण प्रतिबिंब हे खोटे असते. हा झाला उत्तरपक्ष. तिसरा दोहा भजन भरोसे रामके हा घेतला आहे, यात संताला स्वतंत्र सत्ता आहेही आणि नाहीही, हे समन्वयी मत मांडले आहे. तो खेळतो असे वर्णन असल्यामुळे त्याची सत्ता मानावी लागते. परंतु हा खेळ अविनाशी तत्त्वाच्या अधिष्ठानावर चालू आहे म्हणून संताला दुय्यम दर्जाची सत्ता द्यावी लागते. कांटने समन्वयाचा एक प्रकार असा सांगितला आहे की तिथे पूर्वपक्ष व उत्तरपक्ष दोहोंचे म्हणणे मान्य केले जाते. तसेच इथे दोन्ही पक्षांना हो हो म्हटले आहे, म्हणजे दोघेही विशिष्ट अर्थाने खरे आहेत. खरोखरचा समन्वय मात्र संताने देह सोडल्यावर होतो, कारण तेव्हा त्याचा आत्मा परमात्म्यांत मिळून जातो. परमात्मा म्हणून तो असतोच, नाहीसा होत नाही पण व्यक्ती म्हणून मात्र तो नसतो. याच संदर्भात पुढे गुरुदेव म्हणतात की, मृत्यूत्तर ईश्वरात मिसळून जाणे ही कल्पना पूर्णपणे शास्त्रीय आहे. "जोवर संत या जगात राहत आहे तोवर देहधर्मांचे बंधन त्याला आहेच; म्हणून तो पूर्णपणे ईश्वर झाला आहे असे म्हणता येत नाही. पण देह सोडल्यानंतर त्याचा आत्मा परमात्म्यात कालवून जाण्यास कसलीच अडचण नाही. म्हणूनच

मुक्तिकल्पनेची वेदान्तात कितीही उलटसुलट चर्चा झाली असली तरी आपल्याला ठामपणे सांगता येते की विदेहमुक्तीही कल्पना जीवन्मुक्तिकल्पनेहून वरच्या दर्जाची आहे" (पृ.३३२). निष्कर्ष ठसठशीत आहे!

या सैद्धांतिक चर्चेनंतर प्रत्यक्ष परमार्थमार्गाचे वर्णन येते. सद्‌गुरूंची लक्षणे, सद्‌गुरूंनी दिलेल्या नामाचा महिमा किंवा नामस्मरण-प्रक्रिया अशा विषयांवरील संतांची शिकवण इथे दिलेली आहे. साधकाने एकही श्वास वाया जाऊ न देता अखंड नामस्मरण करण्याचा यत्न करावा. ही झाली शारीरिक तयारी. त्याच्याचबरोबर मानसिक तयारी हवी, म्हणजेच मन नामावर पुरते एकाग्र झाले पाहिजे. नैतिक तयारी म्हणजे प्रथम अहंमन्यतेची हकालपट्टी केली पाहिजे. साक्षात्काराच्या दृष्टीने बोलायचे तर देवाचे रूप पाहताना किंवा अनाहत नाद ऐकतानासुद्धा नामस्मरण चालूच पाहिजे. किंबहुना अनुभव येऊ लागले म्हणजेच नामस्मरण-प्रक्रिया यथायोग्य होऊ लागते. इतके झाले तरी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, "भाव किंवा आत्मसाक्षात्काराची खरी तळमळ किंवा परमार्थाची अपरिमित ओढ" (पृ.३१३).

परमार्थमार्गाचे साध्य म्हणजे रूप, तेज, नाद, गंध, रस किंवा स्पर्श यांचे अतींद्रिय अनुभव. यांचे वर्णन झाल्याबरोबर परमेश्वरदर्शनाचे साधकावर होणारे शारीरिक, मानसिक व नैतिक परिणाम सांगितले आहेत. कबिरांचे उदाहरण घेऊन अनुभवातली अद्‌भुतता व अनिर्वचनीयता विशद केली आहे. कबीर म्हणतात की साधकाला ढोलके, अलगूज किंवा वीणा यांची चीज ऐकू येते. तिथे ना रात्र ना दिवस; असा हा बेहदचा अनुभव आहे. राम राम असे प्रत्यक्ष शब्द फुटतात आणि एका रात्रीत दहाचे दहा अवतार डोळ्यांपुढे सरकून जातात. हा अनुभव म्हणजे "अनंत काळाची क्षणरूपात घातलेली घडीच होय" (पृ.२२३). हा कालातीत तत्त्वाचा अनुभव आहे. या अनुभवाने साधकाची मृत्यूबद्दलची धास्ती नाहीशी होते; उपनिषदे म्हणतात त्याप्रमाणे तो मृत्यूला तरून जातो. मृत्यूपलीकडे जाणे याचा स्टोइक तत्त्वज्ञ कसा अर्थ करतात पाहू. मृत्युलोकात दुःखाचे गाठोडे मोकळे सुटलेले असते आणि वादळे, धरणीकंप, पूर, मृत्यू यांचा

नटनाच चालू असतो. त्या सर्वांचा माणसाला जाच होत असतो. ही अरिष्टे टाळता येत नाहीत. तरी पण त्यांच्या योगे जो भावनेचा कल्लोळ उठतो त्यावर माणूस निश्चित ताबा मिळवू शकतो. सग्यासोयऱ्यांच्या मृत्यूने देखील आपल्या मनाचा तोल न बिघडू देणे हे मृत्यूला जिंकणेच आहे. ही अविचलता म्हणजेच मृत्यूवर मात करणे. या स्थितीचे महत्त्व ओळखून गुरुदेव म्हणतात, "समाधीने मानसिक शांती मिळाली पाहिजे, नैतिकता वाढली पाहिजे, देहाची नश्वरता कळली पाहिजे आणि मृत्यूची भीती गेली पाहिजे. तसे होत नसेल तर त्या समाधीचा काय फायदा आहे"? (पृ.२२६). यानंतर येणारा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 'तत्त्वमसि' या महावाक्याचा नवीन अर्थ. साक्षात्काराच्या पथावर माणसाची जसजशी प्रगती होत जाते तसतसे त्याला उच्च अनुभव येऊ लागतात. एकेक पाऊल पुढे पडले की आणखी दर्जेदार अनुभव येतात. ".....साधक ज्या पायरीला पोचला आहे त्याबरहुकूम त्याला अनुभव येतात. म्हणून त्याला येणारे अनुभव हे त्याच्या पारमार्थिक योग्यतेचे गमक आहेत" (पृ.२४६).

परिवारमुक्तीच्या संकल्पनेत सद्गुरू आपल्याबरोबर आपल्या परिवारालाही मुक्ती मिळवून देतात हे कबिरांचे म्हणणे विशद केले आहे. परिवारमुक्ती ही सर्वमुक्ती व एकमुक्ती यांच्याहून वेगळी आहे. सर्वमुक्ति-संकल्पनेप्रमाणे एक संत जन्माला आला की सगळे जग तरून जाते, एकमुक्ति-सिद्धांताप्रमाणे प्रत्येक जण आपापल्या जिवावर तरत असतो. द्वंद्वात्मक युक्तिवादाची भाषा वापरून असे म्हणता येते की "एकमुक्ती व सर्वमुक्ती हे अनुक्रमे वाद व प्रतिवाद असून परिवारमुक्ती हा समन्वय आहे. सद्गुरू.. आपण तरतात इतकेच नव्हे तर ते आपल्या परिवारालादेखील तारतात" (पृ.२६५).

पुस्तकाचा शेवट निःश्रेयसाच्या चर्चेने झाला आहे. या विषयावर दोह्यांमध्ये उत्कृष्ट विचार आहेत. इथे तीन महत्त्वाच्या संकल्पनांचा उल्लेख आहे – मुक्ती, आत्मानंद व भूमन्. मुक्ती म्हणजे जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटका, आत्मानंद म्हणजे साक्षात्कारी संताला मिळणारा परमानंद, भूमन किंवा बेहद् म्हणजे कबिरांच्या लीलेचे क्षेत्र. लीलेच्या कल्पनेत इतरांसाठी कार्यरत होण्याचा भाग

येतो. संतांचे एकमेव कार्य म्हणजे परोपकार. संत स्वतः ईश्वरात मग्न राहून मानवजातीची सेवा करतात. ॲरिस्टॉटलने सांगितलेला ज्ञानपूत कर्मयोग संतांचे ठिकाणी स्पष्ट दिसून येतो.

परमार्थसोपान (हिंदी)

पाथवे टु गॉड इन हिंदी लिटरेचर याचा हा आधारग्रंथ आहे. दुर्देवाने तो फारसा वाचला जात नाही. याचे कारण म्हणजे इंग्रजी पुस्तकात चर्चेसाठी घेतलेल्या पदांची व दोह्यांची यात केवळ जंत्री आहे असा एक गैरसमज आहे. खरोखर पाहिले असता हा एक स्वतंत्र प्रबंध आहे. पदांबरोबर व दोह्यांबरोबर त्यांचा स्वैर अनुवाद आहे. इंग्रजी ग्रंथात ज्या क्रमाने पदा-दोह्यांचे विवरण आहे त्याच क्रमाने पदे-दोहे घेतले आहेत. अर्थातच सुरवातीपासून शेवटपर्यंत पदे किंवा दोहे वाचत गेले की त्यामध्ये परमार्थमार्गावर होणारा साधकाचा रेखीव प्रवास दिसून येतो. "विचाराची नित्यनूतनता व आध्यात्मिक गाभा या दोन मोजपट्ट्यांचा वापर करून पदे व दोहे निवडले आहेत", असे गुरुदेव स्वतःच सांगतात (प्रस्तावना पृ. ३). प्रत्येक पदाला तसेच दोह्याला त्याचे त्याचे सार सांगणारा इंग्रजी मथळा आहे. हे मथळे फार अर्थघन असून गुरुदेवांचे हृद्‌गत उघड करून दाखवतात. एक उदाहरण पाहू. कबिरा तेरी झोपडी या दोह्यात 'कुसंगतीचा माझ्यावर परिणाम होत नाही' असे कबीर म्हणतात. ज्याने कोणी कबिरांची आध्यात्मिक योग्यता प्राप्त करून घेतली असेल तोच आणि तोच फक्त - अशी ग्वाही देऊ शकतो हे ढळढळीत सत्य जगापुढे मांडण्यासाठी गुरुदेव दोह्याला मथळा देतात, 'कबिरांवर कुसंगतीचा परिणाम होत नाही'. हा नियम सामान्य माणसासाठी नाही. 'मनुष्यावर कुसंगतीचा परिणाम होत नाही' असे गुरुदेव म्हणत नाहीत. तसे म्हटले असते तर त्याचा भलताच परिणाम होऊन कुणी सत्संगतीची पर्वाच केली नसती. गुरुदेवांच्या शब्दाशब्दांतून अशा सूक्ष्म व अर्थपूर्ण सूचना केलेल्या दिसतात. पुस्तकाच्या अखेरीस खुलासेवार टिपणे आहेत. त्यात विविध संकल्पनांचा शब्दार्थ व तात्त्विक अर्थ विशद केला आहे. या सविस्तर टिपणांच्या मदतीने पदे व दोहे यांचे उत्तम आकलन होते. ही

टिपणे म्हणजे नुसता शब्दार्थ किंवा पदांचा व दोह्यांचा केवळ अनुवाद नाही. ती शब्दांना बोलके करतात. नुसती टिपणे असे म्हणून कुणीही त्यांच्याकडे दुर्लक्ष करू नये कारण ती ज्ञानाची खाण आहेत. तिथे शब्दांची व्युत्पत्ती मिळते, एका शब्दाला अनुसरून इतर भाषांतले शब्दही मिळतात. नसेनी या शब्दावरचे टिपण नमुना म्हणून पाहावे :- नसेनी - संस्कृत निःश्रेणी, म्हणजे खाली नेणारी शिडी. गुजराथी – निसरणी, कन्नड – निच्चणिके (टिपणे, पृ.१०). व्याकरणदृष्ट्या सर्वत्र नजर टाकली असून काळ, लिंग, वचन किंवा वाक्यरचना यांबद्दल मधूनमधून भाष्य आहे. दीनानाथ हा शब्द सांगतो की ईश्वर दीनांचा नाथ आहे. वास्तविक दीनांचा नाथ, तो दीननाथ असा सामासिक शब्द बनला पाहिजे. उलट दीनानाथ म्हणजे दीन + अनाथ असा संधी होतो. म्हणजे जो दीनांचा किंवा गरिबांचा रक्षणकर्ता नाही असे ठरते! इथे तत्काल गुरुदेव स्पष्टीकरण देतात. ते विश्वामित्र शब्दाचे उदाहरण घेऊन म्हणतात की अर्थशः विश्वामित्र म्हणजे विश्वमित्र, विश्व + अमित्र नव्हे. "इतर व्याकरणकार विश्वामित्र शब्दाचा अर्थ विश्वाचा शत्रू असा करत असले तरी पाणिनी मात्र विश्वाचा मित्र असा अर्थ करतात, मित्रे चर्षौ असे पाणिनिसूत्र आहे". (टिपणे, पृ.५१). वाचकांच्या मनात आलेली शंका फेडण्यासाठी गुरुदेव आद्य व्याकरणकारांना पाचारण करतात! जाताजाता हे नमूद करण्यास हरकत नाही की विश्वमित्र हा समास विश्वं मित्रं यस्य किंवा विश्वस्य मित्रं असा दोन्ही तऱ्हांनी सोडवता येतो आणि विश्वमित्रमध्ये पूर्वपद दीर्घ होऊन विश्वामित्र असा शब्द होतो. विश्व ऐवजी 'विश्वा' असे होते (पाणिनि, अष्टाध्यायी, ६.३.१३०).

ज्यांची पदे किंवा दोहे घेतले आहेत त्या संतकवींच्या नावांच्या, तसेच पदे व दोहे यांच्या सूच्या अभ्यासाला फार उपयोगी पडतात. परिशिष्ट १ मध्ये डॉ. सुखदेव बिहारी मिश्र यांनी लिहिलेली संतकवींची चरित्रे आहेत. पण सर्वाधिक महत्त्वाचा कोणता भाग असेल तर तो म्हणजे परिशिष्ट दुसरे. ही गुरुदेवांनी अलंकारशास्त्रात घातलेली भर आहे. रस आणि भाव यांच्या चर्चेला मानसशास्त्राची बैठक दिली आहे. इथे विल्यम जेम्स, विल्यम मॅकडूगल किंवा शँड यांच्या

मतांचा विचार केला आहे. 'रस' संकल्पनेचा अलंकारशास्त्रीय, मानसशास्त्रीय, सत्ताशास्त्रीय, तसाच साक्षात्कारशास्त्रीय अर्थ उलगडून दाखवला आहे. प्राचीन अलंकारिकांच्या नवरसांच्या जंत्रीबद्दल गुरुदेव म्हणतात, "नवरस ग्रथित केलेल्या या श्लोकात एक फार मोठी उणीव आहे. इथे भक्तिरसाचा उल्लेखच नाही. रसांच्या या मंत्रिमंडळात शांतरसाला स्वीकृत सदस्याचा दर्जा देऊन भक्तीला नामंजुरी दिली आहे. मानवी विचार किती हीन स्तरापर्यंत उतरू शकतो हे यावरून स्पष्ट होते" (परिशिष्ट २, पृ.५). त्यांनी स्वतः मांडलेल्या नवरसमालिकेत भक्ती हा मूधन्यरस मानला आहे.

काहीकाही अलंकारांची परंपरागत नावेही तितकीशी समाधानकारक नाहीत असे सांगून गुरुदेवांनी त्यांचे नवीन नामकरण केले आहे. उदाहरणार्थ सार हे नाव बदलून त्यांनी उत्कर्ष हे नाव दिले आहे (परिशिष्ट २, पृ.२०). मीराबाईंचे 'जोगी मत जा मत जा' हे उत्कर्षालंकाराचे सुंदर उदाहरण असून करुणरसाच्या टप्प्याटप्प्यांनी होणाऱ्या उत्कर्षाचा तिथे उत्तम परिपोष पाहावयास मिळतो (परिशिष्ट २, पृ.२०). अलंकारशास्त्राच्या या चर्चेतील एक वाक्य परमार्थमार्गाबद्दलच्या त्यांच्या सिद्धांतावर अचूकपणे बोट ठेवते. 'अप्पय्य दीक्षितांच्या अन्योन्य अलंकाराचा आध्यात्मिक हेतूसाठी या ग्रंथाचे भरतवाक्य म्हणून' आपण उपयोग केल्याचे ते सांगतात (परिशिष्ट २, पृ.२०). हे विधान फार महत्त्वाचे आहे. भरतवाक्य म्हणजे कोणत्याही ग्रंथाच्या, विशेषतः नाटकाच्या शेवटी येणारा कल्याणसूचक श्लोक. परमार्थसोपानाच्या अखेरीस परिशिष्ट २ पृ. ३१ वर आलेल्या खालील ओळी म्हणजे त्या ग्रंथाचे भरतवाक्य आहे –

मैं मझधारा का माँझी हूँ
तुम भवसागरके केवट हो।
मैं सुरसरि पार उतार दिया
भवसागर पार लगा देना।।

हे अन्योन्य अलंकाराचे उदाहरण म्हणून दिले आहे. म्हणजेच यात देव-घेव आहे. गुहाने श्रीरामांना गंगापार केले आणि त्याच्या मोबदल्यात भवसागरातून

तारून न्यावे अशी श्रीरामांना विनंती केली. या व्यवहाराचा आध्यात्मिक अर्थ सरळ आहे. गुहाने श्रीरामांना गंगापार नेणे म्हणजे साधकाचा स्वप्रयत्न आणि श्रीरामांनी गुहाला भवसागरातून तारणे म्हणजे ईशकृपा. आध्यात्मिक क्षेत्रात फक्त स्वप्रयत्न तोकडा पडतो. कृपेशिवाय काही साध्य होत नाही. म्हणून त्या दोन्हींच्या युतीला महत्त्व आहे. तसे पाहिले तर या पुस्तकाची सुरवातच या संदेशापासून झाली आहे. परमार्थसोपानाचा श्रीणेशा सूरदासांच्या पदापासून झाला आहे. सूरदासांनी तिथे म्हटले आहे की मीच भक्ती केली नाही, प्रयत्न केला नाही (भगवंत भजन बिनु), म्हणून माझ्यावर संकटे कोसळतात. पाठोपाठ कबिरांचे पद सांगते की मनुष्य कृपेच्या अभावी (बिना गुरुज्ञान) भटकतच राहतो. म्हणजे पहिल्या दोन पदात स्वप्रयत्न व ईश्वरकृपा दोन्हींची आवश्यकता सांगितली आहे. एवंच या पुस्तकाचे उपक्रमात (सुरवात) व उपसंहारात (शेवट) स्वप्रयत्न व ईश्वराची कृपा या दोहोंच्या संगमाची जरूर आहे हा मुद्दा आला आहे. ग्रंथाचे तात्पर्य ठरवताना त्याचा उपक्रम व उपसंहार विचारात घेतले जातात हे प्रसिद्ध आहे. अभ्यास म्हणजे तो विषय पुन्हा पुन्हा मांडणे. स्वप्रयत्नाला गुरुकृपेची जोड हवी या अर्थाची कितीतरी पदे परमार्थसोपानात आहेत. णजे उपक्रम, उपसंहार, अभ्यास या मीमांसा तत्त्वज्ञानाने सांगितलेल्या तीन कसोट्या वापरून म्हणता येते की स्वप्रयत्न व ईश्वरकृपा यांची सांगड अत्यावश्यक आहे हा परमार्थसोपान या ग्रंथाचा संदेश आहे.

(ई) पाथवे टु गॉड इन कन्नड लिटरेचर

या ग्रंथात व पाथवे टु गॉड इन हिंदी लिटरेचर यात खूपच साम्य आहे. हिंदी व कन्नड कवींच्या रचनांतून परमार्थमार्गावरील वाटचालीच्या तपशिलात जो कमी अधिक फरक आहे त्याबरहुकूम भाष्यातही फरक असला तरी दोन्ही ठिकाणी हाताळलेले विषय समानच आहेत. हिंदी संतांवरील ग्रंथ गुरुदेवांच्या हयातीत प्रसिद्ध झालेला असून त्यातील शब्दन् शब्द त्यांचा स्वतःचा आहे. कन्नड संतांवरील ग्रंथाची बाब वेगळी आहे. त्यांनी १४ व्याख्याने दिली होती. तरीही मुद्रणप्रत तयार होण्याच्या दृष्टीने त्या मजकुरावर अजून शेवटचा हात

फिरलेला नव्हता. उरलेल्या सहा प्रकरणांची पूर्ण टिपणे तयार होती पण त्यांचे स्पष्टीकरण करण्याचे काम शिल्लक होते. ते नंतर इतरांकडे आले. या ग्रंथाची शैली व भाषा मधून मधून निस्तेज दिसतात, त्याचे कारण हे आहे.

गुरुदेवांनी जी १४ व्याख्याने दिली त्यांचा एक विशेष म्हणजे अनेकदा व्याख्यानाचा शेवट 'देवाच्या मनात असेल तर...' अशा प्रकारचा होता हे टिपणांवरून स्पष्ट होते. एकच उदाहरण घ्यायचे झाले तर पहिल्या प्रकरणाचे घेता येईल. पहिले व्याख्यान दिले त्या दिवशी शेवटी गुरुदेव म्हणाले होते, "हे कार्य मी हाती घेतले आहे आणि देवाच्या मनात असेल तर माझ्या शक्त्यनुसार मी ते पुरे करण्याचा प्रयत्न करीन". मात्र छापलेल्या पुस्तकात पृ.११ वर 'देवाच्या मनात असेल तर' हे शब्द आलेले नाहीत. इतर वेळीही ठिकठिकाणी ते शब्द गाळले आहेत. संपादक मंडळाच्या सदस्यांनी मुद्रणप्रत तयार करताना ही काटछाट का केली हे त्यांचे त्यांना माहीत. हे शब्द काहीसे भविष्यसूचक होते. आपल्या देखत या पुस्तकाचे काम पुरे होईल की नाही याबद्दल गुरुदेवांना जणूकाही संदेह होता. अर्थात हे कारण किरकोळ झाले. मुख्य गोष्ट अशी आहे की या शब्दांतून गुरुदेवांची आत्मनिवेदनभक्ती स्पष्ट होते. "आपण स्वतःला ईश्वराच्या चरणावर झोकून दिले पाहिजे आणि तो करेल ते मानले पाहिजे" (पृ.८४), अशा अर्थाच्या वाक्यांची पुस्तकात पखरण आहे. उत्तरकालातील सर्व लिखाणात ही शरणागती ठळकपणे दिसते.

निंबरगी संप्रदायात भक्तिपूर्ण पदे म्हणण्याची पद्धत होती. श्री गुरुदेवांचे सद्गुरू श्री भाऊसाहेब महाराज यांनी कन्नड संतांची पदे जमवून कन्नड भाषेतील आत्मसाक्षात्कारपर वाङ्मयावर फार मोठे उपकार केले आहेत. आपल्या शिष्यांना ते ही पदे लिहून ठेवण्यास सांगत. त्या पदांवर ते स्वतः निरूपण करीत असताना त्यांचे शिष्य तल्लीन होत असत. अनेकांची ही पदे तोंडपाठ झाली होती. गुरुदेवांनी हीच परंपरा चालू ठेवली होती. तेही पदे म्हणून घेत; त्यावर चर्चाही होई. ही पदे एकत्र करून, ती विषयवार मांडून त्यांतील तात्त्विक व आध्यात्मिक सार त्यांनी या पुस्तकात दिले आहे. ही कल्पनाच नवीन होती.

पदांबद्दलची सामान्य कल्पना म्हणजे ती फक्त गाण्यासाठी असतात. ती तत्त्वज्ञानाचा अभ्यासविषय होतात हे दाखवून गुरुदेवांनी कन्नड पदांच्या अभ्यासाला एक नवीन दिशा दिली.

हे पुस्तक वाचताना कित्येकदा असे वाटते की आपण गुरुदेवांशी संभाषणच करीत आहोत. भाषाशैली खेळीमेळीची आहे आणि जागोजाग संप्रदायातील सत्पुरुषांच्या जीवनातील आणि आपल्या स्वतःच्या जीवनातील घटना सांगितल्या आहेत. संतवाङ्मयाचा अभ्यास एकदा सुरू झाल्यावर त्यातली तात्त्विक व आध्यात्मिक प्रमेये आपोआप बाहेर पडू लागतात. पुस्तकाचा उद्देश असा होता:- "जगातील साक्षात्कारशास्त्राच्या पार्श्वभूमीवर कन्नड संतांच्या साक्षात्काराचे स्थान निश्चित करणे व जगामधील साक्षात्कारी पुरुषांशी तुलना करता या संतांना उच्च स्थान कसे द्यावे लागेल याचे दिग्दर्शन करणे... मराठी व हिंदी संतकवींच्या अभ्यासावरून मला असे सांगता येईल की कन्नड संतांचे स्थान इतर साक्षात्कारी संतांपेक्षा कोठल्याच दृष्टीने कमी नाही. उलट काही बाबतीत ते अधिक श्रेष्ठ आहेत" (पृ.२)... "कन्नड संतांच्या वचनांचा शब्दशः अर्थ करत न बसता त्यांचे जगामधील संतांच्या प्रभावळीत असलेले गौरवास्पद स्थान स्पष्ट करून दाखवणे हा माझा हेतू आहे. ....साक्षात्कारशास्त्रात त्यांनी मोलाची भर घातली आहे" (पृ.१३).

या पुस्तकाच्या सुरवातीस साक्षात्काराची लक्षणे व निकष यासंबंधी सुबोध तात्त्विक चर्चा आहे. चिद्वाद, वास्तववाद, उपयोगितावाद अशासारख्या ज्ञानशास्त्रातील सिद्धांतांचा तिथे उल्लेख आहे. समाधान हा निकष उपयोगितावाद्यांनी मानला तर आत्मानंद साक्षात्कारी संतांनी स्वीकारला. साक्षात्काराचे अनेक निकष असले तरी "स्वतःची अपरोक्षानुभूती हाच धुरेचा निकष. या निखळ अनुभतीनेच ईश्वराचे सम्यक् ज्ञान लाभते" (पृ.२१३). साक्षात्काराच्या बाबतीत आपली स्वतःची प्रचिती ती खरी. मराठी व हिंदी संतांबद्दलच्या पुस्तकातूनही हा मुद्दा आलेला आहे. दुसऱ्याचे अनुभव घेऊन आपल्याला काय करायचे आहे? फारतर ते आपल्या अनुभवाला दुजोरा देतील. दिव्य स्पर्शाने रोमारोमांत भिनलेली

निजानंदतृप्ती आपल्या अनुभवाची पारख करण्यास समर्थ आहे. या पुस्तकात नैतिक निकषाचा उल्लेख आलेला आहे. "योगभ्रष्ट मनुष्यांना पारमार्थिक अनुभव लाभत नाहीत, मी अशी उदाहरणे पाहिली आहेत की जिथे अनुभव यायला लागल्यानंतरही मनुष्याचा पाय घसरल्यामुळे ते नाहीसे झाले. ....मनुष्य नीतिभ्रष्ट झाला तर त्याला असलेली प्रचिती तो गमावून बसतो" (पृ.२२४).

जाताजाता आत्मानंदवादाबद्दल बोलताना, ते सांगून जातात की आत्मानंदाच्या तत्त्वज्ञानावर लिहिण्याचा आपला विचार होता. हे तत्त्वज्ञान समग्रपणे मांडावे म्हणून आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे ते त्या विषयाची विविध दृष्टिकोनांतून चर्चा करणार होते. सत्ताशास्त्र व ज्ञानशास्त्र, नीतिशास्त्र व मूल्यशास्त्र या दृष्टिकोनांचा त्यात समावेश होता (पृ.५).

कर्नाटकातील साक्षात्कारी संतांचा एक विशेष म्हणजे योगप्रक्रियांचे वर्णन करीत असतांना प्रकट झालेले शरीररचना त्र शरीरविज्ञान यांबद्दलचे त्यांचे ज्ञान. या बाबतीत त्यांची बरोबरी कुणीच करू शकत नाही. नाडी, षट्चक्रे किंवा पश्चिममार्ग इत्यादींची वर्णने वरचेवर येतात. इतकेच नव्हे तर हे पारिभाषिक शब्द ते अगदी सहजगत्या वापरतात. त्या काळी ही भाषा सर्वांच्या तोंडी असावी. हठयोगातील संकल्पनांना उगीच बोजड सिद्धांतांचे मुखवटे चढवलेले नव्हते. त्या संकल्पना त्यांच्या आचारविचारांत मुरल्या होत्या. उदाहरणार्थ महलिंगरंग सांगतात की, "खोल श्वास घेऊन प्राणाला उर्ध्वगती द्यावी आणि सुषुम्नामार्गाने नेऊन त्रिकूटाचे ठिकाणी त्याचा लय करावा" (पृ.१००).

बयलिगे बयलु निर्बयलु या सर्रास वापरात असलेल्या महत्त्वाच्या वाक्प्रचारात एक मोठी तात्त्विक, अर्थपूर्ण संकल्पना दडलेली आहे. 'अवकाशाचा अवकाश म्हणजे निरवकाश', किंवा 'पल्याडच्या पल्याड' हा त्याचा शब्दशः अर्थ झाला. पण त्याला तात्त्विक आणि आध्यात्मिक पैलू आहेत. सत्ताशास्त्राच्या दृष्टीने त्याचा अर्थ अनंत तत्त्व किंवा महाकारण ब्रह्म ; साक्षात्काराच्या दृष्टीने सायुज्य. त्यात आत्मानंदाचाही भाग आहे.

कन्नड संतांच्या रचनेत वारंवार दिसून येणारी आणखी एक संकल्पना म्हणजे

शेष. इंद्रियांना उद्देशून नागाचा उल्लेख जसा आढळतो तसाच कुंडलिनी शक्ती असाही त्याचा अर्थ होतो. अतींद्रिय अनुभवांत शेषाची रूपे ज्या स्थितीत दिसतात तीवरून साधकाने कोठवर मजल मारली आहे ते समजते. उदाहरणार्थ, शेषाचे मुख "कधी खालच्या बाजूला तर कधी वरच्या बाजूला वळलेले असते; खाली असेल तर विषयाभिमुखता व वर असेल तर ईश्वराभिमुखता दर्शविली जाते" (पृ.६६).

तेज, नाद, रूप यांचे अनुभव प्रकट करणाऱ्या अनेक पदांचे विस्तृत वर्णन इथे सापडते. अनुभवमंटपात किंवा संतसभेत जमलेल्या साधकांना विविध अनुभव होते. तिथे सागर उफाळून जात होता, पर्वत विरघळत होते, परमेश्वराच्या अनुभूतीने षट्स्थळे ओसंडून जात होती, विजेचा झगमगाट होत होता, मेघगर्जना ऐकू येत होती, आणि वडवानल अखंड प्रदीप्तावस्थेत होता" (पृ.३१३). किती प्रकारचे अनुभव इथे एकदम आले आहेत! या संयुक्त अनुभवांकडे पाहिले की कर्नाटक संत कुठल्याकुठे पोचले होते याची काहीशी कल्पना येते. कन्नड भाषेतील पदांचा संग्रह करून व त्यातील साक्षात्कारदर्शक रत्ने वेचून गुरुदेवांनी त्या भाषेला ऋणी केले आहे.

कन्नड परमार्थसोपान

यात शंभराहून अधिक पदे असून तिथे धर्म, पंथ, संप्रदाय कसलाच भेद नाही. हिंदु-मुस्लिम काय किंवा शैव-वैष्णव काय सर्वच संतांच्या पदांचा इथे समावेश आहे. इथे स्त्री-पुरुष भक्त असा फरक केलेला नाही. हा संग्रह म्हणजे गुरुदेवांनी उभारलेला एक अनुभवमंटपच आहे. कित्येक संतांची नावेही अज्ञात होती, त्यांना इथे पाचारण केले आहे. मग त्यांत काव्यगुण नसेनात का. एवंच या पदांत खूप वैचित्र्य आहे, मात्र सर्वांमधून साक्षात्काराचे सूत्र गुंफलेले आहे.

क्वचित् प्रसंगी नेमाच्या वेळेस गुरुदेव पदे वाचून घेत. नेमानंतर त्यांवरील विवरण तोंडी सांगून लेखकाला लिहायला सांगत. त्यातला गर्भितार्थ नेमामध्ये उकलत असावा असा तर्क करता येतो. या पदांवर मनन होई आणि दशदिशांना धावणाऱ्या मनाला ताब्यात आणून त्याला नामावर स्थिर करण्यास त्याची मदत

होई. आपल्या समकालीनांची चार-दोन पदेही गुरुदेवांनी या पुस्तकात घेतली आहेत व काही लोकगीतांचा समावेश केला आहे. ज्यांत भक्तिभाव दिसेल त्या पदांना संतवाणीच्या या संग्रहात खुला प्रवेश मिळाला आहे, काव्याची शैली किंवा अलंकार यांची फारशी फिकीर केलेली नाही. ही पदे २० प्रकरणांत विभागलेली आहेत. पदांची मध्यवर्ती कल्पना पुढे मांडणारा इंग्लिश मथळा प्रत्येक पदाला दिला आहे. या इंग्लिश मथळ्यांचे म. श्री. देशपांडे यांनी पुढे कन्नड भाषांतर दिले आहे आणि इंग्लिश मथळे परिशिष्टात दिले आहेत. या मथळ्यांचा नीट अभ्यास केला की त्यांतून धर्माचे मानसशास्त्र व तत्त्वज्ञान या क्षेत्रात मोडणारे सगळे विषय आले आहेत हे लक्षात येते. त्यांचा रेखीवपणा आणि अचूकपणा पाहिल्यावर ते ठरवण्यासाठी गुरुदेवांनी किती विचार केला असेल त्याची काहीशी कल्पना येते. संपादकांनी जी टिपणे जोडली आहेत ती मुख्यतः इंग्लिश पुस्तकावर आधारित आहेत. भक्तिरसाने ओथंबणारी ही पदे साधकाला परमार्थमार्गावर दीपस्तंभासारखी मार्गदर्शन करतात.

(उ) एकनाथवचनामृत

एकनाथांचे वाङ्मय विविध विषयांनी नटलेले असून त्यांची साहित्यसंपदा विपुल आहे. ज्या श्रीमद् भागवत-महापुराणाला वैष्णव संप्रदायात पाचव्या वेदाचे स्थान दिलेले आहे त्यातील अकराव्या स्कंधावर लिहिलेली एकनाथांची टीका इतकी प्रसिद्ध आहे की मराठी भाषकांना भागवत म्हटल्याबरोबर एकनाथी भागवतच आठवावे. एकनाथी भागवताबरोबर रुक्मिणीस्वयंवर, भावार्थरामायण व इतर स्फुट आध्यात्मिक ग्रंथ यांतून काढलेले हे वेचे आहेत. भागवतावर विस्तृत टीका लिहून एकनाथांनी भागवत धर्माला स्थैर्य दिले. रुक्मिणीस्वयंवर हा एक रूपकात्मक ग्रंथ आहे व जीव-शिव यांचे ऐक्य हा त्यातला मूळ विषय रुक्मिणी व कृष्ण यांच्या विवाहाच्या रूपकाने मांडला आहे (प्रस्तावना पृ.३२). लोकजागृती हा भावार्थरामायणाचा उद्देश आहे. या ठिकाणी रामायणातील विषयांच्या अनुषंगाने तत्कालीन समाजाची स्थिती कशी रसातळाला गेली होती ते दाखवले आहे. कर्मठपणा, अहंकार, विश्वासघात, भ्रामक समजुती यांनी पोखरून गेलेल्या

समाजाचे रूपकांच्या मदतीने व कधी उपहासाने नाथांनी वर्णन केले आहे (प्रस्तावना पृ. ३३-३४). प्रस्तावनेत सर्व वेच्यांचा अतिशय सोप्या भाषेत सारांश दिल्याने पुढील भाग वाचणे सोपे होते. सर्व वेचे विषयवार मांडलेले आहेत. त्यांना दिलेले मथळे इतके अर्थपूर्ण आहेत की अनुक्रमाणिका नीट वाचून सर्व मथळे नीट ध्यानांत घेतले की या वेच्यांचा गोषवारा लक्षात येतो. शेवटी कठीण शब्दांची सूची दिली आहे.

एकनाथांचे वाङ्मय संपूर्ण वाचणे सामान्य माणसाच्या आटोक्याबाहेरचे आहे. पण या सुंदर वेच्यांनी वाचकांना त्यांतील अमृत मिळाल्याचे समाधान होते. नीतिमार्गाने मिळणारी चिरंजीवता (पृष्ठे १३८ ते १४१) किंवा स्वामित्व विसरे रघुनाथ। दासत्व विसरे हनुमंत। (पृष्ठे १९३-१९४) अशासारखे भाग पुनः पुन्हा मनात रुंजी घालत राहतात.

(ऊ) परमार्थमंदिर

हिंदी, मराठी आणि कन्नड संतांची पदे व तुरळकपणे आलेले संस्कृत श्लोक अशा पाचशेहून अधिक पदांचा हा संग्रह आहे. परमार्थमार्गावरील गुरुदेवांच्या ग्रंथांच्या आधारग्रंथांतून ही पदे बहुशः आली आहेत. यांतली कित्येक पदे निंबरगी महाराजांच्या वेळेपासून प्रचलित असून भाऊसाहेब महाराज व अंबुराव महाराज यांच्या वेळेस म्हटली जात. या पदांतील तेजनादांचे अनेक अनुभव भाऊसाहेब महाराजांना आले होते आणि म्हणून या पदांना वेगळेच पावित्र्य आहे. तंबोऱ्याच्या साथीने रागदारीत बसवलेले आध्यात्मिक गीतांचे संगीत गुरुदेवांच्याही अनुभवाला आले आहे. ही परमार्थप्रेरित पदे जमवण्याच्या खटपटीमागे ही अशी कारणे आहेत. ह्या पदांद्वारे आपल्या आध्यात्मिक संप्रदायातील विचारसरणी व साधनप्रक्रिया यांचे सारच गुरुदेवांनी वाचकांसमोर मांडले. अर्थातच नीती व परमार्थ हे विषय जिथे आहेत तीच पदे निवडली आहेत.

या पुस्तकाशी एक वैयक्तिक प्रसंग निगडित आहे. या पुस्तकाचे शीर्षक अगदी योगायोगाने सुचलेले आहे. निंबाळला एकदा दुपारच्या बैठकीच्या वेळेला ख्यातनाम कन्नड संतकवी पुरंदरदास यांचे नरवृंदवेंब काननदल्लि हे पद कुणीतरी

म्हटले. पदाचा सारांश असा आहे की मानववृंद नावाच्या अरण्यात हरिनामरूपी कल्पवृक्ष उगवतो. विश्रांतीसाठी गार सावली असून चाखण्यास मधुर फळे असतात. जिव्हा नाममंत्राची रुची घेते. मुनीजनांची ही परमागती आहे. हेच ब्रह्मादिकांचे निर्मल हृदयपीठ आहे. हीच द्वारावती, हाच क्षीरसागर. हेच पुरंदर विठ्ठलाचे वैकुंठमंदिर. पदाची शेवटची ओळ 'इदे पुरंदरविठलन वैकुंठमंदिर' अशी आहे. यातील वैकुंठमंदिर हा शब्द ऐकून गुरुदेव एकदम खूष झाले आणि उद्‌गारले : "बस, बस, बस, आपल्या पदसंग्रहाला परमार्थमंदिर हे शीर्षक द्यायचे. पुरंदरदासांचे वैकुंठमंदिर तसे आपले परमार्थमंदिर. ही ५०० पदे त्याचे स्तंभ आहेत. परमार्थसोपानानंतर परमार्थमंदिर हवेच". परमार्थमार्गावरील त्यांचे ग्रंथ यापूर्वीच प्रसिद्ध झाले होते. त्यानंतर परमार्थमंदिर येणे अगदी उचित होते. या पुस्तकाचा एक विशेष म्हणजे इथे पदे अकारविल्हे घेतली आहेत. त्यामुळे ती शोधणे सोपे जाते. कन्नड पदे देवनागरी लिपीत छापली आहेत.

६. प्रस्थानत्रयीवरील ग्रंथ : तत्त्वज्ञान व साक्षात्कारशास्त्र

(अ) ए कन्स्ट्रक्टिव्ह सर्व्हे ऑफ उपनिषदिक फिलॉसॉफी

उपनिषदांमध्ये तत्त्वज्ञान व आध्यात्मिक अनुभव यांचे शिखर गाठलेले दिसून येते. त्यांचा चिकित्सक अभ्यास जितका कठीण तितकेच त्याचे फल बोधप्रद आहे. तीक्ष्ण बुद्धी व विचार अभिव्यक्त करण्याची हातोटी या दोन गोष्टींच्या आधाराने गुरुदेवांनी उपनिषदांतील तत्त्वज्ञान वाचकांपुढे मांडले. त्यामध्ये तत्त्वज्ञानांतर्गत सगळ्या शाखांची - मानसशास्त्राचीसुद्धा - हजेरी लागली आहे. ज्यांना उपनिषदांचा सखोल अभ्यास करायचा आहे त्यांना या पुस्तकाची मदत घेणे अनिवार्य आहे.

भारतामध्ये जे अनेक तत्त्वविचारांचे प्रवाह आहेत त्यांचा उगम उपनिषद्‌रूपी गंगोत्रीहून झालेला आहे. सर्व प्रकारच्या विचारद्रव्यांच्या या साठ्यातील तात्त्विक व आध्यात्मिक प्रमेये शोधून पाश्चात्त्यांच्या पद्धतीने त्यांची रचना करणे हे एक आव्हान होते. उपनिषदांची योग्यता गुरुदेवांना माहीत होती आणि म्हणून गतकालापासून भरत आलेले हे रत्नभांडार विचारवंतांपुढे खुले करणे जरूर

आहे अशी त्यांची भूमिका होती. पाश्चात्त्य विद्वानांची उपनिषदांवरील मते त्यांनी चांगली अभ्यासली होती. तसेच पूर्ण विचारांती त्यांची स्वतःची गोळीबंद मते तयार झाली होती. ग्रीक भाषा त्यांना उत्तम अवगत होती. प्राचीन ग्रीक कालापासून ते थेट आजपर्यंत विस्तारत आलेल्या पाश्चात्त्य देशातील तात्त्विक व आध्यात्मिक विचारस्रोतात त्यांनी अवगाहन केले होते. तत्त्वज्ञानाचा त्यांचा व्यासंग दांडगा होता. भारतीय व पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाची परिभाषा त्यांच्या जिभेवर होती, इंग्रजीवर प्रभुत्व होते. तात्त्विक प्रमेयांचे महत्त्व व त्यांचे स्थान त्यांनी ओळखले होते. शिवाय या सर्वांना साक्षात्काराचे दृढ अधिष्ठान होते. इतकी सामुग्री असल्याने त्यांनी विणलेले उपनिषदांतील तत्त्वज्ञानावरील हे सणंग साहजिकपणेच बहुमोलाचे झाले आहे.

भारतात काय किंवा युरोपात काय जे प्राचीन विचारधन आपल्यापर्यंत पोचले आहे ते गोपाळकाल्याच्या स्वरूपात होते. आजच्या लोकांना रुचेल व पचेल अशा रीतीने ते सांगणे जरूर होते. यासाठी विश्लेषण म्हणजे जटिल सिद्धांतांचे धागेदोरे कुशलतेने वेगळे करणे, व संश्लेषण म्हणजे हे धागेदोरे सुबक आकृती होईल असे गुंफणे, या दोन गोष्टी क्रमप्राप्त होत्या. कोणतेही उपनिषद् घेतले तरी त्यात मानसशास्त्र, सत्ताशास्त्र, नीतिशास्त्र किंवा साक्षात्कारशास्त्र यांबद्दलची मते असतात. ती सर्व निवडून उपनिषदांतून बाजूला काढून त्या त्या शास्त्राकडे सुपूर्त करायची असतात. उदाहरणार्थ सर्व उपनिषदांतून नीतिशास्त्रीय विचार आहेत. सुरवातीला इतर सर्व विषयांवरील मते बाजूला ठेवून प्रत्येक उपनिषदातून फक्त नीतिशास्त्रीय विचारच निवडले जातात. या नैतिक प्रमेयांची मग शिस्तवार मांडणी केली जाते व 'उपनिषदांतील नीतिविचार' असे तिचे रूप तयार होते. अशा रीतीने उपनिषदे समोर ठेवून त्यात ठिकठिकाणी असलेले विशिष्ट विषयावरील विचार एकत्र बांधून या पुस्तकातील प्रकरणे तयार झाली आहेत. ज्या विषयावरील उपनिषदांचे सिद्धांत हवे असतील त्या विषयाचे प्रकरण उघडले की वाचकाचे काम होते.

सुरवातीस उपनिषदांची ऐतिहासिक पार्श्वभूमी दिली आहे. 'अपौरुषेय' म्हणजे

काय हे स्पष्ट केले आहे. आपले धर्मग्रंथ कुणी लिहिलेले नाहीत तर 'ऐकलेले' (श्रुती) आहेत असे आपण मानतो. श्रुती म्हणजे बाह्य जगातल्या कोण्या व्यक्तीने येऊन सांगितलेला निरोप नाही, ती अंतःप्रेरित आहे; ईश्वराशी तल्लीन झालेल्या अवस्थेत मनुष्याला प्राप्त झालेले ते अंतःस्फूर्त ज्ञान आहे (पृ.६). तात्त्विक-आध्यात्मिक विचारांनी भरलेल्या या उपनिषदांमध्ये नुसत्या हकिकती किंवा लांबचलांब चर्चा नाहीत, कधी ती काव्यालंकारांनी नटली आहेत तर कधी ती अगदी बाळबोध भाषेत मौलिक तत्त्वे सांगून जातात. ऋषींच्या विचारांची खोली गहन आहे. आणि त्यांत वाङ्मयीन माधुर्यही आहे. ऋषींनी सत्याच्या शोधासाठी वापरलेल्या दहा पद्धती गुरुदेवांनी सांगितल्या आहेत व त्यांना नावे दिली आहेत.

माणूस कुठल्याही काळातला किंवा स्थळातला असो त्याची विचार करण्याची पद्धती एकच असते. प्राचीन ग्रीसमधील तत्त्वज्ञ व उपनिषदांचे ऋषी यांच्या चिंतनात खूप साम्य आहे. जलापासून, वायूपासून, अग्नीपासून, असत्पासून किंवा सत्पासून जग निर्माण झाले अशी मते दोन्ही ठिकाणी आहेत. बाह्य जगात दिसणाऱ्या या द्रव्यांना विश्वोत्पत्तीचे कारण समजणे स्वाभाविक होते. यांतूनच पुढे विश्वनिर्मात्याची संकल्पना आली. उपनिषदांचा अभ्यास आपल्याकडे नेहमीच होत आला असूनही त्यांतील मानसशास्त्रीय तत्त्वे दुर्लक्षितच राहिली होती. या ग्रंथात त्यांचा परामर्श घेतला गेला असून बुद्धिशक्ती, इच्छाशक्ती आणि भावनाशक्ती या मनाच्या शक्तींची पाहणीही केलेली आहे. आज मानसशास्त्रात मूलभूत समजल्या जाणाऱ्या कोटींच्या परिभाषेत उपनिषदांतील मंत्रांचे वर्णन केले आहे. तत्कालीन ऋषींनी जागृती, स्वप्न व सुषुप्ती या अवस्थांचे विश्लेषण केले, एवढेच नव्हे तर तुर्यावस्थेचेही वर्णन केले आहे. तुर्यावस्था म्हणण्यापेक्षा हिला स्वसंवित् म्हणणे गुरुदेवांना जास्त पसंत आहे. मॅडम ब्लॅव्हॅट्स्की व इतर काही मंडळींनी नंतर ज्या गोष्टीचा खूपच बोलबाला केला त्या प्रश्नाबाबतसुद्धा ऋषींनी काही लिहून ठेवले आहे. याला मानसशास्त्राने 'परामानसिकीय अनुसंधान' असे जाडेजुडे नाव दिले आहे. परलोकी गेलेला आत्मा तिथून कोणातरी व्यक्तीच्या

माध्यमातून इहलोकाशी संपर्क साधतो असा या मंडळींचा दावा होता. मृत्यूत्तर आत्म्याचे काय होते ही समस्या त्यांच्या नजरेतून सुटली नव्हती. मृत्यूत्तर अवस्था व अमरत्व याबद्दल निरनिराळ्या उपनिषदांची निरनिराळी मते होती. सलोकता, समीपता, सरूपता आणि सायुज्य या चार मुक्तिप्रकारांचे बीज उपनिषदांत आहे. मृत्यूत्तर जीवनाबद्दलच्या त्यांच्या संकल्पनांना नैतिक पाया आहे, कारण मनुष्य इहलोकी काय करतो यावर त्याचे परलोकातले जीवन अवलंबून असते असे ती म्हणतात. पेरावे ते उगवते हेच खरे. ऋत ही विश्वाला चालवणारी नैतिक शक्ती, वेदकालापासून ज्ञात आहे. नैतिक नियमांकडे सर्वाधिपत्य आहे. सूर्य-चंद्र, पर्वत-समुद्र, द्यावापृथिवी यांच्या हालचाली त्याच्यामुळेच होतात. मनुष्याचे कर्म त्याला ऐहिक व पारलौकिक फळ देत असते हे हा नियम मान्य करतो. भारतीय तत्त्वज्ञानाने मानलेली षड्दर्शने म्हणजे न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, मीमांसा व वेदांत या दर्शनांचीच नव्हे तर बौद्ध तत्त्वज्ञानासारख्या नास्तिक विचारांची बीजेही उपनिषदांत आहेत. भगवद्गीतेचा इथे विशेष उल्लेख करावा लागेल कारण अनेक ठिकाणी तिचे शब्दशः व अर्थशः उपनिषदांशी साम्य आहे. मूळ झरा अर्थात्च वेदांमध्ये आहे. वेदांतील काव्य व कर्मकांड यांऐवजी उपनिषदांत तात्त्विक विचारसरणी व ज्ञानकांड आढळते. कालांतराने ज्यांना ज्या संकल्पना आवडल्या, त्या त्यांनी उचलल्या आणि त्यानुसार विविध तत्त्वज्ञानशाखा आकाराला आल्या.

उपनिषदांतील अंतिम तत्त्वाची समस्या इथे हाताळली असून विश्वशास्त्रीय, ईश्वरशास्त्रीय व मानसशास्त्रीय असे दृष्टिकोन घेतले आहेत. या प्रकरणातील संपूर्ण मांडणी कांट-छापाची आहे. अंतिम तत्त्वाचा शोध लावण्यास अपरोक्ष अनुभवच हवा असा अखेर निष्कर्ष काढला आहे. "जे जे काही ज्ञेय आहे व जे कोणी ज्ञाते आहेत ते अवघे पूर्ण ब्रह्मात समाविष्ट आहेत. छांदोग्य उपनिषद् उद्गारते - सर्वं खल्विदं ब्रह्म" (पृ.२०३).

परायत्तता व स्वायत्तता, आध्यात्मिक कर्ममार्ग, व्यावहारिक कर्ममार्ग किंवा उभयसुखवाद या सर्वांचे मूळ उपनिषदांत आहे असे सांगून गुरुदेव अतिनीतिवादाकडे

वळतात. नीती-अनीती यांच्या पलीकडे जाणे, सर्व नैतिक भेद व्यावहारिक पातळीवर सोडून निर्द्वंद्व होणे ही नीतिशास्त्रातील अतिनीतीची संकल्पना व सर्व प्रकारची द्वैते जिथे ओलांडली आहेत ती सत्ताशास्त्रातील अद्वैतवादाची संकल्पना या दोन्ही एकच आहेत. द्वैताकडून अद्वैताकडे जाणे हे अंतिम ध्येय दोन्ही ठिकाणी आहे.

शेवटच्या प्रकरणात साक्षात्कारशास्त्रातील सिद्धांत व ते आचरणात आणण्याच्या प्रक्रिया उपनिषदांच्या आधारे सांगितल्या आहेत. ॐ चे ध्यान, साधकाचे विविध अतींद्रिय अनुभव, त्या अनुभवांचे त्याच्यावर होणारे परिणाम यांचा इथे उल्लेख आहे. अखेरीला आपण वाचतो की साधक ईश्वरोन्मादाच्या अवस्थेत स्वच्छंदपणे गीत गात राहतो. भूतांना परस्परांविषयी मैत्र पडले आहे असे हे गीत सांगते. सगळे ब्रह्ममय झाल्यावर विसंवाद कुठला?

कोणत्या उपनिषदातील कोणते मंत्र घेतले आहेत हे दाखवणारी सूची व संदर्भ ग्रंथांबद्दलचे टिपण, यामुळे पुस्तकाची उपयुक्तता वाढली आहे. चर्चेला घेतलेले उपनिषदांतील मूळ मंत्र प्रत्येक प्रकरणाअखेरीस दिले आहेत. यामुळे ज्यांना कुणाला तौलनिक अभ्यास करायचा आहे, मूळ मंत्र व विवरण ताडून पहायचे आहे, किंवा आणखी संशोधन करायचे आहे त्यांची फार सोय झाली आहे. गुरुदेव इथे दाखवून देतात की उपनिषदांमध्ये जीवनाचे सर्वस्पर्शी चित्रण असले तरी ऋषींचे डोळे मात्र सदैव आत्मसाक्षात्कारावर खिळलेले आहेत. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातला गुरुदेवांचा अधिकार इथे प्रथमदर्शनीच दृग्गोचर झाला. जगामधील श्रेष्ठ विचारवंतांचे लक्ष त्या ग्रंथाकडे एकदम गेले हे नवल नाही. आर. झिमरमान म्हणतो, "आपल्या ग्रंथाकडे ओझरता दृष्टिक्षेप टाकला तरी आपण डॉयसनच्या 'फिलॉसॉफी ऑफ दि उपनिषदस्' या ग्रंथाच्या कितीतरी पुढे गेला आहात हे चटकन ध्यानात येते". त्या काळी उपनिषदांचा अभ्यास करण्यास डॉयसनच्या ग्रंथावाचून दुसरा तरणोपाय नव्हता.

गुरुदेवांच्या या ग्रंथांचे रं. रा. दिवाकर, द. रा. बेंद्रे व शं. बा. जोशी या तिघांनी 'उपनिषद्रहस्य' या नावाने कन्नडमध्ये भाषांतर केले असून ते १९२८

सालीच प्रसिद्ध झाले आहे. त्याची तिसरी आवृत्ती नुकतीच म्हणजे १९९९ साली प्रसिद्ध झाली. गुरुदेवांच्या पुस्तकाचे इतके सरस व प्रासादिक भाषांतर दुसरे कुठलेच नाही. त्या भाषांतराचा आढावा घेण्याचे हे स्थान नाही, पण या भाषांतराचा निदान उल्लेख केल्यावाचून पुढे जाणे शक्य नव्हते कारण खुद्द गुरुदेवांनी त्याला प्रस्तावना लिहिली असून त्यात, 'काही काही ठिकाणी हे भाषांतर मूळ इंग्रजीपेक्षा चांगले झाले आहे' असे त्याला शिफारसपत्र दिले आहे.

(आ) दि क्रिएटिव्ह पीरिअड

हा ग्रंथ डॉ. एस. के. बेलवलकर आणि प्रा. आर. डी. रानडे असा दोघांनी मिळून लिहिलेला आहे. उपनिषदांचे चिकित्सक विवरण असलेला भाग गुरुदेवांचा आहे. त्यांच्या लिखाणाची कित्येक वैशिष्ट्ये इथे दिसतात. कोणताही विषय घेतला की तो आणखी कुठेकुठे दिसतो हे गुरुदेव नेहमी पाहत असतात. "स्कँडिनेव्हियन पुराणकथांची सुरुवात 'हैमस्क्रिंगला' अशी होते म्हणून त्या कथांचे नावच जसे हैमास्क्रिंगला पडले तसेच 'ईशावास्यमिदं'... अशी सुरवात असल्याने त्या उपनिषदाचे नावच ईशावास्योपनिषद् असे पडले" (पृ.१६८) असे सांगताना ते आपल्याला एकदम दूरदेशच्या वाङ्मयापर्यंत घेऊन जातात. या पुस्तकातील तौलनिक अभ्यासात ग्रीक शब्द, ग्रीक वाक्प्रचार, ग्रीक तत्त्वज्ञ व त्यांचे विचार, तसेच ग्रीक पुराणकथा वैपुल्याने सापडतात. भिन्न भिन्न मतांचा समन्वय कुठे आहे याकडेही गुरुदेवांचे लक्ष आहे. उदाहरणार्थ ईशोपनिषदात जुने कर्मकांड व नवीन सत्ताशास्त्रीय सिद्धांतांचा समन्वय आहे असे ते नमूद करतात. जे काही घडते ते देवाच्या इच्छेने घडते हा सत्ताशास्त्रीय सिद्धांत आहे. तो शिरोधार्य मानून त्यापुढे मान तुकवण्यातच आपले कल्याण आहे ही नैतिक शिकवणूक उपनिषदांत दिसते, तिच्याकडे गुरुदेव वाचकांचे लक्ष वेधतात (पृ. १७०). यापाठोपाठ शरणागती येतेच. "एका उदात्त भावनेने प्रेरित होऊन या कामाला सुरवात झाली आहे आणि ईश्वराच्या मनात असेल तर भारावून टाकणारी ती भावनाच या कामाला अखेरपर्यंत साथ देईल" (प्रस्तावना पृ. xx). आपल्या प्रयत्नात काही उणीव राहू द्यायची नाही, पण अखेरचे यश देणे

परमेश्वराकडेच आहे हे मानायचे, ही वृत्ती 'देवाच्या मनात असेल तर' अशा शब्दांतून दिसते. ही शरणागतीची भावना त्यांच्या सर्वच लिखाणातून आहे. "सत्ताशास्त्रातील समस्यांबद्दल आपली एक ठाम भूमिका बनवणे हा प्रस्तुत लेखकाचा उद्देश आहे. देवाच्या मनात असेल तर ॲकेडेमीच्या दि पाथवे टु गॉड या आगामी प्रकाशनात ते साधेल".[६८]

उपनिषदांच्या वरवर अगदी साध्या दिसणाऱ्या शब्दांमागे दडलेले तात्त्विक सिद्धांत शोधून काढून त्यांचा पायरीपायरीने उलगडा करण्याचे गुरुदेवांचे कौशल्य अमाप होते. विद्या व अविद्या, संभूती व असंभूती या संकल्पनांची त्यांनी केलेली छाननी पाहावी. सुरवातीलाच सांगितले आहे की कोणताही प्रश्न सोडवण्यापूर्वी मनातले सर्व पूर्वग्रह काढून टाकले पाहिजेत. मग विद्या व अविद्या यांचे विश्लेषण सुरू होते. ईशोपनिषद् म्हणते की अविद्या आपल्याला अंधाराकडे नेते आणि विद्या आणखीनच गडद अंधाराकडे नेते. आश्चर्य आहे! तात्त्विक दृष्ट्या तर विद्या अधिक श्रेष्ठ आहे आणि तिने प्रकाशाकडे नेले पाहिजे, घनांधकाराकडे नाही. मग असे कसे घडते? एका सुसूत्र युक्तिवादाच्या साहाय्याने दिलेले याचे उत्तर आपल्याला इथे मिळते. उपनिषदाला जे सांगायचे आहे ते ज्ञानशास्त्र व नीतिशास्त्र यांच्या माध्यमांतून सांगितले आहे. अविद्या व विद्या या शब्दांचे अर्थ ग्रीक ज्ञानशास्त्राप्रमाणे केले पाहिजेत. अविद्या म्हणजे साधे व्यवहारातले ज्ञान, विद्या म्हणजे विद्वत्ता. ज्ञानाच्या दोन पातळ्या असून विद्या अविद्येपेक्षा श्रेष्ठ आहे. आता श्रेष्ठ प्रतीचे ज्ञान अंधाराकडे घेऊन जाते या म्हणण्यात जो विरोधाभास दिसतो त्याची नीतिशास्त्राच्या थापटण्याने परीक्षा केली आहे. विद्येबरोबर बहुशः अहंकार येतो. विद्येने अहंकार आला तर ती श्रेष्ठ कसली? अहंकाराने व्याप्त झालेली विद्या अविद्येपेक्षाही निकृष्ट ठरते हे सुचवण्यासाठी ती आणखी दाट अंधाराकडे नेते असे म्हटले आहे. हे कोडे सुटण्याची युक्ती म्हणजे उपनिषदांतील नुसत्या शब्दांकडे न पाहता ऋषींना खरोखर काय सांगावयाचे आहे हे लक्षात घेणे. नुसते शब्द पाहिले तर ते आडवाटेला नेतात. गुरुदेवांच्या या तात्पर्यनिर्णयामुळे पुढच्या ओळीचा अर्थ

लावणे सुलभ होते. अविद्या व विद्या या दोन्हींच्या मदतीने अमरत्व मिळते म्हणजे अविद्येला जितक्याच तितकीच किंमत दिली पाहिजे, जास्त नको आणि विद्येचा अहंकार चढू देता कामा नये. खरे ज्ञान मिळवताना काय टाकायचे व काय घ्यायचे हे समजायला हवे. असंभूती व संभूती यांचा असाच अर्थ केला पाहिजे. हा अर्थ स्वीकारला की अविद्या किंवा कर्म आणि विद्या किंवा ज्ञान यांपैकी एकाच पक्षावर भाष्यकारांनी जो निष्कारण भर दिला आहे तसा द्यावा लागत नाही. कर्ममार्ग आणि ज्ञानमार्ग या दोहोंच्या योग्य मिलाफाने परमेश्वरप्राप्ती होते (पृ. १७१ पासून पुढे).

भाषाशास्त्र व तत्त्वज्ञान यांचाही असाच योग्य मिलाफ करावा असे गुरुदेवांचे म्हणणे आहे. पृ. २३७ वर प्रश्न आला आहे की ब्रह्मचर्य या शब्दाचा अर्थ काय? ब्रह्मचर्य म्हणजे अविवाहित राहणे, की यज्ञकर्म करणे, की मौन पाळणे, की उपवास करणे, की अरण्यवास करणे? अशा प्रश्नांच्या सरबत्तीला छांदोग्य उपनिषदाचे उत्तर आहे की ब्रह्मचर्य म्हणजे यांपैकी काहीच नाही. ब्रह्मचर्य म्हणजे ब्रह्मात राहणे. छांदोग्य उपनिषदाच्या ऋषींनी ब्रह्मचर्य शब्दाची फोड केल्यामुळे त्यांना हा अर्थ गवसला. ब्रह्मचर्य म्हणजे ब्रह्मात राहणे किंवा आत्मप्राप्ती करून घेणे. एवंच, इथे "उपनिषदांतील तत्त्वज्ञानाचा आढावा आहे आणि त्याकाळी दिसून येणारी ज्ञानाबद्दलची तीव्र जिज्ञासा व आध्यात्मिक जीवनाची ओढ स्पष्ट करून दाखवली आहे" (त्या पुस्तकाला जोडलेल्या आउटलाइन स्कीम फॉर दि हिस्ट्री ऑफ इंडियन फिलॉसॉफी मधील पृ.६).

(इ) वेदान्त दि कल्मिनेशन ऑफ इंडियन थॉट

गुरुदेवांच्या लेखनाचा अभ्यास करणाऱ्याला हे पुस्तक अडचणीत टाकते. त्यांच्या निर्याणापूर्वी पुस्तकाची संपूर्ण चौकट तयार झालेली होती. टिपणांच्या साहाय्याने मजकूर लिहिण्याचे काम त्यांच्या विद्यार्थ्यांनी केले आहे. विषय 'सोनियाचा करून पुढे ठेवण्याचे' गुरुदेवांचे कसब विद्यार्थ्यांच्या लेखण्यांतून नव्हते. ज्या टिपणांच्या आधारे पुस्तक लिहिलेले आहे ती पुस्तकाच्या शेवटी दिली आहेत. यांत चर्चेसाठी निवडलेली वेदान्तसूत्रे आहेत. गुरुदेवांचे संदर्भग्रंथ-

विषयक टिपण पाहावे. त्यात संदर्भग्रंथांची नावेच काय पण त्या ग्रंथांची वैशिष्ट्येही सांगितली आहेत. परिशिष्ट अ मध्ये वेदान्तसूत्रांच्या गुरुदेवांच्या स्वतःच्या अभ्यासाची रूपरेखा आहे, आणि पुस्तकासाठी केलेले इतर एकदोन आलेख दिले आहेत. त्यांनी स्वतः पुस्तक लिहिले असते तर त्यातला कोणता आलेख वापरला असता हे सांगणे कठीण आहे.

ग्रंथ पूर्णपणे तत्त्वज्ञानावरील आहे. तरीही कित्येक वर्षांपूर्वी म्हणजे १९२० च्या आसपास तयार करून ठेवलेल्या टिपणांत ईशसाक्षात्काराचे जे सूत्र आहे ते लपून रहात नाही. उत्तरोत्तर शुष्क बुद्धिवादाबद्दल त्यांना आस्था वाटेनाशी झाली. भगवद्गीतेवरील पुस्तक जसे त्यांनी स्वतः लिहिले तसेच वेदान्तावरील लिहिले असते तर कदाचित ते अगदी वेगळे झाले असते; गहन तत्त्वज्ञानाची त्यात भरती झाली नसती. कुणाला माहीत, हा ग्रंथ 'वेदान्त म्हणजे ईश्वरसाक्षात्काराचे तत्त्वज्ञान' या स्वरूपात आपल्यापुढे आला असता ! आणखी एक गोष्ट म्हणजे 'सम्मम बोनम' या शेवटच्या प्रकरणाला दि फ्युचर ऑफ वेदान्त असा उपमथळा द्यावा असे एक त्यांच्या मनात होते.

भारतीय तत्त्वज्ञानाचे परिपक्व फल वेदान्त दर्शनात दिसून येते. न्याय किंवा बौद्ध तत्त्वज्ञानांमधून तात्त्विक सिद्धांतांचा कीस काढलेला दिसतो. पण वेदान्त दर्शनात हाताळलेल्या मूलभूत प्रश्नांचा व्याप कोणत्याही दर्शनापेक्षा मोठा आहे. वेदान्तावरील या पुस्तकात वेदान्ताचार्यांची मते नुसती पुढे ठेवलेली नाहीत, तर त्यांचे खंडन-मंडन केले आहे. षड्दर्शनांपैकी न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, व पूर्वमीमांसा यांच्या पार्श्वभूमीवर उत्तरमीमांसा दर्शनाचे विवरण आहे. परंपरागत पद्धतीप्रमाणे पूर्वमीमांसा दर्शनाला नुसते मीमांसा व उत्तरमीमांसा दर्शनाला वेदान्त म्हटले आहे. चार्वाक, बौद्ध व जैन या नास्तिक तत्त्वज्ञानांचाही विचार केलेला आहे. किंबहुना गुरुदेवांनी ज्यांना 'षड्दर्शने' म्हटले आहे. त्यांत आस्तिक व नास्तिक दोन्ही तत्त्वज्ञानांचा समावेश आहे. त्यांच्या एका टिपणात खालील उल्लेख मिळतो :- "षड्दर्शने : (१) सांख्य (२) योग (३) बौद्ध (४) जैन (५) न्याय-वैशेषिक व (६) मीमांसा". बहुतेक ठिकाणी वेदान्त दर्शनाखेरीज इतर

सर्व दर्शनांना पूर्वपक्ष व वेदान्ताला उत्तरपक्ष मानले आहे. त्या त्या दर्शनाची मते मांडून त्यावरील वेदान्ताचे खंडन-मंडन दिले आहे. म्हणूनच चर्चेत सर्व ठिकाणी या दर्शनांची मते सुरवातीस व वेदान्तमत अखेरीस घेतलेले असते. वेदान्तमत हे केव्हाही इतर मतांच्या विरुद्ध असते असा मात्र याचा अर्थ नाही. त्यांत अनेक ठिकाणी साम्यच नव्हे तर मतैक्य आहे, एकमेकांच्या मतांचा आपसांत संबंध आहे व परस्परांवर त्यांचा परिणाम झाला आहे. हे सर्व या पुस्तकात वाचायला मिळते. ठिकठिकाणी भारतीय व पाश्चात्त्य मतांची तुलना केली आहे. इतरत्र आहे तशीच कांटची पद्धती व त्याची परिभाषा डोळ्यात भरते. वेदान्त दर्शनाच्या प्रत्येक मतात गुरुदेव सहभागी आहेतच असे नाही; त्यांची स्वतःची मते कित्येकदा वेगळी आहेत. बड्या बड्या श्रेष्ठींच्या विरुद्ध असणारी आपली मते ते निर्भीडपणे मांडतात.

अद्वैत, विशिष्टाद्वैत किंवा द्वैत यांपैकी एखाद्याच संप्रदायाला वेदान्त म्हणणे योग्य नाही. ब्रह्मसूत्रे किंवा वेदान्तसूत्रे यांची विशिष्ट दिशांनी केलेली वेगवेगळी विवरणे म्हणजेच वेदान्ताचे विभिन्न संप्रदाय. मूळचे वेदान्तमत म्हणजे बादरायणांनी रचलेली वेदान्तसूत्रे. इतर कोणत्याही सूत्रांप्रमाणे ही सूत्रे सुद्धा अल्पाक्षर आहेत आणि त्यांचा अर्थनिर्णय करण्यात भिन्न (प्रसंगविशेषी विरुद्ध) मते पुढे येण्याला भरपूर वाव आहे. गुरुदेवांचा हा ग्रंथ मूळ सूत्रांवर आधारित आहे. सूत्रे जागोजाग उद्धृत केली आहेत आणि त्यांवर स्वतःचे मत दिले आहे. सांप्रदायिक आचार्यांची मते त्यांना कधी मान्य असतात, कधी नाही. एकूण कल अद्वैताच्या बाजूला आहे हे निश्चित. पण इतर संप्रदायांच्या आचार्यांची मते आदरपूर्वक सांगितली आहेत. उदाहरणार्थ, वेदान्तसूत्र ३.२.२५ यावर व्याख्यान करताना ते म्हणतात, "अभ्यास या शब्दाचा अर्थ मध्वाचार्यांनी अखंड चिंतन असा केला आहे, आणि तो योग्य आहे". (पृ.७२).

सत्ताशास्त्राच्या प्रकरणात पदार्थविचार आहे. विद्वानांनी मांडलेल्या अनेक पदार्थांची पाहणी केल्यावर असे आढळून येते की इतके पदार्थ मानण्याची आवश्यकता नाही. वेदान्तमताप्रमाणे आत्मा हा एकच अंतिम पदार्थ मानणे

बरोबर आहे. पदार्थाप्रमाणेच प्रमाणांची चिकित्सा करून अपरोक्षानुभूती हे एकच अंतिम प्रमाण मानावे असे गुरुदेव सुचवतात. हे न्यायप्राप्त आहे कारण अंतिम तत्त्व जर चैतन्यस्वरूप असेल तर त्याचे ज्ञान होण्यास प्रत्यक्ष अनुभूतीच पाहिजे, इतर प्रमाणे उपयोगाची नाहीत.

केवळ बुद्धीच्या मदतीने अंतिम तत्त्वाचे ज्ञान होत नाही व त्याचे वर्णन करता येत नाही या भूमिकेवर ज्ञानशास्त्र व सत्ताशास्त्र एकत्र येतात. तर्कशास्त्रात म्हणजे बुद्धीच्या क्षेत्रात ईश्वराचे ज्ञान करून देणारे प्रमाण जसे नाही तसाच सत्ताशास्त्रात ईश्वराचे वर्णन करणारा एकही पदार्थ नाही. ईश्वर सर्व पदार्थांच्या संकल्पनांच्या पलीकडचा किंवा सर्वातीत आहे. त्याला व्यक्तित्व चिकटवता येत नाही, तो व्यक्तित्वाच्या कोटीपलीकडील आहे (पृ.७५); एवढेच नव्हे तर तो आनंदाच्यासुद्धा पलीकडे आहे (पृ.८०).

चतुष्कोटी पद्धतीने केलेला एखादा युक्तिवाद आकृती काढून पुढे मांडण्याची गुरुदेवांना आवड होती. डोळ्यापुढे आकृती असली की विषय ताबडतोब समजतो. ज्ञानाची वैधता (किंवा सत्यत्व) आणि अवैधता (असत्यत्व) यांना स्वतःप्रामाण्य (ज्ञानाची सत्यता स्वयंसिद्ध असणे) आहे की परतःप्रामाण्य (सत्यासत्यत्व बाहेरून सिद्ध करावे लागणे) आहे? निरनिराळ्या दर्शनात मिळणारी यासंबंधीची मते :-

वैधता	अवैधता
(अ)	(ब)
स्वतः प्रमाण	परतः प्रमाण
(क)	(ड)

अबकक - - - - - - - सांख्य
अबडड - - - - - - - न्याय
अकबड - - - - - - - मीमांसा
अडबक - - - - - - - बौद्धमत

याचा अर्थ असा की सांख्यांच्या मते वैधता व अवैधता दोन्ही स्वतःप्रमाण आहेत; न्यायमतात वैधता व अवैधता दोन्ही परतःप्रमाण आहेत, मीमांसा दर्शनात वैधता स्वतःप्रमाण आहे पण अवैधता परतःप्रमाण आहे आणि बौद्ध तत्त्वज्ञानाप्रमाणे वैधता परतःप्रमाण असली तरी अवैधता स्वतःप्रमाण आहे (पृ.५८). चतुष्कोटींचा उपयोग केलेले आणखी एक उदाहरण पाहू. "सगुण व निर्गुण या दोन गोष्टींचा ईश्वराच्या बाबतीत विचार केला तर चार कोटी मिळतात, तीन नाही. (अ) ईश्वर सगुण आहे, (ब) ईश्वर सगुण-निर्गुण दोन्ही आहे (उभयलिंगम्); (क) ईश्वर निर्गुण आहे आणि (ड) ईश्वर सगुणही नाही व निर्गुणही नाही (अनुभयलिंगम्)" (पृ.७५). सामान्यपणे तीन कोटींचाच विचार केला जातो. पण गुरुदेवांना तार्किक प्रक्रिया पूर्ण करण्याची सवय असल्याने ते चौथी कोटी घालतात. हे त्यांच्या इतर ग्रंथांतूनदेखील दिसते.

त्यांच्या सत्ताशास्त्रीय व ज्ञानशास्त्रीय विचारांचा पिंड अद्वैताचा आहे. गौडपादाचार्य आणि शंकराचार्य यांच्या परंपरेनुसार ते जगाला माया समजतात यावरून हे उघड होते. "जे काही विकारात्मक आहे ते माया आहे; फक्त ब्रह्मच सत्य आहे" (पृ.८४). विकारात्मक जगाला व्यावहारिक सत्ता द्यावीच लागते. इंद्रियजन्य ज्ञानाच्या प्रत्येक क्षणी बाह्य जग अस्तित्त्वात आहे याची सुस्पष्ट जाणीव प्रत्येकाला होते. तरीही जगाला शाश्वत सत्ता देण्याचे कारण नाही; पारमार्थिक दृष्ट्या जग मायाच आहे. ही गोष्ट गुरुदेवांनी वेदान्त-सूत्र २.२.३० याचा साक्षात्कारात्मक अर्थ लावून दाखवली आहे. सूत्राचा अर्थ आहे की जग सत्य नाही कारण ते अनुभवाला येत नाही. साक्षात्कारी पुरुषाच्या दृष्टीने हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. कारण पारमार्थिक अनुभवाच्या वेळेस जगाचे अस्तित्व जाणवतच नाही (पृ.११६). अशा तऱ्हेचा निर्णय जो साक्षात्कारी आहे तोच देऊ शकतो कारण त्याला उन्मनी अवस्थेत फक्त ईश्वराचा अनुभव येत असतो; चित्सूर्याचा उदय झाला की विश्वाभास मावळतो. शंकराचार्यांचे या सूत्रावरील भाष्य फारच मिळमिळीत आहे. त्यांनी फक्त बौद्धमताचा तिथे उल्लेख केला आहे; आणि नेहमी त्यांच्या मतांत ठसठशीतपणे दिसणारा मायावाद या

ठिकाणी मुळीच आढळत नाही. गौडपादाचार्यांनीही घोषणा केली होती की स्वप्नात जसे मायेने होणारे मनाचे स्पंदन आहे तसेच जागृतीतही आहे. स्वप्न-जागृती दोन्ही माया आहेत, अद्वय ब्रह्मच फक्त सत्य आहे (गौडपादकारिका, ३.३० व ४.६२). गुरुदेवांचा वर पाहिलेल्या सूत्राचा अर्थ या छापाचा आहे. प्रपंच जसा व्यावहारिक दृष्ट्या सत्य व पारमार्थिक दृष्ट्या मिथ्या आहे तसाच जीवही आहे. दोन सत्तांचा सिद्धांत मानला की हे पटते. वेदान्ताचार्यांच्या अर्थनिर्णयातही कधीकधी कशी गडबड होते हे गुरुदेव दाखवतात. वेदान्तसूत्र २.१.१३ याच्या अर्थाच्या बाबतीत शंकराचार्य व रामानुजाचार्य दोघांनाही मूळ धागा सापडलाच नाही. रामानुजाचार्य पहिल्या भागाचा अर्थ बरोबर करतात तर शंकराचार्य दुसऱ्या भागाचा (पृ.१२४-१२५). ब्राह्माधिकरणाच्या (वेदान्तसूत्रे ४.४.५-७) अर्थाच्या वेळी हेच झाले आहे. दोघेही आचार्य या सूत्रांचे मूळ छांदोग्य उपनिषदात शोधतात (अर्थात दोघांचे तात्पर्य परस्परविरुद्ध आहे हे वेगळे). पण मुळात छांदोग्यातील मंत्रात ब्राह्म हा शब्दच नाही. या सूत्रांचे मूळ खरोखरी तैत्तिरीय उपनिषदात आहे. गुरुदेवांनी इथे केलेला युक्तिवाद पायरीपायरीने आपल्याला एका प्रभावी सिद्धांतापर्यंत पोचवतो. त्यात तर्काची प्रखरता आहे आणि अनुभवाचे त्याला पाठबळ आहे. अधिकरणाच्या शेवटी आपण चिदानंद या संकल्पनेशी पोचतो.

अंतिम तत्त्व शुभ-अशुभ यांच्या पलीकडे असले तरी त्याला पोचण्याचा राजमार्ग शुभाच्या बाजूने आहे, अशुभाची वाट ही आडवाट आहे. "अतिनीतीच्या स्थितीचे नीतीच्या स्थितीशी अधिक साम्य आहे, न-नीतीच्या किंवा अनीतीच्या स्थितीशी नाही" (पृ. १४७).

ग्रंथाच्या अखेरीस ध्यानाचे भिन्न प्रकार सांगितले असून साक्षात्कारी साधूचे वर्णन आहे. बादरायणांच्या समन्वयदृष्टीचा वारंवार गौरव केला आहे. अत्युच्च स्थितीत सर्वंकष समन्वय साधलेला असतो, सुरेल स्वरसंगम असतो. आत्मानंदाचा अनुभव येत असताना त्यात कुठे बेसूर लागत नाही.

आत्मानंदाचे हे वर्णन साक्षात्काराबद्दल आणखी काही समजावे अशी जिज्ञासा

वाचकांमध्ये निर्माण करते. ध्यानप्रक्रियेची तपशीलवार माहिती आपल्या हाताशी यावी, विविध पारमार्थिक अनुभवांजवळ जावे; दिव्य, अद्‌भुत या संकल्पनांची ओळख व्हावी अशी त्याला ओढ लागते. ही भूक भागवण्यासाठी वाचकाला भगवद्‌गीतेवरील गुरुदेवांच्या दोन पुस्तकांकडे वळावे लागेल.

(ई) ध्यानगीता

भगवद्‌गीतेच्या सगळ्या अध्यायांतील श्लोक निवडून त्यांची ध्यानाच्या दृष्टीने १२ प्रकरणात केलेली मांडणी म्हणजे ध्यानगीता. आकार छोटा पण पुस्तिका भारदस्त आहे. प्रत्येक प्रकरणासाठी निवडलेले श्लोक विभिन्न तात्त्विक विषयाखाली विभागले आहेत. त्या त्या विभागाचे सार सांगणारा चित्तवेधक मराठी मथळा दिला आहे. गुरुदेवांच्या सांगण्यावरून त्यांचे एक शिष्य ए. ए. नरगुंद यांनी पुढे त्या मथळ्यांचे कन्नड रूपांतर केले. या साराचेही सार सांगणारे एखाद-दुसऱ्या शब्दांचे संस्कृत मथळेही पुन्हा दिले आहेत. हे फार अर्थवाही आहेत. सूत्रमय, तंतोतंत गर्भितार्थ सांगणारे संस्कृत मथळे केवळ गुरुदेवांच्या संस्कृत भाषेच्या प्रभुत्वाचीच साक्ष देतात असे नव्हे तर भगवद्‌गीतेच्या तत्त्वज्ञानाशी ते किती एकजीव झाले होते याचीही साक्ष देतात. हे मथळे "तिळा उघड" या मंत्राप्रमाणे श्लोकार्थाची भांडारे वाचकांपुढे खुली करतात. सर्व घटना पूर्वनियोजनाप्रमाणे घडतात या सिद्धांताला तत्त्वज्ञानांत पूर्वनियतिवाद म्हणतात. गुरुदेवांनी त्याला पूर्वनिहति असे म्हटले आहे. तो शब्द गीतेतील निहताः पूर्वमेव (११.३३) या श्लोकावरून बनवला आहे (पृ.१०९). या शब्दाने पूर्वनियतीमधील सिद्धांत तर लक्षात येतोच, शिवाय देवाने सर्व शत्रूंना आधीच मारले आहे, अर्जुन फक्त निमित्तमात्र आहे अशी परमेश्वराच्या सर्वकर्तृत्वाची जाणीव होते. उपद्रष्टानुमन्ताच भर्ताऽभोक्ता महेश्वरः असा १३.२२ या श्लोकाचा पाठ गुरुदेवांनी घेतला आहे. मूळ श्लोकात भर्ता भोक्ता असे आहे; पण गुरुदेव भर्ता अभोक्ता असे म्हणतात (पृ.१४), कारण ईश्वर हा सर्वातीत असल्याने तो आपल्या कर्मांची फळे भोगतो हे म्हणणे बरोबर नाही. तसेच ७.१४ या श्लोकासंबंधी ते म्हणतात की केवळ अनन्यप्रपत्तीनेच माझी त्रिगुणमयी माया तरून भक्त पलीकडे जातो (पृ.९४).

अनन्यप्रपत्ती हा गुरुदेवांचा शब्द विशिष्टाद्वैत तत्त्वज्ञानातील आर्तप्रपत्ती या शब्दाचा जोडीदार आहे. आत्यंतिक विकलावस्थेत ईश्वराला हाक घालणे ही आर्तप्रपत्ती आणि ईश्वराखेरीज कुणी अन्य त्राता नाही ही भक्ताची अनन्यभक्ती या दोन्हींचा भाव अनन्यप्रपत्ती या एका शब्दात आणला आहे.

नेमाला जाण्यापूर्वी हे श्लोक गुरुदेव वाचून घेत. हे चिंतनपूर्ण वाचन असे[६१] आणि मन एकाग्र करण्यास त्याचा फार उपयोग होई. ध्यानगीतेतील श्लोक व त्यांचे मथळे अगदी सावकाश, स्पष्टपणे व एकही चूक न करता वाचले तर क्षुब्ध मनसुद्धा स्तब्ध होते आणि ही अवस्था अखंड नामस्मरणाला पोषक असते. अनेक साधकांचा हा अनुभव आहे.

पुस्तकाच्या ध्यानोपकारिणी गीता या उपमथळ्याचा अर्थच असा की ती ध्यानाला साहाय्य करते. अर्थातच सैद्धांतिक विचारांपेक्षा इथे प्रत्यक्ष साधनाला काय उपयोगी पडेल यावर जास्त भर आहे. हे श्लोक वाचून नेमाला बसावे, दुसरे कोणी हे श्लोक वाचत असले तर ते ऐकत नाम घ्यावे, किंवा मराठी-संस्कृत-कन्नड शीर्षकांतून जो अर्थ निघतो त्याचे चिंतन करीत करीत ध्यानमग्न व्हावे. भगवद्गीतेमध्ये ईश्वराचे अनेक रीतींनी वर्णन केले आहे व त्यांवरून ध्यानगीतेतले मथळे घेतले आहेत. यावर चिंतन केले तर त्याचाही एकाग्रतेला उपयोग होतो. उदाहरणार्थ पुरुष, सूत्र, रवी, मायी, रस, तज्जलान् (विश्वाची उत्पत्ती, स्थिती, लय जिथे आहेत) किंवा आश्चर्य असे देवाला म्हटले आहे. या पुस्तिकेत चार विषयांचा विचार आहे. पहिली दोन प्रकरणे ध्येयवस्तूबद्दल (ज्यावर ध्यान करायचे ते) आहेत. तिसऱ्यापासून आठव्या प्रकरणापर्यंत साधकाची म्हणजे ध्यात्याची लक्षणे आहेत. नऊ व दहा ह्या प्रकरणात ध्यान प्रक्रियेची माहिती आहे. म्हणजे ध्येय, ध्याता, ध्यान झाले. नंतर अकरा व बारा या प्रकरणात ध्यानाची परिणती म्हणजे विश्वरूपदर्शन व भगवदाश्वासन येतात. म्हणजे ध्यानाच्या सर्व पैलूंचा विचार आला, म्हणून ही ध्यानगीता. विश्वरूपदर्शनाजवळ ध्यानगीता संपते. एकदा भगवंताचे रूप नजरेच्या फेकीसरसे सर्वत्र दिसू लागले की शब्दांची खटपट सरते. गुरुदेवांच्या मते विश्वरूपदर्शन व

भगवदाश्वासन हे झाल्यानंतर दैवासुरसंपत्ती किंवा त्रिगुणविचार हा भाग घालणे हे शेपूट जोडण्यासारखे आहे. विश्वरूपदर्शनाची भगवंतांच्या प्रसादात होणारी परिणती हीच कलशाध्यायाची सांगता.

ध्यान हेच मध्यवर्ती सूत्र असल्याने भगवद्गीता इथे ध्यानगीता बनते. तद्वतच भगवद्गीतेमधील अध्यायसमाप्तिदर्शक संकल्पातील 'इति श्रीमद् भगवद्गीतासु उपनिषत्सु ब्रह्मविद्यायां' इत्यादि शब्दांची प्रभावळ जाऊन तिथे 'इति श्रीमद् ध्यानगीतायाम्' इतकाच सुटसुटीत भाग शिल्लक राहतो. उपनिषत्सु, ब्रह्मविद्यायाम् हे शब्द गेले. भगवद्गीता हे उपनिषद् आहे, हे खरे. पण गुरुदेवांनी आपण काढलेल्या वेच्यांना उपनिषद् म्हटले नाही. तसेच ध्यानगीतेत ईश्वर, जीव व जग यांच्याबद्दलचे गहन तत्त्वज्ञान त्यांना घालायचे नव्हते कारण मग बुद्धीच्या जाळ्यात अडकून ध्यानाचा विचार बाजूला राहिला असता. ही ब्रह्मविद्या नाही, ध्यानविद्या आहे. म्हणून ब्रह्मविद्या हा शब्द गाळला गेला. योगशास्त्र हा शब्द शिल्लक आहे. गुरुदेवांच्या मते योग म्हणजे ध्यानप्रक्रिया असा अर्थ बरोबर आहे.[७०] म्हणजे ध्यानगीता व योगशास्त्र दोन्ही एकच होतात. संकल्पातील अखेरीच्या भागातील अध्यायांची नावे बदलून बाकी भाग तसाच ठेवला आहे.

ध्यानगीता १९६१ साली प्रसिद्ध झाली असली तरी तिची रचना १९४२-४६ या काळात होत होती. गुरुदेवांच्या लिखाणातील हा एक संक्रमणकाळ आहे असे म्हणण्यास हरकत नाही. जणू त्यांची अळीमिळी सुटली व लिखाणामध्ये आपल्या संप्रदायातील सत्पुरुषांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष उल्लेख करणे हलके हलके सुरू झाले. नंतरनंतरच्या लिखाणानंतर त्यांनी स्वतःच्या जीवनातील अनेक प्रसंगही सांगितले आहेत. ध्यानगीतेच्या संदर्भात उदाहरणादाखल गीतेतील एक श्लोक घेऊ.

अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः।
तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः।। (८.४१)

या श्लोकातील सततं आणि नित्यशः हे शब्द समानार्थक आहेत आणि दोन्हींपैकी एक गाळला तरी चालण्यासारखे आहे. पण गुरुदेवांनी आपल्या

सद्गुरूंच्या पावलावर पाऊल टाकून केलेल्या अर्थानुसार दोन्ही शब्द आवश्यकच काय पण विशेष महत्त्वपूर्ण ठरतात. समर्थांच्या सदा सर्वदा योग तूझा घडावा या मनाच्या श्लोकावर निरूपण करीत असताना सदा व सर्वदा या एका श्लोकातील दोन समानार्थक शब्दांचा भाऊसाहेब महाराज जो अर्थ सांगत तोच गुरुदेवांनी या गीताश्लोकात सांगितला आहे. एका शब्दाचा संबंध भक्ताकडे तर दुसऱ्या शब्दाचा संबंध देवाकडे आहे. मग गीताश्लोकाचा अर्थ असा होतो की 'जो अनन्य चित्ताने *सदा* माझे अखंड स्मरण करतो त्यास मी *सर्वदा* सुलभ आहे'[७१] (पृ.९८). मराठी मथळ्यात सतत व नित्यशः हे शब्द न घेता सदा व सर्वदा हे रामदासांचे शब्द घेतले आहेत. कारण भाऊसाहेब महाराजांचे निरूपण या दोन शब्दांवर होते. भक्त व देव दोघांचा इथे समावेश आहे. भक्ताच्या सतत ध्यानाने देवाला नित्य त्याचे रक्षण करावे लागते. स्वप्रयत्न व देवाची कृपा यांचा संयोग केला पाहिजे हे गुरुदेवांचे सांगणे इथेही स्पष्ट आहे. बायबलमध्ये म्हटले आहे, 'तू देत राहिलास तर तुला मिळत राहील' (ल्यूक ६.३८). मात्र कृपेचे पारडे जरा जड समजले जाते. यालाच ए. ई. टेलर नावाच्या तत्त्वज्ञाने 'ईश्वराचा पुढाकार' असे म्हटले आहे. पारमार्थिक जीवनाला सुरवात होण्यासाठी सुद्धा ईश्वराची कृपा हवी. भगवद्गीतेवरील आपल्या मुख्य ग्रंथात या श्लोकाचा विचार करताना ध्यानासाठी आवश्यक असलेल्या तीन गोष्टी गुरुदेवांनी उल्लेखिल्या आहेत. (१) अनन्यचेतस्त्वम् म्हणजे चित्ताला भगवंताखेरीज अन्य गोष्टींची गोडी नसणे, (२) नित्यशः किंवा एक क्षणही न दवडता आणि (३) नित्ययुक्तत्वम् म्हणजे अखंडपणे व दीर्घकाल.[७२] भाऊसाहेब महाराजांच्या पद्धतीने गीतेवरील बृहत् ग्रंथात अर्थ केलेला नाही. का, हे कुणी सांगावे?

गुरुदेवांनी केलेले अर्थ आणखी दोन ठिकाणी पारंपारिक अर्थाहून भिन्न आहेत. ते त्यांच्या स्वतःच्या अनुभवावर आधारित असावेत. ६.७ या श्लोकांतील परमात्मा समाहितः याचा अर्थ ईश्वर त्याच्या सन्निध आहे असा गुरुदेवांनी दिला आहे (पृ.८४). समाहित हा शब्द भक्ताच्या स्थिरावल्या चित्ताचा सूचक नसून ईश्वराचे रूप त्याच्या समोर स्थिर असल्याचे दर्शवतो असे त्यांचे सांगणे आहे.

आणखीही एका ठिकाणी भक्ताचे म्हणून समजले जाणारे वर्णन गुरुदेवांनी देवाकडे घेतले आहे. ५.२६ मधील अभितो ब्रह्मनिर्वाणं वर्तते विदितात्मनाम् हे शब्द भक्ताची आत्मानंदाची स्थिती प्रकट करतात, असे न म्हणता 'त्याच्या सभोवार ब्रह्म घिरट्या घालीत असते' असे ते सांगतात (पृ.८९). अभितो ब्रह्मनिर्वाणम् म्हणजे देवाचे भक्ताभोवती फिरणे आहे हे नंतरच्या एक ग्रंथांतही येते.[७३] हे स्पष्टीकरण त्यांच्या स्वतःच्या त्या प्रकारच्या अनुभवावर आधारित असावे असे म्हणण्याचे धारिष्ट करण्यास हरकत नसावी.

ध्यानगीतेच्या सबाह्याभ्यंतरी अवघा साक्षात्कार आहे. उत्कट, भावपूर्ण अशा ध्यानाला ती पोषक आहे.

(उ) दि भगवद्गीता ॲज ए फिलॉसॉफी ऑफ गॉड-रिअलायझेशन.

गुरुदेवांच्या लेखनसंभाराचा निशाणाचा हत्ती म्हणजे हा ग्रंथ. त्यांच्या लिखाणाचा हेतू आध्यात्मिक होता हे पटण्यास हे एकटे पुस्तक पुरेसे आहे. तात्त्विक व आध्यात्मिक विचारांची गुंफण करण्याचे त्यांचे कौशल्य यात शिगेला पोचले आहे. पद्धती नेहमीचीच म्हणजे चिकित्सक विवरणाची आहे. उपनिषदांपासून सुरुवात करून सांख्य-योग व ब्रह्मसूत्रे यांची दखल घेत गुरुदेव वेदान्ती आचार्यांनी केलेल्या गीतेच्या अर्थनिर्णयापर्यंत पोचतात. ज्ञानेश्वरांच्या साक्षात्कारात्मक भाष्यापाशी ही विचारधारा काहीशी स्थिरावते. नंतर प्रक्षिप्ततावाद व भक्तिमार्ग यांतून ती पुन्हा प्रवास सुरू करते. ख्रिश्चन व बौद्ध तत्त्वज्ञानांतून वाट काढीत कर्मयोग व अनासक्ती इथपर्यंत व पुढे समकालीन विद्वानांच्या मतांपर्यंत येते. नंतर अद्भुततावाद व दिव्यीकरण या प्रांतापाशी पोचल्यावर पुस्तकाचा चिकित्सक विभाग संपतो.

भगवद्गीतेच्या अभिजात व अर्वाचीन भाष्यांचा मागोवा घेत घेत भगवद्गीता हे साक्षात्कारशास्त्र आहे या भूमिकेचा परिपोष करण्याचे काम पुढील भागात केले आहे. परमार्थप्रेमी साधकांना हा ग्रंथ एक प्रेमळ वाटाड्या आहे. पृथ्वीच्या पोटातून उफाळून वर येणाऱ्या झऱ्याने बाजूला उभे राहणाऱ्यांना जलतुषारांनी भिजवून टाकावे तद्वत् पुढील सर्व चर्चा वाचकांना अभ्यासपूर्ण विधाने, नवीन

बनवलेले शब्द, सयुक्तिक व्युत्पत्ती, विश्लेषणे, संश्लेषणे, तौलनिक विधाने, ठळक निष्कर्ष यांनी चिंब करून टाकते. यापुढे गहन तात्त्विक विचार आणि सोप्या साधनप्रक्रिया यामधून जात आनंदाच्या सागरात बुडी देते. ईश्वरसाक्षात्काराचा ध्रुवतारा या प्रवासाचा मार्गदर्शक आहे. पुस्तकात अशी कित्येक विधाने आहेत की ती अगदी निःपक्षपातीपणे व थंडपणे चिंतन करण्याचे वाचकाला आव्हान देतात. उदाहरणार्थ, "डॉ. ऑटोचा अद्‌भुततावाद अद्‌भुत या मध्यवर्ती कल्पनेवर आधारलेला आहे. अद्‌भुत म्हणजे विश्वातील दिव्य शक्ती. त्याच्या मते भगवद्‌गीतेतील ईश्वर सर्वातीत आहे. पूर्वनियती आणि निमित्तमात्रता यो दोन बिंदूंभोवती अद्‌भुततावाद गुंफलेला आहे" (पृ.६). "अव्यय, अखंडता, किंवा शाश्वतता या संकल्पनांची व्याप्ती अधिक असून तिथे सार्वत्रिकता समाविष्ट होते. ही सार्वत्रिकता दोन्ही प्रकारची आहे – सत्ताशास्त्रीय व तार्किक. कांटसारख्या तत्त्वज्ञांनी याचा खोल अभ्यास केला आहे" (पृ.२३३). "अद्‌भुत हा सौंदर्य आणि बौद्धिक निश्चितता यांचा समन्वय आहे" (पृ.२८१).

डोके खाजवायला लावणाऱ्या सर्वच कठीण विधानांचा परामर्श इथे घ्यावयाचा नाही. आपापल्या बुद्धीने असल्या तत्त्वविचारांचा उलगडा करण्याचा अभ्यासकांचा आनंद हिरावून घेण्याचे कारण नाही. एक दोन तात्त्विक मुद्दे पाहू. ईश्वराच्या अस्तित्वासाठी मांडलेल्या अनेक युक्तिवादांपैकी विश्वशास्त्रीय युक्तिवादावर गुरुदेवांचा भर आहे. याचा प्रथम विचार करू. निसर्गव्यवस्थेवर हा युक्तिवाद आधारलेला आहे. गुरुदेव विश्वशास्त्रीय व रचनावादी युक्तिवाद एकत्र घेतात. त्यांत कांट फरक करतो ते त्यांना मानवत नाही. कांटच्या मते, विश्वाचे कारण म्हणून ईश्वर आहे असे म्हणणे हा विश्वशास्त्रीय युक्तिवाद; व विश्वातील सुसंबद्ध रचनेचे त्याला कारण म्हणणे हा रचनावादी युक्तिवाद. परंतु हे दोन्ही एकत्र घेता येत असताना दोन वेगवेगळे कशाला हवेत? सुसंबद्ध अशा विश्वाचे कारण ईश्वराला समजले म्हणजे झाले. कांट सत्ताशास्त्रीय युक्तिवादाला पायाभूत समजे. गुरुदेवांचा कल विश्वशास्त्रीय युक्तिवादाकडे आहे. विश्वशास्त्रीय युक्तिवाद म्हणतो की, "विश्वात ज्याही शक्ती आहेत त्या सर्व ईश्वरातूनच येतात", किंवा, "जगाचे

प्रशासन ज्या शक्तीने चालते ती शक्ती म्हणजे ईश्वराचा संकल्प" (पृ.६०). विश्वशास्त्रीय युक्तिवाद म्हणजे विश्वाचे मूळ कारण शोधण्याची जिज्ञासा. ही जास्त स्वाभाविक आहे, अधिक पटण्याजोगी आहे आणि जास्त आव्हान करणारीही आहे. कारण डोळे उघडले की जग समोर खडे दिसते. इथल्या गोष्टींसाठी आपल्याला धडपड करावी लागते आणि त्यांच्याशी जमवूनही घ्यावे लागते. पावलोपावली या प्रपंचाशीच सामना करावा लागतो. आणि म्हणून हे सर्व कुणी निर्माण केले असे कुतूहल जागे होते. उलट सत्ताशास्त्रीय युक्तिवाद ईश्वराच्या संकल्पनेवरून ईश्वराच्या अस्तित्वाकडे जातो. तो केवळ बौद्धिक आहे म्हणून अप्रत्यक्ष आहे. सत्ताशास्त्रीय व विश्वशास्त्रीय युक्तिवादांतील फरक हा सोऽहम् आणि तत्त्वमसि यांतील फरकासारखा आहे. सोऽहम् ही जिवंत व प्रत्यक्ष अनुभूती आहे. उलट तत्त्वमसि हे अप्रत्यक्ष अनुमान आहे. "शेवटी असेच म्हणावे लागेल की सोऽहम् ची पातळी तत्त्वमसिपेक्षा उंच आहे कारण सोऽहम् म्हणजे प्रत्यक्ष परतत्त्वस्पर्श आहे....."[७४] दुसऱ्या एका तात्त्विक सिद्धांताचा आता विचार करू. ईश्वरनियती म्हणजे ईश्वराच्या इच्छेने जग चालते हा सिद्धांत. हा इथे निश्चितपणे सूचित केला आहे. त्यातला एखाददुसरा उल्लेख पाहू. "शरीराचे व्यापार कसे चालतात हे पाहिले तरी कळते, की श्वास व उच्छ्वास हे ईश्वराच्या आज्ञेने चालतात. एकदा श्वास सोडल्यावर पुन्हा तो घेऊच नये असा जेव्हा देवाचा संकल्प असतो तेव्हा आपण शेवटचा श्वास सोडतो. पुन्हा श्वास घेतला जात नाही. ईश्वरी संकल्पाने आणि आज्ञेनेच मृत्यूचा घाला पडतो"(पृ.६०). "फल्गू नदी जशी काळाच्या वाळवंटात दिसेनाशी होते तसा परमार्थमार्गही कालांतराने झाकला जातो.... सर्व गोष्टींना अंत आहे. चांगल्या गोष्टींना देखील अंत आहे आणि तसा अंत आहे याचे कारण म्हणजे ईश्वराचा संकल्प तसा आहे" (पृष्ठे ९६-९७). व्यावहारिक जगात दिसणारा हा सर्वसामान्य सिद्धांत पारमार्थिक जीवनातही खरा आहे. ईश्वर सर्वशक्तिमान् आहे म्हणून भक्ताने पूर्ण शरणागती पत्करली पाहिजे. ईश्वर म्हणजे सर्वस्व, भक्त म्हणजे काही नाही. "तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने शरणागती म्हणजे सामरस्य" किंवा देवाभक्तांचे

ऐक्य. इथे "अहंकाराचा वारा सुद्धा लागत नाही" (पृ.६७). ईश्वरी प्रसादाच्या मागे हेच नियतिवादाचे तत्त्व आहे. जेव्हा मनुष्य हतबल व हतबुद्ध होतो तेव्हा तो कृपेची याचना करतो कारण सर्व काही देणारा देवच असतो हे त्यावेळेस जाणवते.

गुरुदेवांनी केलेल्या स्थितप्रज्ञ कल्पनेचे विवेचन पाहू. थोडे काही मोठेपण दिसले की एखाद्याचा स्थितप्रज्ञ म्हणून उदोउदो करण्याच्या अलीकडच्या प्रवृत्तीमुळे तो शब्द अगदी पोकळ झाला आहे. स्थितप्रज्ञ म्हणजे काय याचा पूर्ण विचार आपण कधी करतच नाही. तसे बनण्याची बाब तर दूरच राहिली. भगवद्गीतेने सांगितलेल्या स्थितप्रज्ञाच्या लक्षणांची पोपटपंची करणे सोपे आहे पण त्यांतला एखादा सद्गुण अंगात आणायचा म्हटले तरी जन्मभर भगीरथ प्रयत्न करावे लागतील. प्रत्येक धर्म किंवा तत्त्वज्ञानाचा संप्रदाय आपापल्या परीने आदर्श मनुष्याची प्रतिमा उभी करत असतो. या सर्व कल्पना कमीअधिक प्रमाणात एकसारख्या असतात. स्टोइक लोकांच्या मते अविव्हलता तर एपिक्युरिअन पंथाच्या मते अविचलता हा आदर्श मनुष्याचा प्रमुख गुण आहे. प्लेटोने त्याला तत्त्वज्ञ-सम्राट म्हटले तर अरिस्टॉटलचा आदर्श पुरुष निश्चयाचा महामेरू आहे. 'बुद्ध' ही बौद्ध तत्त्वज्ञानामधली आणि 'जिन' ही जैन विचारातील संकल्पना हेच सांगतात.

गुरुदेवांनी स्थितप्रज्ञाच्या लक्षणांचे मानसिक, नैतिक, सामाजिक आणि आध्यात्मिक असे वर्गीकरण केले आहे. इंद्रियजय हे मानसिक लक्षण झाले. काम-क्रोधांच्या हल्ल्याला तोंड देणे ही नैतिक बाजू. गुरुदेव ह्या स्थितीला नैतिक जीवन्मुक्ती म्हणतात. सत्ताशास्त्राच्या दृष्टीने संसारपाशातून जो मुक्त झाला तो जीवन्मुक्त; नैतिक दृष्ट्या दुर्गुणांच्या पाशांतून जो मुक्त झाला तो नैतिक जीवन्मुक्त. स्थितप्रज्ञाचे सामाजिक लक्षण म्हणजे साम्यबुद्धी किंवा समदृष्टी. उच्च-नीच, राव-रंक असा भेद त्याच्याजवळ नसतो. परमेश्वराच्या दर्शनाचा त्याच्या आचरणावर परिणाम झालेला असतो. शेवटी, स्थितप्रज्ञाचे आध्यात्मिक लक्षण म्हणजे त्याला वाम-सव्य दोन्हीकडे, खाली अथवा वर, आत-बाहेर सर्वत्र नारायण कोंदलेला

दिसतो आणि परमानंदाची प्राप्ती होते. स्थितप्रज्ञाचे बोलणे-चालणे कसे असते त्याचे गुरुदेवांनी थोडक्यात वर्णन केले आहे. ईश्वराचे ध्यान करणे व त्याचे रूप पाहाणे हाच आत्मानंद आहे. स्थितप्रज्ञाची विविध लक्षणे लक्षात घेऊन त्याचे एक सुंदर चित्र गुरुदेवांनी रंगवले आहे. ध्यानात तल्लीन झालेल्या अवस्थेत आपल्या रोमारोमांतून आनंद झिरपत असतो. परमानंदाची ही स्थिती मृत्यूनंतर येते असे मुळीच नाही. ईश्वराचा अनुभव घेणे, आत्मौपम्यबुद्धीने सत्कर्म करणे, ईश्वराचे सान्निध्य अनुभवणे, आणि ईशकार्यात मग्न होणे हे स्थितप्रज्ञाचे लक्षण आहे. भगवद्गीता तेच सांगत आहे (पृ.१९०).

नयाभास, विप्रतिषेध, विरोधाभास किंवा द्वंद्वात्मक युक्तिवाद हा तत्त्वज्ञानातील एक खोडसाळ विषय आहे. विचाराचा प्रवास अशा द्वंद्वात्मक युक्तिवादाच्या रस्त्यानेच होत असतो. एकाने एक मत मांडले की दुसऱ्याने त्याच्या विरुद्ध मत मांडलेच म्हणून समजावे. गंमत अशी की दोन्ही मते अगदी बिनचूक आहेत असे वाटते. दोन्ही मतांना बळकट पुरावे देता येतात. आता काय करायचे? या जंजाळातून काहीतरी मार्ग काढावा लागतो. कांटने आपल्या तत्त्वज्ञानात चार नयाभासांची छाननी केली आहे. हे चारी नयाभास भिन्न भिन्न प्रश्नांशी निगडित आहेत. गुरुदेवांनी गीतेच्या अभ्यासातून पाच नयाभास शोधले आहेत. नयाभासांच्या भाषेत गीतेतील सिद्धांत मांडून दाखवणे ही एक नवीनच दृष्टी गुरुदेवांनी अभ्यासकाला दिली आहे. एक विरोधाभास मानसशास्त्राच्या क्षेत्रातला आहे, एक विश्वाच्या विचारासंबंधी आहे आणि तीन नयाभास ईश्वराच्या विवरणात बसतात. गीतेत सांगितलेल्या काही गोष्टींचा सखोल विचार करायला गेले की तिथे अशी वरवर विरोधी विधाने भेटतात. हे विरोध तसेच राहू न देता त्यांतून बाहेर पडण्याचा उपाय शोधणे भाग आहे. विरोधात्मक अशी विधाने गीतेतूनच गुरुदेवांनी उचलली आहेत. अशा विरोधांचा समन्वय त्यांनी केला आहे तोही गीतेच्याच शब्दांत.

गुरुदेवांनी दिलेल्या पाच विरोधाभासांपैकी आपण फक्त दोनच पाहू. पहिला ईश्वराच्या स्वरूपाबद्दल आहे. ईश्वर सगुण आहे की निर्गुण आहे? दोन्ही प्रकारच्या

वर्णनाचे श्लोक गीतेत आहेत. या दोन्हींचा समन्वय गुरुदेवांनी ईश्वर गुणातीत आहे असे म्हणून केला आहे. अशा अर्थाचा श्लोकही गीतेतच आहे. ईश्वर सगुण किंवा निर्गुण दोन्ही एकाच वेळेस आहे याचा अर्थ कोणतेच एक वर्णन ठामपणे करता येत नाही. गुणांच्या पलीकडे तो आहे हे म्हणणे जास्त उचित आहे. "एकच पक्ष धरून बसले की त्यातून विरुद्ध पक्षही उद्‌भवतो. जशास तसे या न्यायाने अर्धसत्याचा हट्ट केला की दुसरे अर्धसत्य डोके वर काढते. नाण्याला एक बाजू असली की दुसरी बाजू आलीच. ढाल सोन्याची की चांदीची या तऱ्हेच्या निष्फळ वादांनी तत्त्वज्ञानात जिथे तिथे गोंधळ घातला आहे", असे गुरुदेव कांटवरील एका ग्रंथाच्या सारांशात म्हणतात. दोन्ही बाजूंमधील सत्याचा अंश शोधून काढून त्याचा समन्वय केला पाहिजे म्हणजे त्यांच्यातील एकांगीपणा नाहीसा होतो. नयाभास व त्यांची उकल हे सत्ताशास्त्रीय विषय खरे, पण त्यात एक नैतिक सूत्र गोवलेले आहे. माझीच बाजू खरी असा दुराग्रह न धरता दुसऱ्याचे म्हणणे ऐकून घ्यावे. दोन्ही बाजूंचा नीट विचार केल्यावर कदाचित् त्यात विसंगती दिसणारच नाही. क्रममुक्ती खरी की विदेहमुक्ती खरी या नयाभासाकडे वळू. इथे दोन्हींचा जीवन्मुक्तीमध्ये समन्वय केला आहे. वाद व प्रतिवाद दोहोंना संवादात सामावून घेतले आहे. क्रममुक्ती म्हणजे पूर्ण मुक्ती मिळेपर्यंत चंद्र, मंगळ वगैरे एका जागेवरून दुसऱ्या जागेला जाणे नव्हे, तर मुक्तीच्या वाटेवर अखंड वाटचाल. वेदान्तावरील एका टिपणात ते म्हणतात, "एकदम सायुज्य मुक्तीची भाषा बोलण्याऐवजी (भोगमात्र व जगदव्यापारवर्जम् या सूत्रांना अनुसरून) क्रममार्ग किंवा पावलापावलाने परमेश्वराकडे जाण्याची प्रक्रिया अधिक रास्त वाटते. प्रत्यक्ष अनुभवाला येणारी अशी ही उच्चतम अवस्था आहे".[७५] मुक्ती ही घटना नाही तर प्रक्रिया आहे आणि या प्रक्रियेनेच मनुष्य जीवन्मुक्तीपर्यंत पोचतो; म्हणून हे उघड आहे की जीवन्मुक्तीमध्ये क्रममुक्ती अन्तर्भूत आहे. आता जीवन्मुक्तीत विदेहमुक्तीचा समावेश कसा होतो ते पाहू. कुणीही देह सोडला की तो विदेहमुक्त झाला ही कल्पना आधी काढून टाकली पाहिजे. विदेहमुक्ती म्हणजे देह सोडणे नव्हे तर देह पडताच परमेश्वरात मिळून जाणे. अर्थात अशी योग्यता

जीवन्मुक्तालाच फक्त असते. त्याच्या बाबतीत देहाचा अडसर नाहीसा झाला की परमेश्वराशी सामरस्य पावण्यात कसलीच अडचण रहात नाही. ज्ञानेश्वरांच्या म्हणण्याप्रमाणे जे आधीच देवाजवळ पोचले आहेत ते मृत्यूनंतर दुसरीकडे कुठे जातील?

ते मरणाऐलीचकडे। मज मिळोनि गेले फुडे।
मग मरणी आणिकीकडे। जातील केंवी।। (ज्ञानेश्वरी ९.३६५)

विदेहमुक्ती म्हणजे देहाहंकार जाणे आणि या अर्थी विदेहमुक्ती जीवन्मुक्तीत हजर आहे. क्रममुक्ती जीवन्मुक्तीत आहे हे वर पाहिले आहेच. असा हा क्रममुक्ती व विदेहमुक्ती यांच्या जीवन्मुक्तीत होणाऱ्या समन्वयाचा मथितार्थ आहे.

जितका महत्त्वाचा तितकाच व्यवहारोपयोगी असा ध्यानाच्या पद्धतींचा विषय या ग्रंथात हाताळला आहे. संकल्पनापद्धती, नैतिक पद्धती व साक्षात्कारात्मक पद्धती अशा या पद्धती आहेत. याच पद्धती वेदान्तसूत्रांत प्रतीकोपासना, गुणोपासना आणि अहंग्रहोपासना या स्वरूपात सापडतात. आपल्या स्वभावानुसार ज्याला जी पद्धती मानवेल ती त्याने वापरावी. मनुष्यस्वभावाचे अगदी स्वतंत्र अशा कप्प्यांत वर्गीकरण करता येत नाही. तसेच पद्धतींचे पण आहे. बुद्धिनिष्ठ मंडळी प्रतीकोपासना वापरतील तर कर्मयोगी माणसे गुणोपासना पत्करतील. विशेषतः समाजाला कल्याणप्रद होणाऱ्या सद्गुणांचे पालन करतील. अहंग्रहोपासनेची किंवा ध्यानाची पद्धती सर्वच प्रकारच्या स्वभावांना मानवते. स्वभावधर्मांत विविधता असते, व्यक्ती तितक्या प्रकृती ही गोष्ट गुरुदेवांनी कधीही नजरेआड केली नाही. "स्वभावाला मुरड घालता येते पण प्रकृतिधर्माचे पूर्ण परिवर्तन होणे मात्र शक्य नसते". (पृ.२०८).

भगवद्गीतेत ईश्वराच्या ज्या अनेक संकल्पना आहेत त्यावर ध्यान करणे म्हणजे प्रतीकोपासना. उदाहरणार्थ पुरुषोत्तम किंवा आश्चर्यमय परमेश्वराचे ध्यान. गुणोपासनेत गीतेत सांगितलेल्या अमानित्व, अदंभित्व वगैरे सद्गुणांचे ध्यान येते. या दोन पद्धती अखेरच्या टप्प्यापर्यंत नेत नाहीत. पण परमार्थमार्गावर चार पावले त्याला पुढे नेतात. तिसरी पद्धत ध्यानाची. या पद्धतीची तात्त्विक

चर्चा व प्रत्यक्ष ध्यान करण्याची प्रक्रिया यांचे इथे सविस्तर वर्णन आहे आणि साधकाला ते बोट धरून पुढे चालवते. जर एखाद्याला वाटले की आपल्याला प्राणायाम जमत नाही किंवा नासिकाग्रदृष्टी ठेवता येत नाही तर त्याने पुस्तकातले ध्यानपद्धतीचे प्रकरण उघडावे. मग योगाचा जो भाग ध्यानात येतो त्याचे उपयोग आणि त्याच्या मर्यादा त्याला कळून चुकतील. शारीरिक बाजूच्या चर्चेनंतर मानसिक-नैतिक बाजू म्हणजे इंद्रियजय, वासना जाळणे आणि नामावर मन एकाग्र करणे हे विषय घेतले आहेत. ध्यानामधली तिसरी आणि फार महत्त्वाची बाब म्हणजे भाव किंवा भक्ती. अव्यभिचारी भक्ती म्हणजे ईश्वराच्या शक्तीपुढे आणि संकल्पापुढे मान तुकवणे. शेवटची बाब म्हणजे ईश्वरी कृपा. मनुष्याच्या प्रयत्नाला कृपेनेच यश येते. नुसता प्रयत्न तोकडा आहे.

धर्माचे तत्त्वज्ञान व मानसशास्त्र ही दोन्ही तार्किक पद्धतीने कशी मांडावी याची योजना गुरुदेवांनी पाथवे टु गॉड इन हिंदी लिटरेचरमध्ये दिली होती. गीतेवरील ग्रंथात त्यांनी आध्यात्मिक अनुभव कसे मांडावे याची रूपरेखा दिली आहे. हृदयस्थ ईश्वराचे दर्शन साधकाला कसे होते, बाह्य जगात देव कसा दिसू लागतो, व्यावहारिक दृष्ट्या विरोधी दिसणाऱ्या गोष्टी परमेश्वराच्या दर्शनात अविरोधी कशा होतात, त्याला कृतकृत्य व धन्य झाल्याचा अनुभव कसा येतो व आनंदोद्गार त्याच्या तोंडातून कसे बाहेर पडतात हे इथे आपल्याला वाचायला मिळते (पृ.२६०). पारमार्थिक अनुभवांचे गुरुदेवांचे वर्णन पाहू. "सान्निध्य, शक्ती व तेज हा ईश्वराच्या अस्तिवाचा गाभा आहे" (पृ.१०२). "अद्‌भुताचा अनुभव येत असताना आदर, भीती, आनंद, आश्चर्य व प्रेम अशा संयुक्त भावनेने मन भरून जाते" (पृ.२९२-२९३). "प्रमाणबद्धता, समत्व व समतोल ही ईश्वराच्या रूपाची व अनुभवाची लक्षणे आहेत" (पृ.२६९). वाक्ये लहान लहानच आहेत पण एकेका शब्दात कितीतरी अर्थ भरलेला आहे. गुरुदेवांचे एक अर्थपूर्ण विधान असे आहे की "मनुष्याला स्वतःच्या अनुभवाची पातळी स्वतःच अजमावता येते. आपल्याला कोणकोणते अनुभव येतात ते ज्याचे त्याने लक्षात घ्यावे. साधकाला येणारे विविध अनुभव त्याने कोणती पदवी मिळवली आहे हे स्पष्ट

दाखवतात" (पृ. ७०). पारमार्थिक अनुभवांनी शांतीचा लाभ होतो. शांती इतकी महत्त्वाची आहे की गुरुदेव तिला धुरेचा निकष मानतात (पृ.२१४). शांती श्रेष्ठ की आनंद श्रेष्ठ या प्रश्नाबाबत गुरुदेवांचे निर्णायक मत आहे की आनंदातून शांतीची प्राप्ती होते आणि शांती म्हणजे आनंदाचे शिखर आहे (पृ.२६५). या विषयांच्या चर्चेने पुस्तकाचे मूल्य एकदम वाढले आहे.

पुस्तकाचा शेवटचा भाग म्हणजे अद्‌भुताच्या तत्त्वज्ञानात गुरुदेवांनी घातलेली भर आहे. कलशाध्यायात नैतिक, अद्‌भुत व दिव्य यांची चर्चा आहे. सांगोपांगपणा हे कांटच्या विचाराचे वैशिष्ट्य आहे आणि तरीही त्याने ईश्वरसाक्षात्कार करून देणाऱ्या ज्ञानदृष्टीबद्दल चकार शब्दही कसा काढला नाही, असे आश्चर्य गुरुदेवांनी व्यक्त केले आहे. सुरवातीस कांटची साक्षात्काराशी ओळख नव्हती. म्हणून कांटच्या तीन मीमांसांना गुरुदेवांनी ज्ञानदृष्टीच्या मीमांसेची जोड दिली आहे. कांट व ऑटो दोघांच्या मते ईश्वराच्या महान ऐश्वर्याने मनुष्य दिग्‌भ्रांत होतो आणि आपण क्षुद्र कीडामुंगीसारखे आहोत असे त्याला वाटू लागते. पण अखेरीस स्वतःमधल्या दिव्य अंशाची जाणीव झाली की त्याची मान ताठ होते. या मुद्यानंतर गुरुदेव भारतामधील आध्यात्मिक वाङ्‌मयाकडे वळतात. तुलसीदास, भवतारक आणि ज्ञानेश्वर यांची अद्‌भुताची कल्पना बहुरंगी आहे. अद्‌भुताचा आविष्कार निसर्गात दिसतो – भूगर्भशास्त्र, वातावरणशास्त्र व खगोलशास्त्र या क्षेत्रांचा उल्लेख करता येईल. अद्‌भुताला सत्ताशास्त्रीय पैलू आहेत आणि धर्माच्या मानसशास्त्रात त्याला अढळ स्थान आहे.

ग्रंथसमाप्तीसरसा कांटच्या मनातील परिवर्तनाचा विषय येतो. सुरवातीस बुद्धीला कांटने डोक्यावर बसवले होते पण बौद्धिकतेला त्याने आता हुसकून दिले. कांटच्या मृत्यूनंतर त्याचे जे लिखाण प्रसिद्ध झाले त्यातून डोकावणारा कांट व तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील त्याची चिरपरिचित प्रतिमा यात तिळभरही साम्य नाही. निःश्रेयस् व निरपेक्ष आदेश यांबद्दलच्या त्याच्या संकल्पनांत उलथापालथ झाली आहे. वाद-प्रतिवाद-संवाद ही कांटची त्रिवाद पद्धती आणखी एकदा वापरून त्याच्याच तत्त्वज्ञानात झालेला आमूलाग्र बदल गुरुदेवांनी अभावात्मक-

भावात्मक-विधेयक अशा तीन पायऱ्यांनी मांडला आहे. त्यांतली विधेयक पायरी सांगते की कांटच्या नव्या मतानुसार निरपेक्ष आदेश हा हृदयस्थ ईश्वराची आज्ञा आहे, ईश्वर सर्वांतर्यामी आहे, त्याला सगुण म्हणायला हरकत नाही, शक्ती व बुद्धिमत्ता दोन्हींची पराकाष्ठा त्याच्या ठिकाणी आहे, तो आपल्या अंतरंगात आणि अवतीभोवती आहे. इथे अनपेक्षितपणे एका सर्वव्यापी चैतन्यतत्त्वापाशी कांट येऊन पोचतो. आणि तो इथेही थांबत नाही तर सोऽहम् हा बालेकिल्ला सर करतो. सर्व कर्मे ईश्वरार्पणबुद्धीने करायची असतात या गीतेच्या संदेशात नैतिकता व दिव्यत्व यांचा संगम आहे. कांटच्या नवीन मतान्वये नैतिक कर्मच ईश्वरी आदेश असल्याने नैतिकता व दिव्यत्व अशा समीकरणाला त्याचा दुजोरा आहे. कांटच्या मते अद्‌भुताचा अनुभव म्हणजे ईश्वरी संकल्पाशी एकतान होणे. आपल्यामधील दिव्यत्वाने बाह्य जगावर मात करणे. आणि गीता तरी दुसरे काय सांगते? तिथे केवळ ईश्वरच खऱ्या अर्थी अद्‌भुत आहे. म्हणजे कांट व गीता दोघेही अद्‌भुत व दिव्य यांचे समीकरण मान्य करतात. आणि या दोन्ही समीकरणांची फलश्रुती नैतिकता, अद्‌भुतता आणि दिव्यत्व यांचा त्रिवेणी संगम प्रकट होण्यात येते. या शेवटच्या प्रकरणाचे अखेरीस गुरुदेव मंत्रघोष करतात की, "कांटच्या परिपूर्ण तत्त्वज्ञानात व नैतिक, अद्‌भुत आणि दिव्य यांतील सामरस्याची दिवाळी साजरी करणाऱ्या आणि चैतन्यैकरस परमात्मा मानणाऱ्या गीतेत आता द्वैत उरतच नाही" (पृ.२९७).

अंतिम सत्‌तत्त्व व त्याची प्राप्ती याबद्दलचे गुरुदेवांचे म्हणणे वाचकांच्या समोर मांडून लेखनसीमा गाठली. आता फक्त त्याला साद घालायची आणि पसायदान मागायचे.

संदर्भसूची

१ हे काम म्हणजे Elements of Metaphysics या ग्रंथाची सुधारित आवृत्ती काढणे.

२ A. E. Taylor, Plato the Man and his Work, 6th Edition, P. 10

३ The Bhagavad-gita as a Philosophy of God- realisation, P.24

४ तत्रैव, Pp. 293-294

५ Signs of the Times and Characteristics, P. 36

६ तत्रैव, P. 207

७ Vedanta the Culmination of Indian Thought, P.200
A Constructive Survey of Upanishadic Philosophy, P. 168

८ Signs of the Times and Characteristics, P. 207

९ तत्रैव, P. 206

१० Preface, P. xii

११ The Bhagavad-gita as a Philosophy of God-realisation, Pp. 280-281

१२ A Constructive Survey of Upanishadic Philosophy, P. 98, P. 200

१३ Pathway to God in Hindi Literature, Pp. 224-225

१४ A Constructive Survey of Upanishadic Philosophy, P. 200

१५ Mysticism in Maharashtra, P. 494

१६ Signs of the Times and Characteristics, P. 177

१७ Pathway to God in Hindi Literature, P. 18

१८ The Bhagavad-gita as a Philosophy of God- realisation, P. 295

१९ Mysticism in Maharashtra, Preface, Pp. (24) ff.
Pathway to God in Hindi Literature, General Introduction, Pp. 7-8
Pathway to God in Kannada Literature, P. 4

२० P. 214

२१ The Bhagavad-gita as a Philosophy of God-realisation, P. 280

२२ तत्रैव, p. 59

२३ तत्रैव, p. 64

२४ Pathway to God in Kannada Literature, P. 41

२५ The Bhagavad-gita as a Philosophy of God-realisation, P. 69

२६ Pathway to God in Hindi Literature, P. 210

२७ Philosophical and Other Essays, Part I, Pp. 113 ff

२८ तत्रैव, P. 115

२९ Pathway to God in Hindi Literature, P. 142

३० Pathway to God in Kannada Literature, P.4

३१ तत्रैव, P. 41

३२ Pringle-Pattison याने आपल्या The Idea of God, second Edition, 1920, Oxford University Press, New York, या पुस्तकात पृ. २८१ वर ब्रॅडलेचे मत उद्धृत केले आहे.

३३ Studies in Indian Philosophy, P.1

३४ Pathway to God in Hindi Literature, P. 11

३५ तत्रैव, P. 96

३६ तत्रैव, P. 265

३७ Pathway to God in Kannada Literature, P. 226

३८ The Bhagavad-gita as a Philosophy of God-realisation, P. 241

३९ Pathway to God in Kannada Literature, P. 4

४० Pathway to God in Hindi Literature, P. 197

४१ The Bhagavad-gita as a Philosophy of God-realisation, P. 207

४२ Pathway to God in Hindi Literature, P. 224

४३ Pathway to God in Kannada Literature, P 235

४४ Pp. xv - xvi

४५ ज्ञानेश्वरवचनामृत, पृ. (१) ते (४)

४६ Vedanta the Culmination of Indian Thought, P. 180

४७ तत्रैव, P. 208

४८ Pathway to God in Kannada Literature, P. 160

४९ The Bhagavad-gita as a Philosophy of God-realisation, Pp. 275-276

५० श्री. गुरुदेव रानडे यांचा पारमार्थिक पत्रव्यवहार, प्रकाशिका, सौ. विजया वि. आपटे, रामधुन, ६५/१ एरंडवणा, १५ वी गल्ली, प्रभात रोड, पुणे ४११००४, १९८६, पृ. १४

५१ तत्रैव, पृ. ६५

५२ तत्रैव, पृ. ३

५३ तत्रैव, पृ. १२

५४ तत्रैव, पृ. १८

५५ तत्रैव, पृ. १८

५६ तत्रैव, पृ. ६

५७ तत्रैव, पृ. ७९

५८ तत्रैव, पृ. १३३

५९ तत्रैव, पृ. ९४

६० तत्रैव, पृ. १३२

६१ चिंतनिका, म. शं. पत्तिहाळ व सौ. प्रमिला पत्तिहाळ, प्रकाशिका, लीलाताई शिरवळकर, तेजस, ३ ठुबे पार्क, शिवाजीनगर, पुणे ४११००५, १९९८

६२ या ग्रंथाचे मूळ नाव Mysticism In Maharashtra असे असून तो १९३३ मध्ये प्रसिद्ध झाला. Pathway to God असे शीर्षकांग असलेले गुरुदेवांचे दोन ग्रंथ नंतर प्रसिद्ध झाले. त्या धर्तीवर या पुस्तकाच्या भारतीय विद्या भवनाने प्रकाशित केलेल्या दुसऱ्या आवृत्तीला Pathway to God in Marathi Literature असे नाव दिले गेले.

६३ परमार्थसोपान (हिंदी), Preface, P. (1)

६४ Pathway to God in Kannada Literature, P. 226

६५ Pathway to God in Hindi Literature, P. 9

६६ एकनाथवचनामृत, प्रस्तावना, पृ. ३८

६७ परमार्थसोपान (हिंदी) टिपणे, पृष्ठे ९५-९६

६८ A Constructive Survey of Upanishadic Philosophy, Preface, P. xx.

६९ एखाद्याच वाक्यावर कधीकधी ते २४ तास चिंतन करीत. पाहा - श्री गुरुदेवांच्या आठवणी, लेखक, पद्मश्री काकासाहेब कारखानीस, प्रकाशक श्री. म. अथणी, अध्यक्ष, विश्वस्त समिती, श्री गुरुदेव रानडे परमार्थ मंदिर, जमखंडी, ५८७३०१, जि. विजापूर (कर्नाटक), १९७७, पृ. १३२

७० The Bhagavad-gita as a Philosophy of God-realisation, P. 24

७१ इथे केलेला अर्थ श्री भाऊसाहेब महाराजांच्या निरूपणानुसार आपण केला आहे असे गुरुदेवांनी म्हटल्याचे त्यांना ध्यानगीता वाचून दाखवणाऱ्या त्यांच्या एका विद्यार्थ्याने सांगितले.

७२ The Bhagavad-gita as a Philosophy of God-realisation, P. 254

७३ तत्रैव, P. 222

७४ Pathway to God in Kannada Literature, P. 222

७५ Vedanta the Culmination of Indian Thought, P. 212



परिशिष्टे

१ संक्षिप्त टिपणांचे दोन नमुने

I

(अ) वर्गात शिकवताना जवळ असावे म्हणून केलेल्या एका अतिसंक्षिप्त टिपणाचा नमुना. पुढे दिलेल्या टिपणातील मजकूर खालीलप्रमाणे आहे. त्यामध्ये दोन जागी संशय आहे. १) Epistemology या मथळ्याखालील शेवटच्या ओळीवरील शब्द Phenomenalism आहे की Phenomenality आहे हे समजू शकले नाही. कोणताही शब्द घातला तरी संदर्भाला जुळतो. २) Ethics या मथळ्याखालील दुसऱ्या परिच्छेदातील पहिल्या ओळीत 'And Philosophy' असे शब्द आहेत. ते शब्द वाचता येतात, मात्र ते कुठे बसतात ते कळत नाही.

बाणांनी दाखवलेले शब्द मुख्य मजकुरात जागच्याजागी बसवून व संक्षिप्त रूपांच्या जागी पूर्ण शब्द घालून हे टिपण तयार केले आहे.

Bradley – Appearance and Reality

Cosmology - Change (Motion) and Causality. Sequence in causation and appearance. Cause = all conditions (continuity). Space and Time (Psychological origin irrelevant). (Twice): (1) "Now", Self-inconsistent. Time points beyond itself. (2) Divergent directions of time. Nature, Contingent, Identity, Unity, Infinity, Uniformity.

Epistemology - Relations, Primary and Secondary qualities. Thing (Substance, Thing-in-itself). Thing, identity, an appearance. Phenomenalism the remedy.

Psychology - Feeling, Thought and Activity. Primacy of will, a delusion.

Logic - Judgment, Relation of Thought to Reality. Truth. Thought is dualistic. Subject and Predicate different. Relational. Self (6

meanings) (solipsism) (Body and Soul). Soul, ideal construction. In the end, not even absolute truth is quite true.

Ontology - Nature of Reality. Criterion objective, based on development, positive, perfection. Personal? Happy? Experience, Progress.

Ontological Argument. Progress in the absolute, incompatible with perfection. Its failure and justification. Bastard form of it.

Degrees of Truth and Reality. Error and Evil (several sources) appearance. Theoretical, practical and Aesthetic Attitudes are appearaces. Unity not known in detail. Inexplicability. No total truth or error, but more or less of validity. Absolute truth falls short of reality. Approach to standard measures, relative truth. Even imagination has some truth.

Ethics - Goodness, morality and Religion. How it promises satisfaction and appearance. Not an illusion. Good and Evil not illusions, but appearances, are judged inconsistent aspects of perfection.

Pleasant and Good. And philosophy. Good is not equal to satisfied will. The absolute is and is not good. Self-realisation; Sacrifice and assertion come together but transcended in Absolute.

opinions on this head, see next point. The Mīmāṃsā refutes the Vedāntic view that the physical world is subjective or illusory in nature. / The world" endures in the same form, even if the soul becomes free. Compare also Mīmāṃsā criticism of the Vedāntic "Sādhya" and "Sādhana".

(v) Jñāna, or the knowledge of the self obtained in the process of meditation, is only a "contributory" aid, and then the doctrine is known as "Jñāna-karma-samuchchaya".

Here the rough draft ends.

VI. Prabhākara and Kumārila.

The Two Great Mīmāṃsā Philosophers : Prabhākara and Kumārila, one inclining, on the whole, more towards Nyāya, the other inclining, on the whole, more towards Vedānta.

The chronological relationship between Prabhākara and Kumārila.

Prabhākara	Kumārila
i. Bheda between different categories, hence no sanction to Parināma. No recognition of Abhāva as a category, or Anupalabdhi as a Pramāṇa.	i. Bhedābheda between the different categories, hence Kumārila's doctrine of Pariṇāma. The Bhedābheda doctrine probably an inspiration to Nimbārka who came about 800 years later. One Gupta however finds the Bhedābheda doctrine in the Mīmāṃsā Sūtras Vol.III). Kumārila's recognition of Abhāva as a category, and Anupalabdhi as a Pramāṇa.
ii. The Self is unconscious in the state of deep sleep, or swoon, and will continue in that state if it remains unknowing.	ii. The Self is conscious or luminous even in Suṣupti. Kumārila, however, occupies an intermediate position between Prabhākara which says that the Self has no knowledge in the state of sleep and Vedānta which says that it was knowledge itself.
iii. The Self though unconscious	iii. The Self is [illegible]

II

Omit opinions on this head, see next point. The Mimansa refutes the Vedantic view that the physical world is sublated or transcended in Moksha. "The World" endures in the same form, even if the Soul becomes free. Compare also Mimansa criticisms of Vedantic "Absolute" and "Nescience".

(6) Jnana, or the knowledge of the self obtained in the proccess of meditation, is only a "contributory" aid, and then the doctrine is known as Jnana-karma-samuchchaya.]

Here the rough Draft ends.

VI Prabhakara and Kumarila.

The two Great Mimansa Philosophers : Prabhakara and Kumarila, one inclining, on the whole, more towards Nyaya, the other inclining, on the whole, more towards Vedanta. The chronological relationship between प्रभाकर and कुमारिल. According to some, प्रभाकर is earlier; while according to others कुमारिल is earlier. These latter say that गुरु was a title bestowed by कुमारिल on his disciple प्रभाकर when प्रभाकर intelligently interpreted अत्रापिनोक्तं तत्र तुनोक्तम्।

Prabhakara	Kumarila
i. Bheda (hence inclined towards मध्व) between different categories, hence no sanction to Parinama. No recognition of Abhava as a category, or Anupalabdhi as a Pramana.	i Bhedabheda (hence parallelism with सांख्य in परिणाम and also with निंबार्क in भेदाभेद) between the different categories, hence Kumarila's doctrine of Parinama. The Bhedabheda doctrine was probably an inspiration to Nimbarka who came about 800 years later. Das Gupta, however finds the Bhedabheda doctrine in Badarayana himself (see Vol II) Ahikundalavat ? Recognition of Abhava as a category, and Anupalabdhi as a Pramana.
ii. The self is unconscious or Jada (if the soul is Jada, how can it be the locus of Apurva?) even in the state of Liberation, as contrasted with the Self in Vedeanta which has	ii. The Self is conscious or has Jnanashakti even is Sushupti. Kumarila, however, occupies an intermediate position between Nyaya which says that the Self has no knowledge

Chaitanya. The expression स्वसंवेद्य of प्रभाकर is meaningless because it is bodily or physical.

in the state of sleep and Vedanta which says that it has happiness also: cf Sarvajnatma Muni, who, in his Sankshepashariraka tells us that the self enjoys bliss even in the state of deep sleep.

iii. The Self though unconscious

iii. The self, conscious and an

टीप – हा भाग Studies in Indian Philosophy, या पुस्तकाच्या १९९६ सालच्या आवृत्तीत पृ. २९१–२९४ या पानांवर आला असून तिथे यातल्या काही मुद्यांचे स्पष्टीकरण आहे.

२ गुरुदेवांचे हस्ताक्षर - इंग्रजी, ग्रीक व देवनागरी
इंग्रजी हस्ताक्षराच्या फोटोतील मजकूर

Greek Philosophy

The origins of Greek Philosophy :

(1) It is a debated question how far Greek Philosophy owes its origin to the East, especially to India and to Egypt. It is preferable to take the view that Greek Philosophy was a product of the Greek mind, though there might be some influences from India and Egypt.

(2) In Greece as elsewhere, religion was the origin of Philosophy.

a) The popular religion represented by Homer and Hesiod contributed negatively to rouse philosophic thought; Compare Plato's attack on popular religious legends, and their exclusion in his scheme of education.

b) The esoteric religion represented by Orpheus (13th Century B.C.) had a positive influence on philosophy. The fundamental notion in his songs is that there is one being, from which everything was formed by the principle of dualism. This must have influenced the early Greek Singularists.

The Elusinian and the Orphic mysteries. The distinction between the popular and the esoteric religion represented by the wand-bearers and the mystics.

(3) The practical philosophy of Greece is to be traced to the utterances of the Seven Sages including , among them, Thales and Solon.

Greek Philosophy

The origins of Greek Philosophy:

(1) It is a debated question how far Greek Philosophy was of native origin & the East, especially in Babylon & Egypt. Most people think the views that Greek Philosophy is a product of the Greek mind, though there may be some influence from Babylon & Egypt.

(2) In Greece, as elsewhere, religion was the origin of Philosophy.

(a) The Olympic religion represented by Homer & Hesiod contributed nothing to science & philosophy except Plato's myths.

The Olympian & the Orphic Mysteries. } The distinction between the popular & the esoteric religion represented by the sand-drawing & the mysteries.

popular religion ignored, & even evoked contempt for science & philosophy.

(b) The esoteric religion represented by Orpheus (6th Century B.C.) had a powerful influence on Philosophy. The fundamental notion in this cult was that there was a unity from which everything was formed by the principle of division. This must have influenced the early Greek philosophers.

(3) The first actual philosophy of Europe — that known to the ancients as the Ionic school, or sometimes as the Milesian school —

~~Περσεφόνη~~.

Parmenides: -

δόξα (= opinion) vs: ἐπιστήμη
σν. ἀλήθεια
(= knowledge).

aff: appearance, error,
not being

being, being

Plato: -

δόξαι, δόξα, διάνοια,

dealing with not being, phenomena, being

subject of opinion.

. Not much philosophical Plato in Modern Philosophy

ग्रीक लिपीतील शब्दांचे रोमन लिपीत रुपांतर

Opinion

Parmenides :–

doksa (= opinion) vs episteme or aletheia (= knowledge).

appearance, error, not–being — truth, being

Plato :–

	aisthesis	doksa	dianoia
dealing with	not-being	phenomena, subject to change	being

Not much philosophical status in modern Philosophy.

सोबतच्या पानावरील पत्र गुरुदेवांनी श्री वासुदेवराव दामले यांना लिहिलेले आहे. दामले इंडी येथे मामलेदार होते. निवृत्तीनंतर ते बेळगावला स्थायिक झाले. गुरुदेवांची चारी वचनामृते पुण्याला छापली जात असताना त्यांच्या खर्चाचा हिशोब व छपाईबाबतच्या विविध बाबींची जबाबदारी वासुदेवरावांनी सांभाळली होती. निंबरगी येथे निंबरगी महाराजांच्या समाधीवरील देऊळ बांधण्याच्या कामी त्यांचा फार मोठा वाटा होता. गुरुदेवांनी नाम देण्यास सुरुवात केली तेव्हा ते स्वतःच नाम देत असत. अशा मोजक्या मंडळीपैकी वासुदेवराव होते असे ऐकले. ते फार कर्तबगार व निष्ठावान होते. त्यांचे गुरुदेवांवर व गुरुदेवांचे त्यांच्यावर फार प्रेम होते.

पत्रात नावे असणाऱ्या व्यक्तीपैकी नरसप्पा शापेटी या निंबरगी महाराजांच्या शिष्याची सर्वांना माहिती आहे.

जगन्नाथ रघुनाथ लेले हे अंबुराव महाराजांचे शिष्य असून गुरुदेवांचा त्यांच्याशी नातेसंबंध होता. त्यांनी निंबाळला राहून खूप वर्षे गुरुदेवांची सेवा केली. ते फार भावडे होते.

बाळासाहेब (डी. बी) देशपांडे व गुरुदेव डेक्कन कॉलेजात एका वर्गात होते. निंबरगी महाराजांच्या समाधि-मंदिराच्या बांधकामाच्या वेळेला यांचे फार साहाय्य झाले.

दर पोर्णिमेस अनेक लोक इंचगेरीस जात असत. गुरुदेव जाणार असल्याचे या पत्रात आहे.

श्री. गु. स.

NIMBAL (M. S. M.)
Dt. Bijapur.

30/10/52

के. सा. ने. वि. वि.

आम्ही उद्यापासून पौर्णिमेच्या इंजीनियरिंगच्या क्लास आहोत. आपण सोमवारपर्यंत — दोन तीन-चार एकत्रपर्यंत — इंजीनियरिंगसंबंधी काही. मला बरोबर अभ्यास्य आहे. नरसिंगराव यांचे अर्थशास्त्रा यांचे पैकी नाही. कोणत्याही आर्थिक गोष्टी विद्यार्थ्यास केवढा आवश्यक आहे?

कृ. वि. वि.

[illegible] सानवे.

सूची

अत्यणुकलनशास्त्र, १०७
अद्‌भुत, १६७-१६८
अध्यात्मविद्यापीठ, ५१ पासून पुढे
अनंतस्पर्शी-आसन्नीकरण-न्याय, ९१-९२
अभ्यासपद्धती, ४१-४३
अंबुराव महाराज, ९९
ॲरिस्टॉटल, १०६-१०७
अलंकारशास्त्र, १३३-१३५
अलाहाबाद विद्यापीठ, १८-१९, ३२
ऑटो, रुडॉल्फ, १६०
उपनिषदे, १४२ पासून पुढे
एकनाथ, १४० पासून पुढे
कबीर, ९३, १३१
कांट, ६०, ८४ पासून पुढे, ११८, १२७, १२९, १६०, १६७-१६८
कार्लाइल, १०१ पासून पुढे
क्रमयोग, ९१-९२
गांधी, महात्मा, १०८ पासून पुढे
ग्रीक व संस्कृत, १११-११२
चक्र, १०९
चतुष्कोटी पद्धती, १५२, १५३
ज्ञानेश्वर, १२१
झा, सर गंगानाथ, १९,२०
झेनो, १०७
तत्त्वचिंतनाचा विकास, ११३-११५
तत्त्वज्ञान, ५४-५५, ६६-६८, ६९-७१
तर्काभास, ३३-३४
तुकाराम, १२२-१२३
तुलसीदास, १२८-१२९
ध्यानगीता, १५५ पासून पुढे
ध्यानाचे प्रकार, १५४, १६५-१६६
नयाभास, १६३-१६५
पंचसूत्री (साक्षात्कारशास्त्राची), १२६
पारस्परिक कारणता, ९३-९४
पुस्तक-परीक्षण, ४३-४४, ११२-११३
भगवद्‌गीता, १५९ पासून पुढे
भरतवाक्य, १३४-१३५
भाऊसाहेब महाराज, ९८-९९, १५८
भाषांतराची कला, ८-१०
भाषाशास्त्र, ३९-४१
मानसशास्त्र, २२-२४, २६-२७, ३४-३६, ३८, ५६-६०, ६१
रसेल, बर्ट्रँड, १०७
राधाकृष्णन्, डॉ. सर्वपल्ली, २५
रामदास, १२३
रामानुजाचार्य, १५४
रॉय, डॉ. शिवशंकर, २९-३०, ३१-३२
विज्ञानाचे प्रेम, ८७-८८
विधायक-मीमांसा-पद्धती, ८३-८४
विश्लेषण-पद्धती, ८०-८१
वेदान्त, १४९ पासून पुढे
शंकराचार्य, १५४
शरणागती, १३६
शिवलिंगव्वा, १०० ✓
श्री अरविंद, १०५-१०६
संश्लेषण-पद्धती, ८०-८१
समाजसेवकाची भूमिका, ३७-३९
सवयीचे फायदे, २६-२७
साक्षात्काराचे निकष, १३७-१३८

सुसंबद्धता, ८८-९०
स्थितप्रज्ञ, १६२-१६३
स्मरणशक्ती, २२-२३
हेराक्लाइटस, १०५, १०६

संत महात्म्यांना लौकिक चरित्र असे नसतेच. त्यांचे तत्त्वचिंतन व आत्मचिंतन हेच त्यांचे चरित्र. तरीसुद्धा आपण त्या महान व्यक्तिमत्त्वामागचा माणूस शोधण्याचा प्रयत्न करतच असतो. साक्षात्कारी संत ही गुरुदेव रा. द. रानडे यांच्या जीवनाची बाजू सामान्य माणसाला सहजासहजी आकळणे दुरापास्त आहे. पण अध्यापक आणि ग्रंथकाराची त्यांची भूमिका आपल्याला जवळची वाटते. ते अभ्यास कसे करीत, वर्गात कसे शिकवीत, त्यांच्या लिखाणाची पूर्वतयारी कशी चाले, त्यांच्या ग्रंथांतून कोणकोणत्या गोष्टींचे विवरण आले आहे, हे विषय आपल्या आटोक्यातील आहेत. याच गोष्टी प्रस्तुत पुस्तकात हाताळल्या आहेत. साक्षात्कारी संत या गुरुदेवांच्या चिरपरिचित दर्शनाहून वेगळी असणारी त्यांची वाङ्मयी मूर्ती इथे दृष्टीस पडते.